नवभारत ग्रंथमाला : २२

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ७३२
१९५६

# टिळक आणि आगरकर


REFBK-0008944

किंमत ३॥ रुपये

श्री. ना. बनहट्टी

# टिळक आणि आगरकर





ी. ना. बनहट्टी

केसरी

सुधारक.

THE SUDHARAK OR REFORMER

POONA:—MONDAY, 14 JULY 1890.

# टिळक आणि आगरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत.
अनुक्रमांक २०४०७ वि:
क्रमांक ८.३२ नों. दि: ३/१/७५६

लेखक

श्रीनिवास नारायण बनहट्टी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८९४४
ठाणे

सुविचार प्रका … लिमिटेड,

REFBK-0008944

शके १८७८] किंमत साडेतीन रुपये [सन १९५६

नवभारत ग्रंथमाला : २२

संचालक—श्री. ना. बनहट्टी

# टिळक आणि आगरकर

प्रथमावृत्ति : १ ऑगस्ट १९५६

मुद्रक व प्रकाशक

**पां. ना. बनहट्टी**, बी. एस्सी.,

संचालक, सुविचार प्रकाशन मंडळ, प्रा० लि०, धनतोली, नागपूर.

व्यवस्थापक, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १

## पंचवीस वर्षें

आज टिळक आगरकरांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने 'नवभारत ग्रंथमाले'मधून हें पुस्तक वाचकांस सादर करण्याचा योग येत आहे याबद्दल समाधान वाटतें. त्या पुण्यपुरुषांच्या कृपेने ही प्रेरणा झाली व सिद्धीस गेली.

टिळक आगरकरांच्या प्रधान जीवनकार्यांचें हें त्रोटक वैचारिक समालोचन आहे. त्यांच्या समग्र जीवनकार्याचें समालोचन नव्हे, चरित्र तर नव्हेच नव्हे. अशा तऱ्हेचें पुस्तक अद्याप झालें नाही असें वाटलें, म्हणून हा प्रयत्न केला. दोघांच्याहि चरित्रांच्या पुष्कळच पैलूंचा या पुस्तकांत नुसता निर्देशहि झालेला नाही. तसा उद्देशच नव्हता.

बरोबर पंचवीस वर्षांपूर्वी 'नवभारत ग्रंथमाले'चा उद्योग सुरू झाला. मालेचें पहिलें पुस्तक 'ज्ञानोपासना' जुलै १९३१ मध्ये प्रसिद्ध झालें. आज पंचवीस वर्षांची सांगता महाराष्ट्राच्या पुण्यपुरुषांना वाहावयाच्या पुस्तकरूपी श्रद्धांजलीच्या योगाने होत आहे हा एक शुभ योगायोग होय.

'माला' सुरू करतांना जें पत्रक काढलें त्यांत पुढील मजकूर होता—

**"आपल्या राष्ट्रास कशाची अत्यंत जरूरी आहे?**

"ज्ञान हें सर्व उत्कर्षाचें मूळ आहे. 'ज्ञानाच्या अभावीं मनुष्य पशूसारखा आहे' हें संस्कृत सुभाषित सर्वांच्या माहितीचें आहे. युरोपांतील व अमेरिकेंतील राष्ट्रें जीं आज उन्नतीच्या शिखरावर चढलीं आहेत तीं मुख्यत्वेंकरून ज्ञानाच्या बळावर, हें कोणास सांगावयास नको. जगतांतील उन्नतीचा, त्याचप्रमाणे निरतिशय आनंदाचा व समाधनाचा मूळ पायाच असें जें ज्ञान तें आपल्या राष्ट्रांतील लोकांस सुलभ करून देण्यासाठी **'नवभारत ग्रंथमाल**'चा अवतार झाला आहे.

## विद्वानांस आपलें कर्तव्य करावयास लावणारी ग्रंथमाला

" कोणत्याही देशांतील विद्वानांचें कर्तव्य दोन प्रकारचें असतें. १ ज्ञानसंवर्धन व २ ज्ञानदान. अहर्निश ज्ञानसंपादनाच्या व ज्ञानसंवर्धनाच्या कामांत गर्क असणें हेंच पाश्चात्त्य देशांतील विद्यापीठांमधील विद्वान आपलें कर्तव्य समजतात.

"ज्ञानसंवर्धनाप्रमाणेच ज्ञानदानाचें कर्तव्यहि पाश्चात्त्य देशांतील विद्वान लोक उत्कृष्टपणें बजावतात. निरनिराळ्या पुस्तकमाला, सामान्य जनतेसाठी सोप्या रीतीने लिहिलेलीं हजारों लहानमोठीं पुस्तकें, शेकडों कोश व संग्रह–या सर्व गोष्टी पाश्चात्यांच्या ज्ञानप्रसाराच्या आस्थेची उत्तम साक्ष देतात.

" परंतु आपल्या देशांतील विद्वद्वर्गाकडून ज्ञानसंवर्धन व ज्ञानप्रसार हीं दोन्ही कर्तव्यें जशीं बजावलीं जावीं तशीं जात नाहीत. आपला देश पाश्चात्त्यांच्या मागे रेंगाळत राहण्यास जीं कारणें आहेत, त्यांपैकी हें एक प्रमुख आहे हें कोणासहि कबूल करावें लागेल.

" अशा स्थितींत ही माला विद्वानांकडून ज्ञानसंपादनाचें व ज्ञान-प्रसाराचें कार्य घडवून आणण्यासाठी जन्मास आली आहे. हिंदुस्थानच्या बहुतेक सर्व विश्वविद्यालयांमधून काम करीत असलेल्या विद्वान महाराष्ट्रीय अध्यापकांचा या योजनेस पाठिंबा आहे. पुष्कळ विद्वानांनी अविरत लेखनसाहाय्य देण्याचें कबूल केलें आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या बाहेरील तरुण, व्यासंगी व उत्साही विद्वानांचें व सुप्रसिद्ध वाङ्मयसेवकांचेंहि साहाय्य या मालेस मिळणार आहे."

या उद्देशानुसार यथाशक्ति काम करण्याचा प्रयत्न केला. वर्षांतून अंदाजें तीन पुस्तकें प्रसिद्ध करावींत असा हेतु होता. त्याप्रमाणे प्रथम कांही वर्षें पुस्तकें प्रसिद्ध करतां आलीं. पुढे 'माला' अखंड चालू ठेवण्याच्या कामासाठी आमची शक्ति तोकडी पडली, हें कबूल केलें पाहिजे.

विद्वानांचीं लेखनसाहाय्याचीं आश्वासनें होतीं. पण मालेचा उद्देश, कांही विशिष्ट योजनेनुसार पद्धतशीर रीतीने शास्त्रें, विद्या, कला, इत्यादि विषयांवर अधिकारी विद्वानांकडून ग्रंथ लिहून घेणें, तो जसा म्हणावा तसा सिद्धीस जाण्याचें लक्षण दिसेना. विद्वानांनी निरनिराळ्या विषयांवर आपआपल्या वैयक्तिक उद्देशांनुसार लिहिलेले ग्रंथ स्वीकारावे लागले. हे ग्रंथ उत्तम होते; मराठी वाङ्मयास भूषणभूत ठरले. या सर्व ग्रंथकारांचे आम्ही अतिशय आभारी आहों. पण ज्ञानाचा प्रांत पद्धतशीर रीतीने आक्रमण करण्याची दृष्टि त्यांत राहूं शकली नाही. असे ग्रंथ अधिकारी विद्वानांकडून लिहून घेणें दुरापास्त असा अनुभव आला. ही कदाचित आमची असमर्थता असेल. पण असें झालें खरें. मालेच्या उद्दिष्ट हेतूच्या सिद्धीच्या दृष्टीने ही कमतरता जाणवली.

पुष्कळ अंतरायानंतर आता हें पुष्प प्रसिद्ध होत आहे. सामूहिक उद्दिष्टाच्या बाबतींत कमतरता भासली तर 'एकला चलो रे' हा मंत्र आहेच.

पुस्तक लिहितांना कांही सामग्रीची उणीव भासली. तेव्हा सन्मित्र प्राध्यापक श्री. रा. पारसनीस आणि श्री. आपटे गुरुजी यांनी आपल्याजवळचीं पुस्तकें देऊन उपकृत केलें. त्यांचें ऋणस्मरण अवश्य केलें पाहिजे.

शंभरावी टिळकजयंती<br>
आषाढ कृष्ण ६ शके १८७८<br>
२९-७-१९५६

**श्री. ना. बनहट्टी**

# नवभारत ग्रंथमाला

**या मालेंतील प्रत्येक ग्रंथ त्या त्या विषयावरील सर्वश्रेष्ठ व प्रमाणभूत गणला जातो.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ज्ञानोपासना (आवृत्ति २ री) | श्री. ना. बनहट्टी | रु. २ |
| २. | महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास (आवृत्ति ३ री) | डॉ. शं. दा. पेंडसे | रु. ३ |
| ३. | शेक्सपियर (आवृत्ति २ री) | प्रा. ग. ह. केळकर | रु. २ |
| ४. | राज्यशास्त्र (शिल्लक नाही) | न. चिं. केळकर | |
| ५. | अमेरिका पूर्वखंड (शिल्लक नाही) | ना. ह. आपटे | |
| ६. | भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न | कर्मवीर वि. रा. शिंदे | रु. २ |
| ७. | नागरिकनीति (आवृत्ति दुसरी) | कै. प्रा. श्री. व्यं. पुणतांबेकर | रु. ३॥ |
| ८. | कालिदास (शिल्लक नाही) | म. म. वा. वि. मिराशी | |
| ९. | प्राचीन भारतीय शिक्षणपद्धति | डॉ. अ. स. अळतेकर | रु. २ |
| १०. | भारतीय समाजशास्त्र | डॉ. श्री. व्यं. केतकर | रु. २ |
| ११. | राजपूत संस्कृति | ह. वा. देशपांडे | रु. २ |
| १२. | राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास | ह. वा. देशपांडे | रु. २ |
| १३. | वनस्पतिजीवन | श्री. ल. आजरेकर | रु. २ |
| १४. | हिंदी लोकसंख्येचा प्रश्न | डॉ. सौ. चंद्रकला हाटे व प्रा. कृष्णाबाई कोल्हटकर | रु. २ |
| १५. | बालकांचा मनोविकास (२ री आवृत्ति छापत आहे) | कै. न. ल. आठवले | |
| १६. | भगवान बुद्ध (पूर्वार्ध) | धर्मानंद कोसंबी | रु. २ |
| १७. | भगवान बुद्ध (उत्तरार्ध) | धर्मानंद कोसंबी | रु. २ |
| १८. | चरित्र, आत्मचरित्र : तंत्र आणि इतिहास | प्रा. अ. म. जोशी | रु. ३ |
| १९. | जगाच्या राजकारणांत (१५ नकाशे व आकृति) | गो. प्र. भावे | रु. ३ |
| २०. | विलायतेंतील अनुभव (सचित्र) | पु. गो. निजसुरे | रु. ३ |
| २१. | आधुनिक मराठी कविता | प्रा. भवानीशंकर श्री. पंडित | रु. ५ |
| २२. | टिळक आणि आगरकर | श्री. ना. बनहट्टी | रु. ३॥ |

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. भूमिका | ... | १ |
| २. पूर्वपीठिका | ... | ५ |
| ३. पूर्वगामी शिल्पकार | ... | २८ |
| ४. जीवनमार्गाचा निश्चय | ... | ४९ |
| ५. शाळा, सोसायटी व कॉलेज | ... | ५६ |
| ६. दोलायमान केसरी | ... | ८० |
| ७. मित्रांचे शत्रू बनले | ... | ९४ |
| ८. भारतीय बुद्धिवादाचा जनक | ... | १०८ |
| ९. भारतीय असंतोषाचा जनक | ... | १२१ |
| १०. हृदयेनापराजितः | ... | १५० |
| ११. मानमहतामग्रेसरः केसरी | ... | १७६ |
| १२. अद्वितीय लोकनायक आणि मुत्सद्दी | ... | १९३ |
| १३. प्राप्य वरान्निबोधत | ... | २११ |
| सूची | ... | २२३ |

# शुद्धिपत्र

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४३ | २४ | देशाभिमानी | देशाभिमानी संप्रदाय |
| ४६ | १४ | पाहतां अत्यंत | अत्यंत |
| ५० | ४ | सद्भाभावनांचें | सद्भावनांचें |
| ५२ | ५ | असलेल्या | असलेला |
| ५४ | ६ | ... | गुरुजी या शब्दावर पुढील प्रमाणे टीप वाचावी "लो. बाळ गंगाधर टिळक यांचें चरित्र, ले. कृ. आ. गुरुजी, १९०६ पृ. १०६." |
| ५८ | ८ | Establistment | Establishment |
| ६२ | २० | होसा | होता |
| ९४ | २१ | विषाद | विषार |
| ९५ | ३ | पुस्तकांचें | पुस्तकाचें |
| १०९ | १७ | आधिभौतिक | अतिभौतिक |
| ११७ | १९ | संप्रदायी | सुधारणासंप्रदायी |
| १७२ | ४२ | एकनिष्ट | एकनिष्ठ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.

# टिळक आणि आगरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 20407 दि.
क्रमांक 632 नों: दि:

## १. भूमिका

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म झाल्याला आज शंभर वर्षें पूर्ण झालीं. भारतासारख्या प्राचीन राष्ट्राच्या आयुष्यांत शंभर वर्षें म्हणजे फार मोठा कालावधि नव्हे. पण या एका शतकांत या राष्ट्रांत जीं प्रचंड स्थित्यंतरें झालीं तीं लक्षांत घेतलीं म्हणजे मन विस्मयचकित होतें. राजा रामचन्द्राला वनवासानंतर पुष्कळ वर्षांनी पुन्हा एकदा दंडकारण्यांत येण्याचा प्रसंग आला तेव्हा

जिथे होतें पाणी दिसति नदिचीं तेथ पुलिनें ।
विपर्यासें झालीं घनविरळ सारीं तरुवनें ॥

अशी जिकडे तिकडे उलटापालट झाल्याचा अनुभव आला. दण्डकारण्यांतला देखावा केवळ निसर्गाच्या प्रभावामुळे बदलला होता, पण आपल्या या महान राष्ट्रांत गेल्या शंभर वर्षांत सर्व बाबतींत जी अभूतपूर्व क्रान्ति घडून आली आहे ती उत्तुंग प्रतिभेच्या, अथांग भावनेच्या आणि विशाल अनुभूतीच्या अनेक महाभागांच्या अविरत प्रयत्नांमुळे घडून आली आहे. भारताच्या भवितव्याला परिणामकारक आकार देणारे द्रष्टे, उद्गाते व नेते होऊन गेले, त्यांत टिळकांचें स्थान फार मोठें आहे; इतकें मोठें, की अखिल भारतांतील तरुणांना अनंतकालपर्यन्त त्यांच्या प्रतापी चरित्रापासून स्फूर्ति मिळत राहावी. या स्फूर्तीचा साठा आपण आपल्या

जीवनामध्ये करावा हाच प्रमुख उद्देश या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या चरित्राचें अवलोकन व मनन करण्यामध्ये आपला असला पाहिजे.

टिळक हे महाराष्ट्राचे सुपुत्र होते. मराठी जनतेच्या त्या काळांतल्या सामाजिक जीवनांतून त्यांचें व्यक्तिमत्त्व निर्माण झालें होतें. सुमारें १८९५ पर्यन्त त्यांच्या कार्यांचा व्याप आणि कीर्तीचा प्रसार मराठी प्रदेशापुरताच झालेला होता. त्यांचें लिहिणें व बोलणें बहुतेक सर्व मराठींतून चाले. साहजिकपणें त्यांत बराचसा भाग मराठी जनतेचे विशिष्ट प्रश्न, तिच्या विशिष्ट चळवळी आणि अनेक स्थानिक अथवा प्रादेशिक घटना यांना अनुलक्षून असे. मनुष्य कितीहि मोठा झाला तरी तो स्थल आणि काल या उपाधींनी जखडलेला असतो. अर्थात् कोणत्याहि राजकीय वा सामाजिक नेत्याचें कर्तृत्व बरेंचसें स्थानिक, प्रादेशिक व तात्कालिक गोष्टींवर खर्च पडलेलें असणें हें अपरिहार्य आहे. असें जरी असलें, तथापि टिळकांच्या विचारांची भूमिका प्रथमपासून अखिल भारतीय स्वरूपाची होती. जनतेच्या अंतःकरणांत शिरून तिला आपलेंसें करावें यासाठी जनतेच्या भाषेमध्ये लिहिण्याबोलण्याचा क्रम त्यांनी अंगीकारला होता; त्याचप्रमाणे मराठी समाजाचा ते एक अंश असल्यामुळे मराठी जनतेचे प्रश्न व तिच्या चळवळी निकटवर्तित्वामुळे त्यांचें लक्ष अधिक वेधून घेत असत, तरी त्यांच्या विचारांची भारतीय बैठक कधीहि डळमळीत झाली नाही. स्थानिक व प्रादेशिक प्रश्नांकडे देखील ते भारतीय दृष्टिकोनांतून पाहत असत; भारताच्या व्यापक उन्नतीच्या दृष्टीने प्रत्येक विचाराचें अथवा चळवळीचें इष्टानिष्टत्व ठरवीत असत. पुढे पुढे आयुष्याच्या उत्तरार्धांत तर प्रादेशिक बाबतींवरून त्यांचें लक्ष कमी होऊन अखिल भारताचें राजकारण हाच त्यांच्या विचाराचा व कृतीचा विषय बनला. तेव्हा महाराष्ट्राने अखिल भारताच्या सेवेला अर्पण केलेला तेजस्वी महापुरुष असें जर टिळकांचें वर्णन केलें तर ते पूर्णपणें यथार्थ ठरेल.

टिळक ज्या सालीं जन्मले त्याच सालीं गोपाळ गणेश आगरकर या थोर पुरुषाचा जन्म झाला. अर्थात त्यांची जन्मशताब्दी याच वर्षी महाराष्ट्रांत साजरी करण्यांत येत आहे. त्यांचा संबंध टिळकांशीं विविध

प्रकारांनी आला. वृत्तीने आणि विचारांनी टिळकांहून फार भिन्न असलेल्या या तरुणाची कॉलेजांत असतांना टिळकांशीं गाठ पडली आणि दोघांनी स्वार्थत्यागपूर्वक देशसेवेला वाहून घेण्याचा निश्चय केला. पुढे दोघे एकमेकांचे सहकारी म्हणून कर्तव्याच्या क्षेत्रांत उतरले. पण हें सहकार्य टिकलें नाही. मतभेदास आरंभ झाला. मतभेदांचें पर्यवसान मतविरोधांत झालें. कसलीहि बाकी न ठेवतां दोघांनी एकमेकांवर तीक्ष्ण प्रहार केले. वाद खेळत असतांच रणांगणावर लढत मरणाऱ्या वीराप्रमाणे आगरकरांचा अंत झाला.

आज त्या गोष्टीलाहि साठ वर्षें होऊन गेलीं आहेत. इतक्या दूर अंतरावरून विहंगम दृष्टीने आपण या वीरपुरुषांच्या भांडणाकडे पाहूं लागलों म्हणजे त्यांत एक प्रकारचें सौंदर्य आपण अनुभवूं शकतों. त्या काळांतल्या त्यांच्या भावनांनी आपलीं मनें आविष्ट करून घेऊन त्यांच्याकडे पाहण्याची आजच्या काळांत कांही गरज नाही. शांत मनाने आणि विवेचक बुद्धीने आपण त्या कलहाकडे पाहूं लागलों म्हणजे तो आपणास हृदयंगम भासूं लागेल; कारण तत्त्वरूपी रत्नांना प्रसवणारें तें भव्य विचारमंथन होतें. त्यांत वैयक्तिक मत्सर किंवा किल्मिष मुळीच नव्हतें. राष्ट्रपुरुषाच्या कोणत्या अंगाकडे प्रथम लक्ष द्यावें, समाजजीवनाच्या कोणत्या बाजू कशा सुधाराव्यात, याविषयींचा तो वाद होता. त्यांचा तो तत्त्वनिष्ठ समरचमत्कार आजहि आपणांस बोधप्रद वाटेल.

एकमेकांचे मित्र व सहकारी म्हणून जीवनक्रमास सुरुवात करणाऱ्या, पण अन्तीं एकमेकांचे कट्टे विरोधक बनलेल्या या दोन महापुरुषांच्या जीवनकार्याचें एकत्र अवलोकन अत्यंत मनोरम व बोधप्रद ठरणारें असल्यामुळे त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने तसा प्रयत्न येथे करण्यांत येत आहे.

राष्ट्राच्या जीवनाचे धागेदोरे कधीहि अजीबात तुटत नाहीत; मागच्या काळांतून पुढच्या काळांत ते अखंडपणें गेलेले असतात. भूतकालीन इतिहासांतून भविष्यकालीन घटना उद्भवतात; मागच्या संस्कारांच्या योगानेच पुढील प्रारब्ध ठरत असतें. तेव्हा मागच्या इतिहासाचें सम्यक् ज्ञान करून घेतल्याने आपलें मन प्रकाशित होऊन आपल्या राष्ट्राची पुढील वाटचाल

अधिक डोळसपणें अंदाजण्याचें सामर्थ्य आपणांस येणार आहे. राष्ट्रोद्धाराचा आणि समाजोन्नतीचा विचार करतांना टिळकांनी व आगरकरांनी जीं तत्त्वें प्रतिपादिलीं, जे मार्ग उपदेशिले, त्यांच्यापासून आपणाला पुष्कळच बोध घेतां येईल. कोणच्या तत्त्वांचा परिणाम इष्ट झाला, कोणच्या तत्त्वांचा अनिष्ट झाला, कोणचे मार्ग हितकर ठरले, कोणचे अहितकर ठरले, याचा सारासार विचार निर्विकार मनाने आता करतां येईल. आणि योग्य तत्त्वांचें व मार्गांचें ग्रहण करणें सुलभ होईल. उदात्त प्रेरणांचा लाभ हा तर सर्वांत मोठा म्हणतां येईल. त्याग, सेवा, धैर्य, भक्ति इत्यादि गुणांची प्रेरणा शेकडो देशभक्तांना या महापुरुषांच्या जीवनापासून आजवर मिळाली आहे; आपण विनीत भावाने आणि विवेचक बुद्धीने त्यांच्या चरित्राकडे पाहूं तर आपलें जीवनहि तशाच प्रेरणांनी उजळून निघेल यांत संशय नाही.

# २. पूर्वपीठिका

## नवा मनु

टिळक आगरकरांच्या जीवनकार्याचें मर्म समजण्यास ज्या भूतकालांतून ते जन्मले त्याचें यथार्थ ज्ञान करून घेणें अवश्य आहे. या दोघांच्या कर्तृत्वाला सुरवात स्थूलमानानें इ० स० १८८० सालीं झाली. या दोघांचीं जीवनपुष्पें ओसाड जागेंत एकाकी उमललीं अशांतला प्रकार नाही. झाडाझुडपांनी गजबजलेल्या महाराष्ट्राच्या उपवनांत तीं निर्माण झालीं व विकास पावलीं. केळकरांनी म्हटल्याप्रमाणे "टिळकांची स्फूर्ति ही कांही कोऱ्या मानसिक कागदावर महाराष्ट्रानें प्रथमच काढलेली परीक्षेची पुस्ती नव्हे." इंग्रजी अमलामुळे एकदम नवा मनु अवतरला असें म्हटलें तरी, इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतरहि टिळक आगरकर कर्ते होण्यापूर्वी महाराष्ट्रांतील जनतेच्या तीन पिढ्या लोटल्या होत्या; आणि या साठ वर्षांच्या काळामध्ये सामाजिक जीवनाचा विशिष्ट दिशांनी विकास घडून येत होता.

भारतीय संस्कृति आणि भारतीय जनतेचें जीवन यांच्यामध्ये समानतेचे बळकट धागे काश्मीरपासून तों कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र अनुस्यूत झालेले दिसत असले, तरी भिन्न भिन्न भाषिक समाजांची रचना व त्यांची आर्थिक संघटना निरनिराळ्या प्रकारांनी झालेली आढळते. इंग्रजी सत्तेची स्थापना व तिचें दृढीकरण निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या प्रकारें झालें आणि तिचे परिणाम पूर्वीपासून चालत आलेल्या समाजस्थितीवर भिन्न भिन्न प्रांतांत भिन्न तऱ्हेचे झाले. ज्या मराठी समाजांत टिळक आगरकर जन्मले त्याचें विकसन पूर्वीपासून कांही एका विशिष्ट तऱ्हेने होत आलें होतें. टिळक आगरकरांच्या जीवनाला जो विशिष्ट आकार प्राप्त झाला तो देण्यामध्ये मराठी समाजाच्या पूर्वावस्थेचा बराच हात असणें हें क्रमप्राप्त

आहे. त्या पूर्वावस्थेचें थोडक्यांत, परंतु शोधक बुद्धीने अवलोकन करणें हें आपलें कर्तव्य ठरतें.

पेशवाई समाप्त होऊन इंग्रजी राज्याचा झेंडा इ० स० १८१८ सालीं शनवार वाडयावर लागला, तेव्हापासून टिळक आगरकरांनी सार्वजनिक आयुष्यांत प्रवेश करण्याच्या काळापर्यंत (इ. स. १८८०–८१) स्थूलमानाने वीस बावीस वर्षांच्या तीन पिढया किंवा कालखंड कल्पितां येतात. या तीन पिढयांत मराठी जनतेची सामाजिक रचना व आर्थिक संघटना कसकशी बदलत गेली आणि सामुदायिक जीवनाच्या जाणिवेचा कसकसा विकास होत गेला हें पाहणें अतिशय उद्बोधक होईल.

## पहिली पिढी ( इ. स. १८१८–१८३८ )

पहिलीं सुमारें वीस वर्षें मराठी समाज एक थंड गोळा होऊन पडला होता. इंग्रज बहादराच्या दराऱ्यामुळे सर्वत्र शांतता व सुव्यवस्था झाली होती. स्वाऱ्या, दंगेधोपे, लुटालूट वगैरे बंद झाल्यामुळे शेतांत पिकविलेलें अन्न रयत सुखाने खाऊं शकत होती. औद्योगिक क्रांतीला आणि यंत्रयुगाला इंग्लंडांत नुकती कोठे सुरुवात झाली असल्यामुळे कापड व इतर यंत्रनिर्मित पक्का माल मोठया प्रमाणांत इकडे येऊं लागला नव्हता. त्यामुळे देशी उद्योगधंदे बहुतांशीं टिकून होते. इनामदार, जहागिरदार वगैरे मराठेशाहींतला सरंजामदार वर्ग निकामी होऊन स्वस्थ बसला होता. तसेच त्यांच्या पदरचे फौजी लोक व फौजेवर गुजराण करणारे बाजारबुणगे आपापल्या घरीं येऊन स्वस्थ बसले होते. या सर्व लोकांचा भार शेतीवर पडला, आणि खंडण्या व लूट यांच्या योगाने इतर प्रांतांतून मराठी मुलखांत येणारा पैशाचा ओघ आटला. त्यामुळे मराठी मुलखांत तशी विशेष आबादानी नांदूं लागली नाही; पण एकंदरीने लोक खाऊन पिऊन सुखी होते, यांत शंका नाही. ब्राह्मण व इतर पांढरपेशा वर्ग याचे व्यवसाय मुख्यत्वेंकरून तीन : शिपाईगिरी, कारकुनी आणि उपाध्येगिरी. उपाध्येगिरींतच वैदिकी, पंडिती, याज्ञिकी, हरिकीर्तन, पुराणप्रवचन इत्यादि पेशांचा समावेश करावयाचा. या तीन व्यवसायांपैकी पांढरपेशा वर्गाची शिपाईगिरी तर इंग्रजी जमान्यांत बुडालीच. कारकुनीपैकी

गावोगावचें कुलकर्णी वतन तेवढें राहिलें; बाकी इनामदार, जहागिरदार, संस्थानिक यांच्या फडांतली कारकुनी हळूहळू संकुचित होऊं लागली. पण याच्या उलट इंग्रज सरकारला आपलें राज्य चालविण्याकरिता कारकून व खालच्या दर्जाचे कामदार यांची जरूर भासूं लागली, तिथे ब्राह्मण व इतर पांढरपेशा वर्ग वेगाने घुसूं लागला.

इंग्रजी शिक्षणाला कंपनीसरकारने अधिकृत धोरण म्हणून सर्वत्र या काळांत सुरवात केली नव्हती. एतद्देशीय लोकांस शिक्षण द्यावें, पण तें देशी भाषांतूनच द्यावें असा सरकारचा संकल्प होता. तदनुसार गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टन याच्या प्रेरणेने व सरकारी मदतीने सन १८२० सालीं 'नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी' स्थापन होऊन तिने शाळा काढण्यास व पुस्तकें छापून प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. पुण्याची सुप्रसिद्ध विश्रामबाग पाठशाळा सन १८२१ सालीं सुरू झाली. तिच्यांत प्रथम जुन्या वेदशास्त्रादिकांचेंच शिक्षण देण्यांत येत असे. पण सरकारने नसलें तरी मिशनऱ्यांनी चंचुप्रवेश करून इंग्रजी शिक्षणाच्या शाळा काढण्यास आरंभ केला होता.

धर्माच्या व संस्कृत विद्येच्या आधारावर जगणारा जो शास्त्री, पण्डित, वैदिक, भिक्षुक, हरदास, पुराणिक इत्यादींचा वर्ग, तो पेशव्यांच्या काळांत चांगलाच पुष्ट झाला होता. रावबाजीची कारकीर्द आटपतांच या वर्गाला मिळणाऱ्या देकाराला एकदम धक्का बसला. तरी बरेचसे संस्थानिक व जहागिरदार या काळांत टिकून असल्यामुळे आणि लोकांची परंपरागत धर्मावरची श्रद्धा कायम असल्यामुळे या वर्गाचें पोषण बऱ्या प्रकारें चालू होतें.

## दुसरी पिढी (इ. स. १८३८–१८५८)

अशा रीतीने पहिलीं वीस वर्षें संथपणाचीं गेलीं. पुढच्या वीस बावीस वर्षांत, म्हणजे १८३८ ते १८६० या काळांत मात्र फार महत्त्वाच्या घडामोडी झाल्या आणि सामाजिक अवस्थांतराचा वेग खूप वाढला. या काळांतील स्थित्यंतराचें मुख्य लक्षण थोडक्यांत सांगावयाचें म्हटल्यास पेशवेकालीन सरंजामशाही समाजव्यवस्था मोडली जाऊन तिच्या जागीं

इंग्रज सरकारच्या प्रेरणेने द्रव्याधिष्ठित भांडवलशाही प्रस्थापित होऊं लागली, असें सांगतां येईल. भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत प्रत्येक कामाचें मूल्य पैशाने केलें जातें. सरंजामशाही अर्थव्यवस्थेंत व्यक्तीला तिचें पिढीजाद स्थान जन्मतःच प्राप्त होत असतें, तर भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत वंश-परंपरेचें महत्त्व नाहीसें होऊन व्यक्तीव्यक्तीमधील आर्थिक संबंध करारानें निश्चित केले जातात. व्यक्तीचें मोठेपण तिच्या संपत्तीवरून ठरतें. हिंदु-स्थानांतील समाजाची रचना जन्मजात जातींच्या पायावर झालेली असल्या-मुळे इंग्रजांनी लादलेली द्रव्याधिष्ठित समाजघटना इथे तात्रडतोब सुप्रतिष्ठित होऊं शकली नाही; तथापि तिने येथील परंपराप्राप्त समाजरचनेला हादरे देण्यास सुरवात केली यांत शंका नाही.

इंग्रज सरकारने भांडवलशाही अर्थव्यवस्था हिंदुस्थानांत चालू केली याचें कारण खुद्द इंग्लंडांत एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून एक प्रकारची सामाजिक क्रान्ति होऊन भांडवलशाहीच्या पद्धतीवर समाजरचना गेली होती. शिवाय ईस्ट इंडिया कंपनीला हिंदुस्थानचें जें आर्थिक शोषण करावयाचें होतें, त्याला द्रव्याधिष्ठित व्यवस्था ही अधिक सोयीची होती. बंगाल्यांत कायमच्या जमीनदारीची स्थापना पूर्वीच केली गेली होती. परन्तु ही चूक झाली असें कंपनीच्या चालकांच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. बंगालनंतर जिंकलेल्या प्रान्तांत कंपनीसरकारने ही चूक न करण्याची खबर-दारी घेतली. सरकार हें जमिनीचें मालक हें तत्त्व हळूहळू प्रस्थापित करण्यांत आलें. सरकारने जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना सारा ठरवून देऊन त्यांना एकप्रकारें खंडकरी कुळें बनविलें आणि करारमूलक आर्थिक व्यवहाराच्या क्षेत्रांत आणून सोडलें.

अर्थात जमीनदार, इनामदार, जहागिरदार इत्यादि सरंजामदारांचा वर्ग या काळांत पूर्णपणे उध्वस्त झाला—करण्यांत आला. पेशवाईच्या अखेरीस लष्करी कामगिरी आटपल्यामुळे तो निष्प्रयोजन झालाच होता. निकामी झालेला अवयव गळून पडतो, तसा तो आपल्या मरणाने मरणारच होता; पण या काळांत त्याच्यावर योजनापूर्वक घाव घालून त्याला जमीन-दोस्त करण्यांत आलें. कंपनी सरकारने इनाम कमिशन नेमून सुमारें दहा-

बारा वर्षांत हजारों इनामें खालसा केलीं. हें काम इ. स. १८६१ पर्यंत पूर्ण झालें. स्वतंत्र तह करून ज्यांचे राज्यशासनाचे अधिकार मान्य केले होते अशीं संस्थानें मात्र राहिलीं. पण अव्यवस्था, निपुत्रिकता इत्यादि सबबींवर संस्थानें देखील खालसा करण्याचा कंपनी सरकारने सपाटा चालविला होता, हें इतिहासांत प्रसिद्ध आहे. मराठी मुलखांत सातारचें छत्रपतींचें राज्य आणि नागपूरच्या भोसल्यांचें राज्य अशीं दोन मोठीं राज्यें या सपाट्यास बळी पडलीं. मात्र या सपाट्याला सत्तावन सालच्या स्वातंत्र्ययुद्धाने एकदम आळा पडला. एकछत्री साम्राज्य स्थापून आपल्या नोकरशाहीचा अंमल सर्वत्र जारी करावा म्हणजे सर्व देशाचें आर्थिक शोषण करणें सुलभ होईल, असें इंग्रजांच्या राजनीतीचें धोरण लॉर्ड हेस्टिंग्ज्च्या वेळेपासून, म्हणजे १८१८ पासून ठरलें होतें. सन १८४० पासून तें धोरण विशेष धडाडीने अमलांत आणण्यांत येऊं लागलें. या दौडींत सत्तावन सालच्या बंडाची ठेच लागली तेव्हा भानावर येऊन इंग्रज सरकारने आपलें धोरण बदललें. सन १८५८ च्या जाहिरनाम्यांत संस्थानिकांना दत्तक घेण्याची परवानगी देऊन त्यांचीं संस्थानें राखलीं जातील असें आश्वासन देण्यांत आलें. ही गोष्ट केली त्या वेळीं नाइलाजानेच केली असेल; पण पुढे खालसा मुलखांतील प्रजेची हक्कांकरिता चळवळ सुरू झाल्यावर इंग्रज सरकारला संस्थानें हीं आपल्या सत्तेचे बालेकिल्ले म्हणून उपयोगी पडूं लागलीं. ‘नकळत केलें अन् पथ्यावर पडलें’ असा अनुभव इंग्रज सरकारला याबाबत आला असला पाहिजे.

इकडे सरंजामदार वर्ग जसजसा मोडून काढण्यांत आला, तसतशी तिकडे नोकरशाहीची वाढ करण्यांत येऊं लागली. प्रत्येक खात्यांतले वरिष्ठ अंमलदार गोरे ठेवून दुय्यम व कनिष्ठ श्रेणीचे अधिकारी एतद्देशीयांमधून नेमण्याचें धोरण अवलंबणें भागच होतें; कारण खालच्या वरच्या सर्व नोकऱ्यांसाठी गोरे लोक इंग्लंडांतून आणणें केवळ अशक्य होतें. प्रारंभीं कल्पना अशी होती की एतद्देशीय लोकांना इंग्रजी शिकविण्यापेक्षा इंग्रज अंमलदारांनीच एतद्देशीयांची भाषा (मराठी वगैरे) शिकावी. पुष्कळशा ‘नेटिवांना’ इंग्रजी शिकविण्यापेक्षा थोडयाशा इंग्रजांनी मराठी वगैरे शिकणें अधिक सुलभ व व्यवहार्य. पण हा विचार फार काळ टिकला नाही. मेकॉले

प्रभृति उदारमतवादी मुत्सद्यांनी इंग्रजीची बाजू जोराने उचलून धरली. इंग्रजी भाषा, वाङ्मय, तत्त्वज्ञान, शास्त्रें इत्यादींचें ज्ञान पुढारलेल्या वर्गांना दिलें म्हणजे ते इंग्रजी राहणीचा स्वीकार करतील, इंग्रजी संस्कृतीचे उपासक बनतील, इंग्रजी मालाचे ग्राहक बनतील; तात्पर्य, हे सुशिक्षित पुरते इंग्रजाळतील आणि ते इंग्रजाळले म्हणजे इंग्रजी राज्याचे चाहते व इंग्रजी व्यापाराचे संवर्धक बनतील, असें भविष्यकालीन दृश्य मेकॉले-मेटकाफ प्रभृतींच्या प्रतिभेला दिसत होतें. कांही चाणाक्ष विचारवंत इंग्रजांनी मात्र असा अंदाज वर्तविला की इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाने हे 'नेटिव्ह' राष्ट्राभिमानी बनतील आणि राजकीय हक्कांसाठी आमच्याशीं भांडूं लागतील. उदार-मनस्क मेकॉलेने हा संभवनीय धोका पदरांत घेतला; तो म्हणाला की, इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाने हिंदी सुशिक्षित लोक राष्ट्रीय स्वातंत्र्याचे भोक्ते बनून आमच्यावर उठतील तर त्यासारखा आमच्या राष्ट्राचा गौरव दुसरा कोणताच नाही, असें मी मानीन.

कसेंहि असो. मेकॉले प्रभृतींच्या पुरस्काराने इंग्रजी भाषा, वाङ्मय व पाश्चात्त्य विद्या यांचें शिक्षण हिंदी लोकांना द्यायचें ठरलें व त्याप्रमाणे चक्रें फिरूं लागलीं. सन १८४० सालीं 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' मुंबई इलाख्याकरिता स्थापन झालें. सगळीकडे इंग्रजी शिकविणाऱ्या शाळा (हाय-स्कुलें व मिडलस्कुलें) काढण्याचा उपक्रम सुरू झाला. या शाळांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता त्या काळीं 'हायर स्टांडर्ड' व 'लोअर स्टांडर्ड' अशा दोन परीक्षा असत. या परीक्षा पास झालेल्यांना सरकारच्या सर्व खात्यांतून धडाधड नोकऱ्या मिळूं लागल्या. अशा रीतीने सर्वसामान्य व्यवहारोपयोगी इंग्रजी शिक्षणाचा प्रसार आणि देशभर 'नेटिव्ह' नोकरशा-हीच्या भक्कम जेरबंदांची आवळणी या राज्यशासनास आवश्यक असलेल्या दोन साधनांची सिद्धता सरकारने या वीस वर्षांत केली.

इंग्रजी शिक्षणाच्या या कार्याला मिशनरी लोकांनी चांगला हातभार लावला, हें येथे नमूद केलें पाहिजे. पण शिक्षणप्रसार हें मिशनऱ्यांच्या चळवळीचें केवळ एक अंग होतें. सरकारकडून होणारा शिक्षणप्रसार आणि मिशनऱ्यांचा शिक्षणप्रसार यांत लक्ष्य व उद्देश यांच्या बाबतींत मोठा फरक

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक 20897 ... दि. ...
क्रमांक ... 832 ... नों: दि. ...



होता. सरकारच्या शिक्षणपद्धतीचें लक्ष्य ब्राह्मण आदि पुढारलेल्या जाती होत्या; या जातींच्या लोकांना इंग्रजी भाषा व पाश्चात्त्य विद्या यांचें शिक्षण देऊन सरकारी नोकरीस लायक बनवावयाचें आणि हे आंग्ल संस्कृतीचे उपासक व इंग्रजी सत्तेचे भाट बनतील, असे संस्कार त्यांच्या मनावर करायचे, हें उद्दिष्ट त्या शिक्षणाचें होतें. ब्राह्मणप्रमुख पांढरपेशा वर्ग समाजांत पुढारलेला होता, विद्याभ्यासंगाची परंपरा त्याच्यांत पूर्वीपासून चालत आलेली होती. या वर्गाचे जे तीन व्यवसाय मागे उल्लेखिले त्यांपैकी शिपाईगिरी तर मागेच बुडाली, इनामदार वर्ग नाहीसा झाल्यामुळे त्यांच्या पदरची कारकुनी संपुष्टांत आली व वैदिक, शास्त्री, भिक्षुक, हरदास, पुराणिक यांची वृत्तीहि त्यांचा आश्रयदाता वर्ग घटल्यामुळे, कमी झाली. इकडे इंग्रजी शिक्षणांत शिरल्याबरोबर चांगल्या पगाराची नोकरी वाढून ठेवल्यासारखी. तेव्हा हा ब्राह्मणादिक पांढरपेशांचा वर्ग शिवाशिवीचे व धर्म-समजुतींचे बांध उल्लंघून झपाट्याने इंग्रजी शिक्षणांत शिरला, हें क्रमप्राप्तच होतें. केवळ एका पिढीच्या अवकाशांत ब्राह्मणसमाजाच्या परिस्थितींत, आचारांत व मनोवृत्तींत हा बदल कसा घडून आला याचें मार्मिक वर्णन ‘ वाईकर भटजी ’ या कादंबरींत धनुर्धारींनी केलें आहे.

इंग्रजी शिकून तयार होत असलेल्या या पिढीमध्ये भयंकर मानसिक पोकळी निर्माण झाली होती. नोकरीमुळे येणारी मानमान्यता, संपन्नता व निश्चितता यांमुळे हा वर्ग बेदरकार व खुशालचेंडू बनला होता. त्यांच्या आचारविचाराला धरबंद राहिलेला नव्हता. खुद्द टिळकांनी १९०१ सालीं चिपळूणकरांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने भरलेल्या सभेंत एक निबंध वाचला त्यांत या पिढीच्या मनःस्थितीचें वर्णन केलें आहे.

“ इंग्रजी राज्यांत या मंडळीस ( इंग्रजी शिकलेल्या पहिल्या पिढींतील लोकांस ) नवीन मिळालेल्या अधिकाराने हे बेपर्वा झालेले होते हें वर सांगितलेंच आहे. पण याखेरीज यांच्या अद्वातद्वा विचारआचाराचा समाजावर व विशेषेंकरून पुढारी कुटुंबांच्या गृहस्थितीवर फारच वाईट परिणाम झाला होता..... इंग्रजी शिक्षण-पद्धतीचा आमच्या समाजावर पहिला वाईट परिणाम म्हटला म्हणजे

त्यामुळे झालेली आमच्या पुढाऱ्यांच्या मनाची अव्यवस्थित वृत्ति आणि सदर वृत्तीच्या योगें बिघडलेली गृहव्यवस्था हा होय...... मद्यपान, वेश्यागमन वगैरे दुर्गुण बहुतेक संभावित गणले जात असत......

"विद्या, नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, व्यवस्थित आचरण आणि गृहस्थिति यांचा एकमेकांशीं जो नित्य संबंध असावा लागतो, व जो असल्याखेरीज राष्ट्रांतील विद्वान लोक पुढारीपणा घेऊन जोराने राष्ट्राचा उत्कर्ष करण्यास पात्र होत नाहीत, तो संबंधच इंग्रजी शिक्षणाने पहिल्याने तोडून टाकला, ही मोठया दुःखाची गोष्ट होय. नीतिदृष्ट्या याचा काय परिणाम झाला हें वर सांगितलेंच आहे, पण त्याखेरीज इतर बाबतींतहि अशा प्रकारच्या एकपक्षी शिक्षणापासून दुसरे अनेक वाईट परिणाम झाले. पाश्चिमात्त्य इंग्रजी विद्येने दिपून जाऊन पहिल्या पिढीचे डोळे फिरले आणि आपल्या देशांतील सर्व कांही गोष्टी त्यांस वाईट दिसूं लागल्या असें म्हणण्याचा परिपाठ आहे. पण यांतील खरें बीज काय हें पाहिलें असतां मी सांगितलेल्या गोष्टीकडेच वळावें लागेल."

सरकारी नोकरींत पडलेल्या या शिक्षित वर्गाची व्यावसायिक नीतिमत्ता मुळीच चांगली नव्हती. लाचखाऊपणा बोकाळला होता. लोकहितवादी म्हणतात: "कंपनी सरकारचे चाकरांत हजारांत लाच न खाणारा व ईश्वरास भिऊन चालणारा क्वचित असतो. बाकी सर्व शिपायांपासून प्रिन्सिपाल सदर अमीनपर्यंत शपथेचा व्यभिचार करतात......जो मनुष्य मुनसफाचें काम करतो, तो वेतनाइतका खर्च ठेवून पांच वर्षांत दहाहजार रुपये जवळ करितो......सामान्य कारकूनहि दहा वर्षें काम करतो, तर तो दोन हजार रुपये जवळ करितो." (शतपत्रें, पृ. ५७–५८).

या लिहिण्यांत अतिशयोक्तीचा अंश असणें संभवनीय आहे. एकजात सगळे कामगार लाचखाऊ होते असें समजण्याचें कारण नाही. लाचखाऊपणा, तोंडपुजेपणा, रयतेच्या भल्याविषयी बेपर्वाई इत्यादि अवगुणांचा मक्ता असुक एका काळांतल्या किंवा असुक एका प्रांतांतल्या सरकारी नोकरांकडेच होता अशी समजूत करून घेणें चुकीचें होईल. तथापि नोकरशाहीच्या त्या अव्वल अमदानींत, केवळ महाराष्ट्रांतच नव्हे, तर

सगळीकडे या अवगुणांचें अस्तित्व फार मोठया प्रमाणांत जाणवत होतें, हा निष्कर्ष तत्कालीन लिखाणावरून आपल्या मनांत उतरल्याखेरीज रहात नाही.

मिशनऱ्यांच्या चळवळीचा वर उल्लेख केलाच आहे. त्यांचा स्वधर्म-प्रसाराचा उद्योग या काळांत खूप जोराने चालू होता. इंग्रजी शाळा स्थापणें, दवाखाने चालविणें, लोकांना कपडे-पुस्तकें देणें, अशा अनेक रीतींनी लोकांना उपकारबद्ध करून त्यांना आपल्या कळपांत ओढण्याचा त्यांनी प्रयत्न चालविला. पुढारलेल्या शिक्षित वर्गाला युक्तिवादाने वळविणें आणि मागासलेल्या अशिक्षित लोकांना नानाप्रकारांनी मदत करून आपलेसे करणें असे दुहेरी उपाय ते योजीत असत. रे. मरेमिचेल, रे. निजबिट इत्यादि विद्वान मिशनरी मुंबईंत धर्मचर्चेचे वर्ग चालवीत असत. त्यांचा परिणाम होऊन बाबा पदमनजी, रामकृष्ण मोडक, नारायण शेषाद्रि इत्यादि कांही मंडळींनी खिस्ती धर्म स्वीकारला. खेडयापाडयांतून अशिक्षित दरिद्री समाजामध्ये, दलित वर्गामध्ये मिशनरींनी जे प्रयत्न चालविले होते ते संख्येच्या दृष्टीने अधिक फलद्रूप झाले. हजारों माणसें या काळांत बाटविलीं गेलीं.

पण खिस्ती मिशनऱ्यांचीं व्याख्यानें, चर्चा, वादविवाद यांच्या योगाने आमच्या पुढारलेल्या सुशिक्षित वर्गांत जी धर्मविषयक जागृति झाली ती विशेष महत्त्वाची गणली पाहिजे. खिस्ती मिशनऱ्यांच्या हल्ल्याचा परिणाम दोन प्रकारचा झाला. आपल्या (हिंदु) धर्मांतील चालीरीती व रूढ आचार किती दोषग्रस्त आहेत याची जाणीव होऊन त्यांत सुधारणा करूं इच्छिणारा सुधारक वर्ग निर्माण झाला; हा एक परिणाम. आणि धर्माभिमान जागृत करून व्याख्यानें लेख इत्यादिकांच्या द्वारा तोडीस तोड देऊन त्यांचा प्रतिकार करणारा धर्माभिमानी पंथ उदयास आला, हा दुसरा परिणाम. या दोन्ही पंथांची सुरवात याच काळांत झाली. सुधारणापंथी लोकांनी 'परमहंस सभा' नांवाची संस्था काढिली. मूर्तिपूजा आणि जातिभेद या दोन गोष्टींवर या मंडळीचा विशेष कटाक्ष असे. या सभेचें सर्व काम गुप्तपणे चालत असे. दर आठवडयास मंडळी जमत असत. तेथे एकेश्वरी मतानुसार प्रार्थना होत असे. जातिभेद-निषेधार्थ किरिस्तावाने बनविलेल्या

पावाचा तुकडा नवा सभासद करितांना त्याला खावयास देत असत. सन १८४० च्या सुमारास या सभेची स्थापना झाली व कालांतराने हिच्या शाखा पुणें, नगर, सातारा, बेळगाव, रत्नागिरी इ. स्थळीं चालू झाल्या. पण १८६० च्या सुमारास कोणा एका गृहस्थाने मंडळीचा सभासद म्हणून आंत शिरून सभासदांच्या यादीचें पुस्तक लांबविलें आणि सभासदांचीं नांवें व या सभेची माहिती छापून प्रसिद्ध केली. त्यामुळे सर्व मंडळींचें धाबें दणाणलें आणि परमहंस सभेचा एकदम लोप झाला ! समाजसुधारणेचे व धर्मसुधारणेचे विचार कित्येकांच्या मनांत उद्भवूं लागले होते, पण ते प्रकटपणें उच्चारून दाखविण्याचें धैर्य अद्याप या मंडळींच्या ठायीं आलें नव्हतें, असा बोध परमहंसांच्या या हकीकतीवरून मनांत उतरतो. सामाजिक बाबतींत स्त्रीशिक्षण, बालविवाहनिषेध, विधवापुनर्विवाह इत्यादि सुधारणांचे विचार प्रकट होण्यास या काळांत रीतसर सुरवात झाली होती. मुंबई व पुणें येथे मुलींसाठी शाळा काढण्यांत आल्या होत्या.

धर्माभिमान जागृत करून मिशनऱ्यांचा प्रतिकार करण्याच्या चळवळीला या काळांत मोठा जोर चढला होता. मिशनऱ्यांच्या युक्तिवादांचें खण्डन करण्याकरिता कांही जणांनी वृत्तपत्रें काढलीं. विद्वन्मणि कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचें 'विचारलहरी', बापू सदाशिव शेट यांचें 'सद्धर्मदीपिका' हीं यांपैकी वृत्तपत्रें होत. तथापि मिशनरीखण्डनाचा सर्वांत गाजलेला प्रयत्न विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचा. यांना 'वेदोक्त धर्मानुसार तूं जगांत तारक उपदेश कर' असा ईश्वरी साक्षात्कार झाला होता. वेदशास्त्रादिकांचें अध्ययन कांही झालें नसतांहि या साक्षात्काराच्या बळावर यांनी आत्मविश्वासाने व्याख्यानें देण्यास प्रारंभ केला. १८५६ सालीं ते मुंबईस आले व तेथे त्यांनी मिशनऱ्यांच्या विरुद्ध व्याख्यानांची मोहीम सुरू केली. यांच्या तुफानी प्रचारामुळे मिशनरी कुंठित झाले व त्यांच्या धर्मप्रसाराच्या मोहिमेला कांही आळा बसला. धर्मांतर केलेल्याला पुन्हा हिंदुधर्मांत घेण्याचा प्रयत्नहि या काळांत सुरू झाला.

या काळांत जी विचारजागृति झाली ती केवळ धार्मिक आणि सामाजिक बाबतींपुरतीच मर्यादित नव्हती. आर्थिक व राजकीय बाबतींवरहि

तिचा रोख होता आणि तो दिवसेंदिवस वाढतच गेला. याचें कारण असें की, इंग्रजी राज्याची मगरमिठी दिवसेंदिवस अधिकाधिक आवळ बनत चालली होती आणि तिचा कचका जाणवूं लागला होता. इंग्लंडांतील औद्योगिक क्रांति १८४० च्या सुमारास पुरी झाली होती. यांत्रिक सुधारणा अमलांत येऊन कापड, लोखंडी सामान वगैरे पक्क्या मालाच्या राशी विलायतेंतून निर्यात होऊन हिंदुस्थानांत घुसविण्यांत येऊं लागल्या होत्या. हिंदुस्थानांतील ग्रामीण उद्योगधंद्यांची पद्धतशीर खच्ची करण्यांत आली व इंग्लंडच्या पक्क्या मालानें हिंदी बाजारपेठ काबीज केली, ती मुख्यत्वेंकरून याच काळांत. उद्योगधंद्यांचा टेकू नाहीसा झाला तेव्हा रयतेचा सर्व भार शेतीच्या धंद्यावर पडला. विलायतेंतील कारखानदारांकरिता कच्चा माल निर्माण करणारे मजूर एवढेंच स्थान हिंदी रयतेचें शिल्लक राहिलें. तिची ऐपत झपाट्यानें खालावत गेली. एकदोन पिढ्यांतच हिंदी शेतकरी भयंकर कर्जबाजारी होऊन उपासमारीच्या काठावर येऊन बसला. जिथे रयतवारी पद्धति होती तिथे, म्हणजे मुंबई आणि मद्रास इलाख्यांत, त्याची परिस्थिति अधिकच भीषण झाली

देशांतील अफाट जनता याप्रमाणे कंगाल बनत चालली असतां भरभराटले केवळ दोन वर्ग. विलायतेस जाणाऱ्या कच्च्या मालाची आणि तिकडून येणाऱ्या पक्क्या मालाची दलाली करणारा व्यापारी वर्ग आणि मायबाप सरकारची चाकरी करून रयतेला पिळून काढणारा नोकरवर्ग. दलालीमध्ये अर्थात गुजराथी–पारशी हेच वरच्या पातळींत होते. परंतु त्यांचे हस्तक, आश्रित, आडत्ये किंवा मुनीम म्हणून बऱ्याच मराठी लोकांचीहि वर्णी लागत असे. सरकारी नोकरींत मात्र बहुतांशीं मराठी ब्राह्मणप्रमुख पांढरपेशा वर्गच होता. वकिली, मास्तरकी वगैरे अनुषंगी व्यवसायांवरहि याच वर्गानें कबजा केला होता. एक मास्तरकीखेरीज करून इतर सर्व स्थळीं हा पांढरपेशा वर्ग सर्वसामान्य जनतेला पिळून काढण्यासच कारणीभूत होत असे. प्रत्यक्ष लाच, त्याखेरीज दौऱ्यावर असतांनाची सरबराई वगैरे अनेक अन्यायी मार्गांनी सरकारी अधिकारी रयतेला लुटीत असत.

पण या सर्व चाललेल्या प्रकारांविरूद्ध आवाज उठविणारे लोकप्रतिनिधि, तुरळक कां होईनात, पांढरपेशांतूनच निर्माण व्हायला लागले होते.

समाजाच्या जिवंतपणाची खूण हीच होय, की समाजास बोचणाऱ्या, डिवचणाऱ्या घटनांनी त्यांतील विचारवंतांची विचारशक्ति जागृत व्हावी आणि त्यांनी आपल्या विचारांना बाहेर वाट करून द्यावी. भाऊ महाजन हे मराठींतील आद्य वृत्तपत्रकार. त्यांना त्या काळांतले बृहस्पतितुल्य विद्वान बाळशास्त्री जांभेकर यांची मदत होती. त्यांनी दर्पण, प्रभाकर, धूमकेतु हीं वृत्तपत्रें चालविलीं आणि लोकांचीं दुःखें वेशीवर टांगण्यास मदत केली. तशीच धर्माच्या नांवाखाली चाललेल्या अहितकर रूढींची निंदा करून सुधारणेची बाजू उचलून धरली. 'लोकहितवादीं'नी ब्राह्मणांचा नादानपणा, व्यसनीपणा आणि सरकारी नोकरांचा लाचखाऊपणा यांवर 'प्रभाकर' वर्तमानपत्रांत लेख लिहून कोरडे ओढले. इंग्रज सरकारच्या घातक आर्थिक धोरणावर टीका करून त्यांनी स्वदेशीची कल्पना पुढे मांडली. लोकशाही स्वराज्याचे काल्पनिक विचारतरंगहि त्यांच्या लेखनांत उमटलेले दिसून येतात. देशाच्या आर्थिक दैन्यावस्थेचें विवरण करून देशांतील कलाकौशल्य वृद्धिंगत व्हावें यासाठी उपाय सुचविणारे लेख अभ्यासू तरुणांनी मुंबईच्या ज्ञानप्रसारक मासिकांत लिहिले. वृत्तपत्रें, मासिकें आणि त्रैमासिकें या काळांत बरींच निघालीं, त्यांनी विचारवह्नि चेतविला. त्याची आंच या काळांत, सौम्यच खरी, पण जाणवूं लागली होती.

## तिसरी पिढी ( इ. स. १८५८–१८८० )

इंग्रजी अमलांतील दुसऱ्या पिढीच्या काळांत ( १८३८–१८५८ ) विचारांची जी पेरणी झाली तिचे अंकुर पुढच्या वीस बावीस वर्षांत जोमाने फोफावले. सामाजिक स्थित्यंतर खरोखरी १८३८ ते १८६० याच वीस बावीस वर्षांत अत्यन्त वेगाने झालें; समाजाचा जणू कायापालट झाला. याच्यापूर्वी सरंजामशाही अवस्थेंत समाज नांदत होता; त्याला या काळांत द्रव्यमूलक व्यक्तिप्रधान समाजव्यवस्थेची झूब राज्यकर्त्यांनी दिली. हें स्थित्यंतर आणि त्याचबरोबर पारतंत्र्याच्या जेरबंदांची आवळणी १८५८ पर्यंत बहुतांशीं पूर्ण झाली. अर्थात् पुढच्या वीस वर्षांत प्रत्यक्ष सामाजिक अवस्थांतर असें थोडेंच झालें; पूर्वीच्या स्थित्यंतराचा ओघ तसाच पुढे चालू राहिला. पण या स्थित्यंतराची वैचारिक प्रतिक्रिया या पुढच्या काळांत

अधिक जोराची, भावनाक्षोभाने युक्त अशी झाली. ज्यांच्या प्रतिभेची दीप्ति चिरकाल टिकेल असे अनेक महापुरुष या वीस वर्षांत उदयास आले आणि त्यांनी विश्वकर्म्याला लाजवील अशी आपली कार्यशक्ति याच काळांत प्रकट केली. टिळक-आगरकरांचें कार्य प्रत्यक्ष ज्या टप्प्यापासून सुरू झालें त्या टप्प्यापर्यंत समाजाला आणून सोडण्याचें कार्य या महाभागांनी केलें.

हा सर्व इतिहास मोठा चित्तवेधक व उद्बोधक आहे. पण इथे कांही ठळक गोष्टींचाच आढावा घेणें शक्य आहे. अगदी प्रथम आपल्या लक्षांत येते ती घटना म्हणजे सत्तावन सालचें स्वातंत्र्ययुद्ध. इंग्रजांना घालवून देऊन आपला देश त्यांच्या अमलांतून मुक्त करण्याच्या उद्देशाने लढलें गेलेलें हें युद्ध होतें. या अर्थाने त्याला बंड न म्हणतां स्वातंत्र्ययुद्ध म्हणणें योग्य आहे यांत शंका नाही. पण हें स्वातंत्र्ययुद्ध म्हणजे सरंजामशाहीचा आपल्या देशांत पुन्हा अवतार घडवून आणण्याचा प्रयत्न होता, हें विसरून चालणार नाही. कालौघाच्या उलट पोहण्याची ही उरफाटी कसरत होती; ती अयशस्वी होणें क्रमप्राप्त होतें. उत्तर हिंदुस्थानांत माजलेल्या रणकंदनांत जरी कित्येक मराठी राजे व सरदार प्रमुख होते, तरी खुद्द मराठी मुलखांत या बंडाचे पडसाद फारसे उमटले नाहीत. मुंबई, कोल्हापूर, नरगुंद इत्यादि ठिकाणीं किंचित उठावणीचा संभव दिसतांच तो कंपनी सरकारने निष्ठुरपणें, किंबहुना क्रूरपणें, दडपून टाकला. आमच्यांतला चाकरमान्या पांढरपेशा समाज आणि व्यापारी वर्ग तर बंडवाल्यांना मनांतून शिव्याच मोजीत होता. बाकीचा बहुजनसमाज बिचारा मूक होता.

स्वातंत्र्ययुद्ध जरी अपेशी ठरलें तरी सरंजामशाही अवशेष नष्ट करण्याच्या दृष्टीने इंग्रज सरकारने जी दौड चालविली होती, तिला कांही आळा बसण्यापुरता त्याचा परिणाम झालाच. शिलक उरलेल्या सर्व संस्थानांना ( अर्थात हीं पुष्कळच होतीं ) चिरंजीवपद मिळालें. धर्माच्या बाबतींत सरकार हात घालणार नाही असें स्पष्ट आश्वासन देण्यांत आलें. याचा परिणाम असा झाला की याच्या पूर्वीच्या पंचवीस तीस वर्षांत सतीबंदी

वगैरेसारखे अनेक जुनाट धर्मकल्पनांवर आघात करणारे कायदे सरकारने ज्या द्रुत गतीने केले होते ती गति आता मंद, किंबहुना बंद, झाली.

ईस्ट इंडिया कंपनीचें विसर्जन करून हिंदुस्थानचा कारभार साक्षात पार्लमेंटने हातीं घेण्याचा जो ठराव झाला त्यामुळे हिंदुस्थानांतील जनतेस कांही फरक जाणवला नाही. सरकारची शासनव्यवस्था व धोरण पूर्वी होतें तसेंच पुढे चालू राहिलें.

समाजस्थिति बदलण्याच्या दृष्टीने दोन महत्त्वाच्या गोष्टी या सुमारास घडून आल्या. सोमवार ता. १८ एप्रिल १८५३ रोजीं मुंबई ते ठाणें रेलगाडी सार्वजनिक वहातुकीकरिता खुली झाली. सन १८६३ सालीं बोर घाटाचें बांधकाम पुरें होऊन पुणें ते मुंबई संपूर्ण रेलवे वाहतूक सुरू झाली. स्पर्शास्पर्शाच्या धार्मिक रूढि, शुभाशुभ मुहूर्तासंबंधाच्या भोळ्या समजुती आणि जातिभेदजन्य विषमता यांच्या मुळावर घाव घालण्याचें काम बिन-बोभाट पण अप्रतिहत रीतीने रेलवेने कसें केलें आहे हें विवरण करून सांगण्याची जरुरी नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुंबई विद्यापीठाची स्थापना. सन १८५७ सालीं विद्यापीठाचा कायदा झाला आणि विद्यापीठाची पहिली मॅट्रिकची परीक्षा १८५९ सालीं व पहिली पदवी परीक्षा १८६२ सालीं झाली. पंचवीस वर्षांपूर्वी सुरू झालेल्या इंग्रजी शिक्षणाची ही स्वाभाविक परिणति होती. पाश्चात्त्य विद्या व शास्त्रें यांचें अर्धवट, खालच्या पातळी-वरचें ज्ञान मिळाल्यामुळे Little knowledge is a dangerous thing असा जो सार्वत्रिक अनुभव शिकलेल्या मंडळींमध्ये पूर्वी येत असे, ती स्थिति यापुढे बदलली. सखोल अभ्यास केलेले व्यापक दृष्टीचे व्यासंगी विद्वान, थोडेसेच कां होईनात, निपजूं लागले. त्यांच्या बोलण्या-चालण्यांत व लिखाणांत अधिक गांभीर्य येऊं लागलें. या मंडळींतूनच ज्यांना थोर पुरुष असें खऱ्या अर्थाने म्हणतां येईल असे या काळांतले समाजधुरीण निर्माण झाले. भांडारकर (१८३७–१९२५), रानडे (१८४२–१९०१), तेलंग (१८५०–१८९३) या त्रिखंडकीर्ति झालेल्या त्रिमूर्तीने आपल्या प्रतिभेचें सर्वस्व अंशतः या काळांत राष्ट्राला अर्पण केलें.

विद्यापीठस्थापनेच्या पूर्वीच ज्यांचें शिक्षण आटपलें होतें आणि ज्यांनी पूर्वीच्या कालखंडांतच आपल्या कर्तृत्वाने समाजाचें नेतृत्व संपादन केलें होतें, असे डॉ. भाऊ दाजी लाड (१८२१–१८७४), कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८२४–१८७८) आणि वि. ना. मंडलीक (१८३३–१८८९) यांची कामगिरी मुख्यत्वें याच काळांत झाली.

समाजाची आर्थिक स्थिति पूर्वीच्या कालावधींत खालावत चालली होती, तीच घसरणीची चाल याहि काळांत कायम राहिली. उद्योगधंदे बुडाले, रयतेचा सर्व भार शेतीवर पडला, आणि त्या शेतीच्या संवर्धनाचे, सुधारणेचे कांही प्रयत्न नाहीत—पाटबंधारे नाहीत, जलसंचय नाहीत, कांही नाही. अशा स्थितींत शेतकरी अधिकाधिक कंगाल होऊन भिकेला लागल्यास त्यांत कांही नवल नव्हतें. शेतींतून निघणाऱ्या उत्पन्नावर गुजराण होईनाशी झाली म्हणजे शेतकऱ्याला सावकाराचें घर पाहावें लागतें. महाराष्ट्रांतील शेतकरी सावकारी पाशांत सापडून पिळून निघत होता. आपण ज्या आपत्तीच्या चरकांत सापडलों आहों त्याचें मूलकारण सरकारचें आर्थिक धोरण होय, हें त्या बिचाऱ्या अजाण शेतकऱ्यास कसें समजणार ? त्याला पिळून काढणारा सावकार तेवढा त्याला समोर मूर्तिमंत दिसे. आपल्या सर्व हलाखीचा सूड त्याच्यावर घेण्यास तो प्रवृत्त झाला. ही प्रवृत्ति प्रबळ होऊन सन १८७५ सालीं नगर, पुणें, सोलापूर या जिल्ह्यांतल्या शेतकऱ्यांनी सावकारांच्या विरुद्ध उठावणी केली. सावकारांच्या घरांवर दरोडे घालून घरें जाळणें, चीजवस्त लुटणें, दस्तऐवज जाळणें इत्यादि प्रकार शेतकऱ्यांनी केले. त्यानंतर सरकारने या विषयावर कमिशन बसवून 'दक्षिणेंतील शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनाचा कायदा' केला. या दंग्यांच्या पाठोपाठ दुष्काळाची भयंकर छाया डोकावूं लागली. सन १८७६–७७ सालचा दुष्काळ हा पुढे कित्येक पिढयांना म्हणीसारखा किंवा उपमानासारखा होऊन बसला, यावरून त्याच्या भीषणतेची कल्पना येईल. दुष्काळामुळे देशोधडीला लागलेलीं खेडयांतलीं माणसें शहरांत येऊन गटारांतील शितें किंवा भाजीचीं देठें खाण्यास उद्युक्त होत असत, असा अनर्थ त्या दुष्काळाने घडवून आणला होता. मराठी मुलखांतल्या शेतकऱ्याजवळचें धन सर्व धुवून गेलेलें असून त्याच्यांत एखाद्या वर्षाच्या अवर्षणापुरता दम धरण्याचें

देखील त्राण उरलें नाही, ही गोष्ट या दुष्काळाने स्पष्टपणे नजरेस आली. या दुष्काळांत एकंदर देशांत अंदाजें साठ लाख माणसें मेलीं आणि लाखों परांगदा झालीं.

हिंदुस्थान देश इंग्लंडला लागणारें धान्य आणि कापूस, चामडें इत्यादि कच्चा माल याचें कोठार आणि इंग्लंडमध्ये निर्माण होणाऱ्या पक्क्या मालाचें हुकमी गिऱ्हाईक बनावें, आणि अशा रीतीने आपल्याला त्याची निरंतर आर्थिक पिळणूक करतां यावी हें इंग्लंडचें धोरण होतें. या धोरणाचा परिणाम सुमारें पन्नास वर्षांच्या आंतच इतक्या भयंकर रीतीने दिसून आल्यामुळें इंग्रजी राज्यनीतीची हृदयशून्य दारुणता हिंदी जनतेच्या प्रत्ययास आली. टिळक आगरकर या वेळीं २०-२१ वर्षांचे होते. त्यांच्या संस्कारक्षम तरुण अंतःकरणांत दुष्काळाच्या भीषण वार्तांनी केवढा क्षोभ निर्माण केला असेल याची सहज कल्पना करितां येईल.

पूर्वीच्या वीस वर्षांत हिंदुस्थानच्या व्यापाराला जी दशा लागली होती, तीच प्रस्तुत कालावधींतहि कायम राहिली. म्हणजे धान्य व सर्व प्रकारचा कच्चा माल निर्यात करणें आणि कापड, लोखंडी सामान, यंत्रें इत्यादि पक्का माल आयात करणें हें हिंदच्या व्यापाराचें स्वरूप राहिलें. देशाची परावलंबिता वाढत चालली. मात्र पारशी व गुजराती व्यापाऱ्यांनी मुंबईस कापडाच्या गिरण्या उभारून वस्त्रनिर्माणाच्या प्रचंड कारखानदारीचा या काळांत पाया घातला.

आर्थिक परिस्थितीप्रमाणे राजकीय परिस्थितीहि या कालावधींत अधिक तंग बनत गेली. इंग्रजी राज्याच्या चरकांत देशांतली जनता कशी पिळून निघत आहे हें, १८७६ च्या दुष्काळामुळे देशस्थितीविषयी विचार करणाऱ्या लोकांच्या लक्षांत येऊन चुकलें. गुलामगिरीचे पाश करकचून आवळले जाऊं लागले. सात वर्षें (१८७३-१८८०) इंग्लंडचें प्रधानपद गाजविणाऱ्या लार्ड बीकॉन्सफील्डचें साम्राज्यशाही धोरण उद्दाम स्वरूपांत प्रकट होऊं लागलें. सन १८७७ सालीं दिल्लीला मोठा दरबार भरवून व्हिक्टोरिया राणीचा सम्राज्ञी म्हणून पुकारा करण्यांत आला. दुष्काळाच्या खाईत देश पिचत असतांना झालेल्या या जुबिलीच्या समारंभांत करण्यांत

आलेलें बादशाही वैभवाचें प्रदर्शन म्हणजे आपल्या जखमेवर मीठ चोळण्याप्रमाणे होय असें जनतेला वाटणें साहजिक होतें. जनतेच्या असंतोषाला वृत्तपत्रांतून तीव्र स्वरूपांत वाचा फुटूं लागली. लगेच १८७८ मध्ये देशी भाषेंतील वृत्तपत्रांच्या मुस्कटदाबीचा 'प्रेस ॲक्ट' करण्यांत आला. मराठी मुलखांत नव्याने जमीनपाहणी करून सारावाढ करण्यांत आली. जंगल खात्याचा अंमल सुरू होऊन जंगलाचे कायदे कडक करण्यांत आले. देशांत तयार होणाऱ्या कापड वगैरे पक्क्या मालावर 'एक्साइज ड्यूटी' उर्फ उदीमपट्टी बसविण्यांत आली. या सगळ्या गोष्टींचा जाच रयतेला अधिकाधिक होऊं लागला. या सगळ्याचें कारण आपलें पारतंत्र्य, ही भावना बळावूं लागली.

या धुमसणाऱ्या असंतोषाचा स्फोट १८७९ सालीं वासुदेव बळवंत फडके यांनी केलेल्या सशस्त्र बंडाच्या रूपाने झाला. सत्तावनच्या बंडानंतर स्वातंत्र्याच्या उद्देशाने केलेल्या हिंसात्मक चळवळीचें हें पहिलेंच उदाहरण. भिल्ल रामोशी वगैरे धाडशी पण अडाणी लोकांच्या साहाय्याने केलेल्या या उठावाला जनतेचें प्रकट वा गुप्त साहाय्य असणें शक्य नव्हतें. जनता दिङ्मूढ होऊन या उत्पाताकडे पाहत होती.

धार्मिक आणि सामाजिक विचारांच्या दृष्टीने या कालावधींत खूप प्रगति झाली आणि विचार कृतीमध्ये उतरवण्याचा उपक्रम होऊं लागला. सन १८५८ च्या पूर्वीच्या वीस वर्षांत जे विचार आणि ज्या जाणिवा निर्माण झाल्या त्याच पुढच्या वीस बावीस वर्षांत फोफावल्या. विचार अधिक तीव्र व गंभीर बनत चालले की कृतीमध्ये परिणत होऊं लागतात. विचारांची खळबळ आणि कृतीची गडबड यांनी हीं वीस वर्षें गजबजून गेलेलीं दिसतात.

इंग्रजी शिक्षण, इंग्रज लोकांचें उदाहरण आणि मिशनऱ्यांची टीका यांचा परिणाम शिक्षित वर्गावर दोन प्रकारचा होत होता, हें आपण पाहिलें आहे. आपल्या धार्मिक रूढींत, सामाजिक चालीरीतींत दोष दिसूं लागून त्यांत सुधारणा केली पाहिजे असें मानणारा सुधारणा पंथ; आणि इंग्रजी शिक्षणामुळे व मिशनऱ्यांच्या प्रचारामुळे येणाऱ्या कल्पना हें आपल्या

सनातन धर्माला व परंपरागत प्राचीन संस्कृतीला एक आव्हानच होय असें समजून त्यांचा प्रतिकार करणारा धर्माभिमानी किंवा प्रतिकारवादी पंथ. या काळांतलें वैशिष्ट्य हें की या दुसऱ्या धर्माभिमानी पंथाला आंग्लविद्याविभूषितांतून मदत मिळूं लागली. पूर्वी शास्त्री, पंडित, धर्मगुरु आणि त्यांचा शब्द मानणारे जुन्या कल्पनांचे गृहस्थ हेच या धर्माभिमानी पंथांत असत. आता इंग्रजी वाङ्मय, पाश्चात्त्य विद्या यांचा सुधारणापंथीयांच्या बरोबरीने खोल अभ्यास केलेले पदवीधर पाश्चात्त्य संस्कृति आणि धर्म यांच्या हल्ल्यापासून स्वतःची संस्कृति आणि धर्म यांचें रक्षण करण्यासाठी रणांगणावर येऊन उभे ठाकले. देशाभिमान हा यांचा स्थायी भाव होता. निर्भेळ सनातनी असें जें या पंथाचें स्वरूप होतें तें बदललें. मालाकार चिपळूणकर हें अशा प्रकारांतलें मूर्धाभिषिक्त उदाहरण होय.

कांही तरी कृति करून दाखविण्याची ऊर्मि संस्था काढण्याच्या रूपाने परिणत होऊं लागली. संस्था किंवा समुदाय हें त्या वेळीं तरी इंग्रजी संस्कृतीचें वैशिष्ट्य म्हणूनच सुशिक्षित लोकांच्या नजरेसमोर होतें. आणि त्याचें अनुकरण करण्यास पूर्वीच्या काळांतच सुरवात झाली होती. लोकशिक्षणाच्या उद्देशाने मुंबईस 'स्टूडंट्स लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटी' नांवाची संस्था १८४० सालीं सुशिक्षितांनी स्थापन करून तिच्यामार्फत मुलांच्या व मुलींच्या शाळा यशस्वी रीतीने चालविल्या होत्या. त्यांतल्या कांही मंडळींनी १८४८ मध्ये लोकभाषेंतून चर्चा व विचारविनिमय करण्याकरिता ' उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा ' नांवाचें मंडळ स्थापून त्यांत देशसुधारणेच्या विविध मुद्यांवर निबंध लिहून ते वाचण्याचा उपक्रम सुरू केला होता. पुण्यास मोरशास्त्री साठे यांनी ' कल्याणोन्नायक सभा ' म्हणून एक संस्था अशाच उद्देशाने काढली होती.

पूर्वीच्या काळांतले संस्थास्थापनाचे हे प्रयत्न, विचार व्यक्त करणें, चर्चा करणें, असल्या सौम्य उद्देशांनी प्रेरित झाले होते. त्याच्या पुढच्या म्हणजे १८६० ते १८८० या काळांत संस्था स्थापण्याचा जो उद्योग झाला तो चळवळीकरिता, मतप्रसाराकरिता आणि शक्य तेथे प्रत्यक्ष कृति करण्याकरिता झाला, असें आपणास दिसतें. जुन्या शास्त्रविद्येचें जुन्या

पद्धतीने अध्ययन करून सुधारणा पक्षाचें अध्वर्युत्व पतकरणारे विष्णुशास्त्री पंडित यांनी वरिष्ठ वर्गांतील विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रचार करण्याकरिता 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळी' सन १८६६ मध्ये काढली. आपल्या धर्मांतील मूर्तिपूजा, अवतारकल्पना, जातिभेद, इत्यादि गोष्टी ज्यांना पटल्या नव्हत्या अशा आंग्लविद्याशिक्षितांनी एकेश्वरी मताचा अवलंब करून प्रार्थना-समाजाची स्थापना १८६७ मध्ये केली. समाजाच्या स्थापनेंत व संचालनांत डॉ. रा. गो. भांडारकर आणि रावबहादुर म. गो. रानडे यांचा प्रामुख्याने हात होता. या कार्याला स्फूर्ति बंगाल्यांत राजा राममोहन राय यांनी स्थापिलेल्या आणि केशवचन्द्र सेन यांनी चालविलेल्या ब्रह्मसमाजापासून मिळालेली होती. महाराष्ट्रांतील प्रार्थनासमाजाचा पंथ बंगाल्यांतील ब्रह्म-समाजाइतकाहि वजनदार किंवा विस्तारशाली बनला नाही. पण परमानंद, भांडारकर, रानडे, प्रभृति आध्यात्मिक संपदेच्या थोर पुरुषांच्या धर्मसंबंधी विचारांचें अधिष्ठान बनण्याचा मान त्याला लाभला. त्यामुळे आधुनिक सुशिक्षितांमध्ये धर्मश्रद्धा, ईश्वरनिष्ठा आणि सामाजिक नीतिमत्ता यांचीं मुळें बळकट रुजण्यास अप्रत्यक्ष रीत्या मदत झाली यांत शंका नाही.

विचारांची खळबळ अन्य मार्गांनीहि व्यक्त होत होती. वृत्तपत्रीय वादविवादाचें क्षेत्र आता चांगलेंच रुंदावलें होतें. वृत्तपत्रांतील लेखनाची शैली या काळांत पुष्कळ सुधारून ती प्रवाही व जोरकस बनली. तिच्यांत बोचकपणा व खोचदारपणा आला. सुधारणा पक्ष आणि धर्माभिमानी पक्ष यांच्यामधील वादसंगर चांगलेंच रंगूं लागलें. पुण्याचा ज्ञानप्रकाश व मुंबईचा इंदुप्रकाश हीं त्या काळांतलीं भारदस्त पत्रें सुधारणा पक्षाचीं होतीं. याच्या उलट मुंबईचें नेटिव ओपीनियन आणि पुण्याचें ज्ञानचक्षु असून धर्माभिमानी पक्षाच्या कुमकेस आणखी बऱ्याच पत्रांचा जथा होता. सभाव्याख्यानांतून होणाऱ्या तोंडातोंडी वादविवादांचें पीकहि कमी नव्हतें. या प्रकारांतला एक संस्मरणीय प्रसंग सन १८७० मध्ये पुणें मुक्कामीं घडून आला. विधवापुनर्विवाहाच्या प्रश्नावर शंकराचार्यांच्या समोर जुन्या शास्त्रवचनांस अनुसरून मोठा वाद-विवाद करण्यांत आला. पुनर्विवाहास अनुकूल असलेल्या पक्षाने व प्रतिकूल असलेल्या पक्षाने प्रत्येकीं पांच पांच पंच आपआपल्या तर्फे नेमून दिले होते. महाराष्ट्रांतील जुन्या शास्त्रीय विद्वत्तेचें शिखर या वादविवादांत

दृग्गोचर झालें. मात्र विद्वत्तेच्या उच्चतेबरोबर दानतीची अवनति किती झाली आहे हेंहि त्यावेळीं दिसून आलें. अनुकूल पक्षाचा एक पंच फुटून प्रतिकूल पक्षाला मिळाल्यामुळे धर्माभिमानी पक्षाचा या वादांत जय झाला. पण वादांतून उद्भवलेलीं भांडणें व मारामाऱ्या इतक्या माजल्या की फौजदाऱ्या होऊन कोर्टांत प्रकरणें गेलीं व भावनांचा प्रक्षोभ आम्ही किती हीन पातळीपर्यंत नेऊं शकतों याचें प्रदर्शन झालें.

सुधारक आणि दुर्धारक उर्फ धर्माभिमानी असे सुशिक्षित समाजाचे दोन परस्परविरोधी तट या वेळेपासून महाराष्ट्रांत पडले आणि या दोन्ही तटांमध्ये निंदाप्रचुर, मर्मभेदक, द्वेषप्रेरित अशी टीका एकमेकांवर करण्याचा पायंडा साधारणपणे या वेळेपासून पडला. विद्वेषाचा विषार पसरविणारी टीका करण्याची अशी प्रवृत्ति उत्पन्न होण्याची कारणमीमांसा कोणतीहि असो, या प्रवृत्तीने एकंदर मराठी जनतेचें फार नुकसान केलें आहे यांत शंका नाही. एकदा सुरू झालेली ही प्रवृत्ति पुढे फार काळ चालू राहिली आणि तिने सामाजिक क्षेत्राप्रमाणे राजकीय चर्चेचें क्षेत्रहि व्यापून टाकलें. तो इतिहास आपणास पुढे यथास्थल पाहावा लागेल.

धार्मिक आणि सामाजिक बाबतींतील विचारजागृतीप्रमाणे राजकीय आणि आर्थिक विषयांतील विचारजागृति समुदायस्थापनेच्या द्वारा या काळांत व्यक्त होऊं लागली. किंबहुना हें या काळाचें वैशिष्ट्य होय असें म्हटल्यास चालेल. मुंबईस नाना शंकरशेट ( १८०३–१८६५ ), दादाभाई नवरोजी ( १८२५–१९१७ ) प्रभृतींनी 'बॉम्बे असोसिएशन' ही संस्था १८५१ सालीं स्थापन केली होती. पण हिच्या धर्तीवर पुण्यास १८७० सालच्या वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर निघालेली सार्वजनिक सभा ही आपल्या वडील बहिणीपेक्षा अधिक कर्तृत्ववान ठरली. सुरुवातीपासूनच एक खंबीर, निःस्पृह व लोकहितदक्ष असा कार्यकर्ता हिला मिळाल्यामुळे हिचें तेज पडावयास विलंब लागला नाही. ज्या ज्या गोष्टींत राज्यकर्त्यांचा संबंध येईल अशा प्रत्येक सार्वजनिक हिताच्या गोष्टींत लक्ष घालून साधार युक्तिवादाच्या खंबीर पाठिंब्यानिशीं आपलें म्हणणें सरकारच्या कानीं घालायचें, हें काम या सभेने अत्यंत कसोशीने सुमारें तीस वर्षें केलें.

सार्वजनिक सभेचे अंतःस्थ बुद्धिदाते महादेव गोविंद रानडे होते. सभेचें धोरण त्यांच्या सल्ल्याने ठरत असे, हें खरें असलें, तरी पहिलीं दहा वर्षें सभेचा प्राण व उत्साहाचा झरा दुसरीच एक व्यक्ति होती. या व्यक्तीचें नांव गणेश वासुदेव जोशी. सार्वजनिक सभेचे हे कार्यवाह तर होतेच, पण सभेच्या कार्याशीं ते इतके तद्रूप झाले होते की, 'सार्वजनिक काका' याच नांवाने लोक त्यांना ओळखत असत. सार्वजनिक काका म्हणजे मूर्तिमंत कळकळ. देशाच्या हलाखीचें मूळ राजकीय दास्यांत आणि आर्थिक अधोगतींत असल्याचा साक्षात्कार त्यांना झाला होता. राजकीय बाबतींत सार्वजनिक सभेच्या द्वारा लोकहिताचा जोरदार पुरस्कार करण्याचें व्रत त्यांनी चालविलें; आर्थिक बाबतींत 'स्वदेशी व्यापारोत्तेजक मंडळी' नांवाची समाईक भांडवलाची कंपनी काढून स्वदेशी मालाच्या पैदाशीला उत्तेजन देण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला. आपला देश दिवसेंदिवस अधिकाधिक दरिद्री होत चालला आहे, याचें मुख्य कारण म्हणजे देशांतले उद्योगधंदे नाहीसे झाले; कापूस वगैरे कच्चा माल इथून विलायतेस जाऊन त्याचा कापड वगैरे पक्का माल बनून इथे येतो त्यामुळे वस्तुनिर्मितीचें सर्व मूल्य परकीयांच्या पदरांत पडतें, तेव्हा माल देशांत निर्माण होऊन तो सर्वांनी वापरण्याचा निश्चय करणें हा आर्थिक पुनरुज्जीवनाचा मुख्य उपाय होय, हें सत्य त्या काळीं देखील सर्वांना उमगलें होतें. पण सामूहिक संघटनेच्या द्वारा प्रत्यक्ष कार्याची मुहूर्तमेढ रोवणारा आणि नखशिखान्त खादी वापरून स्वदेशी धर्म आचरणांत उतरविणारा कृतिवीर अखिल भारतांत सार्वजनिक काका हाच प्रथम निघाला.

व्यापारोत्तेजनाची योजना झाली खरी, पण व्यापार करायला वस्तूंचें उत्पादन झालें पाहिजे, आणि वस्तुनिर्मितीसाठी कलाकौशल्य वाढलें पाहिजे, म्हणून 'कौशल्यशिक्षक सभा' काढण्यांत आली. देशाची प्रगति होण्यासाठी जनतेंत जागृति करणें जरूर. जागृति करण्यासाठी वक्ते उत्तम तऱ्हेचे तयार झाले पाहिजेत. यास्तव 'वक्तृत्वोत्तेजक सभा' प्रथम मुंबईस व नंतर पुण्यास काढण्यांत आली व तिच्यामार्फत भाषणांच्या चढाओढी घेण्यांत येऊं लागल्या. ही टूम इतकी लोकप्रिय झाली की तिचें अनुकरण वाई, नाशिक यांसारख्या इतर शहरीं होऊं लागलें. चांगले ग्रंथ निर्माण

व्हावेत म्हणून ‘ग्रंथोत्तेजक मंडळी’ या नांवाने उपक्रम करण्यांत आला. तात्पर्य, देशहिताची कोणतीहि बाब लक्षांत आली, की काढ तिच्या नांवाने एखादी संस्था, असा धडाका या काळांत सुरू झाला होता.

पण ही सर्व प्रवृत्ति बव्हंशीं उथळ पाण्याला खळखळाट फार अशा स्वरूपाची होती. शिक्षणाचा प्रसार होऊन सरकारच्या आश्रयाने मध्यमवर्ग बराच मोठा तयार झाला होता. पदवीधरांचा भाव उतरूं लागला होता व बेकारीचीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं होतीं, तरी एकंदरीने मध्यमवर्गाची स्थिति खाऊन पिऊन बरी होती. कांही तरी करावें, कुठे तरी उसळी मारावी अशी ऊर्मि या काळांत पुढे आलेल्या कर्त्या पिढीच्या मनांत उत्पन्न झाली होती. कळकळ होती, उत्साह होता. पण त्या कळकळीला कोणची दिशा लावावी आणि उत्साह कशा रीतीने कामाला लावावा, याचा नीटसा उमज पडत नव्हता. या विशाल देशाच्या सर्वांगीण उद्धाराचें कार्य चार मंडळी जमून वाक्पांडित्य केल्याने किंवा कागदी घोडे नाचविल्याने होणारें नसून त्यासाठी अधिक मूलगामी असें कांही तरी करण्याची आवश्यकता आहे याची जाणीव निर्माण झाली नव्हती. त्यामुळे खळबळ खूप माजून फेस यावा, पण तो दुसऱ्या क्षणीं विरून जावा, तशी अवस्था त्या काळांतल्या चळवळींची झाली. भराभर संस्था निघाल्या, तितक्याच भराभर त्या नाहीशा झाल्या, किंवा थंड पडल्या. या काळांत दिसून येत असलेल्या या थिल्लरपणाचें विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या उपहासप्रचुर लेखणीने मोठें मार्मिक वर्णन केलें आहे.

“आलीकडे तीन चार वर्षांत तर जिकडे तिकडे अशी विलक्षण गडबड होऊन गेली आहे की, ज्याला त्याला असें वाटूं लागलें आहे की, हा आमचा देश एकदाचा परमोत्कर्षाच्या स्थितीस येऊन पोचतो कसा ! मग काय; कोणी कलाकौशल्य हातीं घेतलें, कोणी धर्माची सुधारणा करण्याचें पतकरलें, कोणी नवे माग तयार करून म्यांचेस्टर बरोबर टक्कर मारण्याकरितां कंबर बांधली, कोणी पाहिलें कीं इंग्लंडची जी एवढी सुधारणा झाली आहे ती केवळ वक्तृत्वामुळे झाली आहे, तेव्हा ‘वक्त्यांचे वर्ग’ सुरू करूं या !

याप्रमाणे देशसुधारणुकेच्या एकेक खांबाने एकेक काम तेव्हाच पतकरलें; पण तें होणें शक्य तरी आहे की नाही, किंवा निदान आपलें सामर्थ्य तरी कितपत आहे, याचा विचार एकानेहि क्षणमात्र सुद्धा केला नाही....कोणतेंहि काम म्हणज आपण हातीं घेतलें आणि त्यांत आमची फजिती झाली नाही, असें एकही आढळणार नाही. पण आमची धाव केवढी ! लूथराने युरोपांत धर्मक्रान्ति केली, त्याप्रमाणे इकडे नवा धर्म उत्पन्न करायचा; तिकडे मोठमोठया व्यापाराच्या मंडळ्या आहेत तोच मासला इकडे उचलून देशाची नष्ट झालेली संपत्ति पुन्हा माघारीं आणायची ......एकंदरींत आपलें बळाबळ न जाणतां ह्या त्या अचाट उद्योगास हात घालण्याची जी विलक्षण हौस आपल्या लोकांत दृष्टीस पडते तिजपासून फार नुकसान होत आहे. तें असें की, एक तर देशाची अपकीर्ति होऊन आरंभशूरपणा, कोती बुद्धि, कमनिश्चयीपणा वगैरे आपले गुण मात्र चोहोंकडे प्रसिद्ध होताहेत; व त्यामुळे आमचें स्वतःचेंच धैर्य खचून पुढे कोणतेंही कार्य हातीं घेण्याविषयी मनास तादृश उत्साह वाटत नाही. दुसरें असें की, वरच्या सारख्या दुर्घट कार्याकडेच लोकांची बुद्धि खर्चली गेल्यामुळे होण्यासारखे जे दुसरे उद्योग आहेत तेहि घडत नाहीत." (निबंधमाला, अंक २१)

टिळक व आगरकर यांनी इ. स. १८८० सालीं, म्हणजे आपल्या वयाच्या चोविसाव्या वर्षी राष्ट्रकार्यांत उडी घेतली, त्याच्या पूर्वीच्या वीस वर्षांत महाराष्ट्रांतलें वातावरण वर वर्णिल्याप्रमाणे होतें. त्या काळांतल्या उथळ खळबळाटाला अनुलक्षून विष्णुशास्त्री प्रभृति नव्या दमाचे लेखक व वक्ते जी टीका करीत होते, ती नवतारुण्याच्या संस्कारक्षम अवस्थेंत टिळक आगरकरांच्या नजरेस पडत असली पाहिजे, आणि त्यामुळे जुन्या पिढीच्या या उणिवांपासून आपण काय धडा घेतला पाहिजे, याचाहि विचार त्यांच्या मनांत घोळत असला पाहिजे, असें गृहीत धरून चालण्यास हरकत नाही.

———

# ३. पूर्वगामी शिल्पकार

## रानडे

साधारणपणें वयाचीं १४ ते २४ वर्षे या काळांत मनुष्याचें मन अत्यंत संस्कारक्षम असतें. या नवतारुण्याच्या वयांत भोवताली जें वातावरण असतें त्याच्या योगाने तरुण मनाची घडण बनते. जे विचार आणि ज्या भावना समाजमनावर पगडा गाजवीत असतात त्यांचा खोल ठसा लवचीक मनावर उमटतो. या सर्वांचा परिणाम होऊन ज्या प्रेरणा उत्पन्न होतात, त्या कर्तृत्ववान तरुणांच्या आयुष्याला विशिष्ट वळण देण्यास कारणीभूत होतात. टिळक आगरकरांच्या वयाचीं १४ ते २४ वर्षें म्हणजे इ. स. १८७० ते १८८० हा कालावधि होय. या काळांत महाराष्ट्राचें वातावरण देशाभिमानाच्या भावनेने भारलेलें होतें. या भावनेची तीव्रता उत्तरोत्तर वाढत होती. इंग्रजी राज्याविषयीचा असंतोष अधिकाधिक तीव्र स्वरूप धारण करीत होता. देशोद्धाराविषयी अनेकांच्या अनेक खटपटी चालू होत्या. वासुदेव बळवंत फडक्यांचें बंड (१८७९) टिळक आगरकरांच्या जाणतेपणीं त्यांच्या नजरेसमोर झालें. फडक्यांची देशभक्ति व स्वातंत्र्यप्रीति उत्कट असली तरी पांचपंचवीस रामोशी जमवून खेडयापाडयांत चार दरवडे घालण्यामध्ये झालेली तिची परिणति अर्थशून्य, किंबहुना अनर्थकारक होती, हें विद्याभ्यासामुळे सारासार विचार करण्यास समर्थ बनलेल्या त्यांच्या मनास तेव्हाच पटलें असेल. गणेश वासुदेव जोशी ऊर्फ 'सार्वजनिक काका' हे या दहा वर्षांत देशसेवेच्या आघाडीवर तळपत होते. त्यागी देशभक्त आणि निःसीम कळकळीचा कार्यकर्ता म्हणून त्यांची मूर्ति या दोघांच्या मनश्चक्षूसमोर वावरत असेल.

पण त्या वेळचें प्रेरक वातावरण हें मुख्यतया जिच्या व्यापक प्रतिभेचें आणि दीर्घ उद्योगाचें फळ होतें ती व्यक्ति महादेव गोविंद रानडे ही होय.

आपल्या सर्वगामी बुद्धिमत्तेने आणि सखोल विद्याव्यासंगाने विद्यापीठामधील आचार्यांच्या निर्भर कौतुकास पात्र झालेला हा ‘पदवीधरांचा मुकुटमणि’ (Prince of graduates) पुढील आयुष्यांत आपल्या व्यापक कर्तबगारीने देशसेवकांचाहि मुकुटमणि ठरला. इ. स. १८६२ सालीं बी. ए. ची परीक्षा पास झाल्यापासून १८७१ पर्यंत सुमारें ९ वर्षांच्या काळांत, नोकरीनिमित्त बाहेरगावीं गेलेला दीड दोन वर्षांचा अवधि वगळल्यास, रानडयांचें वास्तव्य मुंबईस होतें. सन १८७१ सालीं न्यायखात्यांत त्यांची कायमची नेमणूक होऊन ते पुण्यास आले तेव्हापासून पुढच्या २२ वर्षांतला बहुतेक काळ त्यांचें राहणें पुण्यास झालें. १८९३ सालीं मुंबई हायकोर्टाच्या न्यायाधीशपदीं त्यांची नेमणूक झाली, तेव्हापासून ता. १६ जानेवारी १९०१ रोजीं मृत्यु होईपर्यंत त्यांच्या सहवासाचा लाभ मुंबापुरीने घेतला. हीं एकोणचाळीस वर्षे अत्यंत जबाबदारीची सरकारी नोकरी संभाळून देशोद्धाराच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि औद्योगिक या सर्व अंगांचें संचालन व मार्गदर्शन करण्याचें जें कार्य अविरतपणें या पुरुषाने केलें तें अतुलनीय होय. रानडयांच्या मृत्यूनंतर लोकमान्य टिळकांनी केसरीमध्ये त्यांच्यावर जो अग्रलेख लिहिला त्यांत काढलेले पुढील उद्‌गार शिलालेखाप्रमाणे चिरंजीव ठरले आहेत.—

> “लोकांच्या अंगचें तेज अगदीच नाहीसें झालेलें होतें असें नाही, पण वर लिहिलेल्या कारणांमुळे महाराष्ट्र देश म्हणजे त्या वेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंडया गोळयास कोणत्या तऱ्हेने ऊब दिली असतां तो पुनः सजीव होईल व हातपाय हालवूं लागेल याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनी, अनेक उपायांनी, अनेक रीतींनी त्यास पुनः सजीव करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरिता जिवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावजींनीच केली असें म्हटलें पाहिजे; व आमच्या मतें हेंच त्यांच्या थोरवीचें किंवा असामान्य मोठेपणाचें मुख्य चिन्ह होय.”

माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या गौरवाने मन भरून जातें; त्या भरांत हे उद्‌गार निघाले आहेत; पण रानडयांच्या जिवंतपणीं त्यांच्या प्रवृत्ति व

कृति यांच्यावर कडक टीका करण्याचें सरसहा धोरण ज्यांनी अवलंबिलें होतें त्या टिळकांच्या लेखणींतून हे निघाले आहेत. या दोन्ही गोष्टी लक्षांत ठेवून या उद्गारांचें महत्त्व आपण अजमाविलें पाहिजे. रानडे आणि टिळक यांच्या वयामध्ये चवदा वर्षांचें, म्हणजे जवळ जवळ एका पिढीचें अंतर होतें. अव्वल इंग्रजीमध्ये सुशिक्षितांची जी पहिली पिढी झाली तिच्यापैकी रानडे हे नव्हेत; पण त्यांच्या मनावर झालेले संस्कार बहुतांशीं त्या पिढीच्या संस्कारांसारखे होते. बंगाल्यांतील राजा राममोहन राय किंवा महाराष्ट्रांतील 'लोकहितवादी' या पहिल्या पिढींतील विचारवंतांना इंग्रजांशीं आपला जडलेला संबंध हें ईश्वरी वरदान वाटत असे. सोळाव्या शतकांत युरोपांत सांस्कृतिक पुनरुज्जीवन व धार्मिक सुधारणा ( Renaissance and Reformation ) झाली. तेव्हापासून आज तीनचारशें वर्षें प्रगतीच्या श्रेयस्कर तत्त्वांचा अवलंब करून पाश्चात्त्य राष्ट्रें पुढे दौडत गेलीं, तसें आपल्या देशांत कांही झालें नाही. त्यामुळे धर्म, विद्या, कला, सामाजिक रीति वगैरे सर्व बाबतींत आपली कल्पनातीत दुरवस्था झाली आहे.

"आपली विद्या व युरोपियन विद्या ह्यांची जर आपण तुलना केली, तर आपल्या विद्या अगदी भरभराटीच्या काळांतही केवळ बाल्यावस्थेंत होत्या व सांप्रतची युरोपियनांची विद्या तारुण्यदशेंत आहे, असें सहज दिसून येईल......आम्हांस तर ह्या अवस्थेस बाल्यावस्था म्हणण्यापेक्षा वृद्धावस्था व त्यांतही अगदी आसन्नावस्था म्हटल्यास चिंता नाही असें वाटतें."*

अशा स्थितींत इंग्रजांकडून जिंकले जाऊन सुधारलेल्या इंग्रज राष्ट्राशीं आपला संबंध जडला, यांत आपल्या देशाचा उद्धार व्हावा हा ईश्वरी हेतु दिसून येतो. या ईश्वरी योजनेस सादर होऊन पाश्चात्त्य राष्ट्रांनी अवलंबिलेल्या श्रेयस्कर सुधारणांचा अवलंब करून आपण आपली प्रगति

---

* 'इंग्रजी भाषेंतील विद्या' यावर रानड्यांनी नाशिक येथे ता. १८ ऑगष्ट १८७८ रोजीं दिलेलें व्याख्यान. ( न. र. फाटककृत रानडे चरित्र, पृ. ३०२, ३०३ )

करून घेतली पाहिजे, हें रानडयांच्या सर्वांगीण सुधारणेच्या विचारसरणीमागील मुख्य सूत्र होतें.

त्यांची राजकीय विचारसरणी या सूत्रास अनुसरूनच होती. इंग्रजांच्या उदारमतवादी शासनाखाली आपल्या मागण्या व आपलीं दुःखें सनदशीरपणें पुढे मांडून आपली राजकीय प्रगति करून घ्यावी व त्यांच्यापासून लोकशाहीचे व राज्यकारभार चालविण्याचे धडे घेत घेत त्यांच्या अंकित्वाखाली स्वयंशासनाचे हक्क प्राप्त करून घ्यावे असें त्यांचें ध्येयधोरण होतें.*

त्यांच्या एकंदर जीवितकार्याचें सार 'उदारता आणि नेमस्तपणा' ( liberalism and moderation ) या त्यांनीच डेक्कन सभेच्या स्थापनेच्या वेळीं उपयोजिलेल्या दोन शब्दांत सामावलेलें आहे.

सामाजिक असो, धार्मिक असो वा राजकीय असो, कोणतेंहि एखादें कार्य तनमनधनाने हातीं घेऊन त्याच्यासाठी धडाडीची चळवळ करणें व जनतेची शक्ति त्याच्यामागे उभी करणें हें रानडयांच्या हातून कधी घडलें नाही. जन्मभर सरकारी नोकरींत असल्यामुळे हें त्यांना शक्य नव्हतें हें तर खरेंच; पण त्यांचा प्रकृतिस्वभाव अशा कामास अनुकूल नव्हता हें त्यांतलें मूलभूत सत्य होय. चार मंडळींनी कसलीहि एखादी संस्था काढावी, सल्लामसलतीकरिता व मार्गदर्शनाकरिता माधवरावांच्या कडे यावें, प्रसंगविशेषीं संस्थापक किंवा चालक मंडळांत त्यांचें नांव गोवून द्यावें, असा प्रकार चालत असे. त्यामुळे पुष्कळ वेळां माधवरावांना अपयशाचे धनी व्हावें लागलें आणि विसंगति पदरांत घ्यावी लागली. कोणताहि धर्मग्रंथ प्रमाण न मानणाऱ्या एकेश्वरी प्रार्थनासमाजाचे ते धुरीण आहेत, तर वेदांनाच प्रमाण मानणाऱ्या आर्यसमाजांतहि त्यांची उपस्थिति आहे ! ब्राह्मणांच्या वर्चस्वाला सुरुंग लावणाऱ्या सत्यशोधक समाजाकडे त्यांचें वळण आहे, तर स्त्रीशूद्रांना वेदाधिकार नाकारणाऱ्या आणि ब्राह्मणांचें वर्णगुरुत्व कटाक्षाने राखूं पाहणाऱ्या पूर्ण सनातनी वेद-

---

* 'आधुनिक भारत' आवृत्ति पहिली, पृ. १८४ वर दिलेला रानडयांच्या इंग्रजी लेखांतला उतारा पहा.

शास्त्रोत्तेजक सभेच्या संस्थापकांतहि त्यांचें नांव आहे! एकीकडे समतेच्या तत्त्वावर विधवाविवाह, स्त्रीशिक्षण इत्यादि सुधारणांचें प्रतिपादन करून, प्रसंग पडतांच दुसरीकडे शास्त्राधाराच्या गाथागोवींत शिरून स्मृतिवचनांची ओढाताण करीत असलेले माधवराव आपणाला आढळतात! ही चमत्कृति-जनक विसंगति आज आपणास मौजेची वाटते. पण त्या वेळीं ती कडक टीकेचा विषय झाली असल्यास त्यांत नवल वाटण्याचें कारण नाही.

उच्चार व आचार यांतील विसंगति तर त्या काळच्या लोकांना पदोपदीं जाणवत असे. विधवापुनर्विवाहाच्या पक्षाचें धुरीणत्व मिरवून स्वतःवर प्रसंग आल्याबरोबर अल्पवयी कुमारिकेशीं विवाह करणें, समाज-मंदिरांत एकेश्वरी मताचें प्रतिपादन करून घरांत श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माचार चालू ठेवणें, ग्रामण्यापुढे मान तुकवून प्रायश्चित घेणें इत्यादि अनेक विसंगतींबद्दल त्यांना आयुष्यभर टीका, कुचेष्टा, उपहास इत्यादींचा मारा सहन करावा लागला. सुधारणापक्षांतील बहुतेक सर्वच लहानमोठी मंडळी असल्या विसंगतीचे धनी होती हें खरें. पण लोकांना वाटे की ' मग माधवारावांमध्ये विशेष तें काय? ' सुधारणापक्षाच्या धुरीणाचें आचरण तरी ' बोले तैसा चाले ' या वचनास अनुसरून असावें.

पण माधवरावांची धीरोदात्त शांत वृत्ति कसल्याहि टीकेनें ढळली नाही. गाढ ईश्वरभक्ति, स्वदेशाच्या उज्ज्वल भवितव्याविषयी दृढ श्रद्धा आणि देशाच्या सर्वांगीण प्रगतिविषयींची अहर्निश विवंचना या गुणांमुळेच स्थितप्रज्ञाची ही शांत वृत्ति त्यांच्या अंगीं बाणली होती. त्यांच्या विसंगति व त्रुटि लक्षांत घेऊनहि टिळकांनी त्यांच्याविषयी मृत्युलेखांत जे अप्रतिम गौरवाचे उद्गार काढले त्यांवरून त्यांची महात्मता लक्षांत येते. सर्वांगीण सुधारणेचा श्रेष्ठ आचार्य, सनदशीर राजकारणाचा निष्ठावंत प्रणेता आणि भारतीय अर्थशास्त्राचा जनक या तीन नात्यांनी भारताच्या आधुनिक इतिहासांत रानडयांचें स्थान केव्हाहि अद्वितीय असेंच मानलें जाईल.

## नव्या पिढीचें आव्हान

रानडे आपला सुधारणावाद ज्या वेळीं प्रतिपादीत होते त्या वेळींच तो तरुण पिढीस आणि वयस्कांच्या पिढीलाहि मिळमिळीत एतएव त्याज्य

वाटूं लागला होता. इंग्रजी अमलाच्या स्थापनेंत या तरुणांच्या दृष्टीला ईश्वरी योजनेचें सूत्र दिसत नसून त्यांना ती एक महान आपत्ति वाटत होती. चक्रनेमिक्रमाने किंवा ऐतिहासिक कारणाने आपणाला पारतंत्र्य आलें; तें दूर करतां येत नसेल तर निदान त्याचा उदोउदो तरी करूं नये, असें नव्या पिढीला वाटूं लागलें होतें. इंग्रजी राज्याच्या सुखदायकतेचा अनुभव जो पहिल्या एक दोन पिढयांना आला होता, तो या नव्या पिढीला येत नव्हता हें आपण मागे पाहिलेंच आहे. दुष्काळ, हलाखी, बेकारी यांचें चित्र सगळीकडे उमटलेलें त्यांच्या नजरेस पडत होतें. इंग्रजांची टापटीप, शिस्त, कर्तबगारी व अटोकाट धोरण यांच्या योगाने पूर्वीच्या पिढयांचे डोळे दिपून गेले होते. पण पाश्चात्त्य विद्येचें सखोल अध्ययन करणाऱ्या या पिढीला दृढ परिचयामुळे इंग्रजांच्या गुणांबरोबर त्यांचे दोषहि दिसूं लागले होते. पिळणूक करणाऱ्या इंग्रजी राज्यनीतीचा प्रत्यय आल्यामुळे तर इंग्रजांविषयी वाटणाऱ्या आदराची जागा तिरस्काराने घेण्यास सुरवात केली होती.

साहजिकच आम्ही मूर्ख, आम्ही वेडे, आम्ही नालायक आणि आमचे राज्यकर्ते इंग्रज सर्वगुणसंपन्न, महाज्ञानी–असा जो घोष पहिल्या पिढींतल्या सुधारणेच्या म्होरक्यांनी चालविला होता, त्याची चीड या नव्या पिढीच्या सुशिक्षितांना येऊं लागली होती. रानडे प्रभृति दुसऱ्या पिढींतले सुधारक पहिल्या पिढींतल्याप्रमाणे वेडे, मूर्ख, पशु, बेअक्कल इत्यादि इरसाल विशेषणें आपल्या लोकांना उद्देशून वापरीत नसत, तरी त्यांच्या म्हणण्याचा इत्यर्थ एकंदरीने तोच होता. अनेक इंग्रज व जर्मन ग्रंथकार आमच्या कवींची, तत्त्वज्ञांची, शास्त्रकारांची स्तुति करतात; अनेक पाश्चात्त्य इतिहासकार आमच्या इकडच्या योद्धयांची व मुत्सद्यांची स्तुति करतात, मग आम्ही इतके मूर्ख कसे ? इंग्रजांनी आमच्यावर स्वामित्व स्थापित केलें असलें म्हणून काय झालें ? असें आजपर्यंत इतिहासांत पुष्कळ देशांचें झालें आहे. तीन चार हजार वर्षांपासून चालत आलेल्या आपल्या संस्कृतींत पुष्कळच अभिमानास्पद भाग आहे. आमच्यांत जसे कांही दोष आहेत तसे इंग्रजांच्या चालीरीतींत व धर्मांतहि कित्येक दोष आहेत. मग



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २०५५७ वि. व्यारेत
क्रमांक ७३२ नों. दि. १९/३/७८

आपणच आपल्या कपाळावर नालायकीचा छाप मारून घेण्याचा हा अवसानघातकीपणा काय म्हणून ?

## नवनेतृत्वाचा उदय : चिपळूणकर

तरुणांच्या उसळत्या मनांतल्या या भावनांना अकुतोभय वृत्तीनें तोंड फोडणारा निश्चयाचा महामेरु रानडयांच्या नंतर आठ वर्षांनी आणि टिळक आगरकरांच्या पूर्वी सहा वर्षे जन्माला आला. त्याने जी प्रवृत्ति निर्माण केली तिला टिळक आणि आगरकर आपलें विद्याध्ययन संपतांच येऊन मिळाले; तेव्हा या पुरुषाच्या जीवनकार्याचें नीट अवलोकन करून त्याचें तात्त्विक अधिष्ठान समजून घेणें आपल्या विषयाचें यथार्थ आकलन होण्याच्या दृष्टीने अवश्य आहे.

हा पुरुष विष्णु कृष्ण चिपळूणकर ( १८५०–१८८२ ) होय, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. आपल्या लेखणीने आणि करणीने जनमनावर प्रभुत्व संपादन करणारा महाराष्ट्रांतील हा पहिला लोकनेता होय. यांच्या कामगिरीचा एक पैलू ‘ आधुनिक मराठी गद्याचा जनक ’ या त्यांना सर्वांनुमतें देण्यांत आलेल्या पदवीने व्यक्त होतो. बंगाली गद्याचे प्रभु बंकिमचंद्र चतर्जी (१८३८–१८९४) आणि आधुनिक हिंदी वाङ्मयाचे निर्माते भारतेन्दु हरिश्चन्द्र (१८५०–१८८५) या दोघांचें लेखनकार्य चिपळूणकरांच्या वाङ्मयीन कारकीर्दीशीं समकालीन होतें आणि या तिघांना एकमेकांची माहिती नसतांनाहि तिघांचें प्रवृत्तिनिमित्त साधारणपणें सारखेंच होतें ही नवलाची गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. या तिघांच्याहि लेखनामध्ये

स्वधर्म स्वदेश स्वभाषादिकांचा
जगीं मान व्हावा असा हेतु साचा ।

दिसून येतो. विशेषतः बंकिमचंद्रांचें चिपळूणकरांशीं असलेलें साम्य ठळकपणें लक्षांत भरण्याजोगें आहे. परंपरागत भारतीय संस्कृति आणि सनातन हिंदुधर्म यांच्याविषयी स्वत्वाची भावना जागृत करून तिच्या आधारावर देशोद्धाराची त्यागमय प्रवृत्ति निर्माण करणें हा हेतु बंकिमचंद्रांच्या वाङ्मयसरस्वतीमध्ये अंतःप्रवाहाच्या रूपाने दृग्गोचर होतो. तोच हेतु अधिक

परिस्फुट, खळखळणाऱ्या स्वरूपांत चिपळूणकरांच्या लिखाणांत आढळतो. बंकिमचंद्रांची वाङ्मयी मूर्ति विनोद, परिहास, व्याजोक्ति, उपहास इत्यादि अलंकारांनी नटलेली आढळते, तर चिपळूणकरांच्या वाग्देवीने हीं साधनें आयुधरूपाने धारण केलेलीं आपल्या नजरेस पडतात.

पण आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये केवळ अभिजात वाङ्मयवीर म्हणून मिळणाऱ्या स्थानापेक्षा फार मोठें स्थान चिपळूणकरांना मिळालेलें आहे. स्वातंत्र्याकांक्षेवर जनतेच्या शक्ति केंद्रित करूं पाहणारा हा पहिला लोकनायक होय. त्या दृष्टीनेच आपणाला त्यांच्याकडे पाहावयाचें आहे.

केवळ ३१ वर्षें १० महिने एवढया अल्प आयुष्यांत चिपळूणकरांनी जें कर्तृत्व प्रकट केलें तें पाहून मन विस्मयचकित होतें. त्यांनी लिहिलेला सुमारें २००० पृष्ठांचा मजकूर, ज्यांतलें बहुधा एक वाक्यहि लेचेंपेचें आढळावयाचें नाही आणि जो आज ७५ वर्षांनंतरहि चैतन्याने रसरसलेला भासतो, तोच जरी लक्षांत घेतला तरी त्यांच्या प्रतिभेचें अलौकिकत्व मनावर ठसल्याखेरीज राहत नाही. त्यांत आयुष्याच्या शेवटच्या चार वर्षांत सुखाची सरकारी नोकरी सोडून लोकसेवेच्या आणि देशोद्धाराच्या अनेक संस्था स्थापन करण्यांत त्यांच्या अंगचें जें तेज दिसून आलें त्यामुळे

झाले बहु होतिल बहु आहेतहि बहु परंतु यासम हा ।

हें सत्य पुरतेपणीं आपल्या मनावर बिंबतें.

चिपळूणकर १८७२ सालीं बी. ए. झाले आणि १८७४ सालीं सरकारी हायस्कुलांत त्यांनी शिक्षकाची नोकरी पत्करली. याच सालीं त्यांनी ‘ निबंधमाला ’ हें आपलें मासिक सुरू केलें. त्यांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर हे त्या काळांतल्या वाङ्मयसेवकांचे धुरीण होते. त्यांच्या छत्राखाली विष्णुपंतांनी स्वतः लेखन करण्यास प्रारंभ करून आपली लेखणी अगोदरच चांगली घटवून तयार केली होती. अशा घटलेल्या लेखणींतून उतरलेले स्वाभिमान व देशाभिमान उद्दीपित करणारे लेख ‘ निबंधमाले’मधून बाहेर पडूं लागले तेव्हा त्या वेळच्या तरुणांना, वयस्कांना आणि वृद्धांना आपल्या मनांतले मूक विचार जोरकसपणे व्यक्त करणारा नेता लाभला म्हणून हर्ष झाला आणि अल्पावधींतच शिक्षित पांढरपेशा समाजाचें ‘ निबंधमाला ’

हें मुख्य आकर्षणस्थान बनलें. ‘माले’चा तेजस्वीपणा सरकारला आणि सरकारमान्य लब्धप्रतिष्ठितांना दाहक वाटूं लागला तेव्हा ‘माले’च्या कर्त्याला अडचणींत टाकण्याचा उपक्रम सुरू झाला. रत्नागिरीसारख्या दूर आडवळणाच्या गावीं चिपळूणकरांची बदली करण्यांत आली. चिपळूणकरांचा देशसेवेचा निर्धार कसाला लागला. “Rather than bend my knee before tyranny I resolved to snap asunder my chains once and for all” असे बाणेदार उद्‌गार काढून सरकारी नोकरीची रौप्य शृंखला त्यांनी तोडून टाकली आणि ‘परम लाभप्रद व उन्नतिप्रद अशी जी ही आर्यभूमीची सेवा’* तिच्यासाठी ते सिद्ध झाले.

चिपळूणकरांच्या ‘निबंधमाले’ला त्या काळांत आणि त्यानंतरच्या पिढींत अभूतपूर्व लोकप्रियता लाभली. कांही काळानंतर कित्येक दुर्मुखांच्या मनावर याची विपरीत प्रतिक्रिया होऊं लागली. चिपळूणकरांनी आपल्या पूर्वीच्या थोर मानल्या गेलेल्या सुधारणापक्षी पुढाऱ्यांवर उपहासप्रचुर टीका केली होती. या पुढाऱ्यांचे चरित्रकार व समर्थक पुढे जेव्हा निघाले तेव्हा त्यांनी चिपळूणकरांनी त्यांच्या चरित्रविषयांवर केलेल्या टीकेचा वचपा काढला. सन्माननीयांच्या मतांची व कृत्यांची टवाळी करण्याखेरीज चिपळूणकरांनी दुसरें विशेष कांही केलें नाही अशा अर्थाची टीका करून या मंडळींनी यथेच्छ निंदाहि केली आहे. ही मंडळी आता जुनी झाली. सध्याची तरुण पिढी या वादाविषयी बहुंशीं उदासीन आहे. पण साम्यवाद, नवमतवाद वगैरेंचीं बिरुदें बाळगणाऱ्या कालपरवाच्या तरुण पिढींत चिपळूणकरांना प्रतिगामी, प्रगतिविरोधी इत्यादि विशेषणें बहाल करण्याची एक फॅशन पडली होती. तेव्हा चिपळूणकरांनी जें कांही सांगितलें आणि केलें तें यथातथ्य स्वरूपांत पुढे मांडणें जरूर झालें आहे.

गतकाळच्या कोणच्याहि गोष्टीचें मूल्यमापन करितांना वस्तुनिष्ठ ऐतिहासिक दृष्टीचा अवलंब करणें हितावह होतें. असें केल्याने विकारप्रेरित एकांगी विचारसरणी टाळतां येते आणि सध्याच्या काळाला व भविष्य-

---

* निबंधमाला, अंक ७२ अखेर.

काळाला उपयुक्त असा निष्कर्ष काढणें सुलभ होतें. एखाद्या व्यक्तीच्या कार्याचें सारग्राही निरीक्षण करावयाचें असल्यास तिच्या काळीं सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थिति कशा प्रकारची होती, कोणच्या विचारसरणी प्रचलित होत्या आणि कोणच्या शक्ति कार्य करीत होत्या, या सर्व गोष्टींचें निरीक्षण करून उद्दिष्ट व्यक्तीच्या चारित्र्यांत व मतांत या सर्व गोष्टींचा परिपाक कशा प्रकारें अनुभवास येत होता हें पाहिलें पाहिजे.

पूर्वनियतवादाचा सर्वथा अवलंब करायचा असा मात्र याचा अर्थ नाही. व्यक्तीचीं मतें व कृत्यें म्हणजे केवळ ऐतिहासिक परिस्थितीचा परिपाक, तिचे विचार व आचार म्हणजे सामाजिक शक्तींच्या आघातांमुळे झालेली अपरिहार्य प्रतिक्रिया असल्या समजुती ठोकळेबाजपणाच्या ठरतात. ऐतिहासिक कारणांचा आणि सामाजिक प्रवृत्तींचा परिणाम व्यक्तिचरित्रावर होत असला, तरी विशेषतः प्रभावी व्यक्तींच्या जीवनांत त्यांचा पुरुषकार प्रबळ ठरत असतो. भगवद्‌गीतेनें या संबंधांत त्रिकालाबाधित सिद्धान्त घालून दिला आहे.

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ॥
शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः ।
न्याय्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ॥

अधिष्ठान म्हणजे ऐतिहासिक कारणांनी बनलेली सामाजिक परिस्थिति. अधिष्ठान किंवा परिस्थिति हें कोणतेंहि कर्म घडण्याचें केवळ एक कारण होय. तिच्याबरोबरच कर्ता म्हणजे कर्म करणारा, ( त्याची इच्छाशक्ति, त्याच्या उपजत वृत्ति, त्याचा स्वभाव ) हाहि कर्मसिद्धीस कारणीभूत होतो. या दोहोंप्रमाणे 'करणं च पृथग्विधम्' म्हणजे फलनिष्पत्तीसाठी उपयोगांत आणलेलीं भिन्न भिन्न साधनें आणि 'विविधाश्च पृथक् चेष्टाः' म्हणजे नाना प्रकारचे केलेले प्रयत्न या गोष्टीहि फलनिष्पत्तीस कारणीभूत होतात. पण या चारी गोष्टी एकत्रित झाल्या तरी फलनिष्पत्ति होईलच किंवा ती आपण अपेक्षिल्याप्रमाणेच होईल असें मात्र नाही. ज्याची कल्पना कोणालाहि कधीहि होऊं शकत नाही असें 'दैव' हें घटक कारण प्रत्येक कर्मांत कळसूत्राप्रमाणे अदृश्य रूपाने वसत असतें.

या तात्त्विक मीमांसेचें पूर्ण भान ठेवून आपणाला चिपळूणकरांच्या काय किंवा टिळक आगरकरांच्या काय मनोवाक्कायकर्मांचें निरीक्षण करावयाचें आहे.

## चिपळूणकर : उक्ति आणि कृति

चिपळूणकरांचे सर्व विचार, उच्चार आणि आचार यांच्या बुडाशीं असलेलें पहिलें गृहीत तत्त्व हें होतें की स्वातंत्र्यनाश ही आपल्या देशावर कोसळलेली सर्वांत मोठी आपत्ति होय. 'आमच्या देशाची स्थिति' या निबंधांत "इंग्रजी राज्यापासून आमची पहिली मोठी हानि कोणती झाली म्हणाल तर स्वातंत्र्यनाश" (अंक ७८) असें म्हणून या स्वातंत्र्यनाशाच्या पायीं आमची कशी दुर्दशा होऊन गेली आहे, याचें वर्णन अत्यंत पोटतिडकेने 'माले'चे अंक ७८, ७९ व ८१ यांत त्यांनी केलें आहे. हें वर्णन करतांना त्यांचें तळमळणारें अंतःकरण इतकें तापलें आहे की ठिणग्यांप्रमाणे दाहक उद्गार त्यांतून बाहेर पडले आहेत. हे दोन तीन अंक म्हणजे मराठी वाङ्मयांतलीं अमूल्य रत्नें आहेत.

> "आता या एका स्वातंत्र्यनाशाच्या पायीं आमचीं कितीक नुकसानें झालीं आहेत पहा. एक तर आमचें जगांतून अस्तित्वच नाहीसें झाल्यासारखें झालें आहे. केवळ प्राणधारण करून आम्ही आहों इतकच काय तें! गेल्या शतकांत हिंदु लोकांचीं राज्यें, हिंदु लोकांची संपत्ति, हिंदु लोकांची विद्या, वगैरे शब्दांत जसा अर्थ होता तसा आता कांही राहिला आहे काय?" (अंक ७८)

तसेंच अंक ८३ मध्ये ते म्हणतात—

> "आमच्या प्रस्तुतच्या दैन्याचें मुख्य कारण काय आहे हें कोणालाहि सांगायला नकोच. तें परकी अंमल होय हें उघडच आहे."

पारतंत्र्याविषयीची ही तिडीक व्यक्त करण्यांत चिपळूणकर त्या काळांतल्या लोकमताला परिस्फुट करण्याचें लोकाग्रणीचें कर्तव्यच बजावीत होते. लोकमताचाच अनुवाद आपण करीत आहों असें ते कित्येक ठिकाणीं स्पष्ट म्हणतात—

"एकंदरींत पाहतां आलीकडच्या काळांत आणि त्यांतून दिल्लीपदावर बादशाही गाजल्यापासून आमच्या पाश्चात्त्य प्रभूंनी जो वर्तनक्रम सुरू ठेवला आहे तो बहुतेक अंशीं केवळ अन्यायाचा आहे, व ही गोष्ट दिवसेंदिवस येथे आबालवृद्धांच्याहि प्रचीतीस येत चालली आहे......पूर्वीची तिस्मारखानी व पेंढारशाही पुरवली, पण हा इंग्रजी चरक फार भयंकर, असें आलीकडे सर्वांस वाटूं लागलें आहे!" (अंक ७९)

स्वातंत्र्यनाश ही आपली सर्वांत मोठी हानि ही मूलभूत भूमिका ठरल्यानंतर स्वातंत्र्यनाश ज्या कारणांनी झाला तीं नाहीशीं करणें हें ओघानेच आलें. ह्या कारणांसंबंधी चिपळूणकरांनी दोन प्रकारचें प्रतिपादन केलें आहे. सोपपत्तिक विवेचनाचा प्रसंग आला असतां ते ठामपणें असें लिहितात की आमच्या देशास कांही एक झालें नाही.

"आमचा ठरलेला सिद्धांत आम्ही मागेच नमूद केला आहे, की आमच्या देशास कांही एक झालें नाही......हल्ली जी आमच्या राष्ट्रास विपत्तीची स्थिति प्राप्त झाली आहे, ती आमच्या अंगच्या कांही अनिवार्य दोषांमुळे आली नसून ती यदृच्छेने कोणत्याहि देशास येण्यासारखी आहे, व आजपर्यंत आलीहि आहे. इंग्रेज लोक हे आम्हांहून अनेक प्रकारांनी बलिष्ठ असल्यामुळे व आमचें दैव फिरल्यामुळे हल्लीच्या अवस्थेंत आम्ही येऊन पडलों आहों." (अंक ८३)

हें लिहिणें तितकेंसें सयुक्तिक नाही हें कोणाच्याहि लक्षांत येण्याजोगें आहे. इंग्रज लोक बलिष्ठ असल्यामुळे त्यांनी आम्हाला जिंकलें असें म्हणणें म्हणजे आपण त्यांच्यापेक्षा अनेक दृष्टींनी कमकुवत आहोंत हें कबूल करण्यासारखें हो. आपण कमकुवत झालों, याला आपल्यांतील कांही तरी महत्त्वाच्या उणिवा अगर दोष हे कारण असले पाहिजेत, ही कबुली पर्यायाने त्यांत आलीच. आणि हा ध्वन्यर्थ खुद्द त्यांना अमान्य नव्हता, असें वरील मजकूर लिहिल्यानंतर लगेच 'प्रस्तुतच्या दैन्याचें कारण' शोधून त्यावर उपाययोजना सांगण्याच्या मार्गाला ते लागतात यावरून उघड होतें. "आमच्यदेशाला कांही एक झालें नाही" असें ठासून सांगण्यांत

त्यांचा उद्देश हा दिसतो की लोकांचीं मनें जबरदस्त आशावादाने उद्दीपित व्हावींत. 'आमच्यांतल्या बडया बडया मंडळीने मूर्तिपूजा, बालविवाह, जातिभेद इत्यादि जीं एकेक बडीं बडीं निदानें ठरविलीं आहेत' तीं सर्व चुकीचीं होत, हा मुद्दा त्यांनी अनेक ठिकाणीं ठामपणें मांडला आहे. कारण असल्या निदानांमुळे लोकांमध्ये निराशावाद आणि अगतिक वृत्ति बळावते असें त्यांस वाटत होतें.

तर मग खुद्द चिपळूणकरांचें निदान काय होतें ? त्यांच्या एकंदर लिखाणावरून त्यांचें मत असें दिसतें की अभिमानशून्यता, पोचटपणा, स्वस्थितीच्या यथार्थ जाणिवेचा अभाव, इत्यादि मानसिक कारणेंच मुख्यतया आपल्या विपन्नावस्थेच्या बुडाशीं आहेत. देशाभिमान, स्वातंत्र्यप्रीति या मनोवृत्तिच आपल्या देशांत पूर्वीपासून आढळत नाहीत. त्यामुळे शौर्य, बुद्धिमत्ता इत्यादि वैयक्तिक गुणांत आम्ही पाश्चात्त्यांच्या तोडीचे असूनहि वरील मनोवृत्तींच्या अभावामुळे आम्ही पाश्चात्त्य राष्ट्रांतील मेरुमणि जे इंग्रज त्यांच्याकडून जिंकले गेलों.

तेव्हा स्वाभिमान, देशाभिमान, स्वातंत्र्याकांक्षा इत्यादि ज्या मानसिक गुणांच्या अभावामुळे आम्ही पारतंत्र्यांत पडलों त्या गुणांची उत्पत्ति व अभिवृद्धि करण्यास झटणें हें स्वातंत्र्याच्या दिशेने समाजाला नेऊं इच्छिणाऱ्या प्रत्येक देशहितेच्छूचें कर्तव्य होय. ही जाणीव निबंधमालेला सुरवात करण्याच्या वेळेपासून—इतक्या लहान वयांत देखील—चिपळूणकरांच्या मनांत पक्की बिंबलेली दिसते. त्यामुळे 'निबंधमाला' ही असंख्य तरुणांचीं मनें देशाभिमानाने, स्वातंत्र्यलालसेने पेटविणारी एक अक्षय चूड बनली. तिचें वाक्यन् वाक्य गाढ आत्मविश्वासाने भरीव बनलेलें, उज्ज्वल देशाभिमानाच्या दीप्तीने रसरसलेलें असें भासतें.

स्वदेशाचा अभिमान आणि स्वातंत्र्याची आकांक्षा ज्वलित करण्यास चिपळूणकरांनी दुधारी उपाय योजिलेला दिसतो. एकीकडून आपले राज्यकर्ते जे इंग्रज लोक त्यांच्याविषयीची श्रेष्ठत्वभावना आणि वचक हरतऱ्हेने कमी करणें आणि दुसरीकडून आपली प्राचीन संस्कृति, आणि आपला इतिहास यांचें गौरवयुक्त वर्णन करणें. त्यांचें चातुर्य अगे योजकत्व इतकें उच्च दर्जाचें आहे की विषय कोणताहि असो, विवेचन कितीहि गंभीरपणें

चाललेलें असो, मधूनमधून विषयांतर करण्याची संधि साधून ते मिल्ल-मेकाले-सारख्या इतिहासकारांवर झोड तरी उठवतील, मिशनरी मंडळींचा उपहास तरी करतील किंवा टेंपल, लिटन, बीकन्सफील्डसारख्या अरेरावांची खरड तरी काढतील. कांही वेळां हा प्रकार, तर दुसऱ्या कांही प्रसंगीं ओजस्वी वाणीने स्वजनगौरवाचा वीररसाने थबथबलेला पोवाडा गातील.

पारतंत्र्याविषयी चिपळूणकरांना जर इतका कमालीचा तिटकारा होता, तर सशस्त्र क्रांतीसंबंधाने त्यांचीं मतें काय होतीं, याविषयी कुतूहल उत्पन्न होणें साहजिक आहे. पण अशा प्रयत्नांबद्दलचा निषेध स्पष्टपणे नमूद करून त्यांनी या बाबतींत अनुमानाला मुळीच अवसर ठेविलेला नाही.

> "वरील (राज्यकर्त्यांचा संबंध तोडून टाकण्याचा) उपाय म्हटला म्हणजे आम्ही आमच्या राज्यकर्त्यांशीं लढाईला उभे राहून त्यांचा पराजय करायचा, व आपलें राज्य पुन्हा आपलें आपण वहिवाटावयाचें, हा होय. आता ही गोष्ट हल्लीच्या काळीं कितपत साध्य आहे हें बहुधा एखाद्या लहान पोरालाहि कळण्यासारखें आहे....... आमच्या राज्यकर्त्यांचें केवढें अपार सामर्थ्य, व केवढा कड्डा सरंजाम, तसाच केवढा जगड्व्याळ बंदोबस्त; आणि आमच्याकडे मंडळींत परस्पर किती सूत, आमची हल्लीची रणसामग्री किती, व युद्धकलेचें ज्ञान किती,—सर्वच गोष्टी अनुकूल! असो; तर वरील थोरल्या उपायाच्या संबंधाने तर आज कोणी गोष्टहि काढूं नये अशी सांप्रतची अवस्था आहे हें स्पष्टच आहे." (अंक ८३)

वासुदेव बळवंत फडके यांचा उल्लेख त्यांनी 'यःकश्चित दरवडेखोर' (अंक ७८) म्हणून केला आहे, यावरूनहि शस्त्राचाराविषयी त्यांचा तिटकारा व्यक्त होतो.

चिपळूणकरांच्या मतप्रणालीचें एवढें विवरण करणें अवश्य होतें. टिळक आणि आगरकर विद्यापीठांतून उत्तीर्ण होतांच देशसेवेच्या स्फूर्तीने चिपळूणकरांना येऊन मिळाले आणि आरंभीं कांही काळ तरी दोघांचीहि चिपळूणकरांचे सांप्रदायिक म्हणून गणना होत होती; तेव्हा चिपळूणकरांनी व्यक्त केलेल्या देशविषयक विचारांचें स्वरूप तरी काय होतें हें जाणून घेणें इष्ट होय.

ही गोष्ट क्षणार्धांत कोणाच्याहि लक्षांत येणारी आहे की ही विचारसरणी, इंग्रजी शिक्षितांच्या पहिल्या दोन पिढयांच्या सर्वांगीण सुधारणावादाहून मूलतः भिन्न होती. पाश्चात्त्य राष्ट्रांच्या मानाने आपण विद्या, कला व शास्त्रें या बाबतींत फार मागासलेले आहों; आमचा धर्म व आमची सामाजिक स्थिति मूर्तिपूजा, बालविवाह, स्त्रीदास्य, जातिभेद इत्यादि महान दोषांनी ग्रस्त आहे; अशा स्थितींत इंग्लंडसारख्या धुरंधर उदार पाश्चात्य राष्ट्राशीं आपला संबंध जडून आला आहे यांत मोठें ईश्वरी सूत्र आहे. तेव्हा इंग्रज राज्यकर्त्यांच्या उदाहरणाने व प्रत्यक्ष शिकवणुकीने आपण आपल्यांतले दोष प्रथम नाहीसे केले पाहिजेत, अशी जुन्या पिढयांमधील विचारवंतांची, लोकहितवादींनी उत्स्फूर्त केलेली व रानडयांनी परिपक्व केलेली विचारसरणी होती. चिपळूणकरांची विचारसरणी हिच्याहून सर्वथा भिन्न, किंबहुना हिला विरोधी कशीं होती हें वरील विवरणावरून ध्यानांत येईल.

चिपळूणकर सामाजिक सुधारणांच्या विरुद्ध होते, असा एक समज आढळतो. कांही विवेचकांनी या समजाचें निराकरणहि केलें आहे. प्राचीन भारतीय संस्कृतींतील महनीय विशेषांचा आणि आपल्या इतिहासांतील थोर व्यक्तींचा महिमा गातांना त्यांच्या वाणीला अपार प्रेमाचें भरतें येतें व ती विलक्षण सौंदर्याने नटते. 'लोकहितवादीं'चा समाचार घेतांना आपली वेदशास्त्रपुराणें आणि त्यांचें रक्षण करणारे वैदिक, शास्त्री, पुराणिक यांचा त्यांनी कैवार घेतला. यामुळे सनातन धर्माभिमानी रूढिग्रस्त समाजास ते जवळचे वाटूं लागले. पण वास्तविक जुन्या रूढिवादी धर्ममतांच्या समर्थनपर असें त्यांनी कधी लिहिलें नाही. क्वचित प्रतिकूलच लिहिलेलें आढळेल.

चिपळूणकरांवरील मृत्युलेखांत आगरकरांनी त्यांच्या सामाजिक मतांसंबंधाने जो निर्वाळा दिला आहे, तो अधिक स्पष्ट आहे. ते म्हणतात,

> " पुनर्विवाह, बालविवाह, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, धर्मसंस्थापना, जातिभेद यांसंबंधाने त्यांचे विचार जुन्या मताचे दिसत, परंतु ते वास्तविक रीतीने अगदी पुढे सरसावलेल्या सुधारकाप्रमाणे होते." *

---

* केसरींतील निवडक निबंध, पुस्तक पहिलें, पृ. २०७

आगरकरांचें हें विधान सर्वसाधारणपणें यथार्थ मानलें तरी चिपळूणकरांनी सामाजिक वा धार्मिक सुधारणांवर कधीहि भर दिला नाही, उलट त्यांच्यावर भर देणाऱ्यांचा उपहास केला हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यांच्या धोरणांत ही बाब फार महत्त्वाची आहे. 'आधी सामाजिक की आधी राजकीय' या वादाचीं बीजें यांत आहेत. धर्मासंबंधी विचार व्यक्त करितांना पुढील दोन फार मार्मिक वाक्यें त्यांनी लिहिलीं आहेत—

> "धर्म व व्यवहार हे कोणत्याहि देशांत परस्परविरोधाने कधीहि राहत नाहीत. दोघांची घासाघासी होण्याची वेळ आली असतां त्या घासाघासीनेच क्रमाक्रमाने दोघांचीहि सोय निघते." (अंक ८२)

रानडेप्रणीत सर्वांगीण सुधारणावाद आणि चिपळूणकरप्रणीत स्वातंत्र्याकांक्षी देशाभिमानवाद या दोघांचें स्वरूप आपण पाहिलें. यांतला बरोबर कोण, चूक कोण, पुरोगामी कोण, प्रतिगामी कोण याची चिकित्सा येथे करण्याचें प्रयोजन नाही. दोन्ही कोणच्या परिस्थितींत कसे उद्भवले व परिणत झाले हें पाहणें, हें ऐतिहासिक दृष्टीचें काम. या दोन्ही विचारसरणींचा पुढे आपणास अनेकवार परामर्श घ्यावा लागेल व आजपर्यंतचा इतिहासहि कोण बरोबर ठरला व कोण चूक ठरला, किंवा दोन्ही आपापल्या परीने रास्त ठरले, याविषयी कदाचित कानगोष्टी करील. सर्वांगीण सुधारणावाद शिक्षितांच्या पहिल्या पिढींत उद्भवला, दुसऱ्या पिढींत परिपक्व झाला आणि तिसऱ्या पिढींत वठूं लागला. लोकांना त्याचा कंटाळा येऊं लागला. नव्या तरुणांची आवक त्यांत बंद झाली. देशाभिमानी संप्रदाय शिक्षितांच्या तिसऱ्या पिढींत चिपळूणकरांच्या द्वारा परिस्फुट झाला आणि नवतरुणांना त्याने आकृष्ट केलें; इतकेंच नव्हे, तर आबालवृद्ध पांढरपेशा जनतेचीं मनें त्याने काबीज केलीं ही ऐतिहासिक परिणति लक्षांत ठेवली म्हणजे बस आहे.

सुधारणा संप्रदाय आणि देशाभिमानी यांच्यांत एका बाबतींत मात्र मतैक्य होतें. इंग्रजी वाङ्मय, विद्या, शास्त्रें व यांत्रिक कला हें सर्व आपण शक्य तितक्या लवकर आत्मसात् केलें पाहिजे हें सर्वांना मान्य होतें. त्यांतून चिपळूणकरांचा तर या बाबतींत विशेषच कटाक्ष होता. इंग्रजी विद्येचें उन्नतिकारकत्व त्यांनी अनेक ठिकाणीं ऊर्जस्वल रीतीने वर्णिलें आहे. इंग्रजी राज्यापासून झालेल्या लाभांचें वर्णन करतांना ते म्हणतात—

"यास्तव आमच्या देशांत जों जों इंग्रजी विद्येचा प्रसार होत जाईल तों तों सुधारणा, स्वातंत्र्य, सुख यांचा प्रसार अवश्य होत जाणार ! एक इंग्रजी विद्येचें वज्र आमच्या हातांत असलें म्हणजे मग लिटनशाही, टेंपलशाही.. ...वगैरे शंभर शाह्यांस सुद्धा आम्ही दाद देणार नाही" ( अंक ७७ )

तसेंच पुढे एका ठिकाणीं

"त्यांतून इंग्रजी विद्या ही तर वस्तुतः पाहतां वाघिणीसारखी आहे; तिच्या दुधावर जो पोसला तो लेचापेचा कधीच निपजूं नये. उत्साह, धैर्य, अश्लाघ्य कर्माचा तिरस्कार, स्वावलंबन इ. उदात्त गुण वरील भाषेंतील ग्रंथांच्या अध्ययनापासून उत्पन्न होणारे आहेत." ( अंक ७८ )

या विचारांतूनच चिपळूणकरांचें जीवनसूत्र आपणास गवसतें. देशाला सध्याच्या हलाखीच्या स्थितींतून वर काढण्यास सर्वत्र विचारजागृति केली पाहिजे; व्हालटेर प्रभृति महान ग्रंथकारांनी देशभाषेच्या द्वारें लोकांचें मन क्षुब्ध करून सोडलें, त्यामुळेच पुढे फ्रेंच राज्यक्रांति झाली; तसा प्रकार इथे केला पाहिजे, अशा तऱ्हेचे विचार त्यांनी 'आमच्या देशाची स्थिति' या निबंधाच्या अखेरीस व्यक्त केले आहेत. इंग्रजी विद्येपासून देशाभिमान, स्वातंत्र्यप्रीति, धैर्य इत्यादि गुणांचा आपल्या देशांत जो प्रसार व्हावयाचा, तो आजपर्यंतच्या तऱ्हेवाईक शिक्षणपद्धतीमुळे ( अंक ७८ ) झालेला दिसत नाही. तेव्हा वरील गुणांचा उदय होईल अशा रीतीने शिक्षण देणाऱ्या शाळा काढल्या पाहिजेत असाहि विचाराचा ध्वनि उमटलेला दिसतो.

निबंधमालेंतील लेख हें चिपळूणकरांच्या चारित्र्याचें अर्धांग होय. तेवढेंच जरी त्यांनी केलें असतें तरी एक वाङ्मयप्रभु आणि स्वातंत्र्यवादी विचारसरणीचा प्रणेता म्हणून त्यांचें स्थान महाराष्ट्राच्या इतिहासांत अढळ झालें असतें. परंतु धीरोदात्त त्यागाचें उदाहरण घालून देऊन लोकनायक या पदवीला साजेसें कर्तृत्व जें त्यांनी प्रकट केलें त्यामुळे 'मालें' तील तेजस्वी बिचारांवर तेजस्वी कृतीचा कळस चढला.

सरकारी नोकरी हा त्या काळीं इंग्रजी शिकलेल्या पांढरपेशांचा राजमार्ग झाला होता. सरकारचे अंतःस्थ हेतु यांत सिद्धीला जात होते

आणि शिकलेल्या मंडळींनाहि कष्ट करून केलेल्या विद्येचें फळ निश्चित सुखी आयुष्याच्या रूपानें मिळाल्याचें समाधान लाभत होतें. पण पारतंत्र्याच्या काळांत ज्यांना विचारजागृति करावयाची आहे, तेजस्वी देशाभिमानाचें उद्दीपन करावयाचें आहे, त्यांनी राजसेवेच्या रौप्यशृंखलेचा त्याग करून निर्भेळ लोकसेवक म्हणूनच जनतेसमोर उभें ठाकलें पाहिजे, ही खूणगाठ चिपळूणकरांनी मनाशीं बांधली आणि स्वेच्छेनें नोकरीचा राजीनामा देऊन देशसेवेला वाहून घेण्यासाठी ते सिद्ध झाले.

रत्नागिरीहून सन १८७९ च्या उन्हाळयाच्या सुटींत चिपळूणकर पुण्यास आले, ते पुन्हा परत रत्नागिरीला नोकरीवर गेले नाहीत. सहा महिन्यांची रजा काढून ते पुण्यांतच राहिले. रजा संपतांच त्यांनी नोकरीचा राजीनामा पाठवून दिला. टिळक, आगरकर आणि इतर कांही जण यांच्या सहकारितेने १८८० सालच्या सुरवातीस त्यांनी 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली. देशभाषांतील वृत्तपत्रांमध्ये आपल्या अकुतोभय वृत्तीमुळे ज्याने अजरामर कीर्ति मिळविली तो 'केसरी' १८८१ च्या प्रारंभीं निघाला. त्यानंतर चिपळूणकर फार दिवस जगले नाहीत. देशाचें पारतंत्र्य आणि अज्ञान या रावणकुंभकर्णांच्या निर्दलनार्थ अनेक आयुधें घेऊन सज्ज झालेल्या या महारथीला ता. १७ मार्च १८८२ रोजीं अचानक काळाने ग्रासलें.

सबंध आयुष्यांत मार्गक्रमण करीत असतांना चिपळूणकरांचें पाऊल ढिलें म्हणून कधी पडलें नाही; लेखणींतून कचरता शब्द सहसा कागदावर उतरला नाही. सगळें कांही ठाम, दणकट, खंबीर! त्यांनी व्यक्त केलेले विचार सर्व व्यावहारिक, विशुद्ध बुद्धिवादाधिष्ठित आहेत. रानडयांच्या प्रमाणे त्यांत नियति, परमेश्वरी सूत्र इत्यादि श्रद्धागम्य विचारांची गुंतागुंत नाही. तथापि त्यांचें व्यक्तित्व पाहिलें तर तें गीतेंत वर्णिलेल्या स्थिरबुद्धि, असंमूढ अशा ब्रह्मवेत्त्याप्रमाणे भासतें. त्याला कोठे डग नाही किंवा ढाळ नाही.

चिपळूणकरांचा व टिळक आगरकरांचा जो संबंध आला तो आपण यथास्थल पाहणारच आहों. इथे आणखी एका तत्कालीन व्यक्तीच्या कार्याची थोडक्यांत माहिती करून घेणें अवश्य वाटतें. तेवढी करून घेऊन हें प्रकरण समाप्त करूं.

## जोतिबा फुले

ही व्यक्ति महात्मा जोतिबा फुले (१८२७-१८९०) होय. दलितांच्या उद्धाराकरिता आयुष्यभर तनमनधनेंकरून झटणाऱ्या या महापुरुषाची माहिती मराठी प्रदेशांत आता आबालवृद्धांस झाली आहे. समाजांतील जो जो म्हणून दलित वर्ग त्यांना दिसला त्याच्या उद्धारासाठी समाजाच्या प्रतिकूलतेची पर्वा न करितां त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या कार्यांचें विस्तारानें वर्णन येथे करण्याचें प्रयोजन नाही. बहुजनसमाजाचा उद्धार करण्याच्या उद्देशाने १८७३ सालीं त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला. ब्राह्मणांचें धार्मिक व सामाजिक वर्चस्व, जातीजातींमधील विषमता या गोष्टींवर त्यांचा कटाक्ष होता. बहुजनसमाजाच्या उद्धाराच्या चळवळीची एक प्रचंड फळी त्यांच्या प्रयत्नांनी उभारली गेली आणि तिचा प्रसार मराठी प्रदेशाच्या कानाकोपऱ्यांतून झाला.

वास्तविक पाहतां ही चळवळ आपल्या राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीने पाहतां अत्यंत इष्ट होती. स्वतंत्रतेचें आणि समतेचें वारें एकदा सुरू झालें म्हणजे त्याने अमुकच मर्यादेपर्यंत थांबावें असें कसें म्हणतां येईल? ब्राह्मणेतर जाती अज्ञानांत, दारिद्र्यांत, हीन सामाजिक अवस्थेंत खितपत होत्या. त्यांचें स्वातंत्र्य म्हणजे ब्राह्मणांच्या सामाजिक, धार्मिक व आर्थिक दास्यांतून मुक्त होणें हेंच मुख्यतः होतें. इंग्रजांनी लादलेलें पारतंत्र्य त्यांच्या दृष्टीने फार दूर व अप्रत्यक्ष होतें. त्याचे कटु परिणाम जाणण्याइतकें ज्ञान व मानसिक कुवत त्यांना नव्हती. पण ब्राह्मण भटजी, ब्राह्मण कुलकर्णी, ब्राह्मण मामलेदार, ब्राह्मण वकील यांच्या वर्चस्वाखाली आपण दडपले-नाडले जात आहों हें मात्र निकटवर्तित्वामुळे त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाला येत होतें. इंग्रजी अमलामध्ये तर पांढरपेशा समाज आणि बाकीचा अशिक्षित बहुजनसमाज यांच्यामधील वैषम्य अधिकच तीव्र होत चाललें होतें. अशा स्थितींत फुल्यांनी बहुजनसमाजाच्या उद्धाराची चळवळ उभारली तर तिचा आघात ब्राह्मणांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक व बौद्धिक वर्चस्वावर व्हावा यांत नवल करण्याजोगें कांही नव्हतें. ती गोष्ट अपरिहार्य होती.

राष्ट्रीय जागृतीच्या आणि स्वातंत्र्याकांक्षेच्या दृष्टीने सुद्धा ही चळवळ इष्ट होती. कारण ब्राह्मण मूठभर होते व बाकीचा बहुसंख्य समाज हाच खरें राष्ट्र होता. त्याला निकट रीतीने बोचणाऱ्या ब्राह्मणांच्या दास्यांतून तो मुक्त झाल्याखेरीज इंग्रजांच्या दास्याविषयी तो विचार करूं लागेल हें कसें शक्य होतें ? वैचारिक प्रगतीची एक किमान पातळी गाठल्याखेरीज राष्ट्रीय जागृतींत हा समाज सामील होणें शक्य नव्हतें. ही वैचारिक प्रगति होण्यास सार्वत्रिक ज्ञानप्रसाराची आवश्यकता होती.

महात्मा फुल्यांच्या बहुजनोद्धाराच्या चळवळीचें खरें स्वरूप, तिची ऐतिहासिक अपरिहार्यता व इष्टता चिपळूणकरांच्याच काय, रानडे प्रभृति सुधारणापक्षीय पुढाऱ्यांच्या देखील लक्षांत आली होती असें दिसत नाही. मराठी बहुजनसमाजाच्या प्रगतीचा मूलभूत प्रश्न सुटल्याखेरीज राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ केवळ वरवरची ठरली असती, आणि तो सुटण्यासाठी फुले यांच्या चळवळीचा उपयोग होण्याजोगा होता, हें महत्त्वाचें सत्य चिपळूणकरांना आकलन झालें नाही. गाभ्याकडे न पाहतां केवळ वरवरच्या गोष्टींकडे लक्ष देऊन त्यांनी फुले आणि सत्यशोधक समाज यांचा अमर्याद उपहास केला. फुले यांच्या भाषेची अशुद्धता, त्यांचें अज्ञान, त्यांच्या हातून घडलेलें पौराणिक गोष्टींचें विडम्बन इत्यादि गोष्टींची आपल्या तिखट विनोदी भाषेने त्यांनी टर उडवली आहे. यामुळे निर्माण झालेल्या कटुतेने मराठी जनतेच्या मनामध्ये जें घर केलें तें अद्यापि सोडलेलें नाही. या कटुतेने मन पोखरल्यामुळे मराठी जनतेचें जें नुकसान झालें आहे त्याचें मोजमाप करतां येणार नाही.

वास्तविक जातिभेदासंबंधाने चिपळूणकरांचीं मतें त्या काळाच्या मानाने पुष्कळच उदार होतीं. 'देशोन्नति' या आपल्या अखेरच्या लेखांत ते म्हणतात —

"दुसरा प्रकार जातिभेदाचा. याने तर या राष्ट्राची फूट अतिशयितच पाडली आहे....... अलिकडे सारें भरतखंड एक राष्ट्र बनलें आहे. यास्तव कालयोगेंकरून या अठरा धातूंची चांगली मूस बनून सर्वांस साधारण जो देश त्याविषयी अभिमानवृत्ति

स्फुरूं लागणें हेंहि संभवनीय आहे. त्याप्रमाणेच आता केवळ हास्यास्पद होऊन राहिलेला जो जातिभेद, त्याच्या संबंधाचा वेडगळपणाचा पीळहि कमी कमी होत जाऊन, या देशांतील जाती देशबंधुत्वाच्या थोरल्या नात्यांत बारीक सारीक क्षुद्र भेदांची मातब्बरी तादृश धरणार नाहीत व एकोप्यापासून सर्वांचें किती हित आहे हें समजूं लागतील, अशीहि दिवसेंदिवस दृढतर आशा आहे." ( केसरी, वर्ष २, अंक ११ )

याच उदार मतांची कास धरून चिपळूणकर जर फुल्यांच्याकडे गेले असते आणि म्हणाले असते, "जातिवैषम्य नष्ट व्हावें, ब्राह्मणेतर जातींत ज्ञानप्रसार व्हावा हीं जीं तुमचीं उद्दिष्टें आहेत ती आम्हांला मान्य आहेत. तेव्हा आपण एकवट होऊन जरूर ती देवाणघेवाण करून परस्परांना संमत असा कार्यक्रम आखूं या. कांही गोष्टींवर तुम्ही भर द्या, कांही गोष्टींवर आम्ही भर देऊं. एकमेकांच्या सलोख्याने कार्य करूं या." तर मराठी जनतेचें केवढें गोमटें झालें असतें !

पण हें व्हायचें नव्हतें. चिपळूणकरांना ज्यांची अतोनात चीड, त्या खिस्ती मिशनऱ्यांच्या बाष्कळ बडबडीने नादावून जाऊन ब्राह्मणांचा द्वेष करणारे हे एक अविचारी गृहस्थ आहेत अशी फुल्यांसंबंधाने चिपळूणकरांची समजूत झाली आणि त्यांनी वरवरच्या गोष्टींना धरून फुल्यांची खरड काढली.

टिळक आगरकर ज्या चिपळूणकर संप्रदायास मिळाले त्याचा सत्यशोधक पंथाशीं कशा प्रकारचा संबंध आलेला होता हें माहित असणें पुढील परिणतीच्या अवलोकनासाठी अवश्य आहे; म्हणून इथे यासंबंधीचा एवढा ऊहापोह केला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८८४४

# ४. जीवनमार्गाचा निश्चय

## विद्याभ्यासांतील विरोधाभास

उत्तर सातारा जिल्ह्यांतील कराड शहरापासून तीन चार मैलांवर असलेल्या कृष्णाकाठच्या टेंबू नामक गावीं १४ जुलै १८५६ रोजीं गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म झाला. पेशवाईच्या काळांत आगरकरांचें घराणें मोठें श्रीमंत होतें. परंतु पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजी अमलांत जुनी सरंजामदारी समाजव्यवस्था लयाला गेल्यामुळे जीं जुनीं घराणीं मोडकळीस आलीं त्यांतलें आगरकरांचें घराणें होतें, असें दिसतें. पूर्वी मोठ्या तटबंदी वाड्यांत राहणाऱ्या या जहागिरदार घराण्यांतल्या माणसांना खाण्यापिण्याची भ्रांत पडावी अशी स्थिति आगरकरांच्या जन्माच्या सुमारास प्राप्त झाली होती. त्यांचें मातुल घराणें कराडच्या भागवतांचें. इंग्रजी अमदानींत अवश्य झालेल्या इंग्रजी शिक्षणांत शिरल्यामुळे गोपाळरावांच्या मामांची स्थिति खाऊन पिऊन सुखी अशी होती. या भागवतांच्या आश्रयानें गोपाळरावांचें इंग्रजी तीन इयत्तांपर्यंतचें शिक्षण कराडास झालें. पुढच्या शिक्षणाची व्यवस्था त्यावेळीं कराडास नव्हती. गोपाळरावांना शिक्षणासाठी स्वखर्चानें बाहेर पाठविण्याइतकी मामांना ऐपत नव्हती. शिक्षण पुढे चालवावें ही तर अंतःकरणांत जबर महत्त्वाकांक्षा; त्यासाठी अपार कष्ट लहान गोपाळने सोसले. कराडास मुनसफ कचेरींत नोकरी, दवाखान्यांत कंपाउंडरची नोकरी वगैरे करून कसे तरी दिवस कंठीत असतां एका मामांच्या कुटुंबाला पोचविण्याकरिता गोपाळला वऱ्हाडांत अकोल्याला जाण्याचा योग आला. त्याला ही मोठी आशा वाटली, की अकोल्याला हायस्कूल आहे, तिथे आपलें शिक्षण पुढे चालू करण्याची संधि मिळेल. त्याची आशा सफल झाली. सन १८७२ ते १८७५ हीं तीन वर्षें मामांच्या घरीं राहून गोपाळने अकोलें हायस्कुलांत

अभ्यास केला. भाग्याची गोष्ट ही, की विष्णु मोरेश्वर महाजनींसारखे विद्वान, प्रेमळ, सुस्वभावी शिक्षक तिथे त्याला लाभले. स्वतः महाजनि त्या वेळीं तरुण, नुकतेच, बी. ए. झालेले होते. तरी विद्यार्थ्यांना ळळा लावून सद्भावनांचें बीजारोपण त्यांच्या ठायीं करण्याची कुशलता त्यांच्या अंगीं होती. गोपाळरावांवर त्यांचा लोभ जडला. विष्णुपंतांच्या प्रेमळ छत्राखाली गोपाळरावांचा मॅट्रिकपर्यंत उत्तम अभ्यास झाला. १८७५ सालीं मुंबई विद्यापीठाची प्रवेश परीक्षा पास होऊन १८७६ च्या सुरवातीस गोपाळराव पुढील शिक्षणाकरिता पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत प्रविष्ट झाले.

गोपाळरावांचे हाल व कष्ट कॉलेजांत गेल्यानंतर कमी झाले नाहीत; उलट वाढले. शाळेंतील शिक्षक मंडळींनी आपापसांत वर्गणी करून साठ रु. जमवून त्यांच्या हवालीं केले होते. पुढे त्यांनी स्कॉलरशिप मिळविली. पण तेवढयाने खर्च भागत नसे. टंचाई इतकी की कधी कधी गोपाळरावांना एकाच सदऱ्यावर निर्वाह करावा लागे. तो सदरा पहाटेस धुवून वाळत टाकायचा आणि वाळला म्हणजे अंगांत घालून कॉलेजांत जायचें! अशा कष्टप्रद स्थितींत अभ्यास करून ते १८७८ सालीं बी. ए. झाले. त्यांचा ऐच्छिक विषय तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान हा होता. त्याच विषयाचे प्राध्यापक सेल्बी हे त्या वेळीं प्राचार्य झाले होते. त्यांना आपल्या विषयाच्या विद्यार्थ्यांचा अभिमान असे. त्यांनी आगरकरांना दक्षिणा फेलो नेमिलें आणि आयुष्यांत पहिल्यांदाच पैशाच्या विवंचनेंतून आगरकर मुक्त झाले.

टिळक त्याच शिक्षणप्रणालींतून गेले, पण त्यांचा आयुष्यक्रम निराळया तऱ्हेचा झाला. वतनदार खोतांच्या कुळांत, मानाने जगण्याइतपत मिळकत असलेल्या पित्याच्या पोटीं टिळकांचा जन्म झाला. त्यांचे वडील गंगाधरपंत शिक्षक होते. ते रत्नागिरीस असतां ता. २३ जुलै १८५६ रोजीं सूर्योदयानंतर सुमारें २ घटिकांनी त्यांना पुत्र झाला, तेच जगद्विख्यात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक होत. यांचें पाळण्यांतलें नांव केशव होतें. परंतु त्यांची आई त्यांस लाडाने 'बाळ' म्हणे, तेंच नांव पुढे त्यांनी शाळेंत व कागदोपत्रीं रूढ केलें. या 'बाळा'चें पुढे उलटया क्रमाने 'बळवंत' होऊन प्रौढपणीं कीर्तीस चढल्यानंतर विशेष ओळख ज्यांना दाखवावयाची असेल अशी लागट मंडळी 'बळवंतराव' म्हणून त्यांना संबोधूं लागली.

गंगाधरपंत स्वतः विद्वान असून उत्तम शिक्षक होते. 'बाळ' त्यांचा एकुलता एक मुलगा. वडिलांच्या देखरेखीखाली त्याचें शिक्षण शिस्तींत सुरू झालें. गंगाधरपंतांचे संस्कृत व गणित हे विषय विशेष तयार होते. त्यांनी आपल्या मुलाला दोन्ही विषयांत उत्तम तयार केलें. त्यांचें घराणें जुन्या चालीच्या धर्मनिष्ठ ब्राह्मणाचें होतें. लहानपणीं संध्यापूजा वगैरे ब्रह्मकर्माचा सर्व भाग टिळकांकडून करवून घेण्यांत आला होता. परंपरागत धार्मिक आचार निष्ठेने व भक्तीने पाळणाऱ्या कुटुंबांतील तरुणाच्या मनावर धर्मशीलतेचा व सदाचाराचा जो ठसा उमटतो तोच पुढील आयुष्यांत चारित्र्याचा संरक्षक बनतो असें टिळकांचें ठाम मत होतें, तें बऱ्याच अंशीं लहानपणाच्या स्वतःच्या घरांतील परिस्थितीवरून बनलें असावें असा कयास होतो.

गंगाधरपंत १८६६ सालीं डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर होऊन पुण्यास आले. 'बाळ'चें इंग्रजी शिक्षण पुण्यास होऊन १८७२ सालीं प्रवेश परीक्षा पास होऊन तो कॉलेजांत गेला. त्याच वर्षीं गंगाधरपंत वारले.

टिळक लहानपणीं फार अशक्त व रिकेटी होते. कॉलेजांतल्या पहिल्या वर्षीं त्यांनी प्रकृति सुदृढ करण्याकरिता कसून व्यायाम केला. अभ्यासाकडे लक्ष न देतां रोज दोन दोन तास तालमींत घालवून जोर बैठका काढायच्या, जोडीदाराशीं कुस्ती खेळायची, नदीवर जाऊन यथेच्छ पोहायचें, बोटिंग करायचें आणि भरपूर दूध पिऊन तें पचवायचें. अशा प्रकारें त्यांनी आपला एवढा कायापालट करून घेतला की ते एका वर्षांत ओळखूं येईनासे झाले असें म्हणतात. जणूं कांही पुढे आपणाला अपार शारीरिक व मानसिक कष्ट सोसावे लागणार आहेत याचें त्यांना स्वप्न पडलें होतें; त्या कष्टांना खंबीरपणें तोंड देतां यावें यासाठी एक वर्ष अभ्यासाच्या दृष्टीने फुकट घालवून त्यांनी ही शक्तिदेवीची एकतानतेने आराधना केली !

याच काळांतलें आगरकरांचें दृश्य किती कारुण्यजनक होतें ! शिकायला मिळेल या आशेने रत्नागिरीला जा, तिथे वार लाव, शागिर्दी कर, परत कराडास येऊन औषधें घोटीत बैस, मामाच्या घरचे कष्ट उपस, असें करीत एकोणिसाव्या वर्षीं ते मॅट्रिक झाले. कॉलेजांत आल्यानंतरहि दारिद्र्याचा काच कमी झाला नाही. पुढे कसें होणार, ही चिंता नित्य जाळीत

असेल, मधून मधून जेवणाचेहि फाके पडत असतील. या चिंतेच्या व कष्टांच्या पायीं मूळची टणक व काटक असलेली प्रकृति आगरकरांनी खराब करून घेतली. मुळांत अशक्त असलेली प्रकृति टिळकांनी ज्या वयांत सुदृढ करून टाकली त्याच वयांत 'असाध्य तें साध्य' करण्याच्या निर्धारापायीं मुळांत असलेल्या शरीराचा काटकपणा आगरकर गमावून बसले !

डेक्कन कॉलेजांत १८७३ ते ७६ हीं चार वर्षे घालवून १८७६ च्या अखेरीस टिळक गणित हा ऐच्छिक विषय घेऊन बी. ए. परीक्षा पहिल्या वर्गांत पास झाले. आगरकर १८७६ च्या प्रारंभीं कॉलेजांत आले व १८७८ च्या अखेरीस बी. ए. ची परीक्षा पास झाले. म्हणजे १८७६ चें एक वर्ष दोघेहि एका कॉलेजांत एका वसतिगृहांत होते. पण सीनियर बी. ए. मध्ये विद्यार्थि बहुधा सर्वकाळ अभ्यासांत मग्न असतो; त्याला थोडा शिष्टपणाहि प्राप्त झालेला असतो. पहिल्या वर्षांतील विद्यार्थ्यांशीं त्याचें संघटन होण्याचा संभव कमी. तेव्हा टिळक आगरकरांची विशेष ओळख या वेळीं झाली असावी असें दिसत नाही.

## निर्मळ ध्येयवादित्वाची ज्योत

भौतिक व सामाजिक परिस्थितीला अनुसरून माणसाचें मन बनत असतें असें एक मत आहे. त्यांत कांही तथ्यांश नाही असें दाखविण्यास टिळक आणि आगरकर यांचीं उदाहरणें जितकीं उपयोगी पडतील तितकीं दुसरीं क्वचितच पडतील. गरिबीच्या आणि कष्टाच्या परिस्थितींतून जो वर चढला त्याला मोठेपणीं चांगले पैसे मिळवून सुखांत राहावें असें वाटणें साहजिक आहे व तशीं उदाहरणें पुष्कळ आढळतात. पण यावरून कांही नियम काढावा, तर आगरकरांचें उदाहरण त्याला अगदी विरुद्ध जातें. आगरकर ज्या वेळीं परक्यांच्या आश्रयाने अतिशय कष्टांत दिवस काढीत होते त्याच वेळीं त्यांच्या मनांत जनतेंत ज्ञानप्रसार करण्यासाठी आपलें आयुष्य वेचावें असा निर्धार बळ धरूं लागला होता, असें उपलब्ध माहिती वरून दिसतें. याच्या उलट, लहानपणापासून ज्याचें आयुष्य सुस्थितींत गेलें त्याला ध्येयसिद्धीसाठी दारिद्र्याला कवटाळण्याची बुद्धि होणें कठीण, असें म्हटलें तर टिळकांचें उदाहरण त्याला विरुद्ध जातें. तेव्हा ज्यांची इच्छाशक्ति

बलवत्तर आहे त्यांच्या बाबतींत तरी भौतिक परिस्थिति, कौटुम्बिक संबंध इत्यादि गोष्टी प्रवृत्तिनियामक ठरूं शकत नाहीत असें म्हणणें प्राप्त होतें.

एवढें मात्र आपण म्हणूं शकतों की टिळक आगरकर ज्या काळांत आपली विद्यार्थिदशा व्यतीत करीत होते त्या काळांत समाजांत तीव्र असंतोषाचें वातावरण निर्माण झालेलें होतें, भावनात्मकता वाढत होती. राजकीय स्थितीविषयी असंतोष, पुढारी म्हणून मानले गेलेल्या व्यक्तींविषयी असमाधान, कांही तरी केलें पाहिजे अशी तळमळ यांनी वातावरण संचलेलें होतें. आर्द्रता साचून हवा कुंद झाली म्हणजे ज्याप्रमाणे मेघवृष्टीचें अनुमान करतां येतें त्याप्रमाणे अशा वातावरणांतून ध्येयदृष्टीचे वीरपुरुष निर्माण व्हावेत अशी अपेक्षा करितां येत होती. तथापि अशा परिस्थितींतून देखील सर्वस्वार्पण बुद्धीचे खरे त्यागी असे मोहरे आगरकर आणि टिळक ( आणि त्यांच्या अगोदर चिपळूणकर ) असे मोजकेच निर्माण झाले. त्यांच्या भोवती मोठ्या योग्यतेचे अनेक सहकारी नंतर गोळा झाले हें खरें. पण निर्मळ ध्येयवादित्वाची ज्योत या तिघांच्याच अंतःकरणांत पेटली होती अशी साक्ष इतिहासाने दिली आहे.

आगरकरांच्या मनांत असे विचार कॉलेजांत प्रवेश करण्याच्या पूर्वीपासूनच उदय पावले होते असें म्हणण्यास आधार सापडतो. ज्या कष्टावह परिस्थितींत ते मार्गक्रमण करीत होते, तिजमुळे दारिद्र्य, अज्ञान व दुराग्रह यांचें साम्राज्य आपल्या समाजांत किती माजलें आहे याचा अनुभव त्यांना प्रत्यक्ष आलेला होता. सुशिक्षितांनी केवळ पोट भरणें हीच इतिकर्तव्यता न मानतां जनहितार्थ कांही उद्योग केला पाहिजे असें मानणाऱ्या महाजनींसारख्या उदार गुरूचा निकट सहवास त्यांना तीन वर्षें लाभला होता. तेव्हा देशहितार्थ आयुष्य वेचण्याच्या संकल्पाचा अंकुर विशीच्या आंतच गोपाळरावांच्या मनांत वाढीस लागला होता असें अनुमान निघतें.

इ. स. १८७६ च्या अखेरीस राजकीय विषयावर लिहिलेला आपला एक निबंध चिपळूणकरांना वाचून दाखविण्याकरिता आगरकर चिपळूणकरांकडे गेले होते आणि त्याच वेळीं देशोन्नतीच्या कामांत पडण्याचा त्यांचा कल झालेला होता असें चिपळूणकरांचे चरित्रकार लिहितात. यावरूनहि वरील अनुमान दृढ होतें. इतर हकीकतीहि याला पुष्टि देतात.

कॉलेजांतील आयुष्यांत हा संकल्प अधिक दृढ होत गेला. "माझी शिक्षक होण्याची इच्छा आहे. पण ती हल्ली चालू असलेल्या रमण्यांत शिरून दक्षिणा उपटण्याकरिता होण्याची नाही. लोकांत स्वतंत्र विचार उत्पन्न होऊन स्वोन्नतीचे मार्ग लोकांना दिसूं लागतील अशा प्रकारच्या शिक्षकाचें काम करावयाचें आहे." असे उद्गार एम. ए. चा अभ्यास करीत असतां आगरकर कराडास गेले होते, तिथे त्यांनी काढल्याचें गुरुजी लिहितात. १८७९ सालीं आगरकर एम्. ए. चा अभ्यास करीत होते. टिळक त्याच वर्षी एलएल. बी. च्या अखेरच्या परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी डेक्कन कॉलेजांत खोली घेऊन राहिले होते. या वेळीं दोघांची मैत्री जमली, देशस्थिति आणि स्वकर्तव्य यांविषयींचे दोघांचे विचार समान असल्याचें प्रत्ययास येऊन दोघांनी आपले संकल्प पक्के केले. याच सुमारास रत्नागिरीहून दीर्घ मुदतीची रजा काढून पुण्यास येऊन बसलेले चिपळूणकर नोकरीचा राजीनामा देऊन नवीन शाळा काढण्याच्या विचारांत आहेत, अशी बातमी त्यांना समजली. चिपळूणकरांच्या या बेतांत सामील होण्याचा या दोघांनी निश्चय केला आणि सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यांत एका रात्रीं दोघे चिपळूणकरांना जाऊन भेटले. हे विद्वान उत्साही तरुण आपल्या कार्याला परमेश्वराने पाठविल्यासारखे आपण होऊन येऊन मिळत आहेत हें पाहून चिपळूणकरांना साहजिकच आनंद झाला आणि ता. १ जानेवारी १८८० हा दिवस 'झेंडा फडकविण्यासाठी'* त्यांनी लगेच मुक्रर करून टाकला.

टिळकांना देशसेवेची स्फूर्ति आगरकरांपासून मिळालेली होती, असें प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सुचविणारीं विधानें आगरकरांच्या अभिमान्यांनी केलीं आहेत. परंतु त्यांत कांही अर्थ नाही. टिळकांसारखा खोल भावनांचा आणि तीक्ष्ण बुद्धीचा तरुण आपल्याच वयाच्या मित्राशीं केवळ सहासात महिन्यांत मारलेल्या गप्पांमधून संबंध जीविताची दिशा ठरविणारी स्फूर्ति ग्रहण करील हें असंभवनीय होय. आगरकरांच्या स्फूर्तीचा उगम आज-

---

* 'Hoisting of the standard' हे चिपळूणकरांचे शब्द आहेत. पहा, विष्णुशास्त्री चिपळूणकर चरित्र.

मावण्यासाठी कांही आधार उपलब्ध आहेत, तसे टिळकांच्या बाबतींत नाहीत हें खरें. पण तेवढयावरून ती आगरकरांपासून उसनी घेतली होती असें अनुमान करणें योग्य नाही. दोघांचीहि स्फूर्ति आधीचीच होती; तिला कार्यान्वित करण्याचा संकल्प १८७९ सालीं दोघांनी केलेल्या विचार-विनिमयांत पक्का झाला, हीच गोष्ट खरी. चिपळूणकरांच्या प्रमाणेच टिळकांच्या निंदकांचीहि मराठींत वाण नाही. टिळकांच्या देशसेवेच्या स्फूर्तीला लघुत्व आणण्याकरिता त्यांनी नमूद केलेल्या गोष्टींच्या योगाने त्यांचें समाधान होण्याखेरीज दुसरी कांहीहि फलनिष्पत्ति झालेली नाही.

टिळक आणि आगरकर दोघेहि स्वयंसिद्ध स्फूर्तीचे पुरुष होते. तथापि त्यांची स्फूर्ति तत्कालीन वातावरणांतून निर्माण झालेली होती. हें वातावरण निर्माण करण्यांत चिपळूणकरांचा बऱ्याच प्रमाणांत हात होता. ते १८७४ ते १८७९ या पांचसहा वर्षांत स्वाभिमान, देशाभिमान, पूर्वजाभिमान, पारतंत्र्याविषयी तिटकारा, या भावनांनी भरलेले लेख लिहीत होते; हाच काळ टिळक आगरकरांच्या तारुण्यांतील संस्कारक्षम वयाचा होता. त्यांच्या मनांत देशसेवेची जी स्फूर्ति उद्भवली तिला चिपळूणकरांची वाणी अगदीच कारणीभूत झाली नसेल हें अशक्य वाटतें. आगरकरांचे गुरु महाजनि हे चिपळूणकरांचे मित्र होते. त्यांच्याकडे निबंधमाला येत असे. तिचा प्रत्येक अंक आगरकरांच्या वाचनांत येत असला पाहिजे. आगरकर १८७६ च्या अखेर आपला राजकीय विषयावरील निबंध दाखविण्यास चिपळूणकरांकडे गेले होते, ही मागे दिलेली हकीकत या संबंधांत मोठी सूचक आहे. पसंती व प्रोत्साहन मिळविण्यासाठी त्यांना चिपळूणकरांकडे जावेंसें वाटलें यावरून चिपळूणकरांना त्यांनी आपला वैचारिक नेता मानलें होतें, असें अनुमान होतें. टिळकांची गोष्ट याहून कांही निराळी होती असें मानण्यास कांहीच कारण नाही. तेंव्हा चिपळूणकरांच्यामध्ये आणि आपल्यामध्ये वैचारिक व भावनात्मक साम्य असल्याची साक्ष मनोमन पटलेली असल्यामुळेच, त्यागपूर्ण देशसेवेचा मार्ग चोखाळण्याचें पक्कें ठरतांच ही तरुणांची जोडगोळी चिपळूणकरांकडे गेली आणि त्यांचें नेतृत्व पतकरून कार्यासाठी सज्ज झाली, हें सत्य आपणास पटल्याखेरीज राहत नाही.

---

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 20547 वि: चारित्र
क्रमांक ...932...... नों: दि: 9.61.5.66

# ५. शाळा, सोसायटी व कॉलेज

सरकारी नोकरी न पतकरतां स्वार्थत्यागपूर्वक देशसेवा करण्याच्या निश्चयाने टिळक आणि आगरकर चिपळूणकरांना येऊन मिळाले. या तिघांनी लोकांमध्ये ज्ञानप्रसार आणि विचारजागृति करण्याच्या उद्देशाने शाळा, छापखाना आणि दोन वर्तमानपत्रें एवढी कार्यप्रणालि उभी केली. ही सुरवातीस एका विशिष्ट विचारसरणीवर उभारलेली होती. पण कांही थोडयाच वर्षांनंतर तिला फाटे फुटूं लागले. पुढचा वैराग्नि आणि कलह पाहणें नको म्हणूनच की काय चिपळूणकरांनी आपला अवतार लवकरच आटोपता घेतला. बाकी उरलेली मंडळी, विशेषतः ज्यांची परस्पर मैत्री सर्वांत अधिक घनिष्ट होती ते टिळक आणि आगरकर, एकमेकांशीं इतके दातनिसकीस येऊन भांडले की त्यामुळे सर्व महाराष्ट्रांतील वातावरण खळबळून गेलें. महाराष्ट्राला दुहीचा शाप आहे या सिद्धांताचें एक जबरदस्त उदाहरण इतिहासफलकावर नोंदलें गेलें. सुमारें अकराबारा वर्षांत शाळा एकीकडे तर छापखाना दुसरीकडे आणि वर्तमानपत्रें तिसरीकडे असा प्रकार होऊन गेला. या सर्व प्रकाराकडे वस्तुनिष्ठ तत्त्वजिज्ञासु दृष्टीने पाहून काय निष्कर्ष निघतो तो आपणास पाहावयाचा आहे. प्रस्तुत प्रकरणांत शाळेच्या संबंधांतल्या गोष्टींचीच चर्चा करूं आणि वर्तमानपत्रांची बाब पुढील प्रकरणासाठी राखून ठेवूं.

## 'आर्यभूमीच्या परमवंद्य चरणीं सेवा अर्पण'

न्यू इंग्लिश स्कूलची सुरवात ता. १ जानेवारी १८८० रोजीं झाली. त्या वेळीं वास्तविक चिपळूणकर व टिळक हे दोघेच जाग्यावर हजर होते. आगरकर या वर्षी एम्. ए. मध्ये नापास झाले असल्यामुळे व आणखी

एक वर्ष अभ्यासासाठी त्यांना फेलोशिप मिळत असल्यामुळे त्यांनी एम्. ए. ची पदवी घेऊन एक वर्षानंतर येऊन मिळावें असें सर्वानुमतें ठरलें होतें. इतर कांही मदतनीस मंडळी शिक्षक म्हणून होती; परंतु वैचारिक दृष्ट्या किंवा संस्थाचालनाच्या संबंधांत त्यांची मातब्बरी नव्हती. आरंभींचे सहा महिने चिपळूणकर व टिळक यांना मोठे जिकिरीचे गेले. आपले वर्गबंधू वामन शिवराम आपटे (१८५८–१८९२) यांनी आपणास येऊन मिळावें असा प्रयत्न टिळकांनी चालविला, तो सफल होऊन १८८० च्या जुलैमध्ये आपटे येऊन मिळाले. त्यांची विशेष योग्यता लक्षांत घेऊन त्यांच्याकरिता 'सुपरिंटेंडेंट'चा विशेष हुद्दा निर्माण करण्यांत आला व शाळेच्या शासनाचे अधिकार चिपळूणकरांनी स्वखुषीने त्यांच्याकडे सोपविले. संस्थेची इभ्रत व कार्यक्षमता वाढण्यास आपट्यांचा फार उपयोग झाला.

आपटे हे टिळक–आगरकरांच्या पेक्षा दोन वर्षांनी लहान. त्यांनी विद्यार्थिदशेंत अत्यंत स्पृहणीय यश संपादन केलें होतें. मॅट्रिकच्या परीक्षेंत संस्कृतांत पहिले आल्याबद्दल त्यांना जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळाली होती. बी. ए. च्या परीक्षेंत जिद्दीने गणित हा ऐच्छिक विषय घेऊन त्यांनी पहिल्या वर्गांत येण्याचा विक्रम करून दाखविला होता. एम्. ए. मध्ये संस्कृतांत पहिले आल्याबद्दल भगवानदास पुरुषोत्तमदास स्कॉलरशिप मिळविली होती. अशा विद्यापीठविख्यात तरुणाचें आगमन हें शाळेला मोठें भूषण होतें. ते नियमितपणा, पद्धतशीरपणा यांचे भोक्ते होते. शाळेला शिस्त लावण्याचें आणि विद्यार्थ्यांना उत्तम तयार करून मॅट्रिकच्या परीक्षेंत शाळेला उत्कृष्ट यश मिळवून देण्याचें श्रेय त्यांच्याकडे जातें.

याच सालांत केव्हा तरी आपट्यांच्या घरीं श्राद्धानिमित्त भोजनार्थ मंडळी जमली असतां एक मराठी व एक इंग्रजी अशीं दोन साप्ताहिक वृत्तपत्रें सुरू करण्याचें ठरलें. सर्वांचा उत्साह अपूर्व! लगेच एक छापखाना खरेदी करण्यांत येऊन 'आर्यभूषण' असें त्याचें नामकरण करण्यांत आलें; त्यांतून इंग्रजी भाषेंत बोलणारा 'मराठा' ता. २ जानेवारी १८८१ रोजीं व मराठींत गरजणारा 'केसरी' ता. ४ जानेवारी १८८१ रोजीं बाहेर पडला. वर्तमानपत्रांच्या कल्पनेचे तात्कालिक प्रेरक आपटे व आगरकर हे

असणें संभवनीय आहे. कारण आपटयांना इंग्रजींत व आगरकरांना मराठींत लिहिण्याची विशेष हौस होती. पण यांतली मूळ कल्पना व स्फूर्ति चिपळूणकरांची असावी. रत्नागिरी हायस्कुलांतले आपले सहशिक्षक श्री. गांगल यांना चिपळूणकरांनी राजीनामा देण्याच्या आपल्या निर्धाराचें स्पष्टीकरण करणारें पत्र पाठविलें, त्यांत ते म्हणतात--

"I am resolved to try what might be done for public good with the potent instrumentality of a press establistment worked by a vigorous hand"*

अशा रीतीने ज्ञानप्रसार व लोकजागृति हे जे देशोद्धाराचे दोन राजमार्ग चिपळूणकरांनी कल्पिले होते त्यांचीं साधनें एका वर्षाच्या अवधींतच उभारलीं गेलीं. यामुळे झालेला परम संतोष त्यांनी मालेच्या ७२ व्या अंकांत व्यक्त केला आहे. आपल्या सर्व उद्योगांच्या हकीकतींत न्यू इंग्लिश-स्कूल, आर्यभूषण आणि मराठा व केसरी यांचीहि हकीकत देऊन "आर्य-भूमीच्या परमवंद्य चरणीं ही सेवा प्रेमपुरस्सर अर्पण केली" आहे.

## उद्योगामागील तत्त्वत्रिपुटी

ही शाळा आणि हीं वृत्तपत्रें कांही विशिष्ट तत्त्वें, विशिष्ट विचार-सरणी यांचीं प्रतीकें होतीं. हीं तत्त्वें आणि ही विचारसरणी कोणची होती? चिपळूणकरांना येऊन मिळणाऱ्या टिळक आगरकरांच्या भूतकाळाचा फलक कोरा होता; चिपळूणकरांचा तसा नव्हता. शाळा निघण्यापूर्वी सुमारें १२ वर्षे ते आपले विचार ठणठणीतपणें प्रतिपादन करीत होते. शाळा व वर्तमान-पत्रें काढण्याच्या खटपटींत ते पडले, ते त्या विचारांच्या परिपूर्तीकरिताच हें उघड होतें. अशा स्थितींत टिळक आणि आगरकर आपण होऊन उघडया डोळयांनी त्यांना येऊन मिळाले, याचा अर्थ एकच होऊं शकतो. तो हाच की चिपळूणकरांनी तावत्कालपर्यंत प्रतिपादिलेलीं तत्त्वें, ध्येयें, विचारसरणी त्यांना एकंदरीने मान्य होतीं. त्यांनी (किंवा त्यांच्यापैकी

---

* कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र, आ. २ री, पृ. १७९.

कोणाहि एकाने) चिपळूणकरांना असें कधी बजावलें नाही की "शास्त्रीबुवा, तुमचीं अमुक तत्त्वें आम्हांला (किंवा मला) मान्य नाहीत. तथापि तुम्ही शाळा काढतां ही चांगली गोष्ट आहे. तेवढयापुरते आम्ही (किंवा मी) तुम्हांला साथ करतों." हे दोघे मोहरे चिपळूणकरांच्या पुढारीपणाने सुरू झालेल्या कामांत सर्वभावें येऊन मिळाले होते. ही गोष्ट त्या वेळीं किंवा पुढे त्यांच्यापैकी कोणीहि नाकारली नाही. लोकहि चिपळूणकरांच्या वैचारिक भूमिकेंत सामावणारीच ही सर्व मंडळी आहेत असें मानीत होते. आगरकरांनी चिपळूणकरांचा मृत्युलेख लिहितांना शाळावृत्तपत्रांत सामील झालेल्या आपणासकट सर्व पदवीधरांना 'ग्राज्वेट पांडव' अशी उपमा घेतली आहे व चिपळूणकरांना आपल्यांतला 'धर्मराज' असें म्हटलें आहे. यावरून त्यांचा एकोप्याचा व चिपळूणकरानुसारित्वाचा भाव व्यक्त होतो.

चिपळूणकरांची विचारसरणी आणि मनोभूमिका थोडयाबहुत विस्ताराने आपण मागे पाहिली आहे. त्यांचा इथे कारणापुरता अनुवाद करूं.

१. स्वातंत्र्याकांक्षी जाज्वल्य* देशाभिमान. यांत स्वधर्म, स्वभाषा, स्वसंस्कृति यांच्याविषयीचा अभिमान आलाच—हें अधिष्ठान.

२. सरकारी नोकरी न पतकरितां स्वतंत्र बाण्याने राहून लोकसेवेच्या ध्येयास अनुसरणें—हें करण म्हणजे साधन.

३. वर्तमानपत्रें, व्याख्यानें, शाळा इत्यादिकांच्या द्वारें विचारजागृति व ज्ञानप्रसार करणें—हें मार्गक्रमण किंवा प्रयत्न ('चेष्टाः')

ही चिपळूणकरी तत्त्वांची त्रिपुटी असें म्हटल्यास चालेल. शाळा ही अर्थात् या तत्त्वांची कृतिरूप परिणति होय.

---

* जाज्वल्य हा शब्द मुद्दाम योजिला आहे. त्याशिवाय चिपळूणकरांना अभिप्रेत असलेल्या वृत्तीचा बोध होणार नाही. सुप्त किंवा मानसिक देशाभिमान एखाद्या मेषपात्र सरकारी नोकरांत देखील असेल. तसला त्यांना नको होता. प्रखर स्वाभिमानाच्या पायावर आधारलेल्या कृतीच्या रूपाने व्यक्त होणारा स्फोटक देशाभिमान निर्माण व्हावा यासाठी त्यांचा सारा प्रयत्न होता.

वर जें प्रतिपादन केलें त्याचा अर्थ असा नाही की टिळक आगरकरांनी आणि त्यांच्या मागून संस्थेमध्ये येत राहणाऱ्या सहकाऱ्यांनी या तत्त्वत्रिपुटीला अमरपट्टा दिला होता, किंवा 'क्रीड' म्हणून त्याला स्पष्ट मान्यता दिली होती. हे सगळे लोक कर्ते, विद्वान व स्वतंत्र बुद्धीचे होते. त्यांनी चिपळूणकरांनंतर स्वतःच्या बुद्धिशक्तीनुसार संस्था चालविली, आपणाला तें विकसन वस्तुनिष्ठ दृष्टीने बघावयाचें आहे. वरील विवेचनाचा हेतु इतकाच की सुरवातीची तात्त्विक बैठक काय होती याचें वाचकांस ज्ञान व्हावें.

## शिक्षकाच्या भूमिकेंत टिळक-आगरकर

त्या वेळीं राष्ट्रीय शिक्षण हा शब्द नव्हता. पण पुढे १९०६ नंतर किंवा त्यापेक्षाहि अधिक प्रखर स्वरूपांत १९२० नंतर जें राष्ट्रीय शिक्षण अस्तित्वांत आलें त्यांतील कांही कल्पना, थोड्या अस्फुट स्वरूपांत कां होईना, चिपळूणकरांच्या मनांत वसत होत्या यांत शंका नाही. आपलें 'न्यू स्कूल' म्हणजे खरोखरी 'नवविचारांची शाळा' व्हावी अशी मुळांत त्यांची कल्पना होती असें जें राजवाड्यांनी म्हटलें, तें सत्यास सोडून नव्हतें. स्वाभिमान, स्वदेशप्रीति, आपल्या ऐतिहासिक पुरुषांविषयी आदर इत्यादि उच्च मनोवृत्तींचें बीजारोपण विद्यार्थ्यांच्या मनांत व्हावें; स्वावलंबन, सततोद्योग, साहस इ० गोष्टींविषयी त्यांच्या मनांत आवड उत्पन्न व्हावी, असा शाळा काढण्यांत त्यांचा हेतु होता असें त्यांच्या चरित्रकार बंधूंनी लिहिलें आहे * शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांनाहि आमच्या इथे पूर्ण स्वातंत्र्य आहे; शिक्षकांना हेडमास्तरांचें, इन्स्पेक्टरांचें आणि त्रासदायक सरकारी नियमांचें भय बाळगायला नको, आणि विद्यार्थ्यांना शिक्षकांचा बागुलबोवा वाटायला नको, शिक्षकांनी मोकळ्या मनाने ज्ञानदान करावें व विद्यार्थ्यांनी निर्भयपणें ज्ञानार्जन करावें, अशा ज्या कल्पना उन्हाळ्याच्या सुटीच्या आरंभीं विद्यार्थ्यांपुढे निरोपाचें भाषण करितांना त्यांनी व्यक्त केल्या, त्या शिक्षणस्वातंत्र्याच्या तत्त्वाला धरून असल्यामुळे राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेशीं जुळणाऱ्या आहेत.

---

* विष्णु कृष्ण चिपळूणकर यांचें चरित्र, पृ. १८७

पण चिपळूणकरांच्या कल्पना त्यांच्याबरोबरच लयाला गेल्या. खुद्द त्यांच्या शिकवण्यांत स्वदेशप्रीतीस पोषक व उत्तेजक असा मालमसाला पुष्कळ असे. पण एकंदर अभ्यासक्रमास व शिक्षणपद्धतीस राष्ट्रीयतेचें वळण कसें लावतां येईल याचा विचार करण्यास अवसर मिळण्यापूर्वीच ते दिवंगत झाले. इतर शिक्षक—टिळक आगरकर सुद्धा—अभ्यासक्रमांत नेमलेले विषय तेवढे शिकवीत. त्यांची विद्वत्ता, त्यांचा स्वतंत्र बाणा यांची छाप अप्रत्यक्ष रीत्या विद्यार्थ्यांवर काय पडेल तेवढीच. टिळक विद्यार्थ्यांत फारसे मिसळत नसत. त्यांचा आविर्भाव कांहीसा रुक्ष व उग्र असे. त्यांना विनोदाचें वावडें होतें. अभ्यासक्रमानुसार गणित विषय ते व्यवस्थित शिकवीत. पण गणितांतील प्रमेयसिद्धीचे टप्पे फळयावर लिहून न दाखवितां ते तोंडाने सांगत; त्यामुळे सामान्य विद्यार्थ्यांना तें आकलन होत नसे. विद्यार्थ्यांच्या शिस्तीविषयी ते उदासीन असत. वर्गांत येणें व वर्गांतून जाणें याबाबत त्यांची अनियमितता बरीच असे, अशी तक्रार पुढे पुढे होऊं लागली. त्यांना शाळेचें (व नंतर सोसायटीचें) बाहेरचें काम बरेंचसें पडत असे, हें आरंभीं आरंभीं तरी अनियमितपणाचें कारण असणें शक्य आहे.

आगरकरांची तऱ्हा अगदी निराळी. ते इंग्रजी व इतिहास हे विषय शिकवीत. मुलांच्या मनाला भार न वाटेल अशा रीतीने हसत खेळत शिकविण्याची त्यांची पद्धत असे. त्यांत थोडा पाल्हाळीकपणा असे. मुलांना प्रश्न विचारण्याची पूर्ण मुभा; कोणी कितीहि आचरटपणाचा प्रश्न विचारला तरी न रागावतां हसत खेळत ते त्याचें समाधान करीत. वर्गांत कोणी खोडसाळपणा केला तर ते रागाचा आविर्भाव करीत; पण तो अंतरींचें वात्सल्य आणि विनोदी वृत्ति यांमुळे टिकत नसे. ते हसत, वर्गांतहि हशा पिके आणि अपराधी मुलें खजील होऊन जात.

शाळेला सुरवातीपासूनच अपूर्व यश लाभलें. चिपळूणकर शाळा काढणार ही वदंता पसरल्यापासून घरोघरीं मुलें त्यांच्या शाळेंत जायचें म्हणून हट्ट धरून बसलीं. सरकारी शाळेंत स्कालरशिपा, नादाऱ्या मिळविणाऱ्या मुलांनी त्या सोडून चिपळूणकरांच्या शाळेकडे धाव घेतली. वरच्या

वर्गांतले उत्तम विद्यार्थी जगन्नाथ शंकरशेट स्कालरशिप मिळवून चिपळूणकरांच्या शाळेला यश द्यायचें म्हणून मुद्दाम या शाळेंत आले. संस्कृतची पहिली वा दुसरी जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप लागोपाठ पहिलीं पांच वर्षें न्यू इंग्लिश स्कूलने मिळविली. मॅट्रिकचे एकंदर निकालहि इतर शाळांच्या मानाने सरस लागत गेले. या गोष्टींच्या श्रेयाचा मोठा वाटा आपट्यांच्या हक्काचा होता ही गोष्ट उघड होती.

## आपटे यांची ऐतिहासिक साक्ष

शिक्षणाच्या बाबतींत आपले विचार जोमदार रीतीने पुढे मांडण्याची संधि शाळेच्या चालकांना लवकरच प्राप्त झाली आणि तिचा त्यांनी उत्तम रीतीने उपयोग करून घेतला. शिक्षणविषयक प्रश्नांचा विचार करून योग्य त्या शिफारसी करण्यासाठी १८८२ च्या फेब्रुवारीमध्ये हिंदुस्थान सरकारने डॉ. वि. वि. हंटरच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमलें होतें. या कमिशनच्या मुंबई प्रांत समितीच्या पुढे न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळीच्या वतीने वामनराव आपटे यांनी ९ सप्टेंबर १८८२ रोजीं विस्तृत साक्ष दिली. साक्ष देण्यासाठी प्रत्यक्ष हजर राहणारे व कमिशनच्या प्रश्नांना उत्तरें देणारे जरी एकटे आपटे होते, तरी साक्षींत सांगावयाच्या मजकुराची मांडणी टिळक, आगरकर आणि आपटे या तिघांच्या परस्पर विचाराने, टिळक–आगरकर कोल्हापूर प्रकरणीं तुरुंगांत जाण्याच्या पूर्वीच करण्यांत आलेली होती.

माध्यमिक शिक्षणाच्या संबंधांत त्या काळांत उद्भवलेल्या सर्व प्रश्नांचा या साक्षीमध्ये अत्यंत मुद्देसूद रीतीने विचार करण्यांत आला होता. स्वार्थत्यागपूर्वक शिक्षणाचें काम करणाऱ्या नामवंत तरुण पदवीधरांचें मत म्हणून या साक्षीचें फार महत्त्व होतें. त्यांतील बरेच मुद्दे कमिशनला पटले व ते त्यांनी आपल्या अहवालांत योग्य फेरफारांसह समाविष्टहि केले. साक्षींतील सर्व मुद्द्यांचा सारांश येथे देण्याचें कारण नाही. थोडक्यांत एवढें सांगणें पुरे होईल की या साक्षींत आमच्या या मंडळींचा स्वतंत्र बाणा आणि दांडगी हिम्मत पुरेपूर दृष्टोत्पत्तीस आली. आजवर सरकारने युरोपियन, आंग्लोइंडियन आणि मिशनरी शाळांना भरपूर अनुदान चारून अकार्य-

क्षमतेच्या सबबीवर एतद्देशीय लोकांनी चालविलेल्या शाळांना उपाशी ठेवण्याचा पायंडा पाडला होता. हा अन्याय उघडकीस आणून परीक्षेच्या निकालांची सरकारनेच मान्य केलेली कसोटी लावल्यास एतद्देशीयांच्या शाळा अकार्यक्षम ठरत नाहीत, हें आपट्यांनी साक्षींत दाखवून दिलें. सरकारला शाळा चालवायच्या नसतील तर त्या मिशनरी संस्थांच्या हवालीं न करितां एतद्देशीय लोकांनी चालविलेल्या संस्थांच्या हवालीं कराव्या, कारण मिशनऱ्यांचा सांगून सवरून उद्देश धर्मांतराचा असतो, असें सरकारला बजावलें. सरकारला पाहिजे असेल तर सुमारें ८-१० वर्षांत प्रांतांतील सर्व सरकारी हायस्कुलें ताब्यांत घेऊन चालविण्यास न्यू इंग्लिश स्कूलची चालक मंडळी तयार आहेत असेंहि कमिशनला सांगण्यांत आलें.

मात्र हें सर्व शक्य होण्याला सरकारची अनुदान (ग्रँट) देण्याची पद्धति सुधारली पाहिजे. ती कशी सुधारतां येईल हेंहि साक्षीदारांनी दाखवून दिलें होतें. परंतु सध्याच्या आपल्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा मुद्दा व्यवस्था-स्वातंत्र्याचा व शिक्षणस्वातंत्र्याचा होय. शाळा चालविणाऱ्या संस्थांच्या अंतर्गत कारभारांत सरकारने फारसें लक्ष घालण्याचें कारण नाही. शाळेची योग्यता आजमावण्यासाठी परीक्षांचे निकाल कसे होतात, ही कसोटी लावण्याचें ठरल्यानंतर एखादी शाळा वैयक्तिक मालकीची आहे की संस्थेच्या मालकीची आहे याची पंचाईत सरकारला करण्याचें काय कारण ? सरकारी हायस्कुलांतून चालू असलेले नियम, उपनियम, फार्म, नोंदबुकें इत्यादींचा जाच खासगी शाळांना काय म्हणून असावा ? सरकारी हायस्कुलांत रजिस्टरें, नोंदी, नियम, उपनियम वगैरेंचें जें अर्थशून्य अवडंबर माजलेलें आढळतें त्याबद्दल तिटकारा व्यक्त केलेला चिपळूणकरांच्या लेखांत जागोजाग आढळतो, त्याचा येथे आपट्यांच्या साक्षींत पडसाद उमटलेला दिसून येतो. खासगी शाळांना अंतर्गत व्यवस्थेंत शक्य तितकें अधिक स्वातंत्र्य असावें, हा मुद्दा आजच्या परिस्थितींत देखील फार महत्त्वाचा आहे. तो आपट्यांनी जोमदार रीतीने मांडला.

इतकाच किंबहुना याहीपेक्षा अधिक महत्त्वाचा मुद्दा अभ्यासक्रम व शिक्षणपद्धति यांच्या बाबतींतील स्वातंत्र्याचा. या स्वातंत्र्याची देखील

आपट्यांनी जोराची तरफदारी केली. मॅट्रिक परीक्षेचा अभ्यासक्रम व ज्ञानाचा दर्जा एकदा निश्चित ठरल्यानंतर त्याच्या खाली शिक्षणाच्या यत्ता, अभ्यासाचे टप्पे आणि अभ्यासाचे विषय यांच्या बाबतींत शाळाचालकांना शक्य तितकें स्वातंत्र्य द्यावयास हवें, असें मत आपट्यांनी मांडलें. अर्थात् पुस्तकें नेमण्याच्या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य असावें हें तर ओघाने आलेंच. सरकारी शिक्षणखात्याचे अनुदानविषयक नियम इतके जाचक असतात की शाळाचालकांना व शिक्षकांना ठरीव चाकोरींत चालणाऱ्या ओझ्याच्या बैलांचें साम्य प्राप्त होतें. त्यांच्यांत कांही चमक, कांही नवीन, निराळें, अधिक सुंदर आपण करून दाखवूं ही हौस राहत नाही.

शिक्षणस्वातंत्र्याचा हा मुद्दा देखील आजचें सरकारी शिक्षणखातें व शिक्षणशास्त्रज्ञ यांनी विचारांत घेण्याजोगा आहे. अभ्यासक्रम, अभ्यासाचे टप्पे, नेमलेलीं पुस्तकें इत्यादि बाबतींत साचेबंदपणा व नियंत्रण वाजवीपेक्षा अधिक होत आहे काय, त्यामुळे अभिनवतेची प्रेरणा व भरीव काम करण्याची बुद्धि दडपली जात आहे काय, याची छाननी व्हावयास पाहिजे. स्वराज्याच्या या काळांत सुव्यस्थित प्रगतीला बाधक होणार नाहीत अशा रीतीने नियंत्रणें व निर्बंध शक्य तितके कमी झाले तर बरें.

स्वभाषांची जोरदार तरफदारी हा आपट्यांच्या साक्षीमधील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा होय. त्या काळांत इंग्रजीचें साम्राज्य अप्रतिहत होतें. सर्व विषय इंग्रजींतून शिकायचे आणि इंग्रजींतून लिहायचे ! म्हणजे इंग्रजीचा अर्थ समजून घेण्यांतच बुद्धीचा आवाका खर्च व्हावयाचा ! विषयाचें ज्ञान करून घेण्याच्या ऐवजी चक्क् ताडया घोटया याचा सपाटा सररास चालू असे. "सध्याच्या शिक्षणपद्धतींत विद्यार्थ्यांचा तीनचतुर्थांशाहून अधिक वेळ एका परकी भाषेचे बारकावे आत्मसात् करण्यांत खर्च होतो." इंग्रजींत हें स्तोम कमी करून मातृभाषांचा अभ्यास वाढविण्याची व माध्यम म्हणून त्यांचा उपयोग करण्याची जोरदार मागणी आपट्यांनी कमिशनपुढे मांडली.

आज पाउणशें वर्षांनंतर माध्यमिक शिक्षणांत ही सुधारणा अमलांत आल्याचें आपण पाहतों आहों हें आपलें सुदैव ! पण उच्च शिक्षणाच्या बाबतींत मातृभाषा माध्यमाचा प्रश्न अद्याप रेंगाळतोच आहे !

यांप्रमाणे वामनराव आपटयांनी न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांचें प्रतिनिधित्व करून कमिशनपुढे विस्तृत आणि भरीव साक्ष दिली; त्य त्यांनी स्वतंत्र बाणा गाजविला आणि शिक्षणप्रसाराबद्दलची मंडळींची कळकळ व्यक्त केली यांत कांही शंका नाही. त्या साक्षींतच, शिक्षणाचें जाळें सर्वत्र पसरविण्याकरिता जरूर असलेल्या त्यागी शिक्षकांचा भरपूर पुरवठा व्हावा म्हणून एक कॉलेज काढण्याचा मंडळीचा मनोदय असल्याचें त्यांनी निवेदन केलें.

## फर्ग्युसन कॉलेजची प्राणप्रतिष्ठा

चिपळूणकरांच्या मनांत पुढे कधी तरी आपण कॉलेज काढावें असें होतें की काय, हें समजण्यास मार्ग नाही. टिळकांच्या मनांत सुरवातीस कॉलेजच काढायचें होतें असें चिपळूणकर चरित्रांत* लिहिलें आहे तें कितपत साधार आहे हें समजत नाही. पण कोल्हापूर प्रकरणाचें गंडांतर टळून टिळक आगरकर १८८२ च्या २६ आक्टोबरला सुटल्यानंतर शाळेच्या चालकांची लोकप्रियता वाढली, इकडे शाळेचा जमहि तीन वर्षांत चांगला बसला, तेव्हा कॉलेज काढण्याची कल्पना जोराने पुढे आली. त्या दिशेने चक्रें फिरूं लागलीं.

शाळेची गोष्ट निराळी होती. कॉलेजची जबाबदारी फार मोठी. एल-फिन्स्टन, डेक्कन यांसारख्या युरोपियन प्रोफेसर असलेल्या महान कीर्तीच्या जुन्या कॉलेजांशीं तुलना होण्याचा प्रसंग. आणि हें धाडस करणारी मंडळी तर तरुण, दरिद्री, दरबारी प्रतिष्ठेच्या नांवाने शून्य असलेली! जड बुडाच्या शिष्टांकडून नुकत्याच यांनी वेडगळ, उनाड, भ्रांतिष्ट, शेखमहंमदी अशा शिव्या खाल्लेल्या! पण कांही गोष्टी या तरुण मंडळीजवळ होत्या; हरकामी बुद्धिमत्ता, वाटेल तितके कष्ट करण्याची तयारी आणि 'करून दाखवूंच दाखवूं' ही धमक! या सामग्रीच्या बळावर आजपर्यंत 'नेटिवां'नी कधी कुठे न केलेलें धाडस ही मंडळी करून दाखविणार होती.

---

* कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र, आ. २, पृ. १८५.

कॉलेज काढायचें म्हटल्यास सरकारची अनुकूलता पाहिजे, युनिवर्सिटीला मान्य होईल अशा तऱ्हेची संघटना उभी केली पाहिजे आणि वजनदार गृहस्थांचें पाठबळ मिळविलें पाहिजे. मंडळी या दृष्टीने कामाला लागली. महादेव बल्लाळ नामजोशी (१८५३-१८९६) नांवाचे एक हुशार व खटपटी गृहस्थ या मंडळीच्या गोटांत असत. त्यांचा संचार सर्वत्र असून वाटेल त्या व्यक्तीशीं संधान बांधण्याची हातोटी यांच्या अंगीं होती. संस्थेच्या हितासाठी बाहेरच्या खटपटी करण्याची कामगिरी त्यांच्याकडे स्वभावतःच येत असे व त्यामुळे त्यांना संस्थेचे 'परराष्ट्र मंत्री' (Foreign Secretary) असें म्हणत असत. त्यावेळचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन हे वास्तविक हुजूरपक्षीय प्रतिगामी वृत्तीचे गृहस्थ होते. पण नामजोशांनी त्यांच्याशीं सूत्र जमवून त्यांच्या भेटी घेऊन त्यांची अनुकूलता संपादन केली. ता. १३ फेब्रुवारी १८८४ रोजीं न्यू इंग्लिश स्कूलचा बक्षीस समारंभ गव्हर्नर फर्ग्युसनसाहेबांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला. त्यांचें नांव कॉलेजला देण्याचें अभिवचन देऊन त्यांजकडून दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानिकांना उद्देशून शिफारसपत्रें मिळविण्यांत आलीं. बोटभर शिफारसपत्राच्या मोबदल्यांत एवढ्या विद्वान लोकांनी काढलेल्या उच्च शिक्षणाच्या संस्थेला त्याचें नांव कायमचें दिलें जात होतें, यांत साम्राज्यशाहीच्या त्या गणंग हस्तकाचें काय वेचत होतें !

राज्यकर्त्या इंग्रजांविषयी ज्यांना इतका तिरस्कार, की त्यांना 'टोपडे' म्हटल्याखेरीज ज्यांच्याने राहवत नसे, त्या चिपळूणकरांच्या आत्म्याला हें पाहून काय वाटलें असेल ?

ता. २४ आक्टोबर १८८४ रोजीं गद्रेवाड्यांत निमंत्रित बड्या मंडळींची व प्रतिष्ठितांची सभा भरून तींत 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' नामक संस्थेची स्थापना करण्यांत आली. विलियम वेडरबर्न (१८३६–१९१८) हे आय. सी. एस. अधिकारी अध्यक्षस्थानीं होते. सोसायटीच्या स्थापनेचा पहिला ठराव वामन शिवराम आपटे यांनी मांडला. 'पुढील मंडळी या सोसायटीचे घटक असावींत' असें म्हणून पुढे ५ आश्रयदाते, २१ सहायक ( Fellows ) आणि ७ आजीव सभासद ( Life Members ) अशा ३३ व्यक्तींचीं नांवें देणारा दुसरा ठराव बाळ

गंगाधर टिळक यांनी मांडला व सोसायटीच्या कामकाजाकरिता नियम उपनियम सुचविणारा तिसरा ठराव रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनी मांडला. दुसऱ्या ठरावांत नमूद केलेले सोसायटीचे संस्थापक 'आजीव सभासद' येणेंप्रमाणे होतेः—

१. बाळ गंगाधर टिळक, २. महादेव बल्लाळ नामजोशी, ३. वामन शिवराम आपटे, ४. गोपाळ गणेश आगरकर, ५. वासुदेव बाळकृष्ण केळकर, ६. महादेव शिवराम गोळे, ७. नारायण कृष्ण धारप.

कॉलेजला मान्यता देण्यासाठी लगेच मुंबई विद्यापीठाकडे अर्ज करण्यांत आला. विद्यापीठाने कॉलेजला पहिल्या वर्षाचे वर्ग शिकवण्यापुरती तीन वर्षे मान्यता दिली. गद्रेवाडयांत कॉलेजचे वर्ग सुरू झाले. वामन शिवराम आपटे प्राचार्य व संस्कृताचे प्राध्यापक, टिळक गणिताचे प्राध्यापक, इतिहास आणि तर्क यांचे आगरकर प्राध्यापक, याप्रमाणे योजना झाली.

कॉलेजला नांव गव्हर्नराचें आणि गव्हर्नराचीं शिफारसपत्रें घेऊन चतुर मुत्सद्दी नामजोशी हिंडणारे, मग संस्थानिकांच्या देणग्यांना काय विचारतां! सहा महिन्यांत रु. ७५००० चीं अभिवचनें मिळालीं. दुसऱ्या वर्षाचे, म्हणजे फर्स्ट बी. ए. चे वर्ग सुरू करण्यास परवानगी १८९० सालीं आणि सेकंड बी. ए. चे सुरू करण्यास १८९२ सालीं मिळाली. कॉलेजचा याप्रमाणे उत्तरोत्तर उत्कर्ष होत गेला.

## तेजाळ वृत्तीचा अस्त

हें सर्व उत्तम झालें. पण ऐतिहासिक दृष्टीने या सर्व गोष्टींकडे पाहणाऱ्याच्या मनांत आद्य संस्थापक चिपळूणकर यांच्या तत्त्वत्रिपुटीची इथे कितपत बूज राखण्यांत आली असा प्रश्न उत्पन्न होईल. या त्रिपुटीचा मागे उल्लेख केला आहे. त्यांतील पहिल्या तत्त्वाचा प्रस्तुत संदर्भांत असा अर्थ होईल की शाळा कॉलेजांत शिकविणारे स्वतः जाज्वल्य देशाभिमानी असावे आणि त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनांत स्वातंत्र्याकांक्षी जाज्वल्य देशाभिमान उत्पन्न करण्याचा यत्न करावा. त्या वेळच्या ज्या हकीकती उपलब्ध आहेत त्यांजवरून असें दिसतें की या तत्त्वाच्या परिपूर्तीचा विचार कुणाच्याच मनांत वागत नव्हता. टिळक आणि आगरकर यांच्या स्वतःच्या

जाज्वल्य देशाभिमानाबद्दल प्रश्न नव्हता. पण विद्यालयीन अभ्यासक्रमाबरोबरच जाज्वल्य देशाभिमानाचें बीजारोपण विद्यार्थ्यांच्या मनोभूमिकेंत करणें इष्ट व अवश्य आहे, या विचाराची प्रेरणा त्या काळांत त्यांच्या ठायीं होती असें दिसत नाही. ही गोष्ट करणें वस्तुगत्याच अशक्य आहे आणि चिपळूणकर जगले वाचले असते तर त्यांनीहि त्यांच्या सहकाऱ्यांनी अवलंबिलेल्या धोरणास पाठिंबा दिला असता, असा या बाबतींत युक्तिवाद करतां येईल. चिपळूणकर जगले असते तर त्यांनी काय केलें असतें यासंबंधी कल्पना करीत बसणें म्हणजे आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ होय. गांधीजी आज असते तर त्यांनी अमुक केलें असतें असे हजारो हजार परस्पर विरुद्ध तर्क करण्यांत येतात, तसल्या वायफळ कल्पनातरंगांत कांही अर्थ नाही. पण विषयज्ञानाबरोबरच स्वातंत्र्याकांक्षी देशाभिमानाचा विद्यार्थ्यांमध्ये फैलाव करणें अशक्य आहे असें जर कोणाचें म्हणणें असेल, तर तें १९०६ व १९२० या सालांच्या सुमारास राष्ट्रीय शिक्षणाच्या ज्या संस्था निघाल्या त्यांनी खोटें ठरविलें आहे. सरकारच्या विरोधामुळे या संस्था अल्पजीवी ठरल्या असतील, त्या संस्थांतील शिक्षकांना आपल्या कौटुम्बिक स्वास्थ्याची होळी करावी लागली असेल. पण हें सतीचें वाण त्यांनी जाणून बुजून पतकरलें होतें. तुलनेच्या भाषेंत बोलण्याचें कारण नाही; पण हें सतीचें वाण पतकरून या राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्थांनी जी स्वातंत्र्याकांक्षा देशांत पसरविली आणि स्वातंत्र्यसंपादनाच्या कार्याला जो प्रत्यक्ष हातभार लावला, त्याचें महत्त्व देशाच्या पारतंत्र्याच्या अवस्थेंत इतर कोणच्याहि गुणापेक्षा अधिक होय असेंहि प्रामाणिक मत असूं शकेल.

जी गत स्वातंत्र्याकांक्षी देशाभिमानाची तीच गत स्वतंत्र बाण्याची. 'सरकारी नोकरी न पतकरितां स्वतंत्र बाण्याने राहून लोकसेवेच्या ध्येयास अनुसरणें' असें आपण मागे त्रिपुटींतील दुसऱ्या तत्त्वाचें विवरण केलें आहे. यांतला 'स्वतंत्र बाणा' तेवढा गेला आणि बाकीच्या गोष्टी राहिल्या. गाभा गेला आणि फोलकट तेवढें शिलक राहिलें असें याचें वर्णन करणें कोणास आवडेल. प्रस्तुत लेखकाला तसें म्हणावयाचें नाही. पण हा स्वतंत्र बाणा आद्य संस्थापक चिपळूणकर यांना फार प्रिय होता ही गोष्ट दृष्टीआड होऊं शकत नाही. चिपळूणकरांनी आपल्या लिखाणांत

'हेडमास्तरांची रिमार्क, इन्स्पेक्टरांचा शेरा, रजिस्टरें नोंदणीबुकें यांचा जाच' यांचा अनेकवार तिरस्काराने उल्लेख केला आहे. ते होते तोंपर्यंत शाळा सर्व प्रकारच्या सरकारी संबंधापासून अलिप्त होती. आपटे यांनी कमिशन-पुढे साक्ष देतांना बराच स्वतंत्र बाणा दाखविला. त्यांनी आपल्या साक्षींत 'राष्ट्रीय शिक्षण' ( National Education ) या शब्दप्रयोगाचाहि उपयोग केलेला आढळतो. त्यांच्या साक्षींतला स्वतंत्र बाणा अर्धवटच होता, तथापि तेवढा देखील अमलांत आणण्याचा सोसायटीकडून कधी प्रयत्न झाला नाही.

ता. २४ नोवेंबर १८८४ रोजीं न्यू इंग्लिश स्कूल आणि ३१ जाने-वारी १८८५ रोजीं फर्ग्युसन कॉलेज सरकारी अनुदान मिळावें या हेतूने शिक्षणखात्यांत नोंदण्यांत आलें. सरकारी अनुदान म्हटलें की त्याबरोबर सरकारी इन्स्पेक्टरांची तपासणी, सरकारी नियमांची अंमलबजावणी हें सर्व आलेंच. परकीय राज्यकर्ते आपल्या ताब्याखालील राष्ट्राला किती किती प्रकारांनी जखडूं पाहत असतात हें काय सांगावयास हवें ? पण इथे तर आपण होऊन त्यांच्या मनधरणीसाठी प्रयत्न चालला होता. आपलें नांव आमच्या कॉलेजला देण्यास परवानगी द्या, अशी गव्हर्नर फर्ग्युसनसाहेबांना आदरपूर्वक विनंति करण्यांत आली. नांवांत काय आहे असें कोणी म्हणेल; पण तें खरें नाही. नांवांत पुष्कळच आहे. स्वत्वाला, स्वाभिमानाला धक्का देण्याचें सामर्थ्य नांवांत खचित आहे. फर्ग्युसन कॉलेजचा उद्घाटन समा-रंभ प्राचार्य विलियम वर्डस्वर्थ यांच्या हस्तें करण्यांत आला व विलियम वेडरबर्न हे सरकारी अधिकारी कित्येक वर्षें सोसायटीच्या कौन्सिलचे सभा-पति होते, या गोष्टींविषयी फारसें कांही वाटण्याचें कारण नाही; कारण हे दोघे उदारात्मे होते व हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याकांक्षेचें बऱ्याच मर्यादेपर्यंत कौतुक करण्याची त्यांची वृत्ति होती. परंतु प्राचार्य सेल्बी यांच्यासारख्या संकुचित वृत्तीच्या सहानुभूतिशून्य माणसाला आदराने पाचारण करून कित्येक वर्षें सोसायटीच्या कौन्सिलचें सभापतित्व अर्पण करण्यांत येतें या-वरून कोणचें अनुमान काढावें ?

याबद्दल सोसायटीच्या चालकांना दोष देण्याचा इरादा नाही. निबंध-मालेची तेजाळ वृत्ति आणि डेकन एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापक-

चालकांची वृत्ति या दोन्ही एकमेकांशेजारीं ठेवून त्यांवरून एका विशिष्ट कार्याची परिणति कशी होत गेली हें दाखवावें एवढाच हेतु होता. सोसायटीचें धोरण आखणारी मंडळी सामान्य नव्हती. पुढे स्वतंत्र बाण्याचे व सरकारी नियंत्रण झुगारून देण्याचे प्रश्न अनेकवार उपस्थित झाले. त्यांना अनुलक्षून सोसायटीने स्वीकारलेल्या धोरणाचें समर्थन करतांना सोसायटीचे इतिहासकार म्हणतात—

> "बहुजनसमाजाच्या शिक्षणासाठी चालविलेलें कार्य सरकारी मान्यता व सरकारी आश्रय यांच्याशिवाय चालविणें शक्य नाही, ही गोष्ट सोसायटीला पटलेली आहे म्हणूनच अशीं ( स्वतंत्र होण्यासाठी करण्यांत आलेलीं ) आवाहनें तिने सतत अव्हेरिलीं आहेत. मोठया समुदायाचें शिक्षण हें जिने आपलें खास उद्दिष्ट म्हणून डोळयांपुढे ठेवलें आहे अशा संस्थेने, विशेषतः वाङ्मयात्मक शिक्षणाच्या बाबतींत अतिशय उपयुक्त असलेला जो सरकारी मान्यतेचा आणि विद्यापीठमान्यतेचा छाप, त्याचा त्याग करणें हें हितावह नाही."*

हें समर्थन खरें आहे. डे. ए. सोसायटी आणि तिच्या धर्तीवर निघालेल्या संस्था यांनी धिमेपणाने प्रयत्न करून भव्य इमारती, सुसज्ज ग्रंथालयें व प्रयोगशाळा यांची उभारणी करून, गुणी प्राध्यापक शिक्षकांचा संच जमा करून हजारो मुलामुलींना पाश्चात्त्यांपासून इकडे आलेलें विज्ञान वाङ्मय कला इत्यादिकांचें शिक्षण दिलें या कामगिरीचें मूल्य राष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने लहानसहान आहे असें कोण म्हणेल ? त्यांनी अवलंबिलेल्या नेमस्त धोरणामुळेच हें शक्य झालें. पण विष्णुशास्त्र्यांची वृत्ति ही नव्हे. एका बाजूने गमावलें तर दुसऱ्या बाजूने उमाप कमावलें. पण कांहीच गमावलें नाही असें मात्र नव्हे, एवढी जाणीव असली म्हणजे पुरे.

सरकारची मनधरणी आणि सरकारी नियंत्रणांचा स्वीकार या बाबतींत टिळकांचें ( त्या वेळीं ) मत काय होतें, असा प्रश्न एखाद्याच्या मनांत

---

* The History of the Deccan Education Society, 1935, Part I, p. 275.

उत्पन्न होईल. टिळक कांही काळानंतर सोसायटींतून बाहेर पडले तेव्हा याबाबतींत त्यांचें मत प्रतिकूल असावें असे तर्क केले गेले व वादहि झाले. पण सोसायटीनें केलेल्या ज्या गोष्टींचा वर उल्लेख केला आहे त्यांपैकी एकाहि गोष्टीला टिळकांनी आक्षेप घेतला होता असें म्हणण्यास आधार नाही. त्यांच्या मनांत काय असेल तें असो, कॉलेजला फर्ग्युसनचें नांव देणें किंवा सेल्बीसारख्याला कौन्सिलांत घेणें या गोष्टींबद्दलहि त्यांनी नापसंतीचा उद्‌गार काढल्याचें कुठे नमूद नाही. तेव्हा सर्व गोष्टी टिळकांना मान्य होत्या असेंच धरून चाललें पाहिजे.

## टिळकांच्या आयुष्यांतील क्रांतिबिंदु

कॉलेज स्थापन झाल्यानंतर जवळ जवळ सहा वर्षांनी, म्हणजे ता. १४ आक्टोबर १८९० रोजीं, टिळकांनी सोसायटीच्या आजीव सभासदत्वाचा राजीनामा दिला. राजीनाम्याचीं कारणें देणारें विस्तृत निवेदन ता. १५ डिसेंबर रोजीं त्यांनी पाठवून दिलें. हें निवेदन १९३५ सालीं प्रसिद्ध झालेल्या डे. ए. सोसायटीच्या इतिहासांत परिशिष्ट रूपाने समग्र छापलें आहे. त्यामुळे राजीनामा देतांना कोणचीं कारणें टिळकांच्या मनांत प्रमुख होतीं हें स्पष्ट होतें. त्या संबंधांत तर्क करण्याचें आता कांही कारण राहिलें नाही. या इतिहासग्रंथांत टिळकांच्या राजीनाम्यावर एक स्वतंत्र प्रकरण इतिहासकर्त्यांनी लिहिलें असून त्यांत आजीव सभासदांमधील अंतर्गत कलहाचा इतिहास व त्यांत निघालेल्या मुद्द्यांवर स्वतःचा अभिप्राय दिलेला आहे.

हा राजीनामा म्हणजे टिळकांच्या आयुष्यांतील क्रांतिबिंदु होय. टिळक पुढे 'केसरी'चे संपादक आणि राजकीय पुढारी म्हणून ख्यातीला चढले; पण त्यांनी सार्वजनिक जीवनांत प्रवेश केला तो याकरिता मुळीच नव्हे. शिक्षणाच्या कार्यांत आपला जन्म वेचावा या बुद्धीने त्यांनी त्यागपूर्वक शाळा काढली व पुढे कॉलेजची स्थापना केली. हें कार्य करतांना त्यांनी किती परिश्रम केले, लोकांची निंदा व उपहास किती सहन केला, याचें जें वर्णन त्यांनी आपल्या विस्तृत निवेदनांत केलें आहे तें वाचलें म्हणजे मन भरून येतें. या संस्थांच्या उभारणींत त्यांनी आपला जीव

ओतला होता. आपण नामांकित प्राध्यापक व संशोधक व्हावें, तसेंच आपल्या त्यागाच्या व कर्तबगारीच्या जोरावर देशभर शिक्षणसंस्थांचें जाळें पसरावें ही त्यांची जिवाभावाची इच्छा होती. या आकांक्षा, हीं मनोराज्यें सोडून देतांना त्यांच्या मनाला किती वेदना झाल्या असतील याची कल्पनाच केली पाहिजे. हें निवेदन लिहीत असतांना त्यांचें अंतःकरण कमालीचें व्यथित झालें होतें असें दिसतें. एका धीरोदात्त पुरुषाचें कळवळणारें विह्वल अंतःकरण आपण पाहात असल्याचा विलक्षण अनुभव टिळकांचें राजीनामाविषयक निवेदन वाचतांना आपणास येतो. निवेदनाच्या अखेरीस ते म्हणतात—

"माझ्या भावनांशीं तुंबळ युद्ध करूनच मी ह्या ( तुम्हांपासून दूर होण्याच्या ) निश्चयाप्रत आलों हें मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतों. खरोखर माझ्या जीविताचें ध्येय मी टाकून देत आहें, पण स्वतःला दूर करूनच माझ्या हातून त्याची उत्तम सेवा होईल हाच विचार हें माझ्र सांत्वन आहे. जोंपर्यंत मी तुमच्यांत होतों तोंपर्यंत संस्थेचें हित पाहण्यांत मी बिलकुल कसूर केली नाही आणि आता यापुढे तुमच्यांत राहून तिच्या अस्तित्वाला धोका आणण्याची माझी इच्छा नाही... मूळ तत्त्वांप्रमाणे वागूं असें तुम्ही लिहून द्याल अशी मला थोडीशी जरी आशा असती तर आतासुद्धा हा निर्वाणीचा मार्ग मी पतकरला नसता....

"माझ्या प्रिय सहकाऱ्यांनो, दुःखाच्या भाराने जड झालेल्या अंतःकरणाने अखेर मी तुमचा निरोप घेत आहें; ह्या आशेने की तुमच्यापासून माझी तातातूट करून घेण्याने मी तुमच्यामधील सौहार्द टिकविण्यास सहायभूत होऊं शकेन. आपल्या संस्थांचें भलें होण्यास या सौहार्दाची अत्यंत आवश्यकता आहे, कारण या सौहार्दासाठीच मी हा आत्मयज्ञ करीत आहें."

संस्थांच्या कामाविषयी टिळकांची इतकी आत्मीयता होती की तें सोडणें म्हणजे आपल्या आत्म्याचा बळि देण्याप्रमाणे त्यांना वाटत होतें या उद्गारांवरून दिसतें. या संस्थांच्या करिता त्यांनी काय करायचें बाकी

ठेवलें होतें ? वकिलींत गडगंच पैसे मिळण्याची खात्री असतां त्यांनी या संस्थांकरिता आमरण दारिद्र्य पतकरलें होतें. शाळेचें पहिलें वर्ष एक पैंहि न घेतां ते राबले होते. शाळेच्या खोल्या सारवण्यापासून तों खुर्च्या-टेबलें वाहून नेण्यापर्यंत पडेल तीं कामें केलीं होतीं. गद्रेवाडा मिळवून देण्याचें काम त्यांनीच केलें होतें. संस्थेचे कायद्याचे प्रश्न त्यांनी सांभाळले होते. जमाखर्चाच्या गुंतागुंती उपस्थित झाल्या की त्या त्यांच्याच अंगावर टाकण्यांत येत असत. सोसायटीची घटना बहुतांशीं त्यांनीच तयार केली होती. बाहेरच्या कुणाशीं वाटाघाटी करायच्या असल्या की त्यांनाच पुढे करण्यांत येत असे. सोसायटीच्या सभासदांत ते सर्वांत 'सीनियर' असल्यामुळे कॉलेजच्या प्रिन्सिपलपदावर त्यांना हक्क सांगतां आला असता. पण तसें न करितां आपट्यांना त्यांनी तें पद खुशीने घेऊं दिलें. इतकें ज्या संस्थेकरिता आपण केलें तिच्यांत आपल्या रास्त म्हणण्याची बूज राखली जाऊं नये याचें त्यांच्या मानधन अंतःकरणाला केवढें दुःख झालें असेल !

टिळकांचें असें म्हणणें तरी काय होतें की जें त्यांच्या सहकाऱ्यांना कांही केल्या मान्य होऊं नये ? स्वार्थत्याग आणि आत्मलोप (self-sacrifice and self-negation) हीं दोन तत्त्वें आपल्या संस्थेसारख्या संस्थांच्या यशाला आवश्यक आहेत अशी टिळकांची दृढ धारणा होती.

"या मूळतत्त्वांच्या आधारावर संस्थेची आम्ही प्रारंभीं संघटना केली. आमच्यावर लोकांची श्रद्धा बसली ती केवळ आमच्या बौद्धिक पराक्रमामुळे फारशी नसून स्वावलंबन, स्वार्थत्याग आणि वागणुकीचा साधेपणा यामुळे मुख्यतः बसली; पण या गुणांचा सुद्धा आम्ही धिक्कार करूं लागलों आहों....

"केवळ निर्वाहापुरत्या वेतनावर समाधान मानणें आणि आमचीं सर्व साधनें, मिळकत आणि वेळ हीं संस्थेला अर्पण करणें या मिशनरी तत्त्वांवर संस्थेचे नियम आम्ही तयार केले. पण संस्था जशी सुस्थिर झाली, सरकारची ग्रँट मिळून सांपत्तिक स्थिति सुधारली, तशी या तत्त्वांना सुरुंग लावण्याची प्रवृत्ति उत्पन्न होत आहे आणि

त्यामुळे परस्पर विसंगत हितसंबंध उत्पन्न होऊन बखेडा माजला आहे," असें टिळकांचें म्हणणें दिसतें.

'निर्वाहापुरतें वेतन' या तत्त्वाऐवजी आगरकरांनी 'संस्थेच्या सांपत्तिक स्थितीला अनुसरून वेतन' असें तत्त्व पुढे आणलें आणि त्या तत्त्वानुसार सभासदांचा पगार ५ रुपयांनी वाढवावा अशी त्यांनी सूचना केली, हें पाहून टिळकांना संताप आला. मूळच्या त्यागाच्या तत्त्वाला धक्का पोचत आहे असें त्यांना वाटलें. या सूचनेवरील वादांत दोन्ही पक्ष हमरी-तुमरीवर आले.

आजीव सभासदाने संस्थेच्या बाहेरचीं कामें स्वीकारावींत की नाही, हाहि एक वादाचा मुद्दा होऊन बसला होता. टिळकांचें म्हणणें बाहेरचीं कामें करूं नयेत, आणि केलींच तर त्यामुळे होणारी मिळकत संस्थेकडे जमा करावी. आगरकर प्रभृतींचें म्हणणें असें होतें की संस्थेचें काम इमानें इतबारें केल्यानंतर आपल्याला उत्साह व वेळ राहतो असें जर एखाद्याला वाटेल तर त्याने बाहेरचीं कामें करण्यास काय हरकत आहे? 'स्वार्थबुद्धीने बाहेरचीं कामें घेण्याला सुरवात झाली म्हणजे मतभेद व तंटे होतात, हितसंबंधांची गुंतागुंत होते तेव्हा हें मुळांतच टाळावें' असें टिळकांप्रमाणे केळकरांचें म्हणणें होतें. या बाबतींतलीं विशिष्ट उदाहरणें म्हणजे गोखल्यांचें अंकगणित, आपट्यांचा संक्षिप्त इंग्रजी मराठी कोश इत्यादि अनेक गोष्टीं-वरून हमरीतुमरी, कचाकची झाली.

एकमेकांविषयी मनें कलुषित झालीं म्हणजे भांडणाच्या निमित्तांना काय तोटा! त्या वेळच्या हकीकती वाचल्या म्हणजे किती क्षुद्र कारणांवरून हे थोर लोक भांडले हें नजरेस येऊन मौज वाटते; पण ती मौज क्षणभरच. लगेच मन पराकाष्ठेच्या खेदाने व्याप्त होतें.

टिळकांच्या आणि आगरकरांच्या सामाजिक मतांत आता जमीन अस्मानाचें अंतर पडलें होतें. तेंहि एक कलहाचें मूळ होतेंच. इतरांस अति-सुधारकी वाटणाऱ्या सामाजिक मतांमुळे आगरकरांना केसरी सोडावा लागला होता. शाळा व कॉलेजाच्या व्यवस्थेसंबंधांतहि सुरवातीस बहुधा टिळकांचें म्हणणें सर्व जण मानीत असत. या सर्व गोष्टींमुळे आगरकर आपला द्वेष करतात असा टिळकांचा दृढ समज झाला.

गोपाळ कृष्ण गोखले (१८६३–१९१५) हे टिळकांच्या उदाहरणाने प्रेरित होऊन न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाले. जून १८८६ मध्ये आजीव सभासद म्हणून सोसायटींत त्यांना घेण्यांत आलें. सोसायटींत आल्यानंतर आगरकर व गोखले यांचीं पावलें एकोप्याने पडूं लागलीं. हे दोघे एक होऊन आपल्याला हाणून पाडूं पाहतात असा टिळकांचा समज होऊं लागला असें दिसतें.

गोष्टी निकरावर आल्या त्या गोखल्यांच्या एका कृत्यामुळे. सार्वजनिक सभेच्या कार्यवाहाची जागा गोखले यांनी पतकरण्याचें ठरविलें. हीच कार्यवाहाची जागा तुम्ही पतकराल का, म्हणून पूर्वी टिळकांना विचारलें असतां, सोसायटीच्या आजीव सभासदानें बाहेरचीं कामें करणें बरें नव्हे म्हणून त्यांनी नकार दिला होता.

"आमच्यापैकी बहुतेक प्रत्येकाचा संस्थेच्या बाहेर कांही ना कांही हितसंबंध आहे किंबहुना आम्हांला असें वाटूं लागलें आहे की आमचें काम फक्त शाळेंत चार तास शिकविण्याचें, त्याच्या बाहेर प्रत्येक मनुष्य वाटेल तें करण्यास मोकळा आहे. कित्येक नव्या सभासदांत ही मनःस्थिति विशेष प्रबळ असलेली आढळते. त्यांना असें वाटतेंसें दिसतें की डे. ए. सोसायटीचें आजीव सभासदत्व पुण्यांत नवीन आलेल्याला सुरवात करायला एक चांगली गोष्ट आहे आणि जर एखाद्याच्या अंगीं उत्साह व महत्त्वाकांक्षा असेल तर वैयक्तिक मोठेपणा आणि फायदा मिळविण्याकरिता मधला टप्पा (Stepping stone) म्हणून तिचा त्याला उपयोग करतां येईल." *

---

* पृ. ७२ पासून ७५ पर्यंतच्या पानांमध्ये अवतरण चिन्हांत घातलेला मजकूर टिळकांच्या राजीनाम्यामधून भाषांतर करून घेतला आहे व बाकीचें प्रतिपादन राजीनाम्याच्या आधारें केलें आहे. हा राजीनामा The History of the Deccan Education Society, Pt. III, pp. 1–29 मध्ये प्रसिद्ध झाला आहे.

असें टिळकांनी राजीनाम्याच्या निवेदनांत म्हटलें आहे. यांतील टोमणा गोखल्यांना उद्देशून होता, हें सहज ओळखतां येतें. आजीव सभासदांना बाहेरचीं कामें घेतां येऊं नयेत अशा आशयाचा आजीव सभासदांच्या बोर्डापुढे टिळकांनी लगेच ठराव आणला. तो बहुमताने मंजूरहि झाला. विरुद्ध बाजूने उलट अर्थाचा ठराव लगोलग त्याच सभेंत आणला आणि आश्चर्य असें की तोहि मंजूर झाला! इकडे गोखले सार्वजनिक सभेचें चिटणीसपद पतकरून मोकळे झाले. तीन चार महिने हमरीतुमरी, घासाघीस चालून शेवटीं वैतागून जाऊन टिळकांनी ता. १४ आक्टोबर १८९० रोजीं राजीनामा दिला.

टिळक आणि गोखले यांचे परस्पर ग्रहयोग विलक्षण होते, असें म्हणावें लागतें. सार्वजनिक आयुष्याच्या उंबरठयांतच गोखल्यांना टिळकांशीं सामना द्यावा लागला. पुढे आमरण चालावयाच्या विरोधाची ही पहिली सलामी आहे असें दोघांपैकी एकालाहि या वेळीं स्वप्न पडलें नसेल!

वादाच्या मुद्द्यांसंबंधी टिळकांची बाजू वर मांडली आहे. विरुद्ध बाजूचें म्हणणें काय होतें याचाहि थोडक्यांत निर्देश करावयास पाहिजे. संस्थेची सभासद मंडळी १८८६ पर्यंत दरमहा केवळ ४० रु. वेतन घेत असत. पुढे सरकारी अनुदान मिळूं लागलें तेव्हा प्रत्येकास वर्षाअखेरीस ४०० रु. बोनस म्हणून देण्यांत येऊं लागले. तरी देखील ह्या दर्जाच्या माणसांना बाहेर समाजांत मिळणाऱ्या वेतनाच्या मानाने ही रकम इतकी थोडी होती की एखाद्याला पुस्तकें लिहून किंवा बाहेर दुसरें कांही सार्वजनिक काम करून चार पैसे मिळवावेसे वाटले तर त्याला बंदी कां असावी? सोसायटीने सोपविलेलें काम तो चोखपणे बजावितो की नाही एवढें पाहिलें म्हणजे झालें. सोसायटीमध्ये सभासद म्हणून जो येतो तो लोकहितार्थ कांही काम करण्याची हौस असते म्हणून येतो. आपण पैशाच्या बाबतींत जो त्याग केला त्याच्या मोबदल्यांत लोकहिताचें कांही काम केल्याचें समाधान आपल्याला लाभावें असें एखाद्याला वाटलें तर त्यांत गैर कांहीच नाही. जेसुइट लोकांच्या संघटनेचीं तत्त्वें आपण आपल्या सोसायटीला लावून चालणार नाही. ते अविवाहित असतात, एकत्र जेवतात खातात, संन्यस्त वृत्तीने राहतात. इ० इ० .

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक 20409 वि: क्रमांक ८०.३.२ नों: दि:



इथे हें लक्षांत ठेवलें पाहिजे की जेसुइट संघटनेचीं तत्त्वें जशींच्या तशीं आपल्या सोसायटीला लावावीं असें टिळकांनी आपल्या राजीनाम्यांत किंवा इतरत्र कुठे म्हटलें नव्हतें. त्यांत पुष्कळ बदल करावा लागेल, त्याप्रमाणे आपण आपल्या नियमांत केलाहि आहे हें राजीनाम्यांत त्यांनी दाखवून दिलें आहे. मिशनरी संघटनांनी अवलंबिलेल्या एकनिष्ठा आणि सर्वस्वत्याग या तत्त्वांवर आपली संघटना उभारण्याचें पहिल्यापासून ठरलें होतें, असें त्यांचें म्हणणें होतें. आणि याचा इनकार करून 'असें मुळी ठरलेंच नव्हतें' असें आगरकर प्रभृति बहुमतवाल्या लोकांनी कुठेहि स्पष्टपणें म्हटलेलें आढळत नाही, हें सोसायटीच्या इतिहासलेखकांनी, सोसायटींतील बहुमताचें समर्थन करूनहि कबूल केलें आहे.*

## स्वातंत्र्यवाद हें मूलकारण

हें राजीनामा प्रकरण न्याहाळीत असतां असा एक भास होऊं लागतो की सभासदांचें वेतन आणि त्यांचीं सोसायटीबाहेरचीं कामें हीं जरी राजीनाम्याला निमित्तकारण झालेलीं असलीं तरी डे. ए. सोसायटी आपल्या स्वतंत्र बाण्याला पारखी होत चालली असून सरकारच्या व गोऱ्या वरिष्ठांच्या कच्छपीं लागत चालली आहे हें कारणहि टिळकांच्या मनाच्या बुडाशीं असावें. याला आधार दोन. राजीनाम्यासंबंधीच्या निवेदनांत "१८८१-८२-८३ सालांतील देशाभिमानी आणि स्वतंत्र अवस्थेसंबंधाने (patriotic and independent position of 1881-82-83) तिरस्काराने बोलण्यास सुरवात झाली" असें टिळकांनी म्हटलें आहे. तसेंच कॉलेजांत एक गोरा प्रोफेसर आणावा अशी कारवाई आपल्या परोक्ष सुरू झाली असल्याचें त्यांनी उद्वेगाच्या भाषेंत सांगितलें आहे.† निवेदनांतील या उल्लेखांखेरीज दुसरा आधार म्हणजे संस्था सोडल्यानंतरचें टिळकांचें चरित्र. नंतर लगेच ज्याने स्वातंत्र्याकांक्षी देशाभिमानी पंथाचें नेतृत्व करून

---

* The History of the D. E. Society, Pt. I, p. 112.

† The History of the D. E. Society, Pt. III, pp. 20, 21.

लोकशक्ति जागृत करण्याचें कंकण बांधलें तो कॉलेजांत असतां राज्यकर्त्यांच्या मनधरणीच्या तत्त्वाला अगदी मनापासून अनुसरला असेल हें संभवनीय वाटत नाही. कॉलेजला नांव देणें वगैरे एकेक गोष्ट जसजशी उपस्थित होत गेली तसतशी तिला तडजोडीच्या भावनेने टिळक संमति देत गेले. याचा परिणाम स्वतंत्र बाण्याची मूळ भूमिकाच नष्ट करण्यांत होत आहे हें जेव्हा लक्षांत आलें तेव्हा मात्र त्यांचें मन उसळून आलें असावें.

सोसायटी सोडून टिळक गेले हें दोघांच्याहि दृष्टीने चांगलें झालें असें यासंबंधाने लिहिणाऱ्या सर्व जणांनी म्हटलें आहे. कांही केल्या दोघांचें जमत नव्हतें, तेव्हा दोघेहि जण एकमेकांपासून दूर झाल्याने सोसायटी व टिळक या दोघांनाहि आपआपला मार्ग निर्वेधपणे चोखाळावयास मोकळीक झाली. पण या व्यावहारिक अथवा बाह्य दृष्टीच्या पलीकडे जाऊन आपल्याला या फारखतीची तात्त्विक मीमांसा देखील आज करतां येईल. मुळांत न्यू इंग्लिश स्कूल ही स्वातंत्र्याकांक्षी, देशाभिमानी पंथाची निर्मिति होती. पण त्या पंथाच्या भूमिकेपासून ढळत ढळत ती सुधारणावादी पंथाच्या भूमिकेप्रत येऊन पोचली. साहजिकच, संस्थाचालकांपैकी ज्या व्यक्तींची स्वातंत्र्याकांक्षी विचारसरणी टिकून राहिली होती त्यांचें तेथे जुळेनासें झालें. टिळकांना संस्थेमधून बाहेर पडावें लागलें याची ही यथातथ्य उपपत्ति होय. वेतनाचें प्रमाण, बाहेरचें काम वगैरे स्वार्थत्यागाच्या कलमांसंबंधाने टिळकांनी वाद माजविला व मुख्यतः त्यापायीं संस्था सोडली यांतील बीज झालें तरी हेंच होय. मागे आपण दोन्ही पंथांची पूर्वपीठिका आणि वैचारिक बैठक पाहिली आहे, त्यावरून हें दिसून आलें आहे की त्यागपूर्ण देशसेवेचें तत्त्व स्वातंत्र्यवादी पंथाच्या विचारसरणींत होतें. सुधारणावादी विचारसरणींत किंवा आचारप्रणालींत हें तत्त्व त्या काळीं असल्याचें दिसत नाही. तेव्हा कडक स्वार्थत्यागाचा आग्रह टिळकांनीच कां धरला आणि इतर मंडळी स्वार्थत्यागाचें तत्त्व थोडें सौम्य किंवा पातळ करण्यास कशी उद्युक्त झाली याचें रहस्य वरील उपपत्ति लक्षांत घेतल्यास तात्काळ उलगडतें. भांडारकर, रानडे प्रभृति सुधारणापक्षाच्या अध्वर्यूंचा सोसायटीच्या कौन्सिलांत प्रवेश झाला आणि त्यांच्या मान्यतेनुसार तिचें काम चालूं लागलें ही गोष्टहि या संबंधांत मोठी सूचक होय.

अशा रीतीने डे. ए. सोसायटी महाराष्ट्रांतील सुधारणापक्षाचें महत्त्वाचें अंग होऊन बसली. पाश्चात्त्यांकडून आलेल्या सामाजिक सुधारणेच्या तत्त्वांचा यथाशक्य अवलंब करणें, आणि राज्यकर्त्यांशीं सलोख्याने राहून त्यांच्या मदतीने पायरीपायरीने प्रगति करून घेण्यास झटणें, या नेमस्त तत्त्वांचा अंगीकार करून तिने यानंतर आपली प्रगति करून घेतली. ज्ञानप्रसार, विशेषतः पाश्चात्त्य विद्या वाङ्मय यांच्या ज्ञानाचा प्रसार, ही दोन्ही पंथांच्या उद्दिष्टांतली समान गोष्ट होती. म्हणून त्या कार्याकरिता स्थापिलेल्या या संस्थेचा एका पंथांतून दुसऱ्या पंथांत थारेपालट उत्पाताविना होऊं शकला. स्वातंत्र्यवादी पक्षाच्या द्वारें देशसेवेच्या प्रांगणांत उतरलेले आगरकर सोसायटीच्या या परिणतीबरोबर सुधारणापक्षाकडे झुकत जाऊन अखेरीस त्याच्यांत समरस होऊन गेले. तो इतिहास आपण पुढे पाहूं.

इतर कित्येकांनी म्हटल्याप्रमाणे स्वभावभेद किंवा प्रकृतिभेद टिळकांनी संस्था सोडण्यास कारणीभूत झाला नसून तत्त्वाचा किंवा मूलभूत विचारसरणीचा भेदच कारणीभूत झाला हें वरील विवेचनावरून लक्षांत येईल. बरोबरीच्या लोकांत समभावाने वागून काम करणें टिळकांना साधत नाही, त्यांचा स्वभाव अत्याग्रही होता, हेकेखोर होता, म्हणून त्यांचें आपल्या सहकाऱ्यांशीं जमलें नाही असें त्यांच्या अनेक टीकाकारांनी म्हटलें आहे. परंतु त्यांत तथ्य नाही. पहिलीं सहा वर्षें टिळकांनी इतरांशीं जमवून घेऊन काम केलें ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे वरील आरोप टिकूं शकत नाही.

———

# ६. दोलायमान केसरी

## ठेचा खात शहाणपण

चिपळूणकरांच्या पुढारपणाखाली सज्ज झालेल्या तरुण मंडळीने जशी शाळा स्थापली तशींच छापखाना व वर्तमानपत्रेंहि सुरू केलीं. ज्ञानप्रसार आणि विचारजागृति या गोष्टी जवळजवळ एकरूप आहेत अशी भावना. तेव्हा एकाच कार्याचीं भिन्न अंगें किंवा एकाच चळवळीचीं भिन्न द्वारें म्हणून या गोष्टी निर्माण करण्यांत आल्या व सुरवातीचीं कांही वर्षे याच भावनेने चालविण्यांत आल्या.

पण पुढे अनुभव निराळा येऊं लागला. त्या त्या वेळच्या गरजे-प्रमाणे प्रत्येक कामाचीं अवस्थांतरें निरनिराळ्या दिशांनी होत गेलीं. शाळा चालविणें आणि वृत्तपत्रें चालविणें या दोन्ही गोष्टी फार निराळ्या प्रकारच्या आहेत; त्यांना मानसिक तयारी निराळ्या प्रकारची लागते, हें प्रत्यक्ष अनुभवाने उमगूं लागलें तेव्हा त्या त्या वेळीं पर्याय काढून गाडें पुढे चालू करण्यांत आलें. सर्व स्थिरस्थावर होऊन एकीकडे शाळा कॉलेज आणि दुसरीकडे केसरी मराठा हीं वृत्तपत्रें यांचें मार्गक्रमण आपआपल्या दिशेने निर्वेधपणे चालूं लागण्यास १८९१ सालची अखेर गाठावी लागली. ठेचा खाल्ल्याने शहाणपण येतें असें म्हणतात. हें शहाणपण अकरा वर्षे हप्त्याहप्त्याने येत होतें असें दिसतें.

ठेचा खाण्याचा मक्ता बहुतांशीं वर्तमानपत्रांकडे होता. शाळेचें मार्गक्रमण रीतसर विकासक्रमाने जोमदार रीतीने झालें. त्यांत एकच मोठी ठेच लागली, ती टिळकांच्या राजीनाम्याची अगदी शेवटीं शेवटीं. पहिल्या-पासूनच शाळेकडे सर्वांचें अधिक लक्ष होतें. हें आपलें मुख्य कार्य अशी टिळक आगरकरांसह सर्वांची भावना होती. वर्तमानपत्रें हें आपल्या कार्याचें

एक पुरवणीवजा अंग इतकीच समजूत. त्यामुळे त्यांची आबाळ झाली. टिळकांना शिक्षणसंस्था नाइलाजाने सोडावी लागून वृत्तपत्रें यदृच्छया पतकरावीं लागलीं तेव्हा वृत्तपत्रद्वारा जनतेची जागृति करून तिला स्वातंत्र्याच्या मार्गाने नेणें हें भवितव्यतेने आपल्यासाठी ठरविलेलें जीवितकार्य होय याची खूणगाठ त्यांना पटली; आणि त्याच क्षणापासून वृत्तपत्रांची स्थिति सुधारली.

## कोल्हापूर प्रकरण

पहिली ठेच या वृत्तपत्रांना लागली ती अब्रूनुकसानीच्या फौजदारी खटल्याची. तात्त्विक दृष्टया पाहिल्यास हा खटला या तरुण देशभक्तांच्या पूर्वजाभिमानाच्या वृत्तींतून उद्भवला होता, असें म्हणतां येतें. चिपळूणकर-प्रणीत स्वातंत्र्यवादी पंथाच्या विचारसरणीमध्ये पूर्वजाभिमान हें एक तत्त्व होतें. महाराष्ट्रांतलीं संस्थानें हीं आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचीं आणि त्यांनी कमावलेल्या स्वातंत्र्याचीं स्मारकें त्यांना ( आणि त्या काळच्या जनतेला ) वाटत होतीं. संस्थानिकांच्या विषयी यामुळेच आपुलकी व अभिमान वाटत असे. या आपुलकीच्या कळवळयांतून या खटल्याचें कारण उद्भवलें होतें.

खटल्याची हकीकत इथे विशेष तपशीलवार देण्याचें कारण नाही. कोल्हापूर संस्थानचे नुकतेच वयांत आलेले दत्तक अधिपति छत्रपति शिवाजी महाराज यांना वेडे ठरविण्यांत येऊन डॉक्टरी उपचारांच्या मिषाने त्यांचा अतोनात छळ करण्यांत येत आहे, अशा वदंता सर्व महाराष्ट्रभर पसरल्या होत्या. त्यांना सदोदित पाहऱ्याखाली वागविण्यांत येतें, चाबकांनी झोडपण्यांत येतें, मर्मभागीं पलिस्तरें मारण्यांत येतात, आईला बायकोला भेटूं देण्यांत येत नाही, वगैरे वगैरे. हा छळ करण्यांत ब्रिटिश सरकारने नेमलेले कोल्हापूर संस्थानचे दिवाण रा. ब. माधवराव बर्वे यांचें अंग होतें असा लोकप्रवाद होता व त्याबद्दल पुण्यास सभा होऊन या भयंकर प्रकाराची दाद घेण्याबद्दल वजनदार नागरिकांच्या सह्यांनी सरकारकडे अर्जहि रवाना झाला होता. स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराजांच्या या वंशजाबद्दल साहजिकच प्रत्येक मराठी मनुष्यास अतोनात कळवळा वाटत होता. केसरी

व इतर मराठी वृत्तपत्रें अर्थात् या भावनेंत सहभागीं होतीं. बऱ्यांचें छळांत अंग आहे अशा नुसत्या बातम्या देऊनच हीं वृत्तपत्रें थांबलीं नाहींत, तर बर्व्यांनी आपल्या हस्तकांमार्फत कांही व्यक्तींना लिहिलेलीं म्हणून कांही पत्रेंहि त्यांनी प्रसिद्ध केलीं. महाराजांच्या छळाचा या पत्रांत उल्लेख होता. इतर पत्रांत प्रथम प्रसिद्ध झालेलीं हीं पत्रें केसरी व मराठयांत उद्धृत करण्यांत आलीं व केसरीने तर बर्व्यांनी फिर्याद करावीच असें आव्हान दिलें. बर्व्यांनी मुंबईंत फौजदारी फिर्याद दाखल केली. केसरीचे संपादक म्हणून आगरकरांचें आणि मराठयाचे संपादक म्हणून टिळकांचें डिक्लेरेशन केलें होतें. अर्थात् फिर्याद त्या दोघांवर झाली.

अशा तऱ्हेच्या खटल्यांत पुष्कळदा होतें त्याप्रमाणे अगोदर खाजगी बोलण्यांत ज्यांनी अनेक गोष्टी सांगितल्या होत्या व कोर्टांत शपथेवर सांगू असें अभिवचन दिलें होतें अशी मंडळी आयत्या वेळीं फिरली, कांही लेखी पुरावा टिळकांच्या हातीं होता तोहि त्यांस बडया धेंडांच्या भिडेस्तव जाळून टाकावा लागला. केसरीने व इतरांनी बर्व्यांचीं म्हणून जीं पत्रें प्रसिद्ध केलीं होतीं त्यांचें खरेंपण आरोपींना शाबीत करतां आलें नाही. आरोपी-तर्फे बॅरिस्टर फिरोजशहा मेथा व ॲडव्होकेट तेलंग यांनी बचावाची शिकस्त केली. पण कांही उपयोग झाला नाही. मॅजिस्ट्रेट, जज्ज हे गोरे आणि ज्यूरीं-तहि बहुसंख्य गोरे लोक. ज्यूरीने अब्रूनुकसानीचा आरोप शाबीत धरला. न्यायाधीशांनी तें मान्य करून टिळक व आगरकर यांना ४ महिने साधी कैद ही शिक्षा सांगितली ( ता. १७ जुलै १८८२ ). लगेच डोंगरीच्या तुरुंगांत टिळक आगरकरांची रवानगी करण्यांत आली.

इकडे कोल्हापूरच्या राजाची कोल्हापुराहून पुणें, पुण्याहून नगर अशी धिंड चालली होती. त्या हतभाग्याच्या सुटकेला मृत्यु अखेरीस धावून आला. ता. २५ डिसेंबर १८८३ रोजीं सार्जंट ग्रीन याच्याशीं झालेल्या भयंकर मारामारींत शिवाजीमहाराज मृत्यु पावले अशी बातमी प्रसिद्ध झाली !

आज इतक्या वर्षांनंतर त्या अंगावर काटा आणणाऱ्या भयंकर हकीकती वाचल्या म्हणजे हतभाग्य शिवाजी राजाचा असह्य छळ झाला ही गोष्ट खोटी वाटत नाही. पण याचें कारण काय असावें याचा कांही

उलगडा होत नाही. बर्व्यांचें यांत खरोखरी कितपत अंग असावें, असल्यास त्यांचा हेतु काय होता हें गूढ उलगडत नाही. ब्रिटिश सरकारचा रेसिडेंट आणि इतर पोलिटिकल खात्यांतले बडे अधिकारी यांना दखलगिरी असल्याशिवाय असले घोर प्रकार चालले असतील, हें शक्य वाटत नाही. पण त्यांचा तरी हेतु काय असावा? या सगळ्यांच्या मागे अत्यंत गुप्त असा आणखी कुणाचा तरी हात असेल काय? शिवाजीला वेडा ठरविण्यांत किंवा नष्ट करण्यांत कुणाचा तरी स्वार्थ असेल, त्यांचे हात कुणाच्या तरी मार्फतीने कुठे तरी पोचलेले असतील–काय खरें असेल, ईश्वरास माहीत!

जनतेच्या भावनांचें नेतृत्व करून त्यांच्यासाठी कष्ट सोसले म्हणजे जनतेचें प्रेम कसें उंचबळून येतें याचा अनुभव टिळक आगरकरांना या प्रकरणीं अंतःकरण हेलावून जाईल असा आला. तरुण देशभक्तांची ही जोडी ता. २६ आक्टोबर १८८२ रोजीं डोंगरी तुरुंगांतून सुटली तेव्हा मुंबईस हजारो लोकांनी त्यांचा सत्कार केला. पुण्यासहि तोच प्रकार घडला. ब्राह्मणेतर पुढारी या सत्कारांत विशेषेंकरून सामील होते. पुण्याच्या सत्कारसभेंत जोतिबा फुले यांनी गौरवपर भाषण केलें. स्वजातीय कारभाऱ्याच्या विरुद्ध मराठयांच्या राजाचा कैवार घेतल्यामुळे या तरुण पुढाऱ्यांना सोसावा लागलेला तुरुंगवास त्यांच्याविषयी बहुजनसमाजाच्या पुढाऱ्यांच्या मनांत प्रीति उत्पन्न करण्यास कारणीभूत झाला होता. हाच प्रीतीचा धागा कायम राहून अधिक बळकट होत गेला असता तर......!

## आगरकरांची संपादकीय कारकीर्द

सुरवातीपासून दोन्ही पत्रांची अंतर्गत व्यवस्था समाईक कुटुंबाच्या स्वरूपाची होती. शाळेच्या चालक मंडळीपैकी वाटेल त्याने वाटेल तेव्हा वाटेल त्या विषयावर दोहोंपैकी वाटेल त्या पत्रांत लिहावें. चिपळूणकर जिवंत होते तोंपर्यंत, म्हणजे चौदा महिने, नियमाने केसरीच्या दर अंकांत एक लेख लिहीत असत. त्यांचा लेख प्रथमस्थानीं प्रसिद्ध होत असे. नंतरचा लेख बहुतकरून आगरकरांचा असे. चिपळूणकरांचे लेख बहुधा वाङ्मय, कला व इतर सांस्कृतिक विषय यांवर असत. प्रचलित विषयांची चर्चा आगरकरांच्या लेखांत असे. आगरकरांची दृष्टि चौफेर वावरणारी

होती. पत्राचे जबाबदार संपादक म्हणून तेच होते. तेव्हा सर्व प्रकारच्या उपस्थित विषयांचा परामर्श त्यांनी घ्यावा हें क्रमप्राप्त होतें. अगदी तात्कालिक राजकीय वा इतर घडामोडींचा परामर्श 'पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना' या सदराखाली स्फुटें लिहून घेण्यांत येत असे.

आपल्या समाजांतील घातक व दुष्ट रूढींमुळे आपला समाज ह्या अवनत अवस्थेस येऊन पोचला आहे असें आगरकरांचें ठाम मत असल्यामुळे सामाजिक विषयांवरील लेख आगरकरांनी अत्यंत तळमळीने लिहावेत, हें अपेक्षितच होतें. तथापि एकंदर लेखांच्या संख्येच्या मानाने सामाजिक लेखांचें संख्याधिक्य होतें असें दिसत नाही. पहिल्या सहा वर्षांत, म्हणजे १८८६ पर्यंत, केसरीमध्ये जे लेख आले त्यांपैकी बहुतेक महत्त्वाचे लेख आगरकरांनी पुस्तकरूपाने दोन भागांत प्रसिद्ध केले. दोन्ही भाग मिळून एकंदर ९० लेखांमध्ये १३ लेख सामाजिक सुधारणेच्या विषयावर लिहिलेले दिसतात. त्यांत 'एकत्र राहणें चांगलें का ?', 'सासुरवास', 'मुलाचें लग्न करणें बापाचें कर्तव्य आहे काय ?'—अशा प्रकारचे कौटुम्बिक रूढींना अनुलक्षून लिहिलेले, 'मनुष्यजातीची पूर्णावस्था' यासारखा एखादा जातिभेदावर लिहिलेला असे कांही वगळले तर बाकीचे स्त्रीशिक्षण, स्त्रीदास्यविमोचन, बालविवाह, अशा स्त्रीविषयक प्रश्नांवर लिहिलेले दिसतात. कोणच्या विषयांनी आगरकरांचें मन या काळांत विशेष व्याप्त झालेलें होतें हें यावरून दिसून येतें.

पुढे आपल्या 'सुधारक' पत्रामध्ये लिहितांना 'हे भीषण बीभत्स अमंगल हिंदुधर्मा !' असे जळजळीत उद्गार अंतःकरणाच्या तळमळीनुसार आगरकरांच्या लेखणींतून निघत असत, तसेच या काळांत केसरींतून लिहितांना प्रसंगोपात्त निघाल्याखेरीज राहिले नाहीत. बालविवाहाचे वाभाडे काढण्याकरिता वर्ष १ अंक २३ मध्ये लिहिलेल्या 'बालविवाहापेक्षा सतीच बरी !' या नांवाच्या लेखांत त्यांनी आपल्या शास्त्रकारांवर उडविलेला कडाका—

"तांत्रिक नीतीचें संगोपन करण्यासाठी, जिचा वृत्तांत ऐकिला असतां सहृदय हृदयांच्या अंतःकरणाचें विदारण होणार अशा अनीतीचा

प्रघात घालणाऱ्या आप्पलपोट्या व दीर्घमत्सरी शास्त्रकारांस, आज आम्हांत वास करणारी भूतदया शुद्ध राक्षस म्हणविण्यास भाग पाडते."
'सुधारकां'तील लेखांत व्यक्त झालेली तीच तार्किक पद्धति, तोच आवेश, तोच निर्भीडपणा इथेहि आढळतो. मधून मधून विनोदाची झाक लेखांना रंगत आणतांना दिसते.

पण सहा वर्षांच्या मानाने सामाजिक विषयांवरील हे लेख फार थोडे आहेत. पुस्तकरूपाने प्रसिद्ध न झालेल्यांत कदाचित् आणखी कांही असतील, पण ते थोडेच असणार. यावरून असें दिसतें की सामाजिक सुधारणेसंबंधी आगरकरांचीं मतें अत्यंत तीव्र व केवळ तार्किक तऱ्हेचीं जरी होतीं तरी त्याच विषयाला वृत्तपत्रांत प्राधान्य द्यावें अशी त्यांची वृत्ति नव्हती. 'कवि, काव्य आणि काव्यरति' (केसरी, ६. ४६,४९) यांसारख्या वाङ्मयविवेचनात्मक विषयापासून तों 'अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन' (के. १. ४, ५, १६) यांसारख्या अर्थशास्त्रीय विषयापर्यंत सर्वत्र त्यांची बुद्धि संचार करीत असे. त्यांत विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही की वर जे १३ लेख सामाजिक सुधारणाविषयक म्हणून सांगितले त्यांपैकी एकहि पांचव्या किंवा सहाव्या वर्षांत, लिहिलेला नाही. सर्व लेख १, २, व ४ या वर्षांत म्हणजे १८८१, ८२, ८४ या सालांत लिहिलेले आहेत.

## कायद्याने समाजसुधारणा ?

तिसऱ्या वर्षांत म्हणजे १८८३ सालीं आगरकरांनी एकंदरीनेच फार कमी लेख लिहिलेले दिसतात. त्याचें कारण काय हें उमगत नाही. पण १८८४ च्या पुढे सामाजिक विषयांवर आगरकरांची लेखणी कां बंद झाली याचा थांग लागूं शकतो. अशी एक गोष्ट १८८४ सालीं घडली की जिच्यामुळे आगरकर आणि त्यांचे सहकारी यांच्यामधील सामाजिक विषयांसंबंधीची मतभिन्नता परिस्फुट झाली आणि एका महत्त्वाच्या मुद्द्याबाबत आगरकर एकीकडे व त्यांचे सगळे सहकारी दुसरीकडे अशी स्थिति झाल्यामुळे सामाजिक सुधारणेच्या विषयांवर लिहिणें त्यांना अडचणीचें होऊन बसलें.

बेहेरामजी मलबारी (१८४३-१९१२) ही हिंदी वृत्तपत्रसृष्टींत एक वैचित्र्यपूर्ण व्यक्ति होऊन गेली. पारशी असूनहि हिंदूंच्या सामाजिक

सुधारणेविषयी त्यांना विशेष आस्था होती. त्यांनी १८८४ मध्ये हिंदूंमधील बालविवाह आणि असंमत वैधव्य या दोन चाली सरकारने कायदा करून बंद कराव्या अशा अर्थाचें पत्रक काढून तें विलायतेंतील व हिंदुस्थानांतील वृत्तपत्रकार आणि वजनदार लोक यांच्याकडे पाठवून दिलें, तसेंच हिंदुस्थान सरकारकडेहि पाठवून दिलें. या पत्रकामुळे सर्वत्र एकच खळबळ उडून गेली. मलबारींची हाक विलायतेंत गेली असल्यामुळे सरकार खरोखरीच कायदा करतें की काय अशी लोकांना भीति पडली. सनातन्यांची फळी तर विरोधाला सज्ज होतीच, पण सुधारक मंडळींतहि कायदा करावा की न करावा या प्रश्नावर दोन तट पडले. रानडे मोडक प्रभृति कायद्याच्या बाजूला, तेलंग प्रभृति कायदा नको म्हणणाऱ्यांच्या बाजूला, अशी विभागणी झाली.

सामाजिक सुधारणेच्या बाबतींत कायदा अवश्य करावा या बाजूचे आगरकर ठाम होते. पण त्यांच्या सहकाऱ्यांपैकी कोणासच हें मान्य नसल्यामुळे आणि केसरीचे प्रकाशक म्हणून नांव आगरकरांचें असलें तरी त्याचें धोरण ही समाईक बाब असल्यामुळे आगरकरांना गप्प बसावें लागलें.

इथून मतप्रदर्शनाच्या बाबतींत आगरकरांच्या कुचंबणेला सुरवात झाली. तुम्ही स्वतःच्या सहीनें किंवा 'लि. आ. म.' (लिहून आलेला मजकूर) या सदराखाली लिहिण्यास हरकत नाही, असें त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितलें. पण स्वतः संपादक असतां अशा चोरवाटेनें प्रवेश करण्याचा सल्ला त्यांना कसा रुचावा ? तरी ता. १६-१२-१८८४ च्या अंकांत कायदा पक्षाचें मंडन करण्याकरिता त्यांनी स्वतःच्या सहीने एक लेख लिहिला; पण तो अपुराच राहिला. या लेखांत त्यांनी आपण व आपले मित्र यांच्यांतील मतभेदाचा पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे.—

"नांव घालून लेख छापण्यांत कांही मातब्बरी आहे असें आगरकरांना बिलकूल वाटत नाही. पण बालविवाहाच्या निषेधसाधनाविषयी त्यांचे आणि त्यांच्या मित्रांचे विचार जुळत नसल्याने त्यांना या मार्गाचें अवलंबन करावें लागत आहे....महत्त्वाच्या प्रश्नावर केसरी एडिटोरियल कॉलमखाली जे अभिप्राय यावयाचे ते अर्थात मला पसंत असून, निदान त्यांतील बहुतेकांस तरी पसंत

असले पाहिजेत, व शेकडा ९९$\frac{3}{4}$ बाबतींत असतात....पण या बाबतींत माझा बाकीच्यांशीं चार आण्यांचा विरोध आहे व तो आम्हां उभयतांसहि फार महत्त्वाचा वाटत आहे."

आगरकरांनी स्वतःच्या सहीने लिहिला असा लेख हा एकच. 'लि. आ. म.' सदराखाली १८८५ सालीं त्यांनी कांही तुरळक लेख लिहिले. पण एकंदरीने १८८४ च्या अखेरपासून त्यांचें सामाजिक मतप्रदर्शन बंद झालें. त्यांनी केसरींत संपादकीय नात्याने लिहिणें थांबविलें असें मात्र नाही. केसरींतील निवडक निबंधांच्या पुस्तकांत १८८५, ८६ मधील पुष्कळ लेख आहेत; त्यांपैकी बरेचसे-बहुतेक-आगरकरांचे असले पाहिजेत. सर्व प्रकारच्या विषयांवर योग्यतेचें लेखन आवडीने करणारा मंडळींमध्ये त्या वेळीं दुसरा कोणी नव्हता.

## शिक्षणसंस्था व वृत्तपत्रें यांची फारखत

या हेलकावे खाणाऱ्या परिस्थितींत व्यावहारिक बाबीमुळे आणखी भर पडली. सन १८८४ च्या आक्टोबरांत डे. ए. सोसायटी स्थापन झाली व पुढील सालच्या प्रारंभीं कॉलेज उभें राहिलें. सोसायटीचा व कॉलेजचा सरकारशीं, विद्यापीठाशीं आणि समाजांतील वजनदार लोकांशीं नेहमी संबंध येणार, त्यांच्या सद्भावनेवर पुष्कळ गोष्टी अवलंबून असणार. इकडे केसरिराज तर मतस्वातंत्र्याचें ब्रीद गाजवून वाटेल तेव्हा सरकार काय, वजनदार मंडळी काय, कोणावरहि आपल्या खरनखरांचा प्रहार करणार. शाळाच होती तेव्हा शाळेच्या चालकांच्या समाईक मालकीचीं पत्रें होतीं, हें ठीक होतें. पण आता त्याच मंडळीची बनलेली जी सोसायटी, तिच्या मालकीचीं पत्रें करणें वरील कारणास्तव इष्ट नव्हतें. आपट्यांनी तर टिळक आणि आगरकर तुरुंगांतून बाहेर पडल्याबरोबर लगेच 'मी अतःपर वर्तमानपत्रांच्या भानगडींत पडणार नाही' असें सांगितलें होतें. अर्थात् सोसायटीच्या बाहेर समाईक मालकी उभी करण्याचाहि प्रश्न नव्हता. तेव्हा छापखाना व वृत्तपत्रें यांचा आणि आजीव सभासदांचा संबंध पूर्णपणें तोडून टाकावा असा ठराव सोसायटींत मंजूर झाला. या प्रश्नाचा एकदाचा निकाल लावण्यासाठी १८८६ सालीं त्यांच्या हिशेबाचा आढावा करण्याचें

काम टिळकांकडे देण्यांत आलें. त्या आढाव्यांत छापखाना व वृत्तपत्रें यांच्या डोक्यावर कांही कर्ज आहे असें निष्पन्न झालें.

> "हें सर्व (कर्जासह छापखाना व वृत्तपत्रें) तुम्ही अंगावर घ्या म्हणून प्रथम आगरकरांना विचारलें होतें, पण छापखाना व वर्तमानपत्रें यांना देणें झालें आहे आणि संपादक म्हणून मिरविणें हें कांही माझ्या आयुष्याचें ध्येय नाही, हीं कारणें सांगून त्यांनी त्याला नकार दिला. या पत्रांच्या भानगडींत पडण्यापेक्षा तीं बंद करणें मी पतकरीन, असें ते म्हणाले."*

पुढे केळकर‡ हें सर्व आपल्या अंगावर घेण्यास कबूल झाले. त्याप्रमाणे आक्टोबर १८८६ मध्ये छापखाना व वृत्तपत्रें, त्यांच्यावरील देण्यासह केळकरांच्या रीतसर स्वाधीन करण्यांत आलीं. या एकवट कारखान्याचें व्यवस्थापकत्व हरि नारायण गोखले यांच्याकडे सोपवावें असें ठरलें. त्यांच्या मागणीवरून आगष्ट १८८७ मध्ये टिळकांनाहि दुसरा जोखीमदार सभासद म्हणून तिकडे जोडून देण्यांत आलें. परिणामतः टिळक, केळकर व गोखले छापखाना व वृत्तपत्रें यांचे या वेळेपासून संयुक्त मालक बनले.

या घालमेलींत केसरीची संपादकीय मजकुराच्या बाबतींत आबाळ चालली होती. केसरीमध्ये कायदेवाल्यांच्या विरुद्ध सणसणीत लेख १८८६ पासूनच यायला लागले होते. दादाजी विरुद्ध रखमाबाई या सुप्रसिद्ध खटल्यांत, अजाणतेपणीं जिचें लग्न झालें अशा बायकोला ती जाणती झाल्यावर तिच्या इच्छेविरुद्ध नवऱ्याकडे नांदायला जाण्यास न्यायकोर्ट भाग पाडूं शकेल की नाही, हा मुद्दा उपस्थित झाला होता. स्त्रीस्वातंत्र्याच्या मुद्दयावर कोर्टाला असा अधिकार नसावा असें सुधारक मंडळी प्रतिपादीत होती. जुन्या धर्मशास्त्राचा देखील आपल्या म्हणण्याला आधार आहे असें दाखविण्याचा प्रयत्न रा. ब. रानडे यांनी चालविला होता. केसरीला हा

---

* टिळकांचा राजीनामा The History of the Deccan Education Society, Pt. III p. 11.

‡ प्रा. वासुदेव बाळकृष्ण केळकर, इंग्रजीचे प्राध्यापक व 'त्राटिका' नाटकाचे कर्ते.

अव्यापारेषु व्यापार वाटून त्याने 'रा. ब. रानडे यांचें अपूर्व युक्तिचापल्य' या मथळ्याखाली लेख लिहून रानडयांची खरपूस हजेरी घेतली. (७ व १४ जून १८८७). आगरकरांची परिस्थिति यामुळे फारच चमत्कारिक झाली. नांवाला तरी अद्यापि केसरीचे जबाबदार संपादक ते होते; पण तिकडे तर प्रतिपाद्य विषय आणि वैयक्तिक रोख दोन्ही दृष्टींनी त्यांना सर्वथैव नापसंत असे लेख केसरींत धडाकून येत होते; आणि ज्यांच्यावर हा भडिमार चालला होता त्या रानडे प्रभृति मंडळींच्या मदतीची तर डे. ए. सोसायटीच्या संवर्धनासाठी (त्यांच्या दृष्टीने) अत्यंत आवश्यकता होती. भांडारकरांनी सोसायटीच्या कौन्सिलमध्ये या टीकेबद्दल जाब विचारला तेव्हा "आगरकर उठले आणि म्हणाले की निदान मी आणि माझे मित्र गोखले तरी त्या दोषापासून मुक्त आहोंत." या सर्व गोष्टींमुळे आगरकरांचें मन उबगून गेलें असल्यास त्यांत कांही नवल नाही.

अखेर या कुचंबणेचा शेवट ता. २५ आक्टोबर १८८७ च्या केसरींत प्रमुख जागीं प्रसिद्ध झालेल्या पुढील मजकुराने झाला. "आजपासून रा. बाळ गंगाधर टिळक हे केसरी पत्राचे प्रकाशक झाल्यामुळे प्रकाशत्वाची जबाबदारी त्यांच्याच शिरावर आहे. रा. गोपाळ गणेश आगरकर यांच्यावर ती जबाबदारी राहिली नाही." अशा रीतीने टिळक केसरीचे वरील तारखेपासून प्रकाशक ( आणि अर्थात संपादक ) झाले, ते पुढे १८९७ सालीं त्यांना शिक्षा होईपर्यंत सतत तसे होते. मालकी याच सुमारास भागीने त्यांच्याकडे आली होती, त्याचा खुलासा वर आलाच आहे.

जबाबदारीची स्पष्टता याप्रमाणे झाली खरी. पण केसरीची आबाळ होण्याचें थांबलें असें मात्र नाही. ही आबाळ खरें म्हटलें असतां १८९१ च्या अखेरपर्यंत कमजास्त प्रमाणांत चालूच होती. पण १८८७-८८-८९ या सालांत ती फारच झाली. लि. आ. म. या सदराखाली कुणी तरी लिहून पाठविलेला मजकूर, प्रसिद्ध पुरुषांनी दिलेल्या व्याख्यानांचे सारांश, देशी व परदेशी घडामोडींचे वृत्तान्त, इत्यादि इकडून तिकडून आणलेल्या गोष्टींनी या काळांतले बहुतेक अंक भरून काढलेले दिसतात. लोकमतावर प्रभाव पाडण्याकरिता विशिष्ट विषयावर जोमदार रीतीने लिहिलेले अग्रलेख हें जें

केसरीचें वैशिष्ट्य तें बहुतांशीं लुप्त झालें होतें. या काळांत ज्या कामांत किंवा ज्या वादांत टिळक पडले त्याकरिता जरूर ते लेख त्यांनी केसरींत लिहिले, अधिक कांही करण्यास त्यांना फुरसत किंवा मनःस्वास्थ्य लाभलें नाही असें दिसतें. सन १८८७ आणि ८८ या दोन सालांत सोसायटींतील भांडणें जोरांत होतीं. एकीकडे संस्थेकरितां पडेल तें काम करायचें आणि दुसरीकडे भांडणें भांडायचीं असा दुहेरी खाक्या चालू होता. त्यांत इतर गोष्टींना वेळ कसा मिळणार! १८८९ च्या सुरवातीस सोसायटी सोडायची म्हणून त्यांनी रजा घेतली. या वर्षी एप्रिलनंतर क्राफर्ड प्रकरणांतील मामले-दारांचा पक्ष घेऊन त्यांनी एक लहानशी चळवळ केली. जूनमध्ये ते कॉलेज-मध्ये परत येऊन काम करूं लागले, तरी बाहेर मामलेदारांकरिता कांही काळ त्यांनी धडपड चालविलीच होती. त्या संबंधाने कांही लेख त्यांना केसरींत लिहावे लागले. या चळवळीमध्ये टिळकांची सत्यप्रियता आणि न्यायाकरिता झगडण्याची बृत्ति दृष्टोत्पत्तीस आली. त्यानंतर १८९० च्या उत्तरार्धांत संमतिवयाच्या बिलासंबंधाने मोठाच वाद उद्भवला, त्याच्या रणधुमाळींत त्यांना केसरी विश्वासू हस्तकाप्रमाणे उपयोगी पडला. १८९० च्या अखेरीस सोसायटी सोडल्यानंतर 'नवी विटी नवें राज्य' असा सर्व प्रकार झाला. सन १८९१ हें साल आपल्या निर्वाहासाठी कांही व्यावहारिक उद्योग काढून त्याचा जम बसविण्यांत गेलें असावें असा तर्क होतो. या सालांत संमतिवयाचा वाद शमला व पंडिता रमाबाईच्या शारदासदनाचें प्रकरण पुढे आलें. केसरीच्या जीवनक्रमाच्या दृष्टीने फार महत्त्वाची अशी गोष्ट या सालांत घडून आली, ती म्हणजे संयुक्त मालकीचा शेवट होऊन केसरी मराठा हीं दोन्हीं पत्रें टिळकांच्या संपूर्ण मालकीचीं झालीं ही होय. ही गोष्ट कांही अंशीं योगायोगाने घडून आली असली तरी मुख्यतया टिळकांनी जो संप्रदाय जी विचारसरणी अंगीकारिली होती तिचा तो अवश्यंभावी परिणाम होता हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे.

## टिळक पूर्ण मालक

आर्यभूषण छापखाना आणि केसरी मराठा हीं वर्तमानपत्रें १८८७ च्या आक्टोबरपासून टिळक, प्रा. वासुदेव बाळकृष्ण केळकर (१८६०–

१८९५) आणि हरि नारायण गोखले या तिघांच्या संयुक्त मालकीचीं झालीं होतीं. त्या वेळीं या संयुक्त उद्योगावर सुमारें ९००० रु. चें कर्ज होतें. केसरीचा खप चांगला असल्यामुळे वर्गणी व जाहिराती मिळून त्यांत बराच फायदा उरत असे, पण त्यांतला बराच भाग ‘मराठया’ला जगविण्याकरिता खर्च होत असे. ‘मराठा’ पत्र सदैव आंतबट्ट्यांत होतें; आर्थिक दृष्टया ‘केसरी’च्या गळयांतलें लोढणें यापेक्षा अधिक चांगली स्थिति त्याला कधी प्राप्त झाली नाही. तेव्हा व्यवहारदृष्टया पाहतां त्याचें संपादकीय व आर्थिक धोरण केसरीच्या संपादकाच्या नियमनाखाली असावें ही गोष्ट सयुक्तिक होती. पण मराठयाचे संपादक प्रा. केळकर हे डे. ए. सोसायटींतले टिळकांचे सहकारी व त्यांचे मित्र होते. त्यामुळे सर्व गोष्टी सुरळीत चालल्या होत्या तोंपर्यंत त्यांच्यापाशीं चकारशब्द सुद्धा टिळकांनी काढला नाही. शिवाय या चार पांच वर्षांत टिळकांना फुरसत नव्हती आणि वृत्तपत्रचालन हेंच आपलें प्रमुख कार्य ही जाणीव उत्पन्न झाली नव्हती. शाळा कॉलेज, शिक्षणप्रसार हेंच आपलें जीवितकार्य हीच भावना हृदयांत खोल मूळ धरून बसलेली होती. ही भावना १८९० च्या अखेरीस जेव्हा समूळ उपटली गेली तेव्हा देशसेवेच्या ज्या निर्धारापायीं आपण आपलें सर्वस्व वाहिलें तो पुढे चालविण्याला साधन कोणचें याचा शोध त्यांचें मन घेऊं लागलें. आपण आपल्या निराळ्या शाळा, कॉलेज वगैरे शिक्षणसंस्था काढाव्या, असा विचार करणें शक्य व सहज सुचण्याजोगें होतें. पण टिळकांच्या मुत्सद्देगिरीची खूण ही की त्यांनी तसें मुळीच केलें नाही. तसें केलें असतें तर त्यांचे पाय पुन्हा खोडयांत अडकल्यासारखे झाले असते आणि अनिष्ट स्पर्धेचें वातावरण बराच काळ त्यांना जाचत राहिलें असतें. त्यांनी ‘केसरी’लाच आपल्या देशसेवाकार्याचें प्रमुख साधन बनविण्याचें ठरविलें.

कायद्यानुसार नोंदलेले केसरीचे प्रकाशक ते होतेच, एक तृतीयांश मालकहि होते. मालकीची अशी अर्धवट परिस्थिति त्याच्यावर लक्ष केंद्रीभूत करण्यास आणि त्याच्या द्वारा धडाडीचा मतप्रचार करण्यास सोयीची नव्हती. पण ही गुंतागुंत उकलण्यास योगायोगाने एक संधि चालून आली. पंडिता रमाबाई नांवाच्या ब्राह्मण जातींतून खिस्ती झालेल्या स्त्रीने

अमेरिकेंत जाऊन तेथील जनतेकडून मोठी मदत मिळवून हिंदु विधवा स्त्रियांच्या शिक्षणासाठी 'शारदासदन' नामक संस्था काढली. या संस्थेंत धर्मान्तराचा प्रयत्न केला जाणार नाही, तर शुद्ध व्यावहारिक निधर्मी शिक्षण दिलें जाईल, असें आश्वासन प्रारंभीं देण्यांत आल्यामुळे रा. ब. रानडे, डॉ. भांडारकर प्रभृति मोठमोठे सुधारक पक्षाचे पुढारी या संस्थेच्या सल्लागार मंडळावर राहण्यास तयार झाले होते. टिळकांची दृष्टि या संबंधांत सावधगिरीची होती. बाईची इथली बतावणी पोकळ आहे हें अमेरिकेंत ती काय बोलली व तिने काय लिहिलें याची माहिती मुद्दयापत्त्यानिशीं प्रसिद्ध करून त्यांनी सिद्ध केलें आणि "शारदासदन ही संस्था ख्रिस्ती समजून ज्यांस आपल्या मुली तेथे पाठवावयाच्या असतील त्यांनी तो मार्ग खुशाल स्वीकारावा" असा जनतेला इशारा दिला. या गोष्टी १८९१ सालच्या जून ते सप्टेंबर या महिन्यांत घडल्या. पुढे यासंबंधाने पुष्कळ वाद, खुलासे व पत्रव्यवहार होऊन त्यांतून 'शारदासदना'चें ख्रिस्तीधर्मप्रचाराचें छुपें धोरण अधिकच स्पष्ट होत गेलें आणि रानडे भांडारकर प्रभृति मंडळींना सल्लागार मंडळाचा राजीनामा द्यावा लागला.

या प्रकरणाची हकीकत इथे सांगितली याचें कारण असें की प्रकरणांत टिळक आणि केळकर यांचे मतभेद उघड झाले, त्यामुळे केसरी मराठा यांच्या परिस्थितींतली अंतर्गत विसंगति स्पष्ट झाली. टिळकांना लिहिण्याचा मुळांत कंटाळा. मराठयाचे संपादक केळकर होते. ते मराठयाचें लेखन तर संभाळीतच, पण केसरीचे कालम भरण्याची योजनाहि पुष्कळ वेळां तेच करीत असत. पंडिता रमाबाईच्या पहिल्या आविर्भावाला इतरांप्रमाणे भुलून त्यांनी मराठयांत व केसरींत देखील तिच्या शारदासदनाला एकंदरीने अनुकूल असें लिहिण्याचें धोरण ठेवलें होतें. टिळकांनी हें प्रकरण हातीं घेऊन शारदासदनाच्या खऱ्या स्वरूपाचा झणझणीत भाषेंत परिस्फोट केला तरी मराठयाचा पूर्वीचा सूर फारसा बदलला नाही ही, विसंगति सर्वांसच बोचूं लागली. तेव्हा अगोदरपासून फारखतीविषयी चाललेली वाटाघाट घसाला लागली आणि टिळकांनी रु. ७००० कर्जासह केसरी व मराठा हीं दोन्ही पत्रें पूर्णपणें आपल्या मालकीचीं करून घेतलीं (सप्टेंबर १८९१). इकडून तिकडे झोके खाणारा केसरी एका खंबीर खांबाच्या आश्रयाने स्थिर झाला.

या घटनेचें महत्त्व लक्षांत येण्यासाठी थोडी तात्त्विक मीमांसा करणें इष्ट होईल. शाळा व वर्तमानपत्रें हीं एकाच विचारसरणीचीं वाहक आणि एकाच उद्दिष्टाचीं साधनें म्हणून तरुण देशभक्तांच्या गटानें निर्माण केलीं होतीं, हें आपण पूर्वीं पाहिलें आहे. ज्ञानाचा प्रसार आणि देशाभिमानाचें उद्दीपन हीं दोन्ही ध्येयें सरमिसळ रीतीनें दोन्ही कार्यांच्या बुडाशीं होतीं. शाळेंतूनहि स्वातंत्र्यवादी देशाभिमान जागृत करावा आणि केसरींतूनहि विविध ज्ञानाचा प्रसार करावा! सुरवातीस या संबंधाच्या कल्पना ढोबळ व अस्पष्ट होत्या. पुढे शाळेचा विकास केवळ शिक्षणाच्या ध्येयानुसार विशिष्ट सरकारमान्य पद्धतीनें होत गेला. स्वत्वाभिमान, देशाभिमान, स्वतंत्र बाणा यांच्या प्रसाराला तिथे अवसर उरला नाही. स्वातंत्र्यवादी पंथाच्या या ध्येयांबरोबरच स्वातंत्र्यवादी देशभक्त टिळक या संस्थांमधून बाहेर फेकला गेला.

ही स्थिति शाळा व कॉलेज या शिक्षणसंस्थांची झाली. केसरीची अशी स्थिति होणें सुलभ नव्हतें. स्वातंत्र्याकांक्षी लोकजागृतीचें चिपळूणकरप्रणीत उद्दिष्ट बाजूला सारून रानडेप्रणीत सुधारणावादाचें प्रतिपादन करणारा कोणीहि लेखक या तरुण देशभक्तांच्या गटांत नव्हता; उलट स्वातंत्र्याकांक्षी विचार-जागृतीचें उद्दिष्ट कायम राखून तें विकसित करणारा असाहि कोणी नव्हता. या उद्दिष्टाची जाणीव टिळकांना होती, पण त्यांचें मुख्य लक्ष इतरांप्रमाणे शाळेंत व कॉलेजांत गुंतलेलें होतें. आगरकरांच्या विचारसरणीची सुरवातीची बैठक जरी स्वातंत्र्याकांक्षी देशाभिमानी पंथाची होती तरी ती पुढे कायम टिकली नाही. सामाजिक प्रश्न पुढे आले तसे या तरुण देशभक्तांच्या गटांत जवळ जवळ व्यक्तीगणिक तट पडले. परिणाम असा झाला की मतप्रतिपादनाचें मुख्य साधन जो केसरी तो अधांतरी अवस्थेंत लोंबकळत राहिला. अखेर सोसायटींतून बाहेर पडल्यानंतर केसरी हेंच एक भवितव्य-तेनें आपल्यासाठी नियोजित केलेलें देशसेवेचें साधन आहे ही खूणगाठ टिळकांना पटली, तेव्हा स्वातंत्र्याकांक्षी विचारजागृति हें जें चिपळूणकर-प्रणीत देशाभिमानी पंथाचें मूळ उद्दिष्ट मध्यंतरीं बाजूला पडलें होतें, त्याची त्यांनी प्राणप्रतिष्ठा केली आणि केसरी राजाला त्याचें वाहन बनवून अकुतो-भय संचारासाठी मोकळें सोडलें.

---

# ७. मित्रांचे शत्रू बनले

## खाजगी द्वेष?

टिळकांनी सोसायटी सोडली, केसरी मराठा वृत्तपत्रें स्वतःच्या मालकीचीं करून घेतलीं आणि जनतेचा स्वातंत्र्यवादी नेता म्हणून ते तात्काळ पुढे सरसावले. आगरकर सोसायटींत राहिले, सोसायटींत राहिलेल्या बाकीच्या सर्व सभासदांना संभाळून घेऊन तिच्या संस्थांची जिवापाड खपून त्यांनी जोपासना केली आणि 'सुधारक' पत्र काढून सुधारणेच्या विशुद्ध तत्त्वांचा आपल्या सामर्थ्यवान वाणीने प्रचार केला. दोघांचे मार्ग याप्रमाणे भिन्न झाले असल्यामुळे यापुढे दोघांमध्ये विरोध उत्पन्न होण्याचें कांही कारण नव्हतें. सामाजिक सुधारणेचीं तत्त्वें आणि मार्ग यांच्या संबंधाने दोघांमध्ये सुरवातीपासूनच कांही मतभेद होता आणि दोघांचे विचार जसजसे परिपक्व होत गेले तसतशी मतभेदाची दरी रुंदावत गेली हें खरें. तथापि मतभेदांचें स्वरूप तात्त्विक पातळीवर ठेवून, परस्परांविषयी सद्भावना राखून, निदान असद्भावना व्यक्त करण्याचा मोह आवरून, दोघांनाहि आपल्या सार्वजनिक आयुष्याचा मार्ग चोखाळतां आला असता. पण दोघांचेंहि लिहिणें, बोलणें व करणें या मर्यादेंत राहिलें नाही. सुधारक निघेपर्यंत, म्हणजे सन १८८८ च्या आक्टोबरपर्यंत, हे दोघे सोसायटीच्या चार भिंतींच्या आंत काय भांडले असतील ते असतील. पण दोघांचीं दोन पत्रें झाल्यावर हीं भांडणें चवाठ्यावर आलीं. वैयक्तिक उखाळ्यापाखाळ्या, असद्हेतूंचा आरोप, कुत्सित टवाळी या अप्रशस्त साधनांचा उपयोग दोन्ही बाजूंनी इतका करण्यांत आला की महाराष्ट्राचें सार्वजनिक वातावरण दूषित होऊन गेलें. हा विषाद मराठी जनतेच्या सार्वजनिक जीवनांत भिनला. मतभेदाचें पर्यवसान व्यक्तिद्वेषांत करावयाचें आणि त्याचें प्रकटीकरण कुत्सित निंदेच्या मार्गानें करावयाचें ही खोडच मराठी जनतेला जडली.

दोघांमधील उद्वेगकारक कलहाचा तपशील इथे देत बसल्यास अनिष्ट गोष्टी उगाळीत बसणारा 'पापभाक्' प्रस्तुत लेखकाला व्हावें लागेल. दोघांचें जीवनकार्य आणि व्यक्तिमत्व वर्णन करणें हें प्रस्तुत पुस्तकाचें प्रमुख उद्दिष्ट असल्यामुळे तेवढयापुरती मीमांसा करून पुढे सरकणें इष्ट होईल.

टिळक आगरकरांचीं मनें एकमेकांविषयी कडवट कां बनलीं याचीं कारणें आपणास ओळखतां येतात. राजीनामाविषयक निवेदनांतील टिळकांच्या उद्‌गारांवरून असें दिसतें की आगरकरांच्या मनांत आपल्याविषयी मत्सर उत्पन्न झाला आहे, अशी टिळकांची दृढ समजूत झाली होती. सामाजिक सुधारणेच्या आगरकरांना अतिशय जिव्हाळयाच्या वाटणाऱ्या विषयावर केसरीमध्ये मनसोक्त लिहिण्यास आगरकरांना जी बंदी झाली, तिला टिळकांचा आग्रह विशेषेंकरून कारणीभूत होता. शाळाकॉलेजांच्या व्यवस्थेसंबंधांतहि आपल्या कर्तबगारीमुळे आपला प्रभाव विशेष पडतो त्याचें आगरकरांना वैषम्य वाटतें अशी टिळकांची समजूत झाली होती. दोन्ही कार्यक्षेत्रांत याप्रमाणे झालेली "आगरकरांची निराशा हळूहळू दीर्घद्वेषामध्ये परिणत झाली,"* अशी आगरकरांच्या मनोवृत्तीची मीमांसा टिळकांनी केली. याच्या उलट टिळक हे स्वतःच्या त्यागीपणाचा बडिवार माजवून सोसायटींत नव्याने येणाऱ्या सहकाऱ्यांना कमी लेखतात अशी आगरकरांची समजूत झाली असावी असें दिसतें. टिळकांना 'लोकाग्रणी' होण्याची हाव सुटल्यामुळे ते आपलीं सुधारणेविषयीचीं खरीं मतें बाजूला ठेवून मूढ, रूढिप्रिय जनतेच्या घातक समजुतींना कवटाळूं लागले आहेत आणि या त्यांच्या स्वार्थी आग्रहामुळे केसरींत सामाजिक सुधारणेवर लिहिणें आपणास बंद करावें लागलें, असाहि त्यांचा ग्रह झाला होता. त्यामुळे टिळकांवर प्रत्यक्ष वा आडून प्रहार करण्याची संधि दवडूं नये, अशी त्यांची वृत्ति झाली असावीसें दिसतें. ढोंगी लोकाग्रणींच्या आणि धर्माभिमानी पुढाऱ्यांच्या संबंधाने त्यांनी 'सुधारका'मध्ये वारंवार पुढील

---

*"His disappointment gradually grew into rancour" टिळकांचें निवेदन : History of the D. E. Society, Pt. III, p. 12.

नमुन्याचे जे उद्‌गार काढले आहेत त्यांचा रोख टिळकांवर असे हें कोणासहि समजण्याजोगें आहे--

"जे कोणत्याहि मिषाने किंवा रूपाने लोकांपुढे लोकाग्रणी म्हणून मिरवूं लागले असतील त्यांनी लोकांची मर्जी संपादण्यासाठी अथवा त्यांजकडून आपली पाठ थोपटून घेण्यासाठी, किंवा परोपकाराचें ढोंग करून स्वहित साधण्यासाठी त्यांच्या दोषांचें किंवा दुराग्रहांचें संवरण किंवा मंडन करणें अत्यंत लज्जास्पद होय. असे लोकाग्रणी त्यांस सुमार्ग न दाखवितां केव्हा एखाद्या खाडयांत नेऊन घालतील हें सांगवत नाही."*

सार्वजनिक आयुष्यामध्ये टिळक आगरकरांसारखा अनुभव पुष्कळांना येतो. आपण ज्याचें भलें करावें तो आपणावर उलटतो, आपले मित्र आपल्याशीं प्रतारणा करूं लागतात, आपल्या विरुद्ध कारवाया करतात, अशा वेळीं वैयक्तिक रागद्वेष सार्वजनिक रीत्या व्यक्त करावा, असा आपणास मोह पडतो. पण तो आवरणें हें सर्व दृष्टींनी इष्ट ठरतें. वैयक्तिक खरकटीं सार्वजनिक पाणवठयावर आणून धूत बसल्यास समाजाचा विचार-प्रवाह नासून जातो. तात्त्विक मतभेद असल्यास ते तात्त्विक पातळीवरच राखून प्रच्छन्न वा प्रकट वैयक्तिक टीका न करतां केवळ मतांपुरतीच टीका करण्याचा संयम राखला पाहिजे, हें तारतम्य टिळक-आगरकरांना राहिलें नाही, ही खेदाची गोष्ट कबूल केली पाहिजे.

## स्वभावभेद आणि संस्कारभेद

टिळक आणि आगरकर यांच्यामध्ये स्वभावभेद किंवा प्रकृतिभेद बराच होता. टिळक खंबीर कणखर मनाचे आणि खोल भावनांचे पुरुष होते. आगरकरांचें अंतःकरण हळवें व भावनाप्रधान होतें. टिळक नितान्त निश्चयी, स्वतःच्या भूमिकेवरून रेसभर न ढळणारे असे होते; ते जितके आग्रही तितकेच युक्तिबाज होते. आगरकर तत्त्वनिष्ठ तितकेच, परंतु मन खुलें ठेवून प्रत्येक गोष्टीचा विचार करणारे होते. टिळक तापट व रुक्ष, तर आगरकरांना विनोद आणि वात्सल्य यांचें निसर्गदत्त लेणें लाभलेलें होतें.

* 'सुधारक काढण्याचा हेतु' निबंधसंग्रह, भाग १, पृ. ७.

टिळक तत्त्वज्ञ आणि तत्त्वप्रसारक होते, तर आगरकर विचारनिर्माते आणि विचारप्रवर्तक होते. टिळकांच्या मनाची बैठक पांडित्याची होती तर आगरकरांच्या मनाची बैठक विचारकाची होती.

प्रकृतिभेदाप्रमाणे दोघांच्या परस्परविरोधी व्यक्तिमत्त्वाला संस्कार-भेदहि कारणीभूत झाला होता. टिळक आपल्या आईबापांचे नवसायासाने झालेले एकुलते एक पुत्र होते. खाऊन पिऊन बऱ्या स्थितींत असलेल्या धर्मनिष्ठ, शुद्धाचरणी मातापित्यांचें छत्र त्यांना लाभलेलें असल्यामुळे जुन्या पद्धतीच्या उच्चवर्णीय हिंदु कुटुंबाच्या शुद्ध, नीतिमान, स्वाभिमानी व परंपराभिमानी राहणीचे संस्कार त्यांच्या मनावर झालेले होते. त्यामुळे समाजांत सुधारणा करायची ती आपल्या संस्कृतीला अनुसरून, परंपरागत भावना उध्वस्त न करितां आणि समाजाची घडी न विसकटतां जेवढी शक्य असेल तेवढीच करावी असें त्यांचें मत बनलेलें होतें. स्वधर्माभिमान त्यांच्या रोमरोमीं भिनलेला होता. आगरकरांचे संस्कार फार निराळ्या तऱ्हेचे होते. लहानपणापासून बापाने अंगाबाहेर टाकून दिलेलें हें पोरकें पोर इकडे तिकडे वणवण हिंडून स्वतःच्या भगीरथ परिश्रमांच्या जोरावर उजागरास आलें होतें. मामांचा आश्रय होता, तरी तो कांही अंशीं व्यवहारी बुद्धीचा. प्रत्यक्ष चुलत्याने तर शिक्षणाच्या आशेने गेलेल्या या मुलाला झिडकारलें होतें. अशा रीतीने उच्चवर्णीय हिंदु कुटुंबाच्या संस्कृ-तींतला वाईट अनुदार अंशच त्यांच्या वाट्याला आला होता. तेव्हा आपल्या परंपरागत संस्कृतीबद्दल, गृहस्थितीबद्दल आणि धर्माबद्दल त्यांना अभिमान कसा वाटावा? निराधार परिस्थितीमुळे लहानपणापासूनच स्वतंत्र अनिर्बंध विचार करण्यास त्यांचें मन शिकलें होतें.

अत्यंत भिन्न प्रकृतीच्या व भिन्न संस्कारांच्या या दोन मनस्वी पुरुषांचे विचार आणि दृष्टिकोन अत्यंत भिन्न, किंबहुना परस्परविरोधी होणें अपरिहार्य होतें. त्यांच्यांत तात्त्विक कलह झाला यांत गैर कांहीच नव्हतें. त्यांत व्यक्तिद्वेष मिसळला गेला एवढी गोष्ट वाईट झाली.

## टिळकांची मूलभूत भूमिका

असा आरोप टिळकांच्यावर केला जातो, की खरोखरी त्यांचीं मतें सुधारणेस अनुकूल असूनहि लोकांचें पुढारीपण मिळविण्याच्या मोहाला बळी पडून त्यांनी आपलीं खरीं मतें बाजूला ठेवलीं आणि पुराणमताभिमानाचें ढोंग केलें. आताच सांगितल्याप्रमाणे आगरकरांनी तर हा आरोप वारंवार केलाच आहे, पण त्यांच्यामागून येणाऱ्या त्यांच्या स्तुतिपाठकांनी व टिळक-विरोधकांनी त्यांची री ओढून विझत्या निखाऱ्यावर फुंकर घालण्याचें काम केलें आहे. आगरकरांच्या श्राद्धतिथीनिमित्त केसरींत टिळकांनी अग्रलेख लिहिला त्यांत या प्रकारास अनुलक्षून त्यांनी लिहिलें,

> "गोपाळरावजींच्या विरुद्ध जो पक्ष उपस्थित झाला तो 'केवळ सवंग लोकप्रियतेच्या लालचीने झाला' अगर 'सुधारक सत्यासाठी तर केसरी व्यापारासाठी' इत्यादि अजागळ विधानें गोपाळरावजींच्या मृत्यूनंतर आज एकवीस वर्षांनी करणें म्हणजे लेखकाने आपल्यां बुद्धीचें मांद्य प्रकट करण्यासारखें आहे."*

सवंग लोकप्रियतेच्या मागे लागल्याच्या या आरोपांत वास्तविक कांही जीव नाही. केसरी हातीं घेतल्यापासून म्हणजे इ. स. १८९० पासून तों अखेरपर्यंत जेव्हा जेव्हा प्रसंग पडला तेव्हा तेव्हा धार्मिक व सामाजिक सुधारणेसंबंधाने टिळकांनी जें जें लिहिलें त्यांत तत्त्वदृष्टया एकवाक्यता असल्याचें दिसून येईल. आणि एका विशिष्ट विषयासंबंधाने पंचवीसतीस वर्षें एका व्यक्तीने केलेलें एकाच स्वरूपाचें प्रतिपादन प्रारंभापासून शेवटपर्यंत ढोंगीपणाचें होतें असें म्हणणें कोणासहि सयुक्तिक वाटणार नाही. धार्मिक व सामाजिक बाबतींत आगरकरांइतकाच टिळकांनी खोल विचार केला होता. दोघांच्या मतांत भिन्नता, किंबहुना विरोध होता म्हणून त्यांपैकी एकजण ढोंगी किंवा बेअक्कल होता असें म्हणणें म्हणजे सिंधु व ब्रह्मपुत्रा या एकाच ठिकाणीं उगम पावणाऱ्या नद्या परस्पर विरुद्ध दिशांनी वाहत जातात म्हणून त्यांपैकी एकीचें पाणी विषारी आहे असें म्हणण्यासारखें आहे.

---

* 'आगरकरांची श्राद्धतिथि' केसरी, ४ जुलै १९१६.

नगर वाचन मंदिर ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 20809 वि: ......
क्रमांक ......832...... नों: दि: ......

## ७. मित्रांचे शत्रू बनले

टिळकांच्या धार्मिक व सामाजिक मतांविषयी विचार करतांना ही मूलभूत गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे की टिळक हे चिपळूणकरप्रणीत स्वातंत्र्यवादी विचारसंप्रदायाचे अध्वर्यु होते. स्वातंत्र्याकांक्षेवर आणि तिला धरून चालणाऱ्या तेजस्वी राजकीय चळवळीवर त्यांना भर द्यायचा होता. सगळींच कामें एका व्यक्तीने केलीं पाहिजेत असें नाही. श्रमविभाग झाला पाहिजे. आम्ही राजकीय चळवळ हातीं घेतली आहे. ज्यांना सामाजिक सुधारणा करायची असेल त्यांनी त्या कामीं सर्वस्व अर्पण करून ती करण्याचें काम हातीं घ्यावें, असे विचार कित्येक व्यक्तींपाशीं व्यक्त केल्याचें त्यांच्या आठवणींच्या खंडांत नमूद आहेत. चिंतामणराव वैद्यांच्या अवलोन्नति लेखमालेमधील विषयावर अभिप्राय देतांना ते म्हणतात.—

> "परंतु ज्यांस त्यांच्याप्रमाणे (चिं. वि. वैद्यांप्रमाणे) सुधारणा होणें इष्ट वाटत आहे त्यांनी एखादी मंडळी स्थापन करून मिशनरी लोकांप्रमाणे या कामीं लेखन, वाचन व उदाहरण या तीन्ही रीतींनी यथाशक्ति कां मदत करूं नये हें आम्हांस समजत नाही."*

तात्पर्य तुम्हांला सामाजिक सुधारणाच करायची असेल तर मिशनरी लोकांप्रमाणे तनमनधनाने करा. नाही तर आमच्या सुधारणा पंथांतील परस्पर सुधारकांची स्थिति—"घरांत विचारल्याखेरीज एकहि पाऊल पुढे पडत नाही, आणि हिमतीच्या व धैर्याच्या नांवाने आवळयाएवढें पूज्य !"†

सुधारणा ज्यांना घडवून आणायचीच असेल त्यांच्याकरिता हा उपदेश झाला. पण परतंत्र देशाचें परम कर्तव्य स्वातंत्र्य संपादनासाठी अखंड प्रयत्न करणें हेंच होय, त्यासाठी स्वाभिमान, स्वराज्यनिष्ठा जागृत करण्याकडेच सर्वांनी लक्ष पुरविलें पाहिजे, असें मात्र त्यांचें ठाम मत होतें. किंबहुना तेजस्वी स्वाभिमानी समाज स्वतःला जरूर त्या सुधारणा राजकीय प्रगतीच्या अनुषंगाने स्वयंस्फूर्तीने बिनहरकत करून घेत असतो, असेंहि त्यांचें म्हणणें होतें. इ. स. १८९६ सालीं 'सामाजिक सुधारणेचे मार्ग' या नांवाचे दोन मननीय लेख टिळकांनी लिहिले. त्यांत ते म्हणतात—

---

* 'सामाजिक सुधारणा कशाने होईल?' केसरी, १८ नोवेंबर १८९०

† सदर.

"स्वतंत्रतेचा किंवा राष्ट्रीयत्वाचा अभिमान म्हणून जो कांही जोम आहे तो जोंपर्यंत जागृत असतो तोंपर्यंत समाजरचना कशीहि असली तरी त्यांतील दोष राष्ट्राच्या उन्नतीस अथवा भरभराटीस आड येत नाहीत. पण एकदा कां तो जोम नाहीसा झाला, म्हणजे तेच दोष रावणाच्या धनुष्याप्रमाणे छातीवर बसून जगांत त्या लोकांची उपहास्यता होण्यास कारण होतात !"*

स्वराज्यनिष्ठा आणि सुधारणानिष्ठा यांतील तरतमभाव १९१९ सालीं त्यांनी याहीपेक्षा ओजस्वी भाषेत वर्णिला होता.

"स्वाभिमान, हुरूप, स्वराज्यनिष्ठा हाच राष्ट्राचा खरा जीव होय; आणि हा जिवंतपणा जिथे वसत आहे त्या ठिकाणीं सुईच्या मागे जसा दोरा तद्वत् सामाजिक सुधारणाहि मागोमाग येत असतात अशी इतिहास साक्ष देत आहे. म्हणून राष्ट्रीय पक्ष राजकीय चळवळीस जितकें महत्त्व देतो तितकें सामाजिक चळवळीस देत नाही. राष्ट्राची सामाजिक प्रगति होऊं नये असें त्याचें म्हणणें नाही; पण ती राजकीय प्रगतीच्या व स्वाभिमानाच्या अनुषंगानेच झाली पाहिजे. राजकीय परवशता फार तर मुळमुळीत विरोधाने स्वीकारून जिवंत सुधारणा होणेंच शक्य नाही असें राष्ट्रीय पक्षाचें तत्त्व आहे."†

वरील दोन उताऱ्यांवरून प्रस्तुत विषयासंबंधीच्या १८९६ सालच्या व १९१९ सालच्या टिळकांच्या विचारांत किती साम्य होतें हें लक्षांत येतें. आधी राजकीय की आधी सामाजिक हा जो आगरकरांच्या काळीं वादाचा मोठा विषय झाला होता, त्यासंबंधी टिळकांची भूमिका काय होती यावर वरील उद्गारांच्या योगाने स्पष्ट प्रकाश पडतो. वरच्यापैकी दुसऱ्या उताऱ्यांतील टिळकांची वाणी कशी भविष्यसूचक ठरली हेंहि मार्मिक वाचकांच्या सहज लक्षांत येणारें आहे. गांधीजींच्या तेजस्वी स्वराज्यनिष्ठ चळवळीच्या अनुषंगाने खरोखरीच स्त्रियांची समता, जातीयतेचा निरास, अस्पृश्यता-

---

* केसरी, २८ जानेवारी १८९६

† लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग ३, पृ. ४३६.

दा. म. ८९८४

निवारण इत्यादि कितीतरी सामाजिक सुधारणा समाजांत सुईमागे दोरा या न्यायाने रूढ होऊन गेल्या.

## आगरकरांचे सुधारणाविषयक सिद्धान्त

परतंत्र देशांत पारतंत्र्यनाशाच्या प्रयत्नांनाच प्राथम्य आणि प्राधान्य मिळालें पाहिजे या टिळकांच्या ठाम मताविरुद्ध आगरकरांचें तितकेंच ठाम मत होतें. जिच्या योगाने राजसत्ता आपल्या हातीं येईल अशा तऱ्हेची चळवळ आपण केली म्हणजे आपलें कर्तव्य झालें अशा भ्रमांत न राहतां ज्या उपायांनी राजसत्ता प्राप्त झाली असतां तिचें संरक्षण व तिचा सदुपयोग करतां येईल, असें शिक्षण लोकांना अगोदर दिलें पाहिजे, असें आगरकरांचें म्हणणें होतें. या मुद्द्यावर 'सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल, सांप्रतकाल' आणि 'अशी वेळ कधी आली नव्हती' असे लेख सुधारकांत लिहून त्यांनी हें मत विस्तारपूर्वक प्रतिपादन केलें. ते म्हणतात—

> "पुष्कळांचा असा समज आहे की सुधारणेचा आरंभ होणें तो राजविषयक सुधारणेपासून झाला पाहिजे...अशा प्रकारच्या आक्षेपकांस आम्ही असा प्रश्न करतों की इंग्रज लोकांनी तुम्हांस जिंकलें त्या वेळेस...राजकीय सत्ता तुमच्या हातीं असून, सामाजिक व धार्मिक प्रकरणांत पूर्ण ऐकमत्य होतें. असें असून परशत्रूस तुम्ही हार कां गेला?...व पंचवीस चाळीस वर्षांत तुम्ही इतके वीर्यहीन कसे झालांत? आम्हांस असें वाटतें की, पेशवाईचा जो मोड झाला तो आमची सामाजिक व धार्मिक स्थिति जशी पाहिजे होती तशी नव्हती म्हणून झाला. आणि येथून पुढेहि आम्हांस सुदशा प्राप्त होण्यास व ती कायम राहण्यास, आम्ही आपली गृहस्थिति व धर्माचार सुधारण्याचा प्रथम प्रयत्न केला पाहिजे."*

आगरकरांची विचारसरणी अशी कां बनली याचें कारण आपण शोधूं लागलों म्हणजे त्यांच्यामधील व टिळकांमधील मतभेदाचा मूलगामी मुद्दा कोणता होता याचा आपणास पत्ता लागतो. इंग्रजी शिक्षणाच्या द्वारा पाश्चात्त्य

---

* निबंधसंग्रह, भाग १, पान १३३–३४.

सुधारणेचीं जीं तत्त्वें इकडे आलीं आहेत तीं सर्व बहुतेक स्वीकरणीय आहेत आणि त्यांचा स्वीकार केल्यानेच आपल्या समाजास सुख व सामर्थ्य यांची प्राप्ति होईल असा आगरकरांचा ठाम सिद्धान्त होता. 'सुधारक काढण्याचा हेतु' या सुरवातीच्या लेखांत ते म्हणतात—

> "मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडतां, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा, व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीने अंगीकार करीत गेलों, तरच आमचा निभाव लागणार आहे. या कल्पना आपल्या राज्यकर्त्यांकडून येत आहेत म्हणून त्या आम्ही स्वीकाराव्या असें आमचें म्हणणें नाही... त्या कल्पनांत मनुष्यसुधारणेच्या अत्यावश्यक तत्त्वांचा समावेश झाला आहे. म्हणून ज्या लोकांस लयास जावयाचें नसेल त्यांनी त्यांचें अवलंबन केलेंच पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाही."*

याच विचारसरणीचा थोडक्यांत सूत्ररूप उल्लेख 'आमचें काय होणार ?' या लेखमालिकेंत एके ठिकाणीं त्यांनी केला आहे.

> "मनुष्यसुधारणेचीं अत्यंत परिणत तत्त्वें आज युरोपांत दृष्टीस पडत आहेत व ज्या देशास आपली सुधारणा करून घ्यायची असेल त्यास देशकालानुरोधाने त्याच तत्त्वांचा कमीअधिक अंगीकार केला पाहिजे."†

> "युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखें काय आहे तें पुनः पुनः दाखवावें यास्तव हें सुधारक पत्र काढलें आहे"

अशी स्पष्ट प्रतिज्ञाच त्यांनी 'सुधारक काढण्याचा हेतु' या लेखांत केली आहे.

सुधारणेचीं बहुतेक तत्त्वें युरोपीय लोकांपासून आम्हांस कां घेतलीं पाहिजेत, याचें कारण आगरकरांच्या मतें उघडच हें आहे की आमच्या समाजरचनेंत तीं तत्त्वें नाहीत व तीं आपण होऊन निर्माण होतील असा संभव नाही; तसें बुद्धीचें चैतन्य आमच्यांत उरलेलें नाही. युरोपीय देशांनी आपल्या बुद्धीस मोकळें सोडून स्वतंत्र विचारांच्या भराऱ्या मारल्या,

---

* निबंधसंग्रह, भाग १, पान ५, ६.

† निबंधसंग्रह, भाग १ पृ. ४५.

नाना तऱ्हेचे शोध लावले आणि त्यामुळे ते आज सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर जाऊन बसले आहेत. याच्या उलट गेलीं दोन अडीच हजार वर्षें आम्ही अगदी अचेतन, क्रियाहीन होऊन बसलों आहों.

"दोन किंवा अडीच हजार वर्षांपूर्वी ज्या प्रकारच्या राजविचारांनी, धर्मविचारांनी व सामाजिक विचारांनी आम्ही निगडित झालों होतों व त्या वेळीं ज्या आचारांचे आम्ही गुलाम होतों तेच विचार व आचार अद्यापि आम्हांस बहुधा कह्यांत ठेवीत नाहीत काय ?...... आमच्या शोचनीय राष्ट्रस्थितींत गेल्या दोन हजार वर्षांत म्हणण्यासारखा फेरफार झाला आहे, असें बहुधा कोणाहि विचारी पुरुषास म्हणतां येणार नाही."*

अर्थात आमची समाजस्थिति शिलाकाष्ठाप्रमाणे अगदी निर्जीव बनून गेली आहे.

"आमची गृहपद्धति, आमची राज्यपद्धति, आमचीं शास्त्रें, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या चाली, आमच्या रीती —सारांश इंग्रजी होईपर्यंत आमचें सारें व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबिड शृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघाताने कठीण झालेल्या लाकडासारखें किंवा हाडकासारखें शेंकडो वर्षें होऊन राहिलें, असें म्हणण्यास हरकत नाही."†

## टिळकांची धारणा

आपली समाजस्थिति आणि तिच्यांत करावयाची सुधारणा यांच्यासंबंधी आगरकरांचे सिद्धान्त याप्रमाणे होते. या सिद्धांतांचें निरनिराळ्या रीतींनी घोळून घोळून विवरण करण्याचा त्यांना कधी कंटाळा येत नसे. टिळकांची धारणा या विषयासंबंधांत फार निराळी होती. आमचा धर्म, आमची समाजस्थिति, गृहस्थिति सर्व कांही शिलाकाष्ठाप्रमाणे झालें आहे,

* निबंधसंग्रह, भाग १, पृ. २३५.

† 'सुधारक काढण्याचा हेतु', निबंधसंग्रह, भाग १, पान ५.

अडीच हजार वर्षांपासून आम्ही अगदी जडमूढ, चेतनाहीन बनलों आहों, असें त्यांना बिलकुल वाटत नव्हतें. अर्थात युरोपीय राष्ट्रें—त्यांतल्या त्यांत इंग्रज—सर्वैथैव आमचे गुरु आणि आम्ही बहुतेक सर्व बाबतींत त्यांचें अनुकरण करायचें, ही भूमिका त्यांना मान्य नव्हती. पाश्चात्य राष्ट्रांपासून कांही घेण्याजोगें नाही असें नाही; पण आमच्याजवळहि चांगलें असें राखण्याजोगें पुष्कळ आहे. दोहोंच्या परस्पर संघटनांत, राजकीय प्रगतीच्या अनुषंगानें, नव्या काळास अनुरूप अशा योग्य त्या सुधारणा होत जातील, अशी त्यांची विचारसरणी होती. देशकालवर्तमानानुसार योग्य त्या सुधारणा प्रयत्नपूर्वक कुणाला करावयाच्या असल्या तरी त्याला त्यांचा विरोध नव्हता. परंतु आपली परंपरागत संस्कृति आणि आपला धर्म यांच्या चौकटींत बसेल अशाच रीतीने सुधारणांची आखणी व अंमलबजावणी करा; आणि जें कांही करायचें मनांत आणाल त्याच्यासाठी ‘जिवापाड श्रम करून स्वार्थाकडे लक्ष न देतां’ खटपट करा असें त्यांचें सांगणें होतें. ‘सामाजिक सुधारणेचे मार्ग’ या मननीय लेखामधून घेतलेल्या पुढील उताऱ्यांत टिळकांचा सामाजिक सुधारणेविषयीचा दृष्टिकोन चांगल्या रीतीने व्यक्त झाला आहे—

> “ ‘जुन्यास सोडून जातां कामा नये’ असे नुसते शब्द वापरल्याने हा कार्यभाग होत नाही. तो होण्यास जुन्या संस्थांबद्दल खरोखरच योग्य अभिमान वाटावयास पाहिजे. ‘योग्य’ असें म्हणण्याचें कारण एवढेंच की, हल्लीच्या काळांत सर्वांशीं अगर सर्वतोपरी जुन्या संस्था चालणें दुर्घट आहे, हें आम्हांसहि मान्य आहे. पाश्चात्त्य राष्ट्राची व आमची कर्मधर्मसंयोगामुळे जी सांगड पडली आहे तिचा सांखळीच्या दोन्ही टुव्यांवर परिणाम झाल्याखेरीज राहावयाचा नाही...हिंदुसमाजाच्या स्वरूपांत अगर रचनेंत फेरफार व्हावयास नको अगर तो व्हावयाचा नाही, असें आम्ही म्हणत नाही. प्राच्य व पाश्चात्त्य, आध्यात्मिक व आधिभौतिक अथवा वर्णव्यवस्थांकित व यदृच्छाचारप्रवर्तक अशा नव्या जुन्या सुधारणांचा संयोग झाल्याने जुन्या समाजरचनेच्या तत्त्वांत कांही तरी फेरफार झाला पाहिजे व होईल, हें म्हणणें कोणासहि मान्य करावें लागेल

त्याबद्दल वाद नाही. वाद काय तो एवढाच की, वर ज्या दोन तऱ्हेच्या सुधारणा सांगितल्या त्यांपैकी एकीचा लोप करून दुसरी स्थापन करावयाची अथवा जुन्या संस्थेंतच योग्य असे कांही फेरफार करून तिचें पुनरुज्जीवन करावयाचें. "*

भारतीय आणि युरोपीय दोन्ही समाजरचनेच्या तत्त्वांचा संयोग होऊन योग्य ती सुधारणा आपल्याकडे व्हावी, हा टिळकांचा दृष्टिकोन युरोपीय सुधारणेच्या तत्त्वांचें आपण बहुतांशीं अनुसरण करावें या दृष्टिकोनाहून फार निराळा होता. कारण युरोपीय सुधारणा आपल्या गुरुस्थानीं असण्यास लायक आहे असें टिळकांना वाटत नव्हतें. तिच्यांतहि अनेक दोष आहेत—

"'गाव आहे तेंथे म्हारवडा आहेच' या म्हणीप्रमाणे युरोपांतील राष्ट्रांतहि समाजसुधारणा होण्यास अद्याप पुष्कळ जागा आहे. चढाओढीच्या तत्त्वावर रचलेल्या समाजांत संपत्तीची सारखी वाटणी न होतां कांही अतिशय श्रीमंत व कांही अतिशय दरिद्री अशी स्थिति प्राप्त होते; आणि विवाहसंस्कारासहि कराराचें स्वरूप आल्यामुळे विधवांच्या ऐवजी कुमारिकांची संख्या वाढून गृहस्थाश्रमाच्या सुखास पुष्कळ स्त्रिया अंतरतात."†

## कांही वादस्तंभ

सामाजिक सुधारणेसंबंधी टिळक आणि आगरकर यांच्यामध्ये असलेला मतभेद, किंवा मतविरोध, या प्रकारचा होता. हा मूलगामी होता, सैद्धांतिक होता. तपशिलाचे मतभेद या मूलगामी मतभेदाच्याच शाखा होत्या असें म्हटलें तरी चालेल. 'राजकीय आधी की सामाजिक आधी' या प्रश्नासंबंधी दोघांचीं मतें आपण वर पाहिलींच आहेत. तसाच दुसरा मोठा वादस्तंभ 'कायद्याने समाजसुधारणा करावी की नाही?' हा होता. 'संमति-

---

* 'सामाजिक सुधारणेचे मार्ग', लो० टिळकांचे केसरींतील लेख, भाग ४, पृ. १८९.

† सदर पृ. १८८.

वयाचें बिल ' म्हणून जें महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासांत प्रख्यात झालें त्या बिलाच्या वेळीं (सप्टेंबर १८९० ते मार्च १८९१) हा वाद खूप घुसळून निघाला. वास्तविक हा वाद मलबारी शेटजींनी १८८४ सालीं बालविवाहासंबंधी पत्रक काढून सरकारला त्या बाबतींत कायदा करावा अशी सूचना केली होती, त्या वेळीं प्रथम उद्भवला व चर्चिला गेला होता. पण टिळक आगरकरांच्या संबंधाच्या दृष्टीने तेव्हा त्याला इतकें महत्त्व नव्हतें. हे दोघे त्या वेळीं खासगी रीतीने काय भांडले असतील ते असतील. पण वर्तमानपत्ररूपी रणांगण गाजविण्याची दोघांनाहि त्या वेळीं सोय नव्हती. संमतिवयाच्या बिलाच्या वेळीं दोघांचेहि रथ सज्ज होते. एकमेकांना शरवर्षावाने घायाळ करण्यास या वाग्वीरांनी मागेपुढे पाहिलें नाही. वादाच्या धुमश्चक्रींत केसरीने सुधारकावर "सार्वजनिक विषयावर वादविवाद करण्याच्या मिषाने खासगी द्वेषाचें उट्टें काढण्याची अमूल्य संधि" साधीत असल्याचा आरोप केला. तेव्हा आगरकरांचें मन भावनेने उचंबळून जाऊन त्यांनी 'महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र' हा कोणाहि वाचकाचें अंतःकरण हेलावून टाकील असा, उदात्त भावाने परिप्लुत लेख लिहिला.

सामाजिक सुधारणेच्या बाबतींत होतां होई तों कायदा करूं नये असें टिळकांचें मत होतें. विशेषतः परकी सरकारकडून तर असल्या गोष्टींत कायदा मागूंच नये. आमच्या कौटुम्बिक व सामाजिक आचारांचा आमच्या धर्मांत अंतर्भाव होतो, आणि धर्मसंबंधांत तटस्थता राखण्याचें सरकारने अभिवचन दिलें आहे, तेव्हा असल्या बाबतींत कायदा करण्याच्या भानगडींत सरकारने पडूं नये, हाहि युक्तिवाद कायदाविरोधी पक्षाच्या बाजूने होत होता. तथापि केव्हाहि कोणच्याहि स्थितींत सामाजिक संबंधाने कायदा करूंच नये असें टिळकांचें मत नव्हतें. एखाद्या विषयाच्या बाबतींत भरपूर लोकमत अनुकूल झालेलें असेल व धर्मवचनांच्या बाबतींत कांही तडजोड निघण्याजोगी असेल तर कायदा करण्यास हरकत नाही असें म्हणण्यास त्यांची तयारी होती.

आगरकरांच्या संबंधाने प्रश्नच नव्हता. 'हिंदुस्थानच्या पंचवीस कोटी क्षुद्र जंतू'चें लोकमत कसलें आजमावणार? गोष्ट हितावह आहे असें

ठरल्यानंतर ती लोक जर आपण होऊन अमलांत आणीत नसतील तर तिच्याकरिता बिनदिक्कत कायदा करावा. सामाजिक सुधारणेचीं जीं कलमें आम्हांला अमलांत आणायचीं आहेत तीं राज्यकर्ते जे इंग्रज लोक त्यांच्या समाजांत रूढ असल्यामुळे त्यांची अनुकूलता स्वाभाविकच असणार हा मोठा फायदा आहे. आमची सध्याची परतंत्र अवस्था आणि इंग्रजांसारख्या सुधारलेल्या राष्ट्राचें आमच्यावरील आधिपत्य ही सामाजिक सुधारणा घडवून आणण्यास मोठी पर्वणी आहे, अशा प्रकारचे विचार आगरकर मोठया उल्लासाने मांडीत असत.

## लोकहितवादीचा अवतार

एकेकाळींच्या आपल्या प्रियमित्राचें अशा तऱ्हेचें लिहिणें पाहून स्वातंत्र्याभिमानी टिळकांना मनांतून चिरड येत असेल. टिळक पुराणमताभिमान्यांच्या गोटांत गेले असें वाटून आगरकरांचें मन उद्वेगाने व्याप्त होऊन जात असेल. केवळ सामानिक सुधारणेच्या संबंधांतच दोघे एकमेकांना दंश करीत असें नाही. हिंदुमुसलमानांच्या दंग्याचें प्रकरण निघो, म्युनिसिपालिटीच्या व्यवस्थेसंबंधी चर्चा निघो, एकमेकांवर हल्ला करण्याचे जेवढे प्रसंग साधतील तेवढे साधण्याकडे दोघांचा कल दिसून येऊं लागला.

आपल्या समाजाविषयी तुच्छतेने लिहिण्यास आगरकरांनी कसली बाकी ठेवली नाही. "भेकड, प्रतिष्ठाखोर हिंदु लोकांनो !···धिक्कार असो तुम्हांला, तुमच्या धर्माला आणि तुमच्या हक्काला !!!" असे चेव आल्यासारखे उद्गार त्यांनी अनेक ठिकाणीं काढले आहेत; गर्भाधान, अंत्येष्टि यांसारख्या संस्कारांचें विकृत, अतिरेकी, विद्रूप वर्णन करून त्यांजबद्दल किळस उत्पन्न केली आहे आणि स्वसमाजावर सर्व प्रकारच्या दुर्गुणांचा आरोप करून त्याची खरडपट्टी काढली आहे. असे लेख लिहीत असतांना लोकहितवादींनी आगरकरांच्या अंगांत संचार केला असावा असा भास होतो. आगरकरांच्या लिखाणाला शास्त्रीयतेची बैठक होती; त्यांची झेप मोठी होती आणि शैली अनेक वाङ्मयगुणांनी नटलेली होती. बाकी स्वसमाजाविषयी बेमुर्वतखोरपणा व तुच्छता यांच्या बाबतींत हा लोकहितवादींचाच अवतार होता.

# ८. भारतीय बुद्धिवादाचा जनक

" मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन या सार्वत्रिक भावी धर्माची ज्यांनी दीक्षा घेतली असेल त्यांनी कोणास न भितां, आपल्या मनास जें शुद्ध, प्रशस्त, कल्याणप्रद वाटत असेल तें दुसऱ्यास सांगावें, आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें, हेंच त्यांस उचित आहे."

—निबंधसंग्रह, भाग १, पृ. १७७–७८.

## आगरकरांच्या सामाजिक विचारांचें मूळ

आगरकर सर्वत्र सुधारक म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या पत्राचें नांव सुधारक ठेवलें. तथापि सुधारकपणा हें त्यांचें वैशिष्टय नव्हे. त्यांच्या पूर्वी सुधारक होते. महाराष्ट्रांत दोन पिढया सुधारणा दुमदुमत होती. तिच्याबद्दल इतकें चर्वितचर्वण झालें होतें की 'सुधारक' पत्र निघण्याच्या पूर्वी कित्येक वर्षे तो एक हेटाळणीचा विषय होऊन बसला होता.

बुद्धिवाद हें खरें आगरकरांचें वैशिष्टय. आगरकरांच्या पूर्वी महाराष्ट्रांत 'लोकहितवादी' हा एक कांहीसा बुद्धिवादी पुरुष होऊन गेला. पण तो जाणीवपूर्वक अंगीकारिलेला शुद्ध बुद्धिवाद नव्हता. त्यांचे उद्गार हे उत्स्फूर्त विचारांचे फवारे होते; त्याला शास्त्रीयतेची बैठक नव्हती. व्यक्तीपुढे, समाजापुढे व राष्ट्रापुढे येणाऱ्या सर्व प्रश्नांचा विशुद्ध बुद्धिवादाच्या आधारें विचार करणारा केवळ महाराष्ट्रांतच नव्हे, तर आमच्या माहितीप्रमाणे अखिल भारतांत, पहिला विचारक किंवा तत्त्वज्ञ आगरकर हा होय. त्याने दिलेल्या बुद्धिवादाच्या या देणगीचें नीट निरीक्षण करणें अवश्य आहे.

बुद्धि हा शब्द प्रस्तुत संदर्भात reason या इंग्रजी शब्दाला प्रतिशब्द म्हणून योजिलेला दिसतो. त्यांतल्या धातूपासून बनलेल्या rationalism या शब्दाचा अर्थ व्यक्त करण्यासाठी ' बुद्धिवाद ' हा शब्द वापरण्याचा मराठींत प्रघात आहे. पण आगरकरांच्या बुद्धिवादाचा Rationalism म्हणून युरोपांत अठराव्या शतकांत तत्त्वज्ञानाचा जो एक संप्रदाय उदयास आला, लाइब्नित्झ, कांट वगैरे तत्त्वज्ञान्यांनी ज्याची मांडणी केली, त्याच्याशीं कांही संबंध नाही हें लक्षांत ठेवलें पाहिजे. केवळ बुद्धीच्या किंवा तर्काच्या साहाय्याने सृष्टितत्त्वाचें किंवा धर्मतत्त्वाचें आपणास ज्ञान होऊं शकतें त्याला बाह्य वस्तूंच्या अवलोकनाची किंवा बायबलसारख्या ग्रंथाच्या प्रामाण्याची जरूरी नाही, अशा तऱ्हेची या Rationalism ची अथवा केवल-बुद्धिवादाची विचारसरणी आहे. तिच्याशीं आपणास कर्तव्य नाही. आगरकरांच्या लिखाणांत व्यक्त झालेल्या विचारांचें मूळ निराळें आहे. तें विख्यात फ्रेंच तत्त्वज्ञ ऑगस्ट कोम्ट (१७९८-१८५७) याच्या प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञानामध्ये ( Positive Philosophy ) सापडेल. कोम्टने मानवजातीच्या स्थितिगतीसंबंधी विचार करून ' समाजशास्त्र ' (Sociology) नांवाच्या स्वतंत्र ज्ञानशाखेची आवश्यकता प्रतिपादन केली. प्रत्यक्ष किंवा अनुभवगम्य घटनांची आधिभौतिक ( metaphysical ) कारणमीमांसा करीत न बसतां त्यांची परस्पर तुलना व वर्गीकरण करून त्यांच्या स्थितिगतीसंबंधाचे नियम निर्धारित करणें हीच खरी शास्त्रीय विचारपद्धति होय, असें तत्त्व याने मांडलें. याला प्रत्यक्षवाद किंवा तथ्यवाद ( positivism ) असें म्हणतात. या विचारपद्धतीचा उपयोग करून मनुष्यसमाजाच्या स्थितिगतीसंबंधी वर्तविलेले नियम व अंदाज यांचें शास्त्र कल्पिण्यांत आलें; तें समाजशास्त्र होय. कोम्टची विचारपद्धति आणि त्याचें तत्त्वज्ञान, स्वतःच्या विचारसरणीचे त्याच्यावर संस्कार करून, हरबर्ट स्पेन्सर आणि जॉन स्टुअर्ट मिल यांनी इंग्रजींत आणलें. या दोहोंच्या ग्रंथांचे दृढ संस्कार आगरकरांच्या मनावर झाले होते. प्रत्यक्ष कोम्टचे ग्रंथ आगरकरांनी किती अभ्यासिले होते हें समजण्यास सध्या तरी साधन नाही. या तिघांचा उल्लेख आगरकरांनी सुधारकांत प्रारंभीं ' आमचें काय होणार ? ' म्हणून जी लेखमालिका

लिहिली तिच्यांत केला आहे. आगरकरांच्या लिखाणामध्ये कोणकोणत्या तत्त्वज्ञांचे व ग्रंथकारांचे संस्कार कितपत दिसून येतात तें पाहणें, हा एक संशोधन करण्याजोगा विषय आहे.

वरील विवेचनावरून हें लक्षांत येईल की आगरकर हे कोम्ट प्रभृतींच्या प्रत्यक्षवादी विचारपद्धतीस अनुसरणारे होते. प्रत्यक्ष किंवा सिद्ध गोष्टींच्या बाहेर लवमात्र न जातां त्यांच्या आधारें अनुमान करणें किंवा नियम बांधणें हें या पद्धतीचें सारसर्वस्व होय.

आगरकरांच्या विचारपद्धतीचा उगम पाहण्याच्या दृष्टीने वरील विवेचन महत्त्वाचें असलें तरी त्याने आपण स्वतःस बांधून घेण्याचें कारण नाही. आगरकरांची विचारपद्धति जशी त्यांच्या लिखाणांत प्रतिबिंबित झालेली आढळते तशी पाहणें हें आपलें कर्तव्य होय. ती कोम्ट प्रभृतींच्या प्रत्यक्षवादाशीं जितपत जुळेल तितपत जुळेल. आगरकर हे स्वयंप्रज्ञ विचारक (thinker) होते ही जाणीव ठेवून आपण त्यांच्या विचारपद्धतीचें निरीक्षण करूं. म्हणूनच त्यांच्या विचारपद्धतीला प्रत्यक्षवाद (positivism) हें नांव द्यावें की बुद्धिवाद (rationalism) हें नांव द्यावें याच्या सूक्ष्म चिकित्सेंत न शिरतां 'बुद्धिवाद' या साधारणपणे रुळलेल्या शब्दाची योजना केली आहे.

## आगरकरी बुद्धिवादाचीं लक्षणें

बुद्धिवाद या शब्दाचा सर्वसामान्यपणे जो अर्थ करण्यांत येतो तोच आगरकरांच्या बाबतींत लागू पडतो. योग्य अयोग्य, चांगलें वाईट, याचा निर्णय करण्यासाठी बुद्धि हेंच एक स्वतःचें विश्वसनीय असें साधन मनुष्याला उपलब्ध आहे. तिचा निर्णय स्वतःप्रमाण मानला पाहिजे. तेव्हा आप्तवाक्य किंवा शाब्दप्रमाण म्हणून ज्याला म्हणण्यांत येतें त्याची तमा आगरकरांचा बुद्धिवाद बाळगीत नाही. वेदांत अमुक आहे, स्मृति अमुक सांगतात, अमुक गोष्ट शास्त्रविरुद्ध आहे, इत्यादि ग्रंथ प्रामाण्य दर्शविणारे युक्तिवाद आगरकरांच्या मतीं फोल होत.

" एखाद्या दुसऱ्या मनूची आणि पराशराची कथा काय ?.. शेंकडो मनूंचे व सहस्रावधि पाराशरांचे आधार दाखविलेत, तरी...

> आमच्या मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक समजुतींस लागलेला वणवा... विझण्याचा मुळीच संभव नाही."*

अशा तऱ्हेचे उद्गार आगरकर प्रसंगवशात् काढतात हें सुप्रसिद्ध आहे.

संपूर्ण विचारस्वातंत्र्य हें आगरकरांच्या बुद्धिवादाचें दुसरें लक्षण होय.

> "विचाराच्या संबंधाने कोणी कोणाची मुरवत ठेवण्याची जरूरी नाही; वाटेल त्याने वाटेल त्या विषयावर वाटेल तसा विचार करावा, हें मत अलीकडील सर्व विचारी लोकांस मान्य झालें आहे."†

विचार बोलून दाखविण्यास कदाचित् कांही अडचणी येऊं शकतील; त्याप्रमाणे आचरण करण्यास त्याच्यापेक्षाहि जास्त अडचणी असतील. तेव्हा उच्चार व आचार यांचें संपूर्ण स्वातंत्र्य उपभोगणें सर्वांसच जमेल असें नाही.

> "परंतु मनाच्या कपाटाचीं दारें खुलीं टाकून वाटेल त्या विचारास बाहेर पडूं देण्यास व पाहिजे त्या विचारास आंत शिरूं देण्यास ज्याची छाती होत नाही तो मनुष्य कुचक्या कसपटापेक्षाहि नादान होय."‡

धार्मिक समजुती किंवा लोकरूढि यांची बिलकूल परवा न करणें हा आगरकरांच्या विचारस्वातंत्र्याचा प्रमुख भाग होता. लोकांनी पवित्र मानलेले प्रेतसंस्कार किंवा त्यांना प्रिय असलेल्या गर्भाधान वगैरे विधिसंबंधीच्या चालीरीती यांजवर आगरकरांनी बेगुमानपणे हल्ला चढविला आहे. जुन्या पद्धतीच्या लोकांचा दांभिकपणा, तर्काला न जुळणाऱ्या सोवळेंओवळें, शिवाशीव वगैरे संबंधाच्या चालीरीती यांवर संधि सापडेल तेव्हा कोरडे ओढणें यासारखी आवडती गोष्ट त्यांना दुसरी कोणती नव्हती.

गंमत अशी की विचारस्वातंत्र्याच्या या तत्त्वाचा फायदा विरुद्ध पक्षाला घेऊं देण्यास ते तयार नव्हते. हातीं सत्ता नसल्यामुळे पुराणमताभिमानी लोकांचीं तोंडें ते बंद करूं शकत नव्हते. पण अशा लोकांच्या आरडाओरडीकडे लक्ष न देतां समाजसुधारणेचे कायदे सरकारने खुशाल

---

* निबंधसंग्रह, भाग १, पृ. १४६–४७.

† 'गुलामांचें राष्ट्र' निबंधसंग्रह, भाग १, पृ. २००.

‡ सदर, पृ. १८६.

करावे असें त्यांनी आवेशाने प्रतिपादन केलें आहे. पाश्चात्त्य सुधारणेच्या तत्त्वांचा प्रकाश मनावर पडलेला असूनहि पुराणमताभिमानी लोकांच्या गोटांत शिरलेले जे टिळकांसारखे लोक ते जर "सरकारविरुद्ध असमंजस लोकांचीं मनें क्षोभविण्यास प्रवृत्त होतील, तर असल्या सुशिक्षितांची सरकारने एक क्षणभर तरी मुर्वत कां ठेवावी, हें आम्हांस समजत नाही !" असाहि त्यांचा युक्तिवाद आहे. हा युक्तिवाद उलटीकडून पाहिला तर, आपल्या मतांच्या विरुद्ध जे असतील ते एकतर मूर्ख, हेकड व असमंजस पुराणमताभिमानी, किंवा सुधारणेचें महत्त्व कळलें असूनहि जुन्या लोकांना साथ देणारे दांभिक असेच असणार, म्हणून त्यांची खुशाल मुसकटदाबी करावी—असा त्याचा अर्थ होऊं पाहातो. आजकालच्या कल्पनांच्या दृष्टीने पाहिलें तर आगरकरांचा हा विचार लोकशाहीविरोधी वाटेल. खुद्द आगरकरांना याची जाणीव नव्हती असें नाही. पण लोकमतानुसारित्वाचा हा नियम कुठे, तर जिथे पाश्चात्त्य ज्ञानरवीच्या किरणांनी बहुसंख्य लोकांचीं मनें प्रकाशित होऊन तीं समंजस व सुधारणानुकूल बनलीं आहेत, तिथे. हिंदुस्थानांतल्या जडमूढ अज्ञानी अशा जनतेच्या संबंधांत लोकमतानुसारित्वाचा नियम लावणें म्हणजे यावच्चन्द्रदिवाकरौ सुधारणेचा मार्ग बंद करण्याप्रमाणे होईल, असें त्यांचें म्हणणें होतें.

निर्भयता हें आगरकरांच्या बुद्धिवादाचें तिसरें लक्षण होय. लोकमताचा बागुलबोवा किंवा कुटुंबांतील मंडळींचा धाक यांपैकी कशाचीहि परवा न करतां आपल्या मनाला मोकाट सोडा, असें त्यांनी अत्यंत कळकळीचें आवाहन केलें. पायांतला जोडा किंवा डोक्यावरचे केस यांसारख्या विषयांपासून तों अत्यंत पूज्य मानलेल्या धार्मिक संस्कारांपर्यंत सर्व गोष्टींवर स्वतःचे अनिर्बंध विचार व्यक्त करून विचारस्वातंत्र्याचा प्रभावशाली आदर्श त्यांनी लोकांपुढे ठेवला. मानसिक दास्यावर निकराने हल्ले चढवून लोकांचीं मनें मोकळीं करण्याचा त्यांनी प्राणपणाने प्रयत्न केला, ही एकच गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे व हिच्यांतच आगरकरांचें अलौकिकत्व साठविलेलें आहे.

आगरकरप्रणीत बुद्धिवादाचें चौथें लक्षण ऐहिकता हें होय. आमचें सर्व आयुष्य पारलौकिक कल्पनांनी जखडलेलें असतें. देवधर्म, पापपुण्य

इत्यादि आपणच आपल्या मनाने निर्मिलेल्या कल्पनांचीं भुतें आपणांस भेडसावीत असतात. त्यांच्या भीतीने निरर्थक किंवा त्रासदायक कृत्यें करण्यास आपण प्रवृत्त होत असतों. धर्माधर्मांच्या पारलौकिक कल्पनांमुळे त्या काळीं आमच्या आचारांत जी प्रचंड विचारशून्यता भरून राहिलेली होती तिचें स्वरूप आगरकरांनी आपल्या विदारक शैलीने ठायीं ठायीं उघड करून दाखविलें आहे. मोठमोठया विद्वानांपासून क्षुद्र अडाण्यापर्यंत सर्व लोक केवळ अंधश्रद्धेने आचरट आचार कसे उराशीं बाळगून बसतात हें दाखविण्यासाठी प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य यांचें सुरेख उदाहरण त्यांनी दिलें आहे. चंद्रसूर्यांचीं ग्रहणें ते आकाशस्थ गोल अगदी समोरासमोर येऊन त्यांची सावली एकमेकांवर पडली म्हणजे होतात, हें भास्कराचार्यांस पूर्ण माहीत. पण भास्कराचार्यांचें भास्कराचार्यत्व फक्त वेधशाळेंत. ग्रहणाचा वेध लागला की सामान्य लोक पापडलोणच्यांवर, दहीदुधावर तुळशीपत्रें टाकून, मूर्खपणाच्या मंत्राचा जप व दानें करतात आणि ग्रहण सुटलें की धोत्रांपात्रांसकट स्नानें करतात. भास्कराचार्यांनी या आचरट प्रकारास आळा घालणें एकीकडेच राहिलें. तेच उलटे या रूढीला मान वाकविणार! सोवळया ओवळयाच्या विवेकशून्य रूढींवर आगरकरांनी असेच उपाहासाचे कोरडे ओढले आहेत. या जगांतलें आपलें—सर्व मानवसमाजाचें—आयुष्य सुखी समृद्ध करण्यास झटणें, हाच खरा धर्म. जो परलोक कुणास कधी दिसलेला नाही तेथील काल्पनिक बऱ्यावाईटाची भीति बाळगून या जगांतल्या जीवनांत नसत्या कटकटी व त्रास उत्पन्न करणें हा शुद्ध मूर्खपणा होय, हा विचार त्यांनी निरनिराळया रीतींनी सजवून वाचकांपुढे मांडला आहे.

## स्वातंत्र्य आणि समता

असा हा चतुर्लक्षणी बुद्धिवाद कशासाठी प्रवृत्त झाला होता? कोणचें ध्येय त्याच्या नजरेसमोर होतें? या प्रकरणाच्या प्रारंभीं जो उतारा दिला आहे त्यांत आपल्या ध्येयाचा अथवा धर्माचा आगरकरांनी निर्देश केला आहे. अखिल मानवजातीचें सुखवर्धन, आणि तें 'याच देहीं याच डोळां'!

मोक्षासारख्या पारलौकिक ध्येयापेक्षा हें काय कमी पवित्र, कमी उदात्त ध्येय आहे ? हें ध्येय साधण्याकरिता त्यांचीं साधनें किंवा गृहीत तत्त्वें कोणचीं होतीं ? **स्वातंत्र्य** आणि **समता** या दोन तत्त्वांच्या आधाराने त्यांना मानवजातीच्या सुखवर्धनाकरिता चढाई करायची होती. समाजसुधारणेस अवश्य असलेल्या स्वातंत्र्य या तत्त्वाचें स्वरूप ते पुढीलप्रमाणे वर्णितात.

> " समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका द्यावयाचा हें अर्वाचीन पाश्चिमात्त्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे. "*

या स्वातंत्र्य तत्त्वांत सुधारणेच्या ज्या कलमांचा समावेश होत होता त्यांत स्त्रीदास्यविमोचनाला प्राधान्य होतें. बालविवाहनिराकरण, विधवा-पुनर्विवाह, केशवपननिषेध, स्त्रीशिक्षण, सासुरवासाचें उच्चाटन—अशीं स्त्रीदास्यविमोचनाच्या सुधारणेचीं अनेक अंगोपांगें होतीं. त्या सर्वांवर अत्यंत तळमळीने मेंदूचें सर्व सामर्थ्य एकवटून आगरकरांनी लिहिलें आहे.

समतेचें तत्त्व तितकेंच महत्त्वाचें. या तत्त्वाच्या दृष्टीने पुढे येणारें मुख्य कलम जातिभेदाचें होय. आपल्या राष्ट्राचें पाऊल पुढे पडण्यास त्याच्यांतील जातिभेद नष्ट होणें अवश्य आहे याविषयी आगरकरांस कांहीच शंका नव्हती. त्यासंबंधाने त्यांनी अनेक लेख लिहून जातिवैषम्याच्या भावनेवर प्रहार केला आणि शिवाशिवीच्या घातक कल्पना सोडून देण्या-बद्दल उपदेश केला. समतेच्या श्रेष्ठ तत्त्वाचें त्यांनी पुढीलप्रमाणे विवरण केलें आहे—

> " सर्व मानवप्राणी जन्मतः सारख्या योग्यतेचे अधिकारी असून त्यांचे हक्कही एकसारखे असतात; व ती योग्यता व ते हक्क त्यांच्याकडे राहणें न राहणें हें केवळ त्यांच्या कमी अधिक बुद्धि-विकासावर व उद्योगशीलतेवर अवलंबून आहे. "†

---

* ' सुधारक काढण्याचा हेतु ' निबंधसंग्रह, भाग १, पान ६.

† अळतेकरकृत ' गोपाळ गणेश आगरकर ', पृ. ४२५

## ‘सुधारका’ची राजकीय बाजू

स्वातंत्र्य आणि समता या तत्त्वांचा सामाजिक क्षेत्राप्रमाणे राजकीय क्षेत्रांतहि अंमल होण्यास पुष्कळ वाव आहे हें आगरकरांच्या लक्षांत आल्यावाचून राहणें कसें शक्य होतें ? सामाजिक सुधारणेइतकीच राजकीय प्रगतीविषयीहि त्यांना कळकळ होती. तथापि सुधारकांत व्यक्त केलेल्या राजकीय विचारांची स्वतःच्या सामाजिक मतांशीं सुसंगतता राखणें अवश्य असल्यामुळे त्यांच्या राजकीय विचारांच्या तीव्रतेस साहजिकच आळा पडला होता. इंग्लंडकडून हिंदुस्थानचें होत असलेलें द्रव्यशोषण आणि त्यामुळे हिंदुस्थानच्या जनतेचें वाढत चाललेलें दारिद्र्य यांची कहाणी त्यांनी वारंवार अत्यंत कळवळयाने निवेदन केली आहे आणि करांचें ओझें कमी करा, लष्करी खर्च कमी करा इत्यादि विनवण्या केल्या आहेत. पण जनतेची स्वातंत्र्याकांक्षा उद्दीपित करणारें उत्तेजक, क्षोभक लिखाण त्यांच्याकडून होऊं शकलें नाही. सामाजिक बाबतींचा विचार करतांना ज्या आपल्या देशबांधवांना आपण मूर्ख, भेकड, दुराग्रही, भांडखोर, क्षुद्र जंतूंप्रमाणे दुर्बल म्हणतों, त्यांनाच राजकीय बाबतींचा विचार सुरू होतांच समंजस, सुधारलेले, संघटित—सारांश राजकीय हक्क वहिवाटण्याला समर्थ असें म्हणणें, ही भयंकर विसंगति झाली असती. अर्थात राजकीय विषयांत लिहितांना, आमचें राज्य सांभाळण्यास लागणारे गुण आमच्यांत नाहीत, ते गुण येईतों परक्यांना आमच्यावर राज्य करूं देण्यास आपण राजीखुषीने तयार असलें पाहिजे, ही सुधारणावादी पक्षाची सौम्य भूमिका घेणें त्यांना भाग पडलें आहे. पुढील उतारा थोडा लांब आहे, पण आगरकरांच्या राजकीय विषयांवरील लिखाणामधील धोरणाचा तो निदर्शक असल्यामुळे त्यांच्याच भाषेंत त्यांचें धोरण वाचकांस जाणून घेतां यावें यास्तव येथे घेतला आहे. ‘ घ्या, पण त्याला कांही धरबंद असूं द्या ’ या नांवाच्या लेखांत सुरवातीस ते म्हणतात—

“ आम्ही भेकड, आम्ही दुर्बल, आम्ही भांडखोर व आम्ही अज्ञान असल्यामुळे आमचें राज्य आम्हांस चालवितां येणें शक्य नाही, आणि म्हणून आमच्या डोक्यावर कोणी तरी बलवत्तर शास्ता पाहिजे हें आम्ही कबूल करतों, व त्या शास्त्याला आमच्या सामर्थ्या-

प्रमाणे देववेल तितका कारभार देण्यासहि आम्ही राजी आहों. आमच्या अंगीं देशाभिमान असता; आम्ही धर्मवेडानें वेडावून जाऊन आपआपसांत तंटे करीत नसतों; परशत्रूला तोंड देण्यासारखी आम्हांत जूट असती; राष्ट्रहितासाठी स्वहितत्याग करण्याची आवड आम्हांस असती; आम्हांस आमचें राज्य चालविण्याची अक्कल असती आणि कोणत्याहि प्रकारच्या संकटास न डगणारें धैर्य आमच्या अंगीं असतें तर मुसलमान तरी येथे कशाला येते ? आणि इंग्रज तरी कशाला येते ? आमच्या अंगीं जे गुण नाहीत त्याबद्दल पोकळ अभिमान वाहण्यांत कांही अर्थ नाही. ते गुण प्राप्त होत तोंपर्यंत दुसऱ्या राज्यकर्त्यांचें प्रजापण स्वीकारून त्यांच्या श्रमाबद्दल त्यांना वेतन देण्यास तयार असलें पाहिजे."*

कर कमी करा, इंग्रजी अंमलदारांची भरती कमी करा इत्यादि राजकीय मागण्या मांडण्याकरिता लिहिलेल्या लेखाची सुरवात ही अशा तऱ्हेची असल्यानंतर त्याचा शेवट राज्यकर्त्यांच्या प्रार्थनेंत व्हावा हें क्रमप्राप्तच आहे.--

"....अशा प्रकारच्या उदार राज्यतत्त्वांस जे राज्यकर्ते पराङ्मुख होतात, आणि जिंकलेल्या प्रजेस वाढयाकडून व बुडख्याकडून खाण्याचा प्रयत्न करतात ते तिचें सर्वतोपरी नुकसान करून अखेरीस आपलेंहि नुकसान करून घेतात, असें आजपर्यंतच्या अनुभवावरून सिद्ध झालें आहे. याकरता तुम्ही राज्यकर्ते आमचें वित्त घ्या, पण त्या घेण्याला कांही आळा असूं द्या, अशी आमची शेवटची प्रार्थना आहे."†

सुधारकांतले राजकीय विषयांवरील लेख जर तपासून पाहिले तर त्यांतील धोरण सर्वत्र असेंच असल्याचें दिसून येईल. आगरकर हे उत्तरोत्तर सुधारणावादी (नेमस्त) पक्षाशीं समरस होत गेले असें जें मागे एका

---

* निबंधसंग्रह, भाग २, पान ५२४.

† सदर, पान ५२९.

ठिकाणीं म्हटलें आहे तें कसें यथार्थ होतें हें यावरून पटेल.* आपल्या समाजाची अपात्रता, दुबळेपणा, हीन सामाजिक स्थिति यांची जाणीव ज्याला सदोदित टोचत आहे, तो आपल्या समाजाच्या पात्रतेवर जे राजकीय हक्क मिळणें अवलंबून आहे, त्यासाठी जोरकस रीतीने कसा भांडेल? स्वतःच्या अपराधित्वाची जाणीव मनांतून असणारा मनुष्य तक्रार करूं लागला तरी ती अजिजीच्या स्वरूपांतच करणार. सुधारणावादी पक्षाची आणि आगरकरांची तशीच स्थिति होती. याच काळांतील (१८९२–१८९४) केसरींतील राजकीय लेखांत अधिक तेज, अधिक सडेतोडपणा आणि लोकांना निराशेचा चेव आणण्याचें धोरण कसें झळकत होतें हें 'हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावें लागेल काय?' 'आमच्यावर जुलूम कसा होतो?' यांसारखे अग्रलेखांचे नुसते मथळे पाहिले तरी लक्षांत येण्याजोगें आहे.

सामाजिक बाबतीइतकींच राजकीय बाबतींतहि आगरकरांचीं मतें तीव्र होतीं असें सांगण्यांत येत असतें. त्या बाबतींतील खरा प्रकार वर वर्णिल्याप्रमाणे आहे. हिंदुस्थानच्या जनतेचीं राजकीय दुःखें, आर्थिक दैन्यावस्था त्यांनी अत्यंत तळमळीने पुढे मांडली आहे, त्यांत बिलकुल कसूर केलेली नाही. पण त्यांत जो आवेश, जें उद्दीपक सामर्थ्य यावयास पाहिजे होतें, तें स्वसमाजाविषयीच्या न्यूनगंडामुळे येऊं शकलें नाही. यावरून संप्रदायी मनुष्य, तो कितीहि मूलगामी विचार करणारा असला तरी, राजकीय बाबतींत नेमस्त असायचा, या त्या काळच्या अवस्थेंत अनुभवास आलेल्या एका सिद्धांताची उपपत्ति आपल्या लक्षांत येते.

## आगरकर स्वराज्यवादी

आगरकरांच्या श्राद्धतिथीच्या निमित्ताने १९१६ सालीं टिळकांनी केसरींत जो अग्रलेख लिहिला त्यांत आगरकरांच्या राजकीय मतांवर विशेष भर दिला आहे. आगरकरांचा पुण्यतिथि उत्सव साजरा करणारी मंडळी आगरकरांच्या सामाजिक सुधारणेच्या कार्याचाच फक्त विचार करीत होती, त्याला उतारा म्हणून टिळकांचें हें प्रतिपादन झालें आहे. शिवाय मृत्यूनंतर

---

* पहा, मागे पान ७९.

माणसाचें होईल तितकें गुणगौरव करावें अशी टिळकांची नेहमीचीच उदार वृत्ति होती. आगरकरांच्या राजकीय बाजूवर भर देऊन टिळक म्हणतात—

"१८८८ सालापर्यंत केसरींत जे राजकीय विषयावर लेख आले ते बहुतेक आगरकरांचे आहेत; आणि त्यानंतर सुधारकांतहि अशा प्रकारचे बरेच निबंध आले आहेत. या सर्वांचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां असें दिसून येईल की, आगरकर हे पक्के स्वराज्यवादी होते, आणि कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांप्रमाणे देशांतील दारिद्र्य, परावलंबिता, चांगल्या पुरुषांचा तेजोभंग, गोऱ्या अधिकाऱ्यांची चरणी व वरणी, व्यापारनाश वगैरे राजकीय व औद्योगिक अवनति पाहून त्यांचें चित्त केशवपनादि चालीच्या निरीक्षणापेक्षाहि अधिक संतप्त व दुःखित होत असे."*

हा अभिप्राय अवास्तव गौरवपर आहे असें समजण्याचें कारण नाही. राजकीय स्वातंत्र्य हें राष्ट्राचें 'चैतन्यसारतत्त्व' होय अशी आगरकरांची निश्चित भावना होती; आणि "जगावयाचें असेल व जगणें तें चांगल्या प्रकारचें जगणें हवें असेल, तर तें चैतन्यसारतत्त्व फिरून आपल्या हातीं येण्याचा प्रयत्न केला पाहिजे."† असेंहि त्यांचें म्हणणें होतें. त्यांच्यांत आणि सुधारणावादी संप्रदायांत ही ध्येयभिन्नता होतीच. कारण रानडे प्रभृतींच्या सुधारणावादी संप्रदायाच्या मनोवितानांत अगदी दूरवर देखील या ध्येयाची प्रतिमा कुठे उमटत नव्हती. तथापि हा फरक जरी असला, तरी वर सांगितल्याप्रमाणे राजकीय व आर्थिक विषयांवर सुधारकांत लिहितांना त्यांचें धोरण व पद्धति सुधारणा संप्रदायास अनुसरून असे, हें स्पष्ट आहे. तेव्हा आगरकर सुधारणासंप्रदायांत सामील झाले, पण विलीन झाले नाहीत, असें म्हणणें शोभेल.

आगरकरांनी आपल्याबरोबर सुधारणा संप्रदायांत त्यागाचें तत्त्व आणून सोडलें. हा अमोल ठेवा त्यांनी त्या संप्रदायाला दिला, तो पुढे

---

* लो० टिळकांचे केसरींतील लेख, भाग ४, पृ. ५३४.

† निबंधसंग्रह, भाग १, पृ. १३२.

गोखल्यांच्या त्यागी जीवनाच्या रूपानें सुफलित झाला. गोखले हे रानडयांचे शिष्य असें म्हटलें जातें व तें एका अर्थानें खरें आहे. तथापि पहिलीं पांच वर्षें गोखले आगरकरांच्या तालमींत वाढले. कॉलेजांतील प्राध्यापक व सुधारकाचे अंशसंपादक या नात्यानें आगरकरांचा त्यांना निरंतर सहवास होता. त्यागपूर्ण देशसेवेचें व्रत त्यांनी आगरकरांच्या नेतृत्वाखाली चालविलें, म्हणून गोखल्यांना आगरकरांचे शिष्य म्हणणें देखील वाजवी ठरेल.

## उदारात्म्याचा अंत

सुधारणासंप्रदायाशीं सामीलनामा एकंदरीनें आगरकरांना सोयीचा झाला. मनाला पटत नसतां केवळ सोयीकरितां आगरकर सुधारणा संप्रदायास मिळाले असें येथे सुचविण्याचा हेतु नाही. सरकारी नियमन मान्य करणाऱ्या एका मोठया शिक्षणसंस्थेच्या चालनाची जबाबदारी त्यांच्या शिरावर होती. सुधारणासंप्रदायाचे अध्वर्यु सरकारदरबारांत मानमान्यता असलेले असे होते. त्यांची सहानुभूति व सल्ला संस्थेला मुक्त हस्तानें मिळत राहणें हें फार महत्त्वाचें होतें. त्यासाठी सुधारकाचें सुधारणासंप्रदायी धोरण अप्रत्यक्ष या उपयोगी पडणारें होतें.

संस्थेचें संचालन आगरकरांनी अतिशय उल्लासानें केलें. पाश्चात्त्य सुधारणेच्या हितकारक तत्त्वांचा प्रसार करण्यास आपली शाळा व कॉलेज सहायभूत होत आहे, यांत त्यांना मोठा आनंद वाटत होता. १८९० सालीं पहिल्या बी. ए. चे व १८९१ सालीं दुसऱ्या बी. ए. चे वर्ग काढण्यास कॉलेजला परवानगी मिळाली. १८९१ च्या अखेरीस विद्यार्थी बी. ए. च्या परीक्षेस बसले व निकालहि चांगला लागला. १८९२ च्या आरंभीं चतुरशिंगीच्या माळावर कॉलेजची इमारत बांधण्यास सुरवात झाली. पण या आनंदांत विरजण घालण्यासाठी मृत्यूनें सोसायटीचा पिच्छा पुरविण्यास सुरवात केली. सुरवातीपासून कॉलेजचे प्राचार्य असलेले वामनराव आपटे यांचा ९ आगष्ट १८९२ रोजीं झालेला मृत्यु हा चिपळूणकरांच्या मृत्यूनंतरचा या शिक्षणसंस्थेवरील सर्वांत मोठा आघात होय. त्यानंतर आगरकर कॉलेजचे प्राचार्य झाले. प्राचार्यपदाची जबाबदारी आणि सुधारकांतील लेखन या दोहींचा त्यांच्या प्रकृतीवर चांगलाच ताण पडूं लागला. आगरकरांनी समाजांत

बाहेर पडून सभा, व्याख्यानें, संस्था वगैरेंच्या रूपाने सार्वजनिक चळवळ कधी केली नाही. त्यांचा स्वभाव चळवळ्या नव्हता. सार्वजनिक चळवळी-साठी जो शारीरिक जोम लागतो त्याची त्यांच्यांत उणीव होती. ते राष्ट्रीय सभेचे व सामाजिक परिषदेचे कट्टे पुरस्कर्ते होते. पण त्यांचा पुरस्कार सुधारकांत लेख लिहिण्यावरच थांबत असे. कॉलेजचीं कामें आणि शरीर-प्रकृति यांपुढे त्यांचा इलाज नव्हता. डेकन कॉलेजमध्ये शिकत असतांनाच त्यांना दम्याची व्यथा जडली होती. अखेरीस जालीम रेचक घेतल्याचें निमित्त होऊन अगोदरच पोखरून निघालेल्या देहाला ता. १६ जून १८९५ च्या रात्रीं त्यांचा आत्मा सोडून गेला. जितक्या निर्धन स्थितींत हा उदारात्मा जगांत आला तितक्याच निर्धन स्थितींत चालता झाला. त्यांच्या सामानांत कांही रुपयांची पुरचुंडी बांधून ठेवलेली सापडली, तिच्यांत ‘ माझ्या प्रेतदहनार्थ ’ अशी चिठी होती !

# ९. भारतीय असंतोषाचा जनक

## तेजस्वी नेतृत्व

इ. स. १८९१ च्या अखेरीस केसरी मराठा हीं पत्रें संपूर्णपणें आपल्या मालकीचीं करून घेऊन निर्वेधपणें स्वातंत्र्यवादी विचारसरणीचें नेतृत्व करण्यास टिळक सिद्ध झाले. हें नेतृत्व इतक्या धडाडीने आणि कौशल्याने त्यांनी केलें की सहा वर्षांच्या अवधींत आपल्यावर राजद्रोहाचा खटला केल्याखेरीज राज्यकर्त्यांना गत्यंतर राहूं नये अशी पाळी त्यांनी आणली. लोकप्रिय पुढाऱ्यावर खटला भरणें राजनीतिकुशल नोकरशाहीला साधारणपणे इष्ट वाटत नाही. खटला करून शिक्षा दिल्याने पुढाऱ्याची लोकप्रियता अधिक वाढते आणि त्याच्या शिकवणुकीकडे लोक मानसिक रीत्या अधिक जोराने खेचले जातात, हें तिला समजतें. याच्या उलट, शिक्षा करून त्याला जनतेपासून दूर केल्याने त्याने केलेली कार्याची मांडामांड विसकळीत होते, त्याने जनतेच्या भावनांना आणलेला पूर ओसरतो आणि त्याच्या अनुयायांची पांगापांग होते, हे फायदे खटला भरल्याने मिळण्याजोगे असतात. अव्वल दर्जाच्या पुढाऱ्याला पकडतांना या नफ्यातोट्याची वजावाट आपल्या मनाशीं केल्याखेरीज नोकरशाही आपलें पाऊल उचलीत नसली पाहिजे हें उघड आहे. या वजावाटीच्या हिशेबांत, टिळकांना उचलण्यांत निःसंशय आपला फायदाच आहे, किंबहुना त्यांना उचलल्याखेरीज गत्यंतर नाही, असें वाटण्याची पाळी टिळकांनी नोकरशाहीवर सहाच वर्षांत आणली या गोष्टीखेरीज त्यांच्या कार्यकुशलतेचें अधिक मोठें प्रत्यंतर दुसरें कोणतें मिळणें शक्य आहे ?

या कालखंडाच्या प्रारंभीं टिळकांचें वय ३५ वर्षांचें होतें. त्यांच्या मानसिक आणि शारीरिक शक्ति पूर्ण भरांत होत्या. त्यांच्या मानसिक शक्ति तर आयुष्याच्या अखेरपर्यंत तशाच तरतरीत होत्या, पण शरीराच्या कणखर-

पणावर आणि कष्टसहिष्णुत्वावर माणसाचें कर्तृत्व कांही अंशाने अवलंबून असतें. ही शरीराची दृढता कॉलेजमध्ये केलेल्या व्यायामाने आणि तिथे घालविलेल्या बेफिकीर आयुष्यामुळे त्यांना प्राप्त झाली होती. पतीच्या चारित्र्यांत आपलें सर्वस्व विलीन करणारी भार्या लाभली असल्यामुळे त्यांची कौटुम्बिक परिस्थिति निरामय होती. पूर्ण निर्व्यसनिता आणि अत्यंत साधी राहणी यांमुळे त्यांचें जीवन सदाचेंच स्वच्छ व सुटसुटीत असें होतें. या सर्व बाह्य गोष्टींच्या अनुकूलतेमुळे आपल्या अत्यंत श्रेष्ठ दर्जाच्या मानसिक शक्ति अंगीकृत कार्यामध्ये ते संपूर्णपणें केंद्रित करूं शकले. या बाह्य अनुकूल गोष्टींपैकी देखील कांही त्यांनी मुद्दाम प्रयत्न करून प्राप्त करून घेतल्या होत्या, तर कांही त्यांना योगायोगाने मिळाल्या होत्या. कसेंहि असलें तरी या अनुकूलतेचा उपयोग त्यांनी अंगीकृत देशकार्याकडे केला आणि त्यामुळेच त्यांच्या कार्याला इतक्या अल्पावधींत इतकें तेज येऊं शकलें, हें लक्षांत ठेवणें महत्त्वाचें आहे.

## गाढ धर्मबुद्धि

विशिष्ट स्वातंत्र्यवादी विचारसरणीची प्राणप्रतिष्ठा चिपळूणकरांनी केली आणि तिच्या प्रसाराकरिता जी संस्थांची उभारणी त्यांनी केली तिच्यांत, अनुयायी म्हणून नव्हे, तर सुरवातीचे सहकारी म्हणून टिळक जाऊन मिळाले, हें आपण पाहिलें आहे. त्याप्रमाणेच हेंहि आपण पाहिलें आहे की या संस्थांपैकी मुख्य जी शिक्षणसंस्था तिचें धोरण कांही काळाने स्वातंत्र्यवादी संप्रदायाकडून रानडेप्रणीत सुधारणावादी संप्रदायाकडे झुकूं लागलें आणि ती त्यांत सामील होऊन गेली. टिळकांचें मात्र असें न होतां ते स्वातंत्र्यवादी विचारसरणीला चिकटून राहिले व तिचेंच कार्य त्यांनी वर्तमानपत्रांच्या द्वारा जोमानें चालू केलें. अर्थात चिपळूणकरांची स्वातंत्र्यवादी विचारसरणी त्यांनीं एकंदरीने पुढे चालविली, हें खरें असलें तरी, जरा सूक्ष्म अवलोकन करून त्यांच्या दृष्टिकोनांत कुठे फरक दिसून येत असल्यास त्याची नोंद इथे करून ठेवणें इष्ट होईल.

हा फरक धर्मासंबंधीच्या दृष्टिकोनांत दिसून येतो. चिपळूणकरांच्या अंगीं धर्माचा अभिमान पूर्ण होता, पण तो त्यांच्या सर्वव्यापी देशा-

भिमानाचें एक अंग म्हणून होता. त्याला स्वतंत्र अधिष्ठान नव्हतें. धर्माकडे पाहण्याची त्यांची दृष्टि व्यावहारिक होती. सुधारणेच्या संबंधाने पूर्वीच्या पिढयांतील सुधारकांची जी हाकाटी चालू होती तिच्या संबंधाने लिहितांना त्यांनी ' आमच्या देशाची स्थिति ' या निबंधांत जीं दोन विधानें केलीं आहेत, त्यांच्या योगाने त्यांचा दृष्टिकोन व्यक्त होतो. " आमची तर अशी समजूत आजपर्यंत झाली आहे की, हवी तितकी सुधारणा होण्यास सध्याचा हिंदुधर्म मोठासा बाधक आहे असें नाही. " हें विधान केल्यानंतर थोडया अंतराने ते म्हणतात—" धर्म व व्यवहार हे कोणत्याहि देशांत परस्पर विरोधाने कधीहि राहत नाहीत. दोघांची घासाघासी होण्याची वेळ आली असतां त्या घासाघासीनेच क्रमाक्रमाने दोघांचीहि सोय निघते. "

बाह्यात्कारीं पाहिलें तर हीं दोन्ही विधानें टिळकांनाहि मान्य होण्याजोगीं होतीं. तथापि त्यांच्या आंतरिक भावनेमध्ये फरक होता. चिपळूणकरांप्रमाणे व्यावहारिक पातळीवरून धर्मविषयाची त्यांनी कधी संभावना केली नाही. धर्म हा त्यांच्या स्वतंत्र प्रत्ययाचा विषय होता. तें केवळ त्यांच्या देशाभिमानांतलें एक पोटकलम नव्हतें. देशाभिमानाच्या जोडीने असलेली, परंतु स्वतंत्र प्रत्ययावर आधारलेली ती बाब होती. हा फरक बऱ्याच अंशीं पूर्वसंस्कारामधून आणि अध्ययन विषयामधून उद्भवलेला होता. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे वडील कृष्णशास्त्री मरणसमयीं देखील रामाचें नांव घेण्याचें निग्रहाने नाकारणारे नास्तिक होते. त्यामुळे गृहस्थितीच्या योगाने लहानपणापासून धार्मिक श्रद्धेचा जो मनावर संस्कार व्हावयाचा त्याला ते बहुतांशीं आचवलेले होते. टिळकांची लहानपणची गृहस्थिति याच्या उलट होती. त्यांचे वडील परंपरागत धर्माचार श्रद्धेने पालन करणारे असून चांगले संस्कृतज्ञ होते. त्यांच्या आजारांत त्यांच्यापाशीं गीता वाचण्याचा टिळकांना प्रसंग आला होता आणि तेव्हापासून त्यांचें गीतेचें वाचन व मनन चालू होतें. चिपळूणकरांचें वाचन केवळ लौकिक विषयांचें होतें. टिळकांचा व्यासंग तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र या विषयांवर विशेष होता. वेद, उपनिषदें, गीता, आचार्यांचीं भाष्यें इत्यादि धार्मिक आणि तत्त्वज्ञानाचे ग्रंथ, त्याचप्रमाणे मन्वादि धर्मशास्त्रग्रंथ यांचें अवलोकन व मनन जशी सवड मिळेल किंवा जरूरी पडेल तसें त्यांनी चाल-

विलेलें होतें. त्यामुळे आपल्या ऋषींनी व आचार्यांनी प्रतिपादिलेलें अपूर्व तत्त्वज्ञान आणि शास्त्रकारांनी घालून दिलेले समाजरचनेचे नियम यांविषयी प्रत्ययपूर्ण अभिमान त्यांच्या मनांत उत्पन्न झालेला होता. या सगळ्यांचें बनलेलें जें हिंदुत्व तें आपल्या स्वत्वाचें मूळ आहे. देशकालपरिस्थितीनुसार सुधारणा कराव्या लागतील आणि त्या केल्याहि पाहिजेत, पण त्या हिंदुत्वाचा मूळ पाया न सोडतां केल्या पाहिजेत. हे त्यांचे विचार सुरवातीपासूनच होते; ते उत्तरोत्तर अधिक परिणत व सुस्पष्ट होत गेले. १९०३ च्या अखेरीस सामाजिक परिषद मद्रासला भरली होती. त्याच सुमारास थिऑसोफिस्टांच्या प्रेरणेने हिंदुत्वाच्या पुनरुज्जीवनाचा विचार प्रभावी होऊन 'हिंदु असोसिएशन' नांवाची निराळी संस्था तिथे स्थापन झाली. या घटनेस अनुलक्षून टिळकांनी दोन लेख केसरींत लिहिले. त्यांत ते म्हणतात—

"ज्यास हिंदु धर्माचा किंवा हिंदुत्वाचा अभिमान नाही त्यास हिंदु लोकांनी काय समाजसुधारणा करावी हें सांगण्याचाहि पण अधिकार नाही....पन्नास वर्षांपूर्वी जे समाजसुधारक बनले त्यांस त्या वेळीं हिंदुधर्माची अगर त्यांतील ग्रंथांची माहिती नव्हती... पण संस्कृत ज्ञानाच्या प्रसाराने आणि थिऑसाफिकल सोसायटीच्या उद्योगाने हिंदु धर्म, हिंदु आचार, हिंदु तत्त्वज्ञान यांसंबंधाने लोकांस उत्तरोत्तर माहिती मिळून पूर्वीचे विचार आता पालटत चालले आहेत; आणि पुष्कळ सुशिक्षित लोकांस असें वाटूं लागलें आहे की, हिंदुत्वाचा पाया जर आम्ही सोडून दिला तर आम्हांस आमचें असें कांहीच राहणार नाही. नव्या परिस्थितीला अनुरूप सामाजिक फेरफार कोणास नको आहेत असें नाही. पण जे फेरफार व्हावयाचे त्यामुळे हिंदुत्वाचा अभिमान नष्ट होऊं नये अशी प्रत्येकाने खबरदारी घेतली पाहिजे."*

टिळकांचें जीवनकार्य यथातथ्य रीतीने समजून घ्यायचें असेल तर टिळकांची ही धर्मविषयक भूमिका लक्षांत बाळगणें अवश्य आहे. टिळकांचा

---

* लो० टिळकांचे केसरींतील लेख, भाग ४, पृ. ३७०. 'सामाजिक परिषद' आणि 'हिंदुत्व आणि सुधारणा' हे लेख पहा.

धर्माभिमान किंवा त्यांनी वरील उताऱ्यांत उल्लेखिलेलें 'हिंदुत्व' म्हणजे त्यांच्या मृत्यूनंतर उद्भवलेल्या कांही पक्षांनी अथवा संघटनांनी उद्घोषित केलेलें 'हिंदुत्व' नव्हे, हें मात्र स्पष्टपणें लक्षांत ठेवलें पाहिजे. गीता व उपनिषदें यांतील तत्त्वज्ञान आणि श्रुतिस्मृतिप्रणीत वर्णाश्रमधर्म यांच्या आधाराने परंपरेने चालत आलेलें जें कांही एक वैशिष्टय तें हिंदुत्व किंवा हिंदु धर्म अशी त्यांची कल्पना होती, असें त्यांच्या लिखाणावरून म्हणतां येतें. हेंच आमचें स्वत्व, याचा अभिमान आम्ही—हिंदूंनी—बाळगिला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. या त्यांच्या मनोभूमिकेमुळे त्यांचें कार्य, त्यांचा पक्ष यांना कोणच्या प्रकारचें रंगरूप प्राप्त झालें आणि पुढे निरनिराळे गुंतागुंतीचे सामाजिक व राजकीय प्रश्न उपस्थित झाले ते सोडवितांना या मूलभूत भूमिकेची कशी परिणति झाली इत्यादि गोष्टी आपणाला पुढे यथास्थल पाहाव्या लागतील.

या त्यांच्या धर्माभिमानी भूमिकेचा ते सार्वजनिक कार्यांत पडले तेव्हा एक परिणाम मात्र तात्काळ झाला. ते लोकप्रियतेच्या सिंहासनावर एकदम जाऊन बसले. जनसमाज त्या काळीं निवळ पुराणमताभिमानी होता. 'तुमच्या चालीरीती वाईट आहेत', 'तुमची मूर्तिपूजा वेडगळपणाची आहे', 'तुमचे पूर्वज मूर्ख होते', 'तुमचीं शास्त्रें आचरटपणाचीं भांडारें आहेत' याप्रमाणे सुधारकांच्या सारख्या चाललेल्या किटकिटीस तो विटून गेला होता. सुधारकांच्या प्रमाणेच इंग्रजी विद्येंत पारंगत असलेला हा मोहरा त्यांच्या तोडीस तोड देऊन आपल्या धर्माचा कैवार घेतो असें पाहून जनतेने त्यांना शिरीं धारण केलें. जनतेने आपल्या भक्तीचें प्रदर्शन कोल्हापूर प्रकरणांत प्रथम केलें होतें. तेथून नऊ वर्षांनंतर संमतिवयाच्या बिलाच्या चळवळींत लोकप्रियतेचा दुसरा साक्षात्कार त्यांना घडला. या बिलाच्या धुमश्चक्रीनंतर आगरकरांनी जें 'अनावृत पत्र' लिहिलें त्यांत टिळकांच्या बद्दल "या क्षणीं ते अत्यंत लोकप्रिय झाले असून प्रत्येकाच्या तोंडांतून त्यांचें नांव निघत आहे" असे उद्गार त्यांनी काढले आहेत. त्यानंतर १८९३ सालीं हिंदुमुसलमानांच्या दंग्यांचा प्रश्न आला. तेव्हा सरकारच्या पक्षपातीपणामुळे चिडून गेलेल्या हिंदु जनतेला न्याय मिळावा म्हणून केसरीमधून जो सडेतोड प्रचार टिळकांनी केला त्यामुळे त्यांच्या लोकप्रियतेंत

आणखी भर पडली. रस्त्यानें ते जाऊं लागले म्हणजे लोकांनी प्रेमभरानें ‘टिळक महाराजकी जय’ म्हणून जयजयकार करावा, अशा गोष्टी तेव्हापासून सर्वसाधारण होऊन गेल्या. पुढे गणपति उत्सव, शिवाजी उत्सव, राजद्रोहाचा खटला, अशा एकेक प्रसंगांनी त्यांना लोकप्रियतेच्या शिखराकडे चढवीत नेलें, तो सर्व प्रकार आजकालच्या पिढींतल्या लोकांनी जरी अनुभविलेला नसला तरी त्यांना कल्पनेने जाणतां येण्याजोगा आहे.

## चतुर्विध कार्य

प्रस्तुत विवेचनासाठी घेतलेल्या सहा वर्षांच्या कालखंडांत टिळकांनी जें कार्य केलें तें पुढे दिल्याप्रमाणे चार प्रकारचें होतें असें आपणास म्हणतां येईल. (१) सरकारच्या राज्यकारभारांतले दोष टिपून काढून त्यांच्यावर सडेतोड टीका करणें; (२) प्रांतिक परिषदा आणि राष्ट्रीय महासभा या देशाच्या राजकीय प्रगतीसाठी सुशिक्षितांनी काढलेल्या संस्थांच्या कार्यांत भाग घेऊन तेथील काम अधिक तेजस्वी बनविण्याचा प्रयत्न करणें; (३) जनतेचीं मनें देशाभिमानानें उद्दीपित करणें; जनतेचा असंतोष प्रज्वलित करून प्रत्यक्ष प्रतिकारासाठी तिला तयार करणें; आणि (४) पूर्वीपासून चालत आलेला जो सुधारणावादी नेमस्त पक्ष त्याचा पाडाव करणें. या सहा वर्षांतलें टिळकांचें चरित्र पाहिलें म्हणजे हा चौपदरी हार ते असीम धैर्यानें योजनापूर्वक गुंफीत होते, असें दिसतें.

या चारहि प्रकारांसंबंधानें प्रथम थोडेंसें सामान्य विवेचन करून प्रस्तुत कालावधींत घडलेल्या घटनांचें कालक्रमानें वर्णन करूं. त्यांतून टिळकांचें हें चतुरस्र धोरण कसकसें व्यक्त झालें हें सहज स्पष्ट होईल.

यांतलें पहिलें कलम वर्तमानपत्रकर्त्यांच्या नेहमीच्या कर्तव्यांमध्ये अंतर्भूत होणारें आहे. राजकीय घडामोडींवर आणि त्यांतहि सरकारच्या चुकांवर टीका करणें यासारखें वर्तमानपत्रांना लोकप्रियता मिळविण्याचें आणि टिकविण्याचें दुसरें कोणतेंहि निश्चित फलदायी साधन नसतें. प्रसंगविशेषीं केसरीपेक्षाहि इतर वर्तमानपत्रें सरकारवर कडक टीका करीत असतील. टिळकांच्या केसरींतून होणाऱ्या टीकेचा विशेष हाच की तिच्यांत कडकपणा असूनहि मुद्देसूदपणा असे. कोणताहि राजकीय विषय उपस्थित

होवो, त्या बाबतींतले परकीय राज्यकर्त्यांचे कुटिल हेतु हेरून ते निर्भीडपणें पण कायद्याच्या कचाटींत न सापडतां उघड करणें यांत टिळकांचा हातखंडा होता. टिळकांच्या केसरींतील लेखांचें अशा प्रकारें गुणवर्णन करणें म्हणजे वास्तविक सूर्याला प्रकाश असतो असला सिद्धांत सांगण्याप्रमाणे होय. मराठी वृत्तपत्रकारांच्या तेजस्वी परंपरेच्या गुरुस्थानीं त्यांचें नांव ध्रुवाप्रमाणे अढळ आहे. स्वातंत्र्याचा मार्ग आक्रमण करण्यासाठी जनतेच्या असंतोषाची तार सदैव ताणलेली राहणें अवश्य होय ही जाणीव त्यांच्या मनांत निरंतर जागृत होती. त्यांचें केसरींतील लेखन या जाणिवेने स्फुरलेलें असे हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे.

राष्ट्रीय महासभा उर्फ कांग्रेस हिच्यामध्ये आणि प्रांतिक राजकीय परिषदांमध्ये भाग घेणें हें टिळक आपलें अवश्य कर्तव्य समजत असत. पण या काळांत या संस्थांमध्ये ठराव आणणें, उपसूचना करणें इ० मामुली गोष्टींखेरीज त्यांच्या हातून दुसरें कांही कार्य घडलें नाही. प्रबळ लोकमताचें संघटित दडपण राज्यकर्त्यांवर आणण्यासाठी कांग्रेस हेंच अखिल हिंदी राष्ट्राचें एकमेव मुख म्हणून उपयोगी पडणारें आहे ही खात्री टिळकांच्या मनाला पटली होती. म्हणूनच आपल्या सबंध आयुष्यांत ते कांग्रेसच्या निष्ठेपासून कधीहि ढळले नाहीत. पण या काळांत तीव्र निर्धाराचें प्रबळ लोकमत अद्याप तयार झालें नव्हतें. तें तयार करण्यासाठी जें आंदोलन करायचें तें अर्थात बाहेरच्या जनतेंत करायचें. तें टिळक करीतच होते. तेंच त्यांचें जीवितकार्य होतें. तें जितक्या परिणामकारक रीतीने टिळक करीत होते, तितकें अखिल भारतांत दुसरा कोणीहि नेता त्या वेळीं करीत नव्हता.

आणि हेंच वर तिसऱ्या कलमांत सांगितलेलें जनशक्तीच्या उद्दीपनाचें कार्य होय. जनतेमध्ये राष्ट्राभिमान, स्वातंत्र्याभिमान आणि दुर्दम्य इच्छाशक्ति जागृत करण्यासाठी त्यांनी गणपति उत्सव, शिवाजी उत्सव हे धार्मिक आणि राष्ट्रीय महोत्सव सुरू केले, स्वतःच्या हक्कसंरक्षणासाठी जनतेंत प्रतिकारशक्ति जागृत व्हावी म्हणून दुष्काळांत गावोगाव प्रचारक पाठवून लोकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली. जनतेची शक्ति जागृत करण्याचें एवढें प्रचंड सामर्थ्य या काळांत टिळकांनी प्रकट केलें की

त्यांना यापुढे अधिक काळ मोकळें ठेवणें हिंदुस्थानवरील आपल्या राज्य-सत्तेच्या दृष्टीने धोक्याचें होय, असें राज्यकर्त्यांना वाटलें.

सुधारणावादी नेमस्तपक्षाचा पाडाव हें टिळकांच्या कार्यक्रमांतलें चौथें कलम म्हणून वर नमूद केलें आहे, याचें कित्येकांना आश्चर्य वाटेल. या मागील भांडणांच्या गोष्टी आता कशाला उकरून काढाव्या, असें कांही म्हणतील. पण वस्तुनिष्ठ ऐतिहासिक दृष्टीने आपणाला टिळकांचें चरित्र पाहावयाचें आहे. पूर्वीचें भांडण आज भांडत बसावयाचें नाही. या भांडणांत तत्त्वाचा प्रश्न असल्यामुळे त्याचा वृत्तांत आजहि पुष्कळ बोधप्रद वाटण्याजोगा आहे.

सुधारणा संप्रदाय आणि स्वातंत्र्यवादी संप्रदाय हे पूर्वीपासून तत्त्व आणि कार्यपद्धति या दोन्ही दृष्टींनी परस्पर विरोधी कसे होते, याचें विवरण मागे केलें आहे. इंग्रजी राज्य हें ईश्वरी योजनेनें आपल्यावर आलेलें आहे. मूलतः इंग्रज लोक न्यायी व उदार आहेत. ते सर्व बाबतींत पुढारलेले असल्यामुळे त्यांच्यापासून आपणास धर्म, नीति, राजकारण इ. बाबतींत पुष्कळ शिकायचें आहे. त्यांच्या अमलाखाली हळूहळू सुधारणा करींत आम्ही आमच्या मागण्या त्यांच्या कानावर घालीत राहिलों, म्हणजे आम्ही जसजसे पात्र होऊं तसतसे ते आम्हांला राजकीय हक्क बहाल करतील.—याप्रमाणे ज्याची मतप्रणाली होती त्या संप्रदायाशीं स्वातंत्र्य-वादी टिळकांचें जुळणार कसें ? पुण्याच्या, किंबहुना महाराष्ट्राच्या राज-कारणाची गुरुकिल्ली जिच्या हातीं ती सार्वजनिक सभा सुधारणा पक्षाच्या हातीं होती. या पक्षाचे सूत्रचालक रा. ब. रानडे ( त्या वेळीं न्यायमूर्ति झाले नव्हते ) हे होते आणि १८९० सालीं सार्वजनिक सभेचे चिटणीस झालेले प्रा. गोपाळ कृष्ण गोखले हे त्यांचे शिष्य बनून आपल्या स्वभाव-सिद्ध उत्साहाने सभेचें काम आटोपीत होते. लोकांत व सरकारांत प्रमुख राजकीय संस्था म्हणून सभेला मान होता. सुधारणा पक्षाची सामाजिक सुधारणेची चळवळ बहुतेक संपुष्टांत आली होती; त्या बाजूने जनतेंत त्याला थारा उरलेला नव्हता. राजकीय बाजू मात्र रानडयांच्या संचालकत्वा-मुळे आणि गोखल्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे भरभराटीस आली होती. पण

जनतेचें बहुमत जर सुधारणा पक्षाच्या पाठीशीं नसेल तर सार्वजनिक सभा काय, किंवा एकंदर पुण्याचें राजकीय कार्य काय, त्या पक्षाच्या हातीं कां म्हणून राहावें, असा टिळकांचा सवाल होता. बहुमताच्या तत्त्वाच्या दृष्टीने त्यांचें धोरण रास्त होतें. दोन परस्परविरोधी तत्त्वांचा व वृत्तींचा हा झगडा होता. त्यांत वैयक्तिक मत्सर, हेवा इत्यादि मनोविकारांचा भाग नव्हता, असण्याचें कारण नव्हतें. या झगडयांतील चकमकी कसकशा, कोणकोणत्या प्रसंगांनी झडल्या हें पुढील वृत्तान्तांत आपल्याला दिसून येईल.

## हिंदुमुसलमानांचे दंगे

इ. स. १८९२ सालांत कायदेकौन्सिलांच्या सुधारणेचें बिल पार्लमेंटांत आलें. विलायत सरकारने रुपयाचें अवमूल्यन केलें, त्याच्या परिणामां-वरून वाद माजला. हे प्रश्न त्यावेळीं महत्त्वाचे होते; आज इथे त्यांची चर्चा करण्याचें प्रयोजन नाही. पुढच्या सालीं हिंदुमुसलमानांचे दंगे सर्वत्र उसळले, त्यांत न्यायाच्या पक्षाचा कैवार घेऊन टिळकांनी जो लढा दिला त्याचा जरा विस्ताराने उल्लेख केला पाहिजे. हे दंगे ‘ फोडा आणि झोडा ’ ( divide and rule ) या परंपरापुनीत राजनीतीच्या तत्त्वानुसार हिंदी लोकांची राजकीय चळवळ किंचित भराला येऊं पाहत आहे अशा ऐन समयीं सुरू झाले, तेंव्हा त्यांची प्रेरणा कोठून मिळाली असेल, याचा तर्क करण्यासाठी डोक्याला मोठा शीण देण्याची जरुरी नव्हती. राष्ट्रीय सभेच्या पूर्वेतिहासाचा आढावा घेतांना टिळकांनी सरळच लिहिलें,—

> “...मूले कुठार करण्याकरिता सामदामापैकी चौथा उपाय योजण्याचा कित्येकांनी ( अँग्लोइंडियन हितशत्रूंनी ) उपक्रम केला. सर सय्यद अहमद प्रभृतींना बगलेंत मारून मुसलमानांना फित-विण्यास प्रारंभ झाला...कुंपिणीसरकारचा इतिहासप्रसिद्ध मार्ग बरा वाटूं लागला, व देशांत ठिकठिकाणीं हिंदुमुसलमानांचे दंगे उपस्थित झाले.”

सर्व ठिकाणच्या दंग्यांमध्ये सुरवातीची आगळीक मुसलमानांकडून व्हावयाची, पुढे हिंदु प्रतिकारार्थ उठले की पोलिसांनी यायचें आणि हिंदूंची

धरपकड करायची, पुराव्याकडे वगैरे लक्ष न देतां जे कधी कुणाला नखहि लावणार नाहीत, अशा सन्माननीय हिंदूंना मॅजिस्ट्रेटांनी शिक्षा ठोठावयाच्या, मिरवणुकी काढणें, वाद्यें वाजविणें वगैरे संबंधाने वहिवाटीची नीट चौकशी न करितां मॅजिस्ट्रेटांनी दंडेलीचे हुकूम काढायचे, अशा तऱ्हेच्या त्या वेळच्या हकीकती वाचल्या म्हणजे नोकरशाहीचा नंगा नाच कसा चालला होता, याची कल्पना येते. दंग्याला मूळ सुरवात झाली ती काठेवाडांतील जुनागड या मुसलमानी संस्थानांतील प्रभासपट्टण या क्षेत्राच्या गावीं. तेथून हें लोण मुंबईस आलें आणि अगोदर कांही कल्पना नसतांना मशिदीं-तून काठ्या घेऊन मुसलमान बाहेर पडले ते हिंदूंच्या देवळावर धावले. (ता. ११-८-१८९३). लगेच मुंबईंतल्या मुसलमान वस्तींतल्या भागांतून भयंकर दंगा सुरू झाला. सरकारचें पोलीस मुसलमानांना आवरूं शकत नाही (किंवा इच्छीत नाही) हें पाहून दुसऱ्या दिवशीं कामाठी-पुऱ्यांतील शूर मराठा मजूर वर्ग उठला आणि त्याने दंगेखोर मुसलमानांचा प्रतिकार करण्यास सुरवात केली. मग सरकारी पोलिसांच्या धावाधावीला सुरवात झाली. गोळीबार झाला, लष्कर आणण्यांत आलें, तोफा डागण्यांत आल्या, धरपकड झाली, खटले झाले, शिक्षा झाल्या, सर्व कांही यथासांग झालें. असेच दंगे कमजास्त प्रमाणांत बेळगाव, येवलें, राजापूर, नगर, रावेर, धुळें इत्यादि अनेक ठिकाणीं झाले. हें दंग्यांचें सत्र पुढील वर्षींच्या गणेशोत्सवापर्यंत, म्हणजे सुमारें एक वर्षभर चाललें होतें. येवल्याच्या दंग्याचें प्रकरण फार गाजलें, कारण तिथे इंग्रज अंमलदारांचा पक्षपातीपणा भडक रीतीने उठून दिसला. १८९३ च्या गणेशचतुर्थीच्या दिवशीं मॅजिस्ट्रेटाने वाद्यें वाजविण्यासंबंधी लादलेले नियम अन्यायाचे असूनहि ते हिंदूंनी पाळायची कोशीस केली. तरी मशिदींतून दगड आलेच. पुढे बालाजीच्या मिरवणुकीला बंदी करून व इतर अनेक रीतींनी हिंदूंवर अन्याय करण्याचा क्रम अधिकाऱ्यांनी चालू ठेवला. १८९४ च्या फेब्रुवारी-मध्ये मारुतीची मूर्ति फोडण्यांत आली. तेव्हा पुनः दंगा झाला. त्यावर धरपकड झाली. त्यांत मुसलमानांतला कोणीहि मनुष्य हिंदूंपैकी ज्याचीं ज्याचीं नांवें सांगेल त्याला त्याला पकडावें असें सत्र सुरू झालें. बिचारे मुसलमान नांवें सांगून सांगून कंटाळले असतील!

दंग्यांचें खरें कारण इंग्रज अंमलदारांची फूस व पक्षपाती वर्तणूक हें ओळखून टिळकांनी निर्भयपणें केसरींत लिहिण्यास सुरवात केली. आगळीक मुसलमानांकडून होत असली तरी त्यांत त्या बिचाऱ्यांचा कांही दोष नसून सरकारी अधिकारी त्यांना चिथावीत असल्यामुळे ते भडकतात. दंग्यांच्याविषयी लिहिलेल्या पहिल्याच लेखांत ते लिहितात—

"दोन्ही धर्मांच्या लोकांचा होईल तितका मिलाफ करून देण्यास झटावें हें सरकारचें व लोकांचें कर्तव्य आहे. कित्येक सरकारी अंमलदार बऱ्याच वेळीं ही गोष्ट विसरून जाऊन हिंदुमुसलमानांतील द्वेषभाव कायम राहिला तरच इंग्रजी राज्याचें हित आहे, अशा समजुतीने मुसलमान लोकांस चिथविण्याचा हस्तें परहस्तें प्रयत्न करीत असतात, लॉर्ड हॅरिससारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी असले प्रकार जेणेंकरून बंद होतील अशी व्यवस्था व वर्तणूक ठेवली पाहिजे."*

'मुंबईचा दंगा आणि सरकारचें कर्तव्य' या दुसऱ्या लेखांत पुन्हा त्यांनी बजावलें—

"हल्ली मुसलमानांबद्दल सरकारी अम्मलदार जो पक्षपात दाखवितात तो अन्याय्य आहे, इतकेंच नव्हे, तर लॉर्ड हॅरिस (मुंबईचा गव्हर्नर) यांनी या बाबतींत कांही सुधारणा न केल्यास एकंदर इंग्रजी राज्याच्या इमारतीस तो अपायकारक होईल, अशी आमची पक्की खात्री आहे."

नोकरशाहीने इ. स. १८९३ सालीं सुरू केलेली ही भेदनीति इंग्रजी राज्याला किती अपायकारक झाली याची कारणमीमांसा करणें कठीण आहे; पण ती हिंदी राष्ट्रवादाला निखालस अपायकारक होऊन अखेर पाकिस्तानच्या निर्मितीला कारणीभूत झाली, हें आपणास आता उघड दिसतें. असो. त्या वेळीं जेव्हा टिळक 'इंग्रजी राज्याच्या इमारतीस असुक एक गोष्ट अपायकारक होईल' अशा अर्थाचीं वाक्यें लिहीत, तेव्हा त्याचे ध्वनि लोकांच्या अंतःकरणांत काय उमटत असतील, इंग्रजी राज्याला खरोखरच

---

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग १, पृ. २०७.

अपाय झाला पाहिजे अशा अर्थाची भावना त्यांच्या मनांत कशी उसळत असेल याची आज केवळ कल्पनाच करणें शक्य आहे.

इंग्रज अधिकाऱ्यांनी मुसलमानांना शेफारून ठेवलें आहे, ते त्यांचा पक्षपात करतात, हेंच टिळकांचें या दंग्यांच्यासंबंधी लिहिलेल्या लेखांत पालुपद होतें. सरकार धडधडीत पक्षपाताने वागत आहे हें दाखवून जनतेचा असंतोष चेतविण्याचा त्यांचा उद्देश स्पष्ट दिसतो. मुसलमानांना दोष देण्याचा रोख त्यांच्या लेखांत मुळीच दिसत नाही. दोघांमध्ये एकी नांदली पाहिजे, 'सर्वांनी सुखसंतोषाने राहून एकमेकांच्या हक्कांस जपावें' अशानेच देशस्थिति सुधारून सर्वांस सौख्य होईल, अशा अर्थाचे उद्गार त्यांनी अनेक ठिकाणीं काढले आहेत. पण हिंदुमुसलमानांच्या दंग्यांचा विचार करतांना हिंदू आणि मुसलमान हे दोनच पक्ष आहेत असें मानणें चूक आहे; यांत सरकार हा तिसरा एक पक्ष आहे ही गोष्ट लक्षांत घेतल्याखेरीज दंग्यांच्या कारणांची कधीहि उपपत्ति लागणार नाही; आणि सरकार जर असें पक्षपात करीत राहिलें तर दंगे कधीहि मिटणार नाहीत, अशी भविष्यसूचक मीमांसा त्यांनी या प्रकरणीं केली आहे.*

या दंग्यांच्या संबंधांत टिळकपक्ष आणि रानडेपक्ष यांची पहिली चकमक झडली. दंग्यांसंबंधी आणि दोन्ही जमातींत मित्रत्व वाढविण्यास काय करावें यासंबंधी हिंदु लोकांचें मत सरकारास कळविण्यासाठी हिंदु लोकांचीच जाहीर सभा भरवावी, असें टिळकपक्षाने ठरविलें. रा. ब. रानडे व त्यांचे अनुयायी अशी सभा भरविण्यास विरुद्ध होते. असा मतभेद असण्यांत गैर कांहीच नव्हतें. पण रानडयांनी आपण सभा भरविण्यास विरुद्ध असल्याबद्दल स्वतःच्या सहीचें पत्र सार्वजनिक सभेच्या चेअरमनच्या द्वारा जाहीर सभेच्या अध्यक्षांना तेथे वाचून दाखविण्यासाठी पाठविलें. एवढयावर न थांबतां सभेच्या उद्देशाबद्दल गैरसमज उत्पन्न करणारें असें पत्र मुंबईच्या फिरोजशहा मेहता प्रभृति प्रतिष्ठित गृहस्थांना आणि 'टाइम्स ऑफ इंडिया'ला रानडयांच्या कुणातरी अनुयायाने पाठविलें. या गोष्टींनी

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग १, पृष्ठ २१२–२१७ 'दंगे कशाने बंद होतील ?'

टिळक संतापले. आपसांतील मतभेदांची कागाळी मुंबईच्या इंग्रजी पत्रांत करावी आणि आम्ही मात्र दोन्ही जमातींच्या ऐक्याचे भोक्ते आहोंत व टिळक हे एकीचे शत्रु आहेत, असें अप्रत्यक्ष रीत्या सुचवावें, याची त्यांना चीड आली. "सार्वजनिक कामांत मतभेद पडला असतां एका पक्षाने दुसऱ्या पक्षाचा अशा रीतीने पाडाव करण्याचा प्रयत्न करणें हें आमच्या सार्वजनिक पुढाऱ्यांस अत्यंत लज्जास्पद आहे." असें त्यांनी या प्रसंगीं म्हटलें. पण असे प्रसंग पुढे अनेक यावयाचे होते.

## राष्ट्रीय महोत्सवांची उभारणी

हिंदुमुसळमानांच्या दंग्यांनी एक उपकार केला. गणपति उत्सवाला सार्वजनिक आणि व्यापक स्वरूप देण्याची कल्पना लोकांच्या मनांत आली आणि मुंबईचा दंगा झाल्यानंतर सहा आठवड्यांनी १८९३ सालीं पुण्यांत अशा तऱ्हेवर पहिला गणेशोत्सव साजरा करण्यांत आला. पुढच्या वर्षी उत्सवाला खूप मोठें भव्य स्वरूप आलें आणि टिळकांनी १८ सप्टेंबर १८९४ च्या केसरींत त्याच्यावर अतिशय उज्ज्वल आणि उत्साहवर्धक लेख लिहिला. सार्वजनिक गणपति उत्सवाची कल्पना अगदी प्रथम कोणाच्याहि डोक्यांत आली असो, ती उचलून धरून तिचा सर्वत्र प्रसार करण्याचें आणि तिच्यांत राष्ट्रहितवर्धक गुण ओतण्याचें श्रेय टिळकांनाच आहे. उत्सवाचा पुरस्कार करण्यांत देशभक्तीबरोबर धर्मबुद्धिहि अर्थात होतीच. तिचा उघडपणे गौरव करण्यांत त्यांना कधी संकोच वाटला नाही. गणेशोत्सवाने राष्ट्रीय जागृतीचें, स्वातंत्र्याकांक्षा वृद्धिंगत करण्याचें आणि त्याचबरोबर आपला धर्म व संस्कृति यांचें ज्ञान करून देऊन त्यांचा अभिमान उत्पन्न करण्याचें केवढें कार्य त्या काळांत बजावलें याची कल्पना आज त्या उत्सवाला जें स्वरूप आलें आहे त्यावरून होणें कठीण आहे. खुद्द टिळकांप्रमाणे परांजपे आणि पांगारकर, खाडिलकर आणि केळकर अशी धुरंधर मंडळी ज्या वेळीं या उत्सवांत व्याख्यान-प्रवचनें करीत असत त्या वेळच्या त्या स्फूर्तीचा आणि सद्विचारांचा आनंद कोण वर्णू शकेल ? "पाश्चिमात्य सुधारणेने उत्पन्न केलेल्या 'वर्तमानपत्रा'सारख्या संस्थांच्या हातूनहि जें काम नीटसें रेटत नाही, तें कार्य राष्ट्रीय महोत्सवच नीट

तडीस नेऊं शकतात." असे उद्गार 'राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता' या सर्वोत्कृष्ट लेखांत टिळकांनी काढले आहेत. याच्याच पुढच्या केसरीच्या अंकांत 'राष्ट्रीय महोत्सवांचे वेळीं सुशिक्षितांनी काय केलें पाहिजे' या तशाच सुंदर लेखांत ते म्हणतात —

" ज्या राष्ट्राला वर्षांतून आठ दहा दिवसहि सात्त्विक हौस पुरविण्याची संधि मिळत नाही; भक्तीने आपल्या देवतांचीं पदें गाण्यांत व ऐकण्यांत तल्लीन होतां येत नाही, गुलामांच्या संसार-यात्रेंतील कष्ट क्षणभर विसरून, ईर्ष्या व आवेश उत्पन्न करणाऱ्या गोष्टी ऐकण्यास व पाहण्यास ज्या राष्ट्राला मिळत नाहीत—तें राष्ट्र सर्वांशीं धुळीस मिळालें म्हणून समजावें....आमची धर्मबुद्धि जागृत राहावी, आमच्या नैतिक व राजकीय मनोवृत्ति जोमाच्या राहाव्यात, आमची राष्ट्रीयत्वाची ज्योत नेहमी प्रकाश देणारी असावी, म्हणूनच आमच्या वाडवडिलांनी या उत्सवांची योजना केलेली आहे. तरी आता ह्या अत्युत्कृष्ट सार्वजनिक संस्थांची हेळसांड केल्याचें पाप सुशिक्षित मंडळीच्या माथीं बसत नाही काय ?...राष्ट्रीय सभे-इतकें हें काम दगदगीचें व खर्चाचेंहि नाही. असें असूनहि राष्ट्रीय सभेच्या हातून जी कामगिरी बजावणें अशक्य आहे ती कामगिरी महोत्सवांच्या द्वारें सुशिक्षित लोक सहज बजावूं शकतील. मोठ्या जत्रांना प्रचंड सभांचें स्वरूप आम्ही कां देऊं नये ? तुमच्या राजकीय चळवळीचा प्रवेश खेड्यापाड्यांतील झोपडींतहि अशा प्रकाराने व्हावयाचा नाही काय ?...अशा वेळीं आपली खरी स्थिति काय आहे याचें ज्ञान लोकसमूहाला सुशिक्षितांनी कां करून देऊं नये ? सरकार करीत असलेल्या जुलमाची आठवण त्या वेळीं लोकांना शहाणे म्हणविणाऱ्या मंडळींनी कां करून देऊं नये ? अथवा सर्वांत धर्मबुद्धि जागृत करून आमच्या राष्ट्रीयत्वास कां बळकटी आणूं नये ? "

गणेशोत्सवासारख्या उत्सवापासून व्हावयाच्या कार्यासंबंधी किती उदात्त व व्यापक आकांक्षा टिळकांच्या मनांत तरंगत होत्या हें या लेखा-वरून उत्कृष्ट रीतीने मनांत बिंबतें.

गणेशोत्सवाची पाठशिवणी करीत शिवजयंती उत्सव आला. रायगडावरील शिवाजी महाराजांची समाधि दुरुस्त करण्याच्या कल्पनेंतून शिवाजी उत्सवाची कल्पना निघाली. वर्गणी गोळा करण्यास १८९५ सालीं सुरवात झाली. प्रत्यक्ष रायगडावर जाऊन उत्सव करावा ही कल्पना कायम होऊन ता. १५ एप्रिल १८९६ रोजीं उत्सव अत्यंत उत्साहानें व थाटानें साजरा झाला. कीर्तनें, मेळ्यांचीं पदें, पोवाडे, टिळक परांजपे कानिटकर यांचीं व्याख्यानें, जुन्या मराठे घराण्यांतल्या वंशजांस मानाचे नारळ वगैरे कार्यक्रम झाला. कोणचीहि सार्वजनिक कामगिरी असो, त्यांत पूर्वीची परंपरा आणि आधुनिक कल्पना यांची सांगड घालून देण्याची टिळकांची वृत्ति असे. ता. २८ एप्रिल १८९६ रोजीं या विषयावर त्यांनी अग्रलेख लिहिला. त्यांत राष्ट्राभिमान, एकराष्ट्रीयत्व, जातीजातींचें ऐक्य या भावनांच्या वर त्यांनी जोर दिला.

"ज्याप्रमाणे आम्ही आपल्या वडिलांचें स्मरण कायम ठेवून त्याच्यायोगें आपल्या घराण्याचा पूर्वापार चालत आलेला लौकिक राखण्याचें एक साधन करून ठेवितों, तद्वतच राष्ट्रांतील महापुरुषांचें स्मरण हें राष्ट्रीयत्व कायम राहण्यास एक चांगलें साधन आहे. एकराष्ट्रीयत्व म्हणजे कांही दृश्य पदार्थ नव्हे. ही एक प्रकारची कल्पना असून ती सतत जागृत ठेविली तरच ती टिकण्यासारखी आहे, व ज्या ज्या राष्ट्रांनी ती कायम राखिली आहे त्यांनी आपल्या ऐतिहासिक थोर पुरुषांच्या इतिहासाची या कामीं योग्य मदत घेतली असें थोडया विचारांतीं कोणाच्याहि लक्षांत येईल. श्री शिवछत्रपति महाराजांचें चरित्र अशाच प्रकारचें होय. महाराष्ट्रांतील निरनिराळया जातींचें प्रेम एकाच ठिकाणीं बसण्यासारखें जर कोणतेंहि स्थळ असेल तर तें शिवछत्रपतींचें चरित्र हेंच होय, हें शिवछत्रपतींचा उत्सव करणाऱ्या सर्व लोकांनी नेहमी ध्यानांत बाळगावयास पाहिजे. या उत्सवांत मराठे आणि ब्राह्मण, ब्राह्मण अगर परभू अशा प्रकारचा कोणताहि भेद ठेवणें अगदी गैरशिस्त आहे."

गणपति उत्सवावर तर सुधारणापक्षीयांनी आक्षेप घेतलेच होते, पण शिवजयंती उत्सवालाहि नांवें ठेवण्यास त्यांनी कमी केलें नाही. टिळकांनी

आरंभिलेलें किंवा पुरस्कारिलेलें जें जें कार्य असेल त्याच्यांत या मंडळींनी कांही ना कांही खोड काढायची हें आता ठरल्यासारखें झालें होतें. पण हे उत्सव द्रुत वेगाने सर्व महाराष्ट्रांत फैलावले. किंबहुना सर्व हिंदुस्थानांत —फार काय, जगतीतलावर—जिथे जिथे मराठी माणूस तिथे तिथे हे उत्सव साजरे होऊं लागले. समाजमनाची एवढी पकड घेणाऱ्या गोष्टी ज्याने निर्माण केल्या त्याचें प्रतिभासामर्थ्य कांही अलौकिक होय यांत शंका कसली ?

## मंडपाचा वाद

प्रांतिक परिषदा आणि राष्ट्रीय महासभा (कांग्रेस) ह्यांना सुशिक्षित समाजाच्या राजकीय आकांक्षा व्यक्त करण्याचीं द्वारें एवढेंच महत्त्व त्या काळीं होतें. एवढी गोष्टहि कांही कमी नव्हे, अशा बुद्धीने टिळक या संस्थांच्या कार्यांत आस्थेने भाग घेत असत. इ. स. १८८९ पासून प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनांत टिळक भाग घेऊं लागले; कांही काळ ते तिचे सेक्रेटरी होते. कांग्रेसला ते १८८९ सालीं प्रथम हजर राहिले व त्यानंतर सहसा त्यांनी कांग्रेस चुकविली नाही. १८९५ सालीं कांग्रेस पुण्याला बोलाविली होती. तिची व्यवस्था करण्यासाठी जी प्रोव्हिजनल वर्किंग कमिटी नेमण्यांत आली तिच्यांत टिळकपक्ष व रानडेपक्ष दोघांची मंडळी घेण्यांत आली होती. दोघांनी एकोप्याने काम करून कांग्रेस तडीला न्यावी अशी सुरवातीची योजना; ती सिद्धीला जाण्यास कांही अडचण नव्हती. पण पुण्यांतील पुराणमताभिमानी पक्षाने सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरूं देऊं नये असा वाद सुरू केला. राष्ट्रीय सभा ही सर्व जाती, धर्म, पंथ यांची आहे; पण सामाजिक परिषद ही फक्त कांही विशिष्ट सामाजिक व धार्मिक मतें असलेल्या थोडक्याशा लोकांची आहे. त्या लोकांचीं मतें मान्य नाहीत असे कितीतरी लोक राष्ट्रीय सभेंत आहेत. सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरूं दिल्याने सामाजिक परिषदेच्या एकंदर कार्याला या सर्वांची संमति आहे असा अप्रत्यक्ष ध्वनि निघतो, यास्तव परिषदेला राष्ट्रीय सभेच्या मंडपांत जागा देऊं नये, असा पुराणमताभिमान्यांनी आग्रह धरला. उलट बाजूने सुधारणापक्षीयांचाहि

आग्रह पडला. अशा ओढाताणींत वर्गणी जमविणें व इतर काम करणें कठीण होऊं लागलें.

टिळक या वादांत सुरवातीपासून नव्हते. पण दोन्ही बाजूंनी चळवळीची तीव्रता वाढत चालली तेव्हा परिषदेला मांडव देऊं नये असें म्हणणाऱ्यांच्या बाजूला सयुक्तिकता अधिक आहे असें वाटून ते त्या पक्षाला वळले. तेव्हा हीं भांडणें मुंबईच्या मुख्य स्टँडिंग कमिटीकडे गेलीं. तिने नेमलेल्या मुखत्यारांच्या आग्रहावरून टिळकांना कांग्रेसच्या चिटणीसपदाचा राजीनामा द्यावा लागला.

वादाच्या किचकट तपशिलांत शिरण्याचें कारण नाही. इथे लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही की टिळकपक्ष आणि रानडेपक्ष यांच्यामधील ही दुसरी झटापट होय. हिच्यांत विजय कोणाचा झाला हा प्रश्न महत्त्वाचा नाही. इकडे टिळकांनी राजीनामा दिला तर तिकडे रानडे यांनी सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरविण्याचा बेत रद्द केल्याचें जाहीर केलें. टिळकांच्या चारित्र्याच्या दृष्टीने यांत लक्षांत घेण्याजोगी गोष्ट ही की व्यक्तीची प्रतिष्ठा आणि सार्वजनिक हित यांच्यांत विरोध उत्पन्न होण्याचा प्रसंग आला असतां टिळक स्वतःच्या प्रतिष्ठेचा बळी द्यायला तयार झाले. राजीनामा न देण्याचा हेका ते धरूं शकले असते. त्यामुळे वर्किंग कमिटींत अधिक बखेडा माजला असता व कांग्रेस कदाचित पुण्याहून दुसऱ्या शहरीं नेण्यांत आली असती. अर्थात यामुळे सर्व विचका झाला असता व इतरांच्या बरोबर टिळकांचेंहि तोंड काळें झालें असतें. पण टिळक स्वाभिमानी असले तरी अहंकारी नव्हते. ज्या उदात्ततेने त्यांनी डे. ए. सोसायटी सोडली तीच त्यांच्या अंगची उदात्तता इथे पुन्हा प्रकट झाली.

पुण्याच्या या बखेड्याचा एक मात्र परिणाम झाला. पुण्याच्या बातम्या बाहेर पाठविण्याचें तंत्र बहुतांशीं सुधारणापक्षीयांच्या हातीं होतें. बाहेर ज्या बातम्या गेल्या त्यामुळे परप्रांतीयांचा असा समज झाला की टिळक हे अगदी कट्टर व हेकड पुराणमताभिमानी गृहस्थ असले पाहिजेत. कांग्रेस होऊन गेल्यानंतर रिकामा मंडप सामाजिक परिषदेसारख्या पूर्वीपासून कांग्रेसबरोबर चालत आलेल्या संस्थेला देणें ही साधी निरुपद्रवी गोष्ट, त्यांत इतका हट्ट धरण्याचें काय कारण ?

## सार्वजनिक सभा काबीज केली

याच सुमारास इतर आघाड्यांवर देखील टिळकपक्ष आणि रानडेपक्ष यांच्यांत लढे चालू होते. केवळ बहुजनसमाजामध्येच नव्हे, तर सुशिक्षित मध्यमवर्गीयांमध्ये देखील टिळकांची लोकप्रियता सारखी वाढत होती. १८९५ सालीं मध्यभागाच्या लोकल बोर्डांतर्फे मुंबईच्या कायदेकौन्सिलाचा सभासद निवडण्यासाठी खुद्द टिळक आणि रानडेपक्षाचे उमेदवार जटार यांच्यामध्ये चुरशीची स्पर्धा झाली. सामना तिरंगी होता, तो टिळकांनी जिंकला. दुसरी आघाडी सार्वजनिक सभेची. पंचवीस वर्षे सतत काम करून जनतेचीं गाऱ्हाणीं आणि राजकीय प्रश्नांवरील जनतेचें मत सरकारपुढे मांडणारी महाराष्ट्रांतील सर्वमान्य राजकीय संस्था म्हणून सार्वजनिक सभेने लौकिक मिळविला होता. विचारपरिप्लुत लेखांनी भरलेलें त्रैमासिक सभेच्या मार्फत निघत असे, त्यामुळे सभेच्या वजनदारपणांत व कीर्तींत भर पडलेली होती. टिळकांचा पक्ष जसजसा संख्येच्या व कर्तृत्वाच्या दृष्टीने वाढत होता, तसतसें त्याला या संस्थेमध्ये आपलें बहुमत प्रस्थापित व्हावें असें वाटणें साहजिक होतें. ज्या काळांत लोकमत फारसें प्रभावी झालेलें नव्हतें, अशा काळांत कांही प्रतिष्ठित विचारवंतांनी पुढे होऊन अशा संस्था चालविल्या हें ठीक झालें. पण आता प्रभावी लोकमत तयार झालें असतांना त्याचा शिरकाव संस्थेच्या कामकाजांत होऊं नये ही गोष्ट टिळक पक्षाला बोचूं लागली होती. हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांच्या बाबतींत चालकांच्या एकतंत्रीपणाचा अनुभवहि आला होता. तेव्हा १८९५ सालीं टिळकपक्षाने सभेंत आपलें बहुमत करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. ता. १४ जुलै रोजीं भरलेल्या वार्षिक साधारण सभेंत टिळकपक्षाचें बहुमत होऊन कार्यकारी मंडळ त्याच्या मतानुसार निवडण्यांत आलें. त्यांनी चिटणिसाच्या जागीं गोखले यांना कायम ठेवलें, बाकीचे सर्व पदाधिकारी व कार्यकारी मंडळांतील बहुतेक लोक आपल्या पक्षाचे निवडले. अशा परिस्थितींत गोखले फार दिवस चिटणीसपदीं टिकणें शक्य नव्हतें. मार्च १८९६ मध्ये त्यांनी रजा घेतली व आगष्ट १८९६ मध्ये राजीनामा दिला. १८९६ च्या वार्षिक सभेंत प्रा. शिवराम महादेव परांजपे (१८६४-१९२९)

यांना सभेचे चिटणीस निवडण्यांत आलें. त्रैमासिकाच्या संपादकाच्या जागीं महादेव राजाराम बोडस यांची नेमणूक झाली. याप्रमाणे एका वर्षाच्या अवधींत सभेचें पक्षांतर पूर्ण झालें.

## सवत्यासुभ्याची चिरड

या दांडग्या क्रांतीसंबंधाने वृत्तपत्रांत वाद होऊन आरोप प्रत्यारोपांची झटापट उडावी, यांत विशेष कांही नव्हतें; पण न्या. रानडे यांनी आपल्या शिष्यांच्या इच्छेला मान देऊन त्यांच्याकरिता डेकन सभा नांवाची संस्था काढण्याचें मुक्रर केलें आणि त्या संस्थेच्या प्रसिद्धिपत्रकांत सार्वजनिक सभेच्या नव्या चालकांना पर्यायाने जहाल ( firebrand ) म्हणून स्वतः-च्या नेमस्तपणाचा ( moderation ) महिमा गायिला, तेव्हा टिळक चिडले. या चिडलेल्या मनःस्थितींत त्यांनी 'म्हातारचळ कां पोरखेळ' हा लेख लिहून अतिशय कडक भाषेंत रानडयांची हजेरी घेतली. टिळकांचे शब्द कदाचित वाजवीपेक्षा अधिक कडक पडले असतील, परंतु त्यांच्या टीकेच्या बुडाशीं एक महत्त्वाचें तत्त्व होतें. लोकमताचें प्रतिनिधित्व करूं इच्छिणाऱ्या कोणत्याहि संस्थेंत एका विशिष्ट पक्षाने अथवा गटाने जर आपलें बहुमत प्रस्थापित करून ती संस्था काबीज केली, तर अल्पमतवाल्या गटाने लगेच फुटून निघून आपला सवतासुभा प्रस्थापित करणें हा रास्त मार्ग नव्हे, जुन्या संस्थेंतच राहून जनतेला आपलें मत पटवून देऊन त्या संस्थेमध्ये आपलें बहुमत करून घेणें हा सरळपणाचा मार्ग होय. अशानेच लोकशाहीच्या व सुव्यवस्थित राष्ट्रीय जीवनाच्या परंपरा देशांत निर्माण होऊं शकतील. विशेषतः पारतंत्र्यावस्थेंत, जेथे सरकार आपसांतील दुहीचा फायदा घेण्यास टपलेलें आहे, तिथे आम्ही तेवढे सोज्वळ व नेमस्त आहों आणि आमचे प्रतिस्पर्धी जहाल व आततायी आहेत असें सूचित करणें हें तर अतिशय निंद्य समजलें पाहिजे. स्वतः सरकारची मर्जी संपादन करण्या-साठी प्रतिस्पर्ध्याला चिरडण्यास सरकारला आवाहन करण्यासारखाच हा प्रकार होय. आणि याचीच टिळकांना अतोनात चिरड आली. या एकंदर घटनेस अनुलक्षून आचार्य जावडेकर यांनी जो अभिप्राय व्यक्त केला तो योग्य वाटतो.

" टिळकांनी या वेळीं रानडयांच्यावर जी टीका केली, तिच्या बुडाशीं एक अत्यंत महत्त्वाचें तत्त्व होतें आणि त्या टीकेंतील भाषा कितीहि कडक असली तरी ज्या तत्त्वाचा पुरस्कार त्यांनी या लेखांत केला आहे तें तत्त्व जर हिंदी राजकारणांत पाळिलें गेलें असतें तर त्याचें पाऊल एक पिढीने तरी खास पुढे पडलें असतें. मागील पिढीने स्थापन केलेली राजकीय संस्था पुढील पिढीने बहुमताच्या जोरावर आपल्या हातीं घेतली असतां जुन्या पिढीने जर बहुमताच्या निर्णयाला झुगारून आपलें राजकारण चिरंतन करण्यासाठी स्वतंत्र राजकीय संस्था काढल्या तर राष्ट्रांत एकी राहावी कशी आणि राष्ट्राची शक्ति संघटित होऊन तिचा प्रभाव परकीय सत्तेवर पडावा कसा ? न्यायमूर्तींचें त्या वेळचें कृत्य राष्ट्रीयत्वाच्या विकासास आणि लोकसत्तेच्या तत्त्वांस पूर्णपणें हरताळ फासणारें आणि वाढत्या राष्ट्रवृक्षावर दुहीच्या विषरसाचें सिंचन करणारें होतें. "*

टिळकांनी सार्वजनिक सभेसाठी कार्यकर्त्यांचा जो संच जमविला होता तो तरुण, विद्वान व तरतरीत असाच होता. कर्तृत्वाच्या बाबतींत जुन्या कार्यकारी मंडळाच्या तुलनेने नव्याला नांव ठेवायला जागा नव्हती. सभेचे मुख्य चिटणीस शिवराम महादेव परांजपे हे त्या वेळीं नुकत्याच निघालेल्या महाराष्ट्र कॉलेजांत संस्कृतचे प्राध्यापक होते. ते संस्कृतचे पंडित होते. उत्कृष्ट खोचदार शैलीचे लेखक, प्रभावशाली वक्ते आणि स्वातंत्र्यवादी जहाल देशभक्त म्हणून त्यांनी पुढे मोठी कीर्ति मिळविली. चेअरमन अण्णासाहेब पटवर्धन हे आध्यात्मिक प्रवृत्तीचे सर्वांस आदरणीय असे देशभक्त होते. सहचिटणीस अ. सी. साठे हे तरुण विद्वान प्राध्यापक असून गोड वक्ते होते. केवळ सार्वजनिक सभेच्या बाबतींतच नव्हे तर आपल्या इतर कार्यांच्या पसाऱ्यामध्येहि तरुण, सुयोग्य असे मदतनीस मिळविण्याचा प्रयत्न टिळकांनी चालविला होता. त्यांचे डावे उजवे हात समजले गेलेले न. चिं. केळकर आणि कृ. प्र. खाडिलकर हे १८९६ सालींच त्यांना येऊन मिळाले. पुढे लवकरच येणाऱ्या संकटाकरिता जणू आगाऊ

---

* ' आधुनिक भारत ', आक्टोबर १९३८, पृ. ३३१.

तरतूद म्हणूनच की काय नियतीने हे दोन लेखनपटु, कर्तबगार, निष्ठावंत तरुण टिळकांच्याकडे पाठवून दिले.

## दुष्काळांतील जागृतिकार्य

इ. स. १८९६ चा उत्तरार्ध आणि १८९७ चा पूर्वार्ध मिळून एक वर्षभर टिळकांनी जें काम केलेलें दिसतें तें पाहून तोंडांत बोट घालावेंसें वाटतें. त्यांच्या कार्यशक्तीचा कधी अंत लागला नाही; तसेंच त्यांचें धैर्य कधी हटलें नाही व मेंदू कधी थकला नाही. जें जें काम अंगावर पडेल तें तें पार पाडून पुन्हा नवीन काम अंगावर घ्यायला ते सदोदित तयार असत. १८९६ च्या उत्तरार्धांत सर्व महाराष्ट्रभर दुष्काळाने आपलें उग्र स्वरूप प्रकट केलें. वीस वर्षांपूर्वी १८७६ सालच्या दुष्काळाच्या वेळीं सार्वजनिक सभेने जी संस्मरणीय कामगिरी बजावली तशीच किंबहुना त्याहिपेक्षा नमुनेदार व उपयुक्त अशी कामगिरी त्याच सार्वजनिक सभेमार्फत आपण करून दाखवूं अशी उमेद टिळकांनी धरली.

वीस वर्षांपूर्वीच्या परिस्थितींत आणि या वेळच्या परिस्थितींत एक फरक झालेला होता आणि तो जनतेला अनुकूल होता. पूर्वीच्या दुष्काळांत झालेल्या गवगव्यानंतर सरकारने 'फॅमिन रिलीफ कोड' ( दुष्काळ मदत नियमावलि ) नांवाचा कायदा केला होता आणि दुष्काळ पडल्यास त्याच्या निवारणाकरिता पैशाची टंचाई पडूं नये म्हणून दरवर्षी फॅमिन रिलीफ फंड (दुष्काळ मदत निधि) नांवाची स्वतंत्र गंगाजळी स्थापून दरसाल विम्याच्या हप्त्याप्रमाणे तिच्यांत ठराविक रकम टाकायची असा ठराव केला होता. म्हणूनच यासंबंधाने लिहितांना टिळकांनी म्हटलें,

> "दुष्काळांत प्रजेचें राजाने संरक्षण केलेंच पाहिजे. त्यांतून आमच्या सरकारने आमच्याकडून पैसे घेऊन दुष्काळाचा विमा उतरिला आहे; त्यामुळे तर दुधांत साखर पडल्यासारखेंच झालें आहे.... आमचे पैसे सरकाराजवळ आहेत व सरकार आपलें कर्तव्य करण्यास तयार आहे; मग आम्ही उपाशीं मेलों तर त्याचा दोष आमचेकडे नव्हे काय?"

हाच युक्तिवाद पुढे वाढवून त्यांनी जनतेचें कर्तव्य काय तें सांगितलें—

"खेडेगावच्या लोकांनी फक्त एवढेंच करावें की, सरकाराने ज्या ज्या गोष्टी करतों म्हणून कबूल केलें आहे तितक्या त्यांच्याकडून पुऱ्या करवून घ्याव्या."*

आणि यांतच टिळकांचें टिळकपण होतें. केसरींतल्या सर्व लिखाणांत, सार्वजनिक सभेच्या सर्व खटाटोपांत टिळकांचें पालुपद हेंच होतें की जनतेने आपले हक्क पूर्णपणे बजावून घ्यावे. दुष्काळांत सुद्धा आपले, आपल्या कुटुंबीयांचे व गुराढोरांचे प्राण वाचविलेच पाहिजेत असें म्हणण्याचा व त्याप्रमाणे करवून घेण्याचा रयतेचा हक्क आहे. चार आण्याखाली पीक आलें असेल तर संपूर्ण सारामाफी, आठ आणेपर्यंत असेल तर अर्धी सारामाफी झाली पाहिजे हा रयतेचा हक्क आहे. आपल्या हक्कांची जाणीव आणि ते बजावून घेण्याची जागृति निर्माण करणें हें टिळकांच्या एतद्विषयक चळवळीचें सार होतें.

आणि नेमकें हेंच सरकारला नको होतें. या दृष्टीने पाहिल्यास शहात्तरच्या दुष्काळाच्या वेळीं सभेने केलेल्या कामगिरींत आणि या वेळीं ती करीत असलेल्या कामगिरींत जमीन अस्मानाचा फरक होता. शहात्तर सालीं परिस्थितीचे संकलित अहवाल व स्वतःच्या सूचना सरकारकडे पाठविणें यापलीकडे सभेने विशेष कांही केलें नव्हतें. शहाण्णव सालीं विश्वप्रयत्न करून टिळकांनी सगळीकडून रान उठविलें. त्यांनी प्रथम फॅमिन रिलीफ कोडाचा सारांश केसरींत छापून प्रसिद्ध केला व त्याचीं पुस्तकें छापून वाटविलीं. या कोडांतील नियमांप्रमाणे सरकारी अधिकाऱ्यांची वर्तणूक होत नसेल तर सभा भरवून सरकारकडे अर्ज करण्यासाठी लोकांना प्रवृत्त केलें. सभेचे एजंट निरनिराळ्या ठिकाणीं पाठवून त्यांच्याकरवीं माहिती आणवून तिच्या आधारें दुष्काळी कामें, सारामाफी वगैरे संबंधाने सरकारकडे आवेदनें पाठविलीं. सर्वांवर कळस म्हणून सभेचे मुखत्यार अनेक ठिकाणीं पाठवून फॅमिन रिलीफ कोडाप्रमाणे आपले हक्क बजावून घ्या, अमुक अमुक आण्यांपेक्षा जर पीक कमी आलें असेल तर सारामाफी

---

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग १, पृ. ५७९.

होणें हा तुमचा हक्क आहे, तो तुम्ही मागून घ्या असा—जवळजवळ करबंदीच्या सदरांत जाऊं पाहणारा—रयतेला उपदेश करण्यास सुरवात केली.

कुठे शहात्तर आणि कुठे शहाण्णव! कुठे ते त्या वेळचे सरकारास सौम्यपणे सूचना करणारे सभेचे अर्ज आणि कुठे हा आजचा 'पीक अमुक आणे नसेल तर सरकारला सारा देऊं नका', असा सभेच्या मुखत्यारांचा प्रचार! त्या वेळीं सभा सरकाराभिमुख होती तर या वेळीं ती लोकाभिमुख झाली होती. सरकार प्रथमपासून सभेच्या आवेदनांना बेपर्वाईचीं उत्तरें देतच होतें. पुढे सभेच्या एका एजंटाने काढलेल्या हस्तपत्रकांत कांही चुकीचीं विधानें होतीं व त्या विधानाबद्दल सभेने खेदहि प्रदर्शित केला नाही, या सबबीखातर सरकारला आवेदनें पाठविण्याचा सभेचा हक्क सरकारने काढून घेतला. अच्युतराव साठे, दत्तोपंत आपटे प्रभृति प्रचारकां-वर सरकारने खटले भरले. त्यांतले कांही लोक सुटले, कांहींना शिक्षा झाल्या.

राजकीय जागृति आणि असंतोष निर्माण करण्याच्या दृष्टीने केवळ चार पांच महिन्यांत टिळकांनी केलेली ही चळवळ इतकी तीव्र व परिणाम-कारक होती की तशा तऱ्हेची चळवळ महाराष्ट्रांतच काय, अखिल हिंदुस्थानांत तावत्कालपर्यंत झाली नव्हती.

## प्लेगोबाची स्वारी

दुष्काळाच्या पावलावर पाऊल ठेवून प्लेग आला. सांध्यांत गाठ येऊन लोक पटापट शेकडयांनी मरूं लागले. या रोगाचा संसर्ग हांगकांगहून प्रथम मुंबईस आला व मुंबईहून तो द्रुत गतीने देशाच्या अंतर्भागांत पसरला. मुंबईच्या प्लेगाची वार्ता कळतांच, त्याचा संसर्ग न जाणो विलायतेंत येऊन पोचेल, अशा आशंकेने विलायतचें सरकार अस्वस्थ झालें. वाटेल तें करून या प्लेगचा शक्य तितक्या लवकर नायनाट करून टाका अशा विलायतेहून तारावर तारा धडकूं लागल्या. तेव्हा रोगबीज नाहीसें करण्यासाठी सरकारने घाबरटपणाने जुलमी, कल्पनाशून्य असे इलाज जबरदस्तीने लोकांवर लादण्यास सुरवात केली. हे उपाय म्हणजे क्वारंटाइन, सेग्रिगेशन आणि डिसइन्फेक्शन असे तीन प्रकारचे असत.

क्वारंटाइन म्हणजे बाहेरगावाहून आलेल्या मनुष्याने गावांत प्रवेश करण्या-पूर्वी रोगसंशयाच्या निवृत्तीसाठी कांही दिवस एकीकडे, निराळ्या जागीं राहणें; सेग्रिगेशन म्हणजे प्रत्यक्ष रोग झालेल्या माणसाला अलग करून इस्पितळांत रवाना करणें आणि त्याच्या कुटुंबियांना सेग्रिगेशन कँपांत (विलगीकरण छावणीमध्ये) कांही मुदतीपर्यंत ठेवणें; आणि डिसइन्फेक्शन म्हणजे रोगी ज्या घरांत असेल तें घर साफ, निर्जन्तुक करणें. या गोष्टी रोगनाशाच्या दृष्टीने तत्त्वतः ठीक होत्या, आणि त्यांचें केसरींतून टिळकांनी समर्थनहि केलें. पण त्यांच्या अंमलबजावणींत जुलमाचा व सडेसोटपणाचा कहर झाला. रँड नांवाचे कल्पनाशून्य आय. सी. एस. गृहस्थ ता. १७ फेब्रुवारी १८९७ रोजीं पुण्याचे प्लेग कमिश्नर नेमले गेले. त्यांच्या हाताखाली वरील कामें करण्याकरिता गोऱ्या सोजिरांची पार्टी देण्यांत आली. त्यांनी कसा धिंगाणा घातला, याचें वर्णन स्वतःच्या शब्दांनी देण्यापेक्षा त्या वेळचे सुधारक पत्रांतील उतारे टिळक चरित्रांत देण्यांत आले आहेत त्यांतील कांही अंश इथे देणें अधिक बरें.

"इंग्रज सरकारचे अंमलदार इतके बेगुमान होतील असें कधी वाटलें नव्हतें! परंतु ब्यूबॉनिक प्लेग म्हणजे आजार नव्हे, सोजरांचें पेंढार आहे असें म्हणावें लागत आहे! पाहिजे त्यांचीं घरें फोड, पाहिजे त्या जिनगीची अफरातफर कर, पाहिजे त्या ठिकाणीं धिंगाणा घाल, पाहिजे त्याचा हात धर, आणि हवें त्याला ओढीत ने, ही का घरतपासणी, का लोकांची थट्टा? अर्जांची दाद नाही, फिर्यादीची फिकीर नाही,... अशीच रँडसाहेबांच्या यमदूतांपैकी कित्येकांची वागणूक आहे."

"इतक्या दिवस चोरीवरच भागत होतें पण आता बायकांच्या अंगावर हात टाकण्यापर्यंतहि मजल येऊन ठेपली आहे! आणि इतके सारे प्रकार घडत असून आमचे लोक पाहावे तों आपले शांत! खरोखर आमच्या लोकांसारखे नामर्द लोक पृथ्वीच्या पाठीवर कोठेहि सापडणार नाहीत असें मोठ्या शरमेने कबूल केलें पाहिजे!"*

---

* लो. टिळक यांचें चरित्र, पूर्वार्ध, पृ. ५३६.

टिळक एकसारखे कार्यमग्न होते. दुष्काळासंबंधीच्या कामाबरोबरच प्लेगच्या जुलमाबाबत अर्ज करणें, विधायक सूचना करणें, तक्रारी योग्य अधिकाऱ्यांकडे पाठविणें हींहि कामें चाललीं होतीं. याखेरीज विधायक स्वरूपाच्या लोकसेवेच्या गोष्टी त्यांनी अनेक केल्या. व्यापाऱ्यांचें मन वळवून पुणें शहरांत दुष्काळपीडित लोकांकरिता त्यांनी स्वस्त धान्याचीं दुकानें काढविलीं, तसेंच प्लेगपीडित लोकांकरिता लोकांच्या प्रयत्नांनी त्यांनी एक सार्वजनिक इस्पितळ उभें केलें. त्याचा मध्यमवर्गीयांना बराच उपयोग झाला. केसरींतून अन्याय, जुलूम यांविरुद्ध कडक टीका चालूच होती. दुष्काळाबाबत 'पोलिसाच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्यांत भरलेली रयतेची जंगी सभा' अशा मथळयाचे लेख ते लिहीत होते, त्याप्रमाणे प्लेगच्या जुलमी व्यवस्थेबाबत 'पुण्यांत सध्या चालू असलेला धूमाकूळ' असे लेख लिहून निर्भीड टीकेबरोबरच विधायक सूचनाहि करीत होते. लोकांचीं अंतःकरणें चेतविलीं जात होतीं. पण टिळक आपल्या समजुतीने कायद्याच्या कक्षेच्या आंत राहून सर्व लिखाण करीत होते.

## भवितव्यतेने बार भरला

टिळकांच्या समजुतीचा कांही उपयोग नव्हता. भवितव्यतेने बार भरून तयार ठेवलेला होता. व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त ता. २२ जून १८९७ रोजीं पुण्यांत गव्हर्नमेंट हाउसवर (सध्या पुणें विद्यापीठ वसलें आहे त्या इमारतींत ) बडा खाना झाला, तेथून प्लेग कमिशनर रँड घोडयाच्या गाडींतून परत जात असतां मध्यरात्रीं त्याचा खून झाला! पुण्यावर जादा पोलीस बसविण्यांत आले, पुण्याच्या कलेक्टरने प्रतिष्ठित लोकांना बोलावून त्यांच्यासमोर धमकीचें भाषण केलें आणि वृत्तपत्रकारांवर आग पाखडली! टिळकांनी 'सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय?' (६-७-९७) आणि 'राज्य करणें म्हणजे सूड उगविणें नव्हे' (१३-७-९७) असे लेख केसरींत लिहिले. रँडशाहीच्या जुलमाचा कांही पुरावा गोळा करून तो मुंबईच्या इंग्रजी पत्रांतून छापविण्याच्या उद्देशाने टिळक मुंबईस गेले असतां ता. २७ जुलै रोजीं रात्रीं राजद्रोहाच्या आरोपावरून त्यांना पकडण्यांत आलें!

जामिनावर सोडविण्याचा प्रयत्न करून तो फसल्याचें सांगण्याकरिता टिळकांचे मित्र दाजीसाहेब खरे पोलिस कोठडीमध्ये त्यांना भेटण्यासाठी गेले तों टिळक गाढ झोपले असल्याचें त्यांना आढळून आलें !

अखेर न्या० बदरुद्दिन तैयबजी यांनी टिळकांना जामिनावर सोडल्यावर टिळक पुण्यास आले. लोकांकरिता तनमनधनाने झिजणारे टिळक स्वतः निष्कांचन होते. ताबडतोबीच्या खर्चाकरिता त्यांचे स्नेही वासूकाका जोशी यांनी कोणाकडून शंभर, कोणाकडून दोनशे, अशा किरकोळ रकमा उसनवार घेऊन कांही भरती केली. मित्रांनी केसरींत जाहीर विनंती करून बचावफंड सुरू केला. खटल्यांत आपल्याला शिक्षा होणार, त्यांतून सुटून कदाचित आपण परत येऊं न येऊं, असें वाटून टिळकांनी आपलें मृत्युपत्र केलें. आपली सांपत्तिक स्थिति, कैदेंत बरेंवाईट झाल्यास सर्व गोष्टींची होणारी वाताहत यांचें चित्र डोळयापुढे येऊन मृत्युपत्र सांगणारे टिळक आणि लिहिणारे बाबा विद्वांस या दोघांच्याहि डोळयांतून अश्रु ओघळले !

खटल्याचा विशेष तपशील इथे देण्याचें कारण नाही. मुंबई हायकोर्टापुढे ता. ८ सप्टेंबर रोजीं खटला सुरू झाला तो ता. १४ रोजीं आटोपून न्यायाधीशांनी आरोप शाबीत धरून टिळकांना ‘ फक्त ’ अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा सांगितली.

टिळकांना प्रथम मुंबईस भायखळयाच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें. त्या वेळच्या कैदखान्यांतील हालांची आज कोणास कल्पना होणें शक्य नाही. जेलमधील अन्न म्हणजे जाडीभरडी भाकरी ! तिचा वरचा पापुद्रा केवळ पाण्यांत कुसकरून टिळक खात असत. दोन महिन्यांत त्यांचें वजन तीस पौंड कमी झालें. अशा स्थितींत टिळक तुरुंगांतून जिवंत बाहेर पडतात की तिथेच त्यांचा अंत होतो याची त्यांच्या आप्तेष्टांना चिंता वाटूं लागली. कैदखान्यांच्या सुधारणेसाठी स्थापन झालेल्या इंग्लंडांतील भूतदयावादी हॉवर्ड सोसायटीला टिळकांची ही स्थिति कळविण्यांत आली. टिळकांच्या ओरायन या ग्रंथावरून त्यांची योग्यता मॅक्सम्युलर या विख्यात वैदिक पंडिताला माहीत झाली होती. त्यांच्या व इतर कित्येक विद्वान, उदार मनाच्या इंग्रज गृहस्थांच्या आणि दादाभाई नौरोजी, रमेशचंद्र दत्त वगैरे विलायतेंत असलेल्या हिंदी गृहस्थांच्या सह्यांनिशी टिळकांच्या सुटकेसाठी हिंदु-

स्थानच्या स्टेट सेक्रेटरीकडे फेब्रुवारी १८९८ मध्ये एक अर्ज करण्यांत आला. या वजनदार अर्जाचा तात्कालिक परिणाम हा झाला की टिळकांना भायखळ्याहून पुण्यानजीक यरवडा जेलमध्ये हलविण्यांत आलें व तेथे त्यांना अन्न जरा चांगलें देण्यांत येऊन विश्रांतीच्या व वाचनाच्या कांही सवलती देण्यांत आल्या. टिळकांना कोणत्या अटींवर सोडतां येईल याचाहि विचार सुरू झाला. विलायतेंतील वजनदार लोकांचा अर्ज हें एक त्याचें कारण होतेंच. पण रँडचा खून करण्याबद्दल दामोदर चाफेकर यास पकडण्यांत येऊन त्याच्यावर आरोप शाबीत होऊन त्यास फाशीची शिक्षाहि झाली होती. ( फेब्रु. १८९८ ). त्याच्या चौकशींत टिळकांशीं खुनाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध जोडतां येईल असें कांहीहि मिळालें नाही. त्यामुळे टिळकां-विषयीचें वातावरण निवळण्यास बरीच मदत झाली. सरकार टिळकांकडून 'यापुढे मी राजकीय चळवळ करणार .नाही ' असें अभिवचन मागत होतें. तें अर्थात टिळकांनी देणें कधी शक्य नव्हतें. अखेर या अटीबद्दलचा आग्रह सरकारने सोडला व मंगळवार ता. ६ सप्टेंबर १८९८ रोजीं रात्रीं १० वाजतां टिळकांची सुटका होऊन टिळक घरीं आले.

## खटल्याची थोडी मीमांसा

टिळकांवर खटला करण्यांत आला तो रँडच्या खुनाच्या बुडाशीं एखादा कट असून त्यांत टिळकांचें अंग असावें या संशयावरून करण्यांत आला, अशी एक समजूत त्या वेळीं सर्वत्र पसरली होती. आता ऐति-हासिक दृष्टीने या खटल्याकडे पाहतां सरकारने अत्यंत धूर्तपणाने उठविलेली ही हूल असावी असें दिसतें. हा संशय जागृत करून वातावरण गढूळ करण्यांत सरकारचा हेतु टिळकांना न्यायाधीशाकडून संशयग्रस्त मनःस्थितींत जास्तींत जास्त कडक शिक्षा ठोठावली जावी असा असला पाहिजे. रँडचा खून झाला नसता तरी टिळकांवर खटला हा झालाच असता. खटला करण्यासाठी निवडलेले केसरींतील लेख अगदी किरकोळ असून त्यांत खुद्द टिळकांनी लिहिलेलें कांही नव्हतें, आणि मुख्य गोष्ट ही की हे सर्व लेख एप्रिल व मे मध्ये केसरींत प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर प्लेगच्या व्यवस्थे-संबंधी टिळकांवर हा खटला होण्यास त्या वेळच्या सुधारक उर्फ नेमस्त

पक्षांतील कांही लोक कारणीभूत झाले असावेत असा लोकांचा संशय होता. खटल्यापूर्वी टाइम्समध्ये 'जस्टिस' या टोपण नांवाने एक चिथावणीचें पत्र प्रसिद्ध झालें होतें. त्याचा लेखक कोण याचा शेवटपर्यंत उलगडा झाला नाही. पण खुद्द टिळकांना या संबंधांत कांही तरी निश्चित कल्पना असावी असें दिसतें. केसरी पुन्हा हातीं घेतांना त्यांनी 'पुनश्च हरिः ॐ' म्हणून लेख लिहिला त्यांत ते म्हणतात—

> "सरकारची वक्रदृष्टि १८९७ सालीं कांही वर्तमानपत्रकर्त्यांकडेसच लागण्यास कोणी तरी मध्यंतरीं 'आगींत तेल ओतणारे गृहस्थ' कारणीभूत झाले असावेत असें वाटणें स्वाभाविक आहे, व त्याप्रमाणे स्थितिहि आहे असें आम्हांस मोठ्या दुःखाने म्हणावें लागतें. पुण्यांत ज्या वेळीं मॉडरेशनचें नवीन पोलिटिकल स्कूल निघालें त्या वेळींच याचें पर्यवसान अशा प्रकारें होईल अशी आम्हांस वाटलेली धास्ती आम्ही प्रदर्शित केलेली होती." *

हे आगींत तेल ओतणारे गृहस्थ कोण असावेत, याचा पत्ता लागत नाही. तथापि टिळकांना त्यांची कल्पना होती व त्यासंबंधाची त्यांच्या मनांत पक्की अढी बसून गेली होती हें आठ वर्षांनंतर १९०५ सालीं गुप्तपोलीस आफिसर ब्रुइनसाहेब यांच्या मृत्यूवर लेख लिहितांना टिळकांच्या हातून "किंबहुना या वेळीं (१८९७ सालीं) साहेब लोकांकडे जाऊन खोट्या चहाड्या सांगणारे बडे लोक आपल्यांतच निघाले" असें वाक्य पडलें, यावरून दिसून येतें.

त्या वेळचे लोक, ते पक्षभेद, तीं वैरें, सर्व काळाच्या उदरांत विलीन झालें आहे. ती वृत्ति आपल्यांत अझून आहे की काय, याचें परीक्षण करण्याकडे मन वळवावें, इतकाच उद्देश या गोष्टीचा इथे उल्लेख करण्यांत आहे. साहेब गेला व त्यामुळे परकी राज्यकर्त्यांकडे चहाड्या करण्याचें जें अति घृणास्पद स्वरूप या दुर्गणाचें होतें तें कमी झालें असेल. पण

> "एका हिंदूने त्याचा आणि दुसऱ्याचा कांही बाबतींत मतभेद असला म्हणून आपल्या प्रतिपक्षाच्या लेखाचा विपर्यास करून...तो

* लो० टिळकांचे केसरींतील लेख, भाग २, पृ. ७.

खड्ड्यांत पडला म्हणजे आनंद मानणें यासारखें अश्लाघ्यपणाचें दुसरें कृत्य नाही.” *

हें पटून त्याप्रमाणे प्रत्येकाचें आचरण निरपवाद होण्याइतकी भारतीयांची, विशेषतः आपणा मराठी लोकांची, दानत वाढली आहे की नाही हा आजहि विचार करण्याजोगा प्रश्न आहे. असो.

टिळक सुटल्याने जणू कांही आपलें मेलेलें प्रिय माणूस जिवंत होऊन पुन्हा भेटावें, तसा आनंद लोकांना झाला. कित्येकांनी पक्वान्नें करून खाल्लीं, कांही जणांनी सुटकेसाठी केलेले नवस फेडले. जनतेच्या हृदय-सिंहासनावर अधिष्ठित झालेली ही वामनमूर्ति तेथून ओढून काढण्यासाठी परकी नोकरशाहीने जंग जंग पछाडले. पण असल्या प्रयत्नांनी तिचें आसन अधिक दृढ मात्र होत गेलें.

तुरुंगवासाने टिळकांची प्रकृति इतकी खालावली होती की कांही काळ विश्रांति घेतल्याखेरीज आपलें नियत कार्य हातीं घेणें त्यांना शक्य नव्हतें. त्यांनी नवीन संपादन केलेले तरुण मदतनीस न. चिं. केळकर व कृ. प्र. खाडिलकर यांनी मोठ्या धैर्याने अडचणींना तोंड देऊन केसरी चालू ठेवला होता. ‘ सांधा बेमालूम जडविल्या ’चें शिफारसपत्र टिळकांकडून मिळविण्याइतकें लेखनकौशल्य त्यांनी प्रकट केलें होतें. तेव्हा त्यांच्याच हातीं केसरी व मराठा हीं पत्रें टिळकांनी कांही काळ ठेवलीं. या सालच्या अखेरीस मद्रासेस कांग्रेस भरली तिला ते हजर राहिले व तेथून आपले मित्र वासुदेवराव जोशी यांना बरोबर घेऊन रामेश्वर, लंका इ० स्थळांचा प्रवास करून महिन्याभराने ते परत आले. अजून विश्रांतीची आवश्यकता होतीच. तथापि मधून मधून केसरींत लिहिण्यास त्यांनी सुरवात केली. अखेर ४ जुलै १८९९ पासून प्रसिद्धपणे केसरी त्यांनी हातीं घेतला. आणि ‘ पुनश्च हरिः ॐ ’ असें म्हणून आपल्या चरित्रांतील नवीन प्रकरणास सुरवात केली.

---

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग २, पृ. ७

# १०. हृदयेनापराजितः

## पूर्वी करीत आलों तेंच पुढे !

'टिळकांच्या खऱ्या कारकीर्दीला आणि त्यांनी मरेपर्यंत चालविलेल्या द्विदशवार्षिक युद्धाला सन १८९९ सालापासूनच सुरवात झाली' असें टिळकांच्या चरित्रकारांनी म्हटलें आहे. वास्तविक गोष्ट अशी दिसते की त्यांच्या खऱ्या कारकीर्दीला १८९२ पासूनच सुरवात झाली होती आणि १८९९ पासून पुढे जें त्यांनी केलें तें 'मागील अंकावरून पुढे चालू' असें होतें. वृत्तपत्राच्या बातमीदाराने १८९९ च्या प्रारंभीं 'आता आपण यापुढे काय करणार ?' असा प्रश्न विचारिला असतां 'मी आजवर पूर्वी जें करीत आलों तेंच पुढेहि करणार' असें टिळकांनी उत्तर दिलें. आणि तेंच खरें होतें. सन १८९२ ते ९७ पर्यंत टिळकांनी केलेलें कार्य इतकें तेजस्वी आणि महत्त्वपूर्ण आहे की त्याच्या खेरीज त्यांच्या पुढच्या आयुष्याची कल्पनाच करतां येत नाही. पुढच्या काळांत ज्या ज्या गोष्टी त्यांनी केल्या किंवा जीं जीं तत्त्वें प्रतिपादिलीं त्याच गोष्टी किंवा तींच तत्त्वें त्यांच्या १८९७ पर्यंतच्या आयुष्यांत दिसून येतात. प्रत्यक्ष कृतीचें, किंवा प्रतिकाराचें जें तत्त्व वंगभंगानंतर हिंदी राजकीय चळवळींत शिरलें ( असें मानलें जातें ) त्या तत्त्वाचा अवलंब १८९६ सालीं केलेल्या दुष्काळविषयक चळवळींत टिळकांनी केलेला दिसतो. या चळवळीचा पल्ला त्यांनी करबंदीच्या कल्पनेपर्यंत पोचविला होता हें आपण मागे पाहिलें आहे. हिंदु-मुसल्मानांसंबंधीच्या सरकारी भेदनीतीचा परिस्फोट करून तिचा मुकाबला करण्यासाठी जनतेला तयार करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्वदेशीचें तत्त्व जें पुढे राष्ट्रीय आंदोलनाचें महत्त्वाचें अंग होऊन बसलें त्याचा जोरदार पुरस्कार त्यांनी १८९६ सालीं केला. राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना बीजरूपांत न्यू इंग्लिश स्कूलच्या सुरवातीस टिळकादिक संस्थापकांच्या मनांत होती हेंहि

आपल्याला दिसून आलें आहे. तेव्हा, टिळकांच्या खऱ्या कारकीर्दीला सुरवात केव्हा झाली हें जर पाहायचें असेल तर ती मूळ रूपांत १८८० सालीं आणि पूर्ण व्यक्त स्वरूपांत १८९२ सालीं असें आपणास दिसून येतें. १८९९ सालीं नव्या अंकाला सुरवात झाली, पण तो मागील अंकावरून 'पुढे चालू' होता. १८९७ मधील शिक्षेने त्यांच्या वैयक्तिक प्रख्यातींत फार मोठी भर पडली. प्रत्यक्ष कार्य परिस्थितीनुसार विकसित होत गेलें.

टिळकांच्या भोवती आता एक प्रकारचें तेजोवलय निर्माण झालें होतें. कांग्रेसच्या अधिवेशनासाठी ते जिथे जात तिथे जनतेकडून त्यांचा सत्कार व जयजयकार होऊं लागला. खुद्द कांग्रेसच्या अधिवेशनांत जमलेले प्रतिनिधि टिळकांचें आगमन होतांच त्यांना उत्थापन देत व जयघोष करीत. येतांना जातांना वाटेंत स्टेशनांवर लोक जमून त्यांनी जयजयकार करणें, पानसुपाऱ्या करणें इत्यादि आदर व्यक्त करण्याचे प्रकारहि सुरू झाले. गांधीजींची कारकीर्द सुरू झाल्यानंतरची गोष्ट निराळी; पण त्याच्या अगोदर अखंड बावीस वर्षें अखिल हिंदुस्थानभर एवढी प्रचंड लोकप्रियता अनुभविणारा दुसरा कोणीहि पुढारी झाला नाही. सुप्रसिद्ध विद्वान, सेवानिवृत्त आय. सी. एस. अधिकारी व कांग्रेसचे एक अध्यक्ष बाबू रमेशचंद्र दत्त यांनी कैदेंतून सुटल्यानंतर ता. १३ आक्टोबर १८९८ रोजीं टिळकांना अभिनंदनार्थ पत्र लिहिलें त्यांत ते म्हणतात—

"तुम्ही सोसलेले कष्ट मनांत आले म्हणजे तुमच्यासंबंधाने जी भावना उत्पन्न होते तिचें यथार्थ वर्णन पत्रद्वारा मला करितां येत नाही. तुम्ही अखेरपर्यंत दाखविलेलें धैर्य व उदात्त असा सोशीकपणा वाखाणण्यासारखा आहे. असे गुण अंगीं असून अशीं दुःखें ज्या राष्ट्रांतील लोक सोसतात तींच उदयास येतात....तुमच्याविषयी सर्वत्र इतकी सहानुभूति, आदरबुद्धि व मान्यता प्रकट व्हावी हें पाहून आम्हांलाहि तुमच्याप्रमाणेच धन्यता वाटत आहे. पण या धन्यतेपेक्षाहि तुमच्या हालअपेष्टेच्या स्मरणाने राष्ट्रकार्याला यश येणार हें मनांत आलें म्हणजे हें समाधान दुणावतें."*

---

* टिळक चरित्र, पूर्वार्ध, पृ. ६२४.

हीच भावना अखिल भरतखंडभर, कांही मूठभर लोक सोडल्यास, विद्वान अविद्वान सर्व जनतेची होती.

## मित्रमंडळ आणि प्रभावळ

मित्रमंडळ, अनुयायिमंडळ आणि बाह्य परिवार या बाबतींत एकोणिसावें शतक उलटण्याच्या सुमारास टिळकांच्या परिस्थितींत क्रांतिकारक बदल झाला. जुने स्नेही गेले, नवें अनुयायिमंडळ जमूं लागलें. त्यांचे कांही स्नेही वारले, राजद्रोहाच्या शिक्षेमुळे कांही त्यांच्यापासून दूर झाले, तर उलट त्यांच्या तेजस्वी व त्यागी नेतृत्वामुळे नव्या पिढींतली देशाभिमानी पदवीधर मंडळी त्यांच्याकडे आकृष्ट होऊं लागली. न्यू इंग्लिश स्कूल मधील त्यांचे सहकारी आणि त्यांचे जिवश्च कंठश्च मित्र, महाराष्ट्रांतील औद्योगिक चळवळीचे उत्पादक व चालक महादेव बल्लाळ नामजोशी हे १८९६ सालीं वारले. दुसरे एक त्यांचे निकट स्नेही बाबामहाराज पंडित १८९७ सालीं वारले. कट्टे सनातनी व पुण्यांतील पुराणमताभिमानी पक्षाचे म्होरके सरदार बाळासाहेब नातू हेहि टिळकांच्या सलगीच्या मित्रांपैकी होते. टिळकांना १८९७ सालीं राजद्रोहाच्या आरोपाखाली पकडलें त्याच वेळीं हे व यांचे बंधु तात्यासाहेब या दोघांना सरकारने १८२७ च्या २५ व्या रेग्युलेशनखाली अटक करून कैदेंत ठेवलें. सारख्या तक्रारी व चळवळी केल्यानंतर अडीच वर्षांनी यांना सोडण्यांत आलें. पण त्यानंतर त्यांचा व टिळकांचा विशेष संबंध राहिल्याचें दिसत नाही. तात्पर्य, एकटे वासूकाका जोशी खेरीजकरून बाकीचें त्यांचें जुनें मित्रमंडळ एकोणिसाव्या शतकाबरोबर लोप पावलें.

नवीन जमूं लागलेल्या सहकाऱ्यांमध्ये सुप्रसिद्ध 'काळ' वर्तमानपत्राचे जनक व चालक शिवरामपंत परांजपे (१८६४–१९२९) हे पुढे प्रसिद्धीस आलेल्या सहकाऱ्यांमध्ये ज्येष्ठ व अग्रगण्य होत. अखेरपर्यंत त्यांचे मदतनीस म्हणून असलेले केळकर आणि खाडिलकर हे बाहेरच्या राजकीय कार्यांत त्यांचे अनुयायी म्हणून काम करीत, हें सांगणें नको. संतवाङ्मयाचे श्रद्धावान अभ्यासक आणि रसाळ प्रवचनकार लक्ष्मण रामचंद्र पांगारकर (१८७२–१९४१), मालाकार भोपटकर बंधु, सुप्रसिद्ध हिंदु मिशनरी गजानन भास्कर

वैद्य, कर्नाटकसिंह गंगाधरराव देशपांडे (१८७०– ), नागपूरचे नारायणराव अळेकर आणि डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे, इत्यादि अनेकानेक मंडळी पुण्यांत किंवा पुण्याबाहेरच्या महाराष्ट्रांत, कांही १८९९ च्या पूर्वी तर कांही त्यानंतरच्या चार पांच वर्षांत टिळकांचे अनुयायी, किंवा टिळकपक्षांतले सरदार मानकरी म्हणून प्रसिद्धीस आली. अमरावतीचे गणेश श्रीकृष्ण खापर्डे हे टिळकांपेक्षा वडील आणि साताऱ्याचे रघुनाथ पांडुरंग करंदीकर टिळकांच्या बरोबरीचे. हेहि साधारणपणे १९०१ च्या सुमारास टिळकांकडे आकर्षिले जाऊन त्यांचे सहकारी व भक्त बनले. वऱ्हाडचे सुप्रसिद्ध पुढारी लोकनायक बापूजी अणे हेहि टिळकपक्षाचे एक म्होरके होते.

वर उल्लेखिलेली सर्व मंडळी आपआपल्या परीने कर्तबगार, देशभक्त आणि स्वातंत्र्यवादी संप्रदायांत शोभणारी अशी होती. प्रत्येकाची प्रवृत्ति आणि संस्कार भिन्न असले तरी वरील गुण सगळयांमध्ये समान होते. आणि या गुणांमुळेच टिळकांनी त्यांना जवळ केलें होतें.

लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि ।
[ करीं तूं कर्म लक्षूनि लोकसंग्रहधर्म हि ।]

ह्या गीतेंतील भगवंताचा आदेश निरंतर लक्षांत ठेवून लोकसंग्रहयुक्त कर्मयोग टिळक आचरीत होते. वर उल्लेखिलेल्या व्यक्तींपैकी प्रत्येकाने टिळकांच्या मृत्यूनंतर आपआपला मार्ग निराळा काढला. पण टिळकनिष्ठेचें दृढ बंधन सर्वांना आवळणारें असल्यामुळे टिळकांच्या मृत्यूपर्यंत ही सर्व मंडळी बऱ्याच चांगल्या रीतीने पक्षसंघटनेंत नांदूं शकली.

कांही युक्ति योजणें, गुप्त बातम्या काढणें, किंवा जोखमीच्या मसलती करणें, याकरिता टिळकांची अगदी अंतरंगांतली मंडळी निराळीच असत. टिळकांचे समवयस्क मित्र चित्रशाळेचे मालक वासुदेव गणेश उर्फ वासूकाका जोशी (१८५६-१९४४) हे सुरवातीपासून टिळकांचे अगदी आंतल्या कप्प्यांतले स्नेही व सल्लागार. टिळकांचे भाचे धोंडो वासुदेव उर्फ बाबा विद्वांस हे १८९७ सालीं केसरीची व्यवस्था पाहण्यासाठी पुण्यास आले तेव्हापासून केसरीच्या व्यवस्थापकाचें काम तर त्यांनी उत्तम प्रकारें संभाळलेंच, पण पूर्ण विश्वासू व आज्ञाधारक मदतनीस म्हणून टिळकांची त्यांनी आमरण

सेवा केली. दत्तोपंत बेहेरे व भिकाजीपंत हर्डीकर हेहि पडेल तें काम करणारे टिळकांचे विश्वासू हस्तक असत.

## पुराणप्रियत्वाचा आरोप

एवढें खरें की डे. ए. सोसायटीमधून बाहेर पडल्यानंतर टिळकांनीं जी मित्रमंडळी जोडली ती बहुतेक पुराणमताभिमानी होती. मूठभर सुधारक सोडून बाकीचा सर्व समाज रूढिप्रिय पुराणमताभिमानी होता. राजकीय चळवळ करण्यासाठी या समाजाकडे जाणें, त्याचें नेतृत्व करणें टिळकांना अवश्य होतें. या बहुसंख्य समाजाला आपला समजून त्याच्यांत ते समरस होऊन जात असत. या मित्रांमुळे आणि पुराणप्रिय समाजनेतृत्वामुळे शिंगें मोडून वासरांत शिरणारा, लोकाराधनेसाठी स्वमताचा अपलाप करणारा, आधुनिक पाश्चात्त्य शिक्षणास बट्टा लावणारा इत्यादि अनेक निंदास्पद विशेषणें सुधारणापक्षाकडून टिळकांना लावण्यांत येत असत. टिळकांनी आपल्या खऱ्या मताशीं प्रतारणा केली किंवा ते सवंग लोकप्रियतेच्या मागे लागले असें म्हणण्यास कुठे आधार दिसत नाही. धार्मिक व सामाजिक सुधारणेसंबंधी लिहिण्याचा किंवा बोलण्याचा जिथे जिथे प्रसंग आला तिथे तिथे रानडे, आगरकर प्रभृति सुधारणापंथीयांचे मार्ग चुकीचे आहेत हें सांगतांना 'आम्हांला सुधारणा नको आहेत असें नाही; धर्माभिमान कायम राखून पूर्वपरंपरेचा उच्छेद न करितां सध्याच्या परिस्थितीला अनुसरून अवश्य त्या सुधारणा जरूर कराव्या' असें त्यांनी प्रत्येक ठिकाणीं न चुकतां सांगितलें आहे. पण राजकीय सभांमध्ये व लेखांमध्ये अर्थाअर्थी कांही संबंध नसतांना 'मी सुधारक आहें, मला सुधारणा पाहिजे आहे' असें पालुपद गात बसण्याचें काय कारण ? असला अप्रयोजकपणा त्यांनी केला नाही म्हणून ते ढोंगी ठरतात असें म्हणणें बरोबर नाही.

साधारणपणें १८८० ते १९०० पर्यंतच्या वीस वर्षांत धर्माभिमानाचें व पुराणप्रियतेचें वारें जोरांत होतें. कित्येक सुधारणापक्षीय पुढाऱ्यांची उच्चार-आचारांतील विसंगति, कृतिशून्यता, चिपळूणकरादिकांची टीका इत्यादि कारणांनी सुधारणापक्षाचा बोज कमी झाला होता; त्यांतच जिनसीवाले, टिळक यांच्यासारख्या नवशिक्षितांतील पुढाऱ्यांनी सुधारणापक्षावर

चालू केलेल्या टीकेच्या सरबत्तीमुळे तो नामोहरम झाला. इंग्रजी शिकणाऱ्या नव्या पिढीमध्ये पुराणप्रियता हें देशाभिमानाचें एक कलम होऊन बसलें. या काळांत इंग्रजी शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या पदवीधरांमध्ये धर्माभिमानी पुराणप्रिय वृत्तीची मंडळी जास्त प्रमाणांत निघाली. टिळकांना येऊन मिळालेल्या नव्या अनुयायांमध्ये बहुंवशीं अशाच मंडळीचा भरणा होता. ही मंडळी आपला धर्म व समाजरीति यांमध्ये कांही बदल करावयास पाहिजे हेंच कबूल करायला तयार नव्हती. सुधारक, सुधारणा, पाश्चात्त्य चालीरीती यांची अमर्याद चेष्टा व उपहास करणें हें यांच्या देशभक्तीचें एक कलम होऊन बसलें. गणेशोत्सवांतील व्याख्यान प्रवचनांमध्ये, वृत्तपत्रांतील लेखांमध्ये आणि इतरत्र जिथे साधेल तिथे सुधारणेची चेष्टा करणें आणि आपला पुराणमताभिमान मिरविणें हें हमखास टाळ्या व लोकप्रियता मिळविण्याचें साधन ठरून गेलें. टिळक स्वतः लिहितांना अगर बोलतांना सुधारकांचा उपहास करीत, पण त्याचबरोबर आपणाला कोणच्या तत्त्वानुसार सुधारणा पाहिजे हें सांगण्यास विसरत नसत. तसेंच प्रसंगविशेषीं धर्माभिमानी पक्षाचा दंभ व पोकळपणा उघडकीस आणण्यास ते कमी करीत नसत. पण हें तारतम्य आणि हा समतोलपणा त्यांच्या अनुयायिमंडळाकडून सहसा राखला जात नसे. सुधारणेवर घसारा करणें एवढेंच कर्तव्य त्यांपैकी बहुतेक जण मानीत असत. त्यामुळे टिळकांचा पक्ष म्हणजे एकंदरीने पुराणमताभिमान्यांचा पक्ष अशी समजूत होती व ती चुकीची होती असें म्हणतां येत नाही.

## राजकीय पक्षभेदाचा उगम

वास्तविक सार्वजनिक चळवळीचा केंद्रबिंदु धार्मिक व सामाजिक विषयांकडून राजकीय विषयांकडे ढळत चालला होता. टिळकांनी आपल्या कार्यांत राजकीय विषयांस दिलेलें प्राधान्य हें त्याचें मुख्य कारण होतें. रानडे प्रभृति जुन्या सुधारणापक्षीयांचा सुधारणाप्रचार शिथिल पडत चालला होता; आगरकरांचा मृत्यु ओढवला होता आणि गोखले प्रभृति नवोदित पुढाऱ्यांची प्रवृत्ति राजकारणाकडेच होती. तेव्हा सुधारक आणि दुर्धारक किंवा धर्माभिमानी अशा स्वरूपाचा पक्षभेद हळूहळू मागे पडत जाऊन नेमस्त आणि राष्ट्रीय किंवा मवाळ आणि जहाल अशा नांवांनी हे पक्ष

अंकित होऊं लागले व त्यांचें स्वरूप मुख्यतया राजकीय बनलें. १८९६ च्या अखेरीस सुधारणापक्षानें डेक्कन सभा काढली व ती काढतांना स्वतःस उदार ( liberal ) व नेमस्त ( moderate ) म्हणवून घेऊन सार्वजनिक सभेंत शिरलेल्या लोकांना अप्रत्यक्षतया अविचारी व आगलावे (firebrand) म्हटलें तेव्हाच पक्षभेदाची ही निरगाठ पक्की झाली. असें करण्यांत लोकपक्षाला केवढा धोका आहे हें टिळकांनी तेव्हाच हेरलें आणि त्यांनी केसरी व मराठा या पत्रांतून या असमंजस कृत्याचा कंठशोष करून निषेध केला. १८९९ सालीं केसरी हातांत घेतल्यानंतर 'पुनश्च हरिः ॐ !' हा जो पहिलाच लेख त्यांनी लिहिला त्यांत याबद्दल त्यांनी जीव तोडून लिहिलें.

"इंग्रजी राज्यांत सरकाराकडून प्रजेस जे हक्क मिळाले पाहिजेत त्याबद्दल कोणाचाच मतभेद नाही. हे हक्क कोणते हें लोकांस समजावून देण्याची व त्याप्रमाणे त्यांस सरकारास मागणी करण्यास सांगण्याचीहि आवश्कता आहे, याबद्दलहि मतभेद नाही. इतकें झाल्यावर नेमस्तपणा आणि जहालपणा तो कशांत राहणार ? ...अमुक लोक आमच्यापेक्षा जरा नेटाने काम करणारे आहेत म्हणून, अथवा त्यांच्या मागण्या सरकारास आवडण्यासारख्या नाहीत म्हणून ते राजद्रोही आहेत अशा प्रकारचा आपल्या मनाचा खोटाच समज करून घेऊन एकमेकांपासून अलिप्त राहण्याची जी तऱ्हा निघालेली आहे, ती मोडून टाकून निदान ज्या प्रकरणीं मतैक्य आहे त्या प्रकरणीं तरी एकत्र जमून सर्वांनी एकत्र मिळून एक दिशेने उद्योग करणें हें हल्लीच्या स्थितींत पुणेकरांचें कर्तव्य होय."*

पण टिळकांच्या या आक्रोशाचा कांही उपयोग नव्हता. चिडलेल्या वैयक्तिक भावना या दुहीच्या बुडाशीं होत्या. त्यांचें ओझरतें दर्शन आपल्याला 'लीडर' पत्राचे विख्यात संपादक व नेमस्तपक्षाचे एक पुढारी सी. वाय. चिंतामणि यांनी लिहिलेल्या टिळकांविषयीच्या आठवणींत होतें.

"१८९९ च्या लखनौ येथील कांग्रेसमध्ये सबजेक्ट्स कमिटींत टिळक व गोखले यांचा एका क्षुल्लक विषयावर वादविवाद

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग २, पृ. ९–११.

झाला. या वादविवादांत गोखले अगदी चिडून गेले, म्हणून सुरेन्द्र बाबूंनी त्यांची समजूत घातली; पण टिळक हे आपल्या प्रतिपक्षाचें हें मनोदौर्बल्य पाहून त्यांच्याकडे पाहून हसत; पण आंतून मनाने खिन्न दिसत."*

अशा रीतीने, इतर अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा प्रारंभ करण्याचें श्रेय ज्याप्रमाणे पुण्याने किंवा महाराष्ट्राने मिळविलें, त्याप्रमाणे परतंत्र भारताच्या राजकारणांत नेमस्त आणि जहाल हे पक्षभेद पाडण्याचें श्रेय किंवा अपश्रेय पुण्याच्या, म्हणजे महाराष्ट्राच्या वाटयास आलें! मराठी माणसाचा कट्टा शत्रु मराठी माणूसच असावयाचा हें ठरून गेल्यासारखें असतें. महाराष्ट्रांतला हा मवाळ जहाल पक्षभेद कांग्रेसमध्ये जाऊन तेथे रूढ होण्यास कांही वर्षें लागलीं. पण तेथे तो जाऊन पोचतांक्षणींच सरकारने त्याचा फायदा घेतला, तो प्रकार आपणास पुढे पाहावा लागणार आहे.

## कांही ज्वलन्त प्रकरणें

टिळकांनी आपल्या कार्यास १८९९ सालीं पुन्हा सुरवात केली तेव्हा परिस्थिति किती बिकट होती हें जाणून घेणें अवश्य आहे. प्लेगच्या धामधुमीने सर्व जीवन अस्ताव्यस्त झालें होतें. सरकारच्या उग्र दडपशाहीने बहुतेक चळवळे लोक भेदरले होते व जनता स्तिमित झाली होती. त्यांत कांही थोडे हातपाय हलवावे म्हटलें तर वर उल्लेखिलेल्या दुहीने अंगांतलें बळ हिरावून घेतल्यासारखें झालें होतें. सार्वजनिक सभा अगदी थंड पडली होती. अशा स्थितींत, १८९६ च्या दुष्काळांत ज्याप्रमाणे प्रत्यक्ष कृतिरूप चळवळ केली तसें कांहीहि करणें शक्य नाही हें उघड दिसत होतें. हा एकटया टिळकांच्या धैर्याचा प्रश्न नसून जनतेच्या तयारीचा प्रश्न होता. तेव्हा राज्यकारभारांत जीं जीं प्रकरणें उपस्थित होतील त्यांच्यावर केसरींतून लेख लिहून तद्द्वारा जनतेचा असंतोष आणि स्वातंत्र्याकांक्षा प्रज्वलित करीत राहणें एवढाच मार्ग उपलब्ध होता व तो टिळकांनी अवलंबिला.

---

* लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, खंड १, भाग २, पृ. ५.

प्राप्तं प्राप्तमुपासीत हृदयेनापराजितः।

हें राजनीतीचें त्रिकालाबाधित तत्त्व आहे.

सुरवातीस जीं ज्वलन्त प्रकरणें केसरींतून हाताळावीं लागलीं तीं म्हणजे प्लेग आणि दुष्काळ. १८९६-९७ च्या दुष्काळानंतर १८९९ आणि १९०० या दोन सालीं लागोपाठ एवढा भीषण दुष्काळ पडला की त्याने पूर्वीच्या सर्व दुष्काळांस बरें म्हणविलें. मध्यंतरीं १८९७ सालीं सरकारने पूर्वीच्या दुष्काळांचा अनुभव लक्षांत घेऊन पुढील व्यवस्थेसंबंधी सूचना करण्यासाठी फॅमिन कमिशन (दुष्काळ आयोग) नेमलें होतें, त्याचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला होता. त्याच्या आधारें टिळकांनी असें दाखवून दिलें की ९६-९७ सालच्या दुष्काळांत सरकारने जी सारासूट व तहकुबी दिली होती ती अत्यंत अपुरी व कंजूषपणाची होती; तसेंच ह्या नव्या दुष्काळांत सूट व तहकुबी जी देण्यांत येत आहे ती फार अपुरी आहे. दुष्काळी कामांच्या बाबतींतहि अधिक सढळ व्यवस्था झाली पाहिजे असें त्यांनी सुचविलें.

प्लेगची स्वारी तर हटकून दरवर्षी यायची हें ठरल्यासारखें होतें. या राक्षसी रोगाने संबंध हिंदुस्थानला सुमारें वीस वर्षें छळलें आणि यमपुरीची वाट जत्रेंतल्या हमरस्त्याप्रमाणे रहदारीची करून टाकली. पुण्यासारख्या सवालाख वस्तीच्या शहरांत रोजचे मृत्यु दोन अडीचशेंपर्यंत जात असत, असा हा कराल कृतान्ताचा झपाटा चालत असे. सरकारच्या आडमुठ्या योजनांमुळे लोक आणखी हैराण होत असत. प्रत्यक्ष रोग पुरवला, पण प्लेग कमिटीचा सेग्रिगेशन, हेल्थ कँप वगैरेचा त्रास नको, असें लोकांना होऊन जात असे. त्यांत प्लेगच्या जंतूंचें संशोधन होऊन त्यांपासून तयार केलेली लस टोचण्याचा उपाय निघाला, त्याची सक्ती सुरू झाली. टिळकांनी या टोचण्याच्या सक्तीविरुद्ध निकराने झगडा सुरू केला व त्यासंबंधांत अनेक लेख लिहिले. या विषयाचा त्यांनी सशास्त्र अभ्यास केला. जंतुशास्त्र आणि लस टोचण्याच्या उपायाच्या बुडाशीं असलेलें तत्त्व यांच्या संबंधाने त्यांचा वाद नव्हता. त्यांचें म्हणणें एवढेंच होतें की लस तयार करण्याची प्रकिया अद्याप अपूर्णावस्थेंत आहे; लस टोचण्याचे अनेक दुष्परिणाम टोचलेल्या व्यक्तींवर होत असल्याबद्दल सर्वत्र तक्रारी आहेत,

कांही ठिकाणीं लस टोचल्याबरोबर तडकाफडकी माणसें मेल्याच्याहि बातम्या आहेत; तेव्हा अशा स्थितींत लस टोचण्याची सक्ती होऊं नये. टिळकांचें हें म्हणणें रास्त होतें आणि अखेर सरकारला तें आपल्या ठरावांत मान्य करावें लागलें.

याच काळांत सरकारच्या एका स्वातंत्र्यापहारक कृत्याचा कडक समाचार टिळकांना घ्यावा लागला. १८९७ सालच्या राजद्रोहाच्या खटल्यानंतर सरकारची वक्र दृष्टि खासगी शिक्षणसंस्थांकडे वळली. राजद्रोहाचे जंतु कदाचित या शाळांतून पोसले जात असतील अशी शंका येऊन मुंबई व मद्रास सरकारच्या शाळाखात्यांनी असा नियम केला की सरकारी अनुदान घेणाऱ्या खासगी शाळांतील शिक्षकांनी कोणत्याहि राजकीय चळवळींत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भाग घेऊं नये आणि राजकीय बाबतींत भरलेल्या सभेस हजर राहूं नये. पुण्याच्या डेकन एज्युकेशन सोसायटीवर तर याहि पेक्षा लज्जास्पद बंधनें लादण्यांत आलीं. कोणाहि शिक्षकाने गणपति उत्सव किंवा शिवाजी उत्सव यांत भाग घेऊं नये, त्यांना हजर राहूं नये, अशीं सर्क्युलरें शाळांना सुटलीं. सरकारच्या या अरेरावीच्या कृत्यांवर टिळकांनी किती कडक टीका केली असेल, याची सहज कल्पना करतां येण्याजोगी आहे.

व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांनी युनिवर्सिटयांवर सरकारचें नियंत्रण घालण्याकरिता १९०४ सालीं जो कायदा केला त्याला अर्थात केसरीने विरोध केला व त्या बिलाच्या समर्थनपर भाषण डॉ. भांडारकरांनी केलें त्याचाहि समाचार घेतला, हीहि शैक्षणिक धोरणांतली उल्लेखनीय गोष्ट होय.

## ध्येय आणि धोरण

अशाच रीतीने, लोकांचें उरलेंसुरलें स्वातंत्र्य हिरावून घेणारीं, लोकांच्या हक्काला बाध आणणारीं, जनतेच्या दारिद्र्यांत भर टाकणारीं किंवा स्वाभिमानास धक्का लावणारीं अशीं जीं जीं कृत्यें सरकारकडून घडत होतीं तीं तीं टिपून काढून त्यांचा घातुकपणा अथवा जुलमीपणा स्पष्ट शब्दांत उघडकीस आणण्याचें कुलव्रत केसरीने या काळांत, म्हणजे १८९९ पासून पुढील ४–५ वर्षांत, नेहमीच्या निःस्पृहपणाने पाळिलेलें आपणास दिसून येतें. टिळकांच्या वाणीचा सडेतोडपणा, सबळ युक्तिवादावर आधारलेला

कडकपणा आणि जनतेचीं मनें चेतविण्याचें तिचें सामर्थ्य यांत मुळीच कमतरता आलेली दिसत नाही. ‘नामदार जाइल्स यांचें राजद्रोहाचें पिसें’, ‘सावकार मेला आणि कुणबीहि मेला,’ ‘दुराग्रही सरकार आणि निर्बल लोकमत’, ‘आमचीं कायदेकौन्सिलें थट्टा आहे काय ?’ इत्यादि त्यांच्या अग्रलेखांचे मथळे जरी पाहिले तरी त्यांजवरून त्यांच्या लेखांत तेज कसें भरलेलें असेल याची कल्पना येईल. दुष्काळाचा आणि प्लेगचा असह्य जुलूम करणारा गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट याच्या स्मारकाबद्दल चाललेल्या खटपटीस अनुलक्षून टिळकांनी काढलेले पुढील उद्गार त्यांच्या स्पष्टोक्तीचें लहानसें उदाहरण म्हणून देतां येतील.—

“पण हें स्मारक म्हणजे रावण दरबारांतील प्रधानमंडळीने संन्याशास सुळीं देण्याबद्दल रावणाच्या राज्यकारभाराची शिफारस करण्याइतकेंच समंजस आहे.”*

आपली राजकीय दृष्टि न सोडतां इंग्रजी राज्याविषयी राजनिष्ठेचे उद्गार काढावयाचे, स्पष्टोक्तीबद्दल गव्हर्नर, व्हाइसराय वगैरेंची शिष्टाचारास अनुसरून माफी मागायची, हें धोरण या काळांत टिळकांनी तत्परतेने अवलंबिलेलें दिसतें. महाराणी व्हिक्टोरियाचा मृत्युलेख लिहिला त्यांत त्यांनी अखेरीस पुढील उद्गार काढिले आहेत—

“हा (१८५७ च्या बंडानंतरचा) जाहिरनामा म्हणजे हिंदुस्थानांतील प्रजेच्या हक्काची मुख्य व महत्त्वाची सनद होय; व तिचा अंमल होण्यास विलंब लागला तरी आज नाही उद्या अखेरीस हे हक्क आम्हांस...मिळालेच पाहिजेत. ज्या थोर राजकर्त्यांकडून अशा प्रकारची सनद आम्हांस प्राप्त झाली त्यांचे आम्ही किती उपकारी असलें पाहिजे हें सांगावयास नको.”†

हें राजनिष्ठेचें प्रतिपादन तोंडदेखलें होतें असें नाही. तें धोरण म्हणून प्रामाणिकपणे अवलंबिलेलें होतें.

---

* लो० टिळकांचे केसरींतील लेख, भाग २, पृ. १२६.

† लो० टिळकांचे केसरींतील लेख, भाग २, पृ. २२२.

या प्रश्नांवर एका बाजूने प्रकाश पाडूं शकेल अशा विशेष महत्त्वाच्या गोष्टीचा इथे उल्लेख केला पाहिजे. हा काळपर्यंत राजकीय विषयांवर जे लेख लिहिले त्यांत आपल्या राजकीय चळवळीचें ध्येय काय असावें या विषयीचे विचार टिळकांनी क्वचितच व्यक्त केले असतील. लोकांवरील अन्याय उघडकीस आणणें, सरकारचे वाईट कायदे, वाईट हुकूम यांचा निषेध करून त्यांजविरुद्ध रान उठवणें, कायद्यानुसार आपले हक्क काय आहेत हें लोकांना सांगून ते हक्क बजावण्यास उद्युक्त करणें, असें साधारणपणे केसरींतील राजकीय लेखांचें हा काळपर्यंत स्वरूप असे. यांतून असंतोष निर्माण होऊन सध्याची राज्यपद्धति त्याज्य, असह्य वाटावी असा परिणाम अपेक्षित असे यांत शंका नाही. पण सध्याची राज्यपद्धति त्याज्य असेल तर तिच्या जागीं आपण काय आणूं इच्छितों, थोडक्यांत म्हणजे कोणचें उद्दिष्ट डोळयांपुढे ठेवून आपण राज्यकर्त्यांशीं झगडायचें, आपली चळवळ करायची, याचा निर्देश पूर्वी कुठे केलेला दिसत नाही. हा ध्येयनिर्देश १९०२ सालीं लिहिलेल्या कांही लेखांमध्ये आढळतो. ता. २ डिसेंबर १९०२ रोजीं लिहिलेल्या 'आमचीं मनेंच फिरलीं पाहिजेत' या मथळयाच्या केसरींतील लेखांत टिळक म्हणतात—

> "ज्या दिवशीं इंग्लंडच्या बाहुटयाखाली या देशास सर्वतोपरी पूर्ण स्वातंत्र्य मिळेल व इंग्लंड आणि हिंदुस्थान हे मित्रत्वाच्या नात्याने राहूं लागतील, तसेंच हिंदुस्थानच्या तिजोरींतील सर्व पैसे हिंदुस्थानांतच खर्च केले जातील, तो दिवस धन्य होय."*

या लहानशा वाक्यांत 'वसाहतीचें स्वराज्य' या स्वरूपाची –किंबहुना त्यापेक्षा थोडया वरचढ स्वरूपाची–अवस्था आपलें ध्येय म्हणून नमूद केली आहे. 'पाच्छाहीपणा का गुलामगिरी' या ता. १६ डिसेंबर १९०२ च्या केसरींत लिहिलेल्या लेखांत 'इंपीरियालिझम' उर्फ पाच्छाहीपणाची जी भयंकर लाट इंग्लंडांत उठली आहे तिने खुद्द इंग्लंडचें बौद्धिक स्वातंत्र्य नष्ट होत असून त्याची अवनति होत आहे हा मुद्दा फार सुंदर

---

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग २, पृ. ३७१.

रीतीने मांडिला असून लेखाच्या शेवटीं पुढीलप्रमाणे बुद्धिवाद केला आहे.

"एवढयासाठीच इंग्लंडने इतर देशांस गुलाम बनवून 'कोऽन्योऽस्ति सदृशो मया' असा डौल मारण्यापेक्षा योग्य तितकें वर्चस्व आपणाकडे ठेऊन जिंकलेल्या देशांना स्वातंत्र्याची जोड मिळवून देण्यास झटावें, हेंच त्याच्या हिताचें असून नीतिदृष्टया भूषणास्पद व फायद्याचें आहे."*

हिंदी राजकीय चळवळीचें ध्येय दर्शविणारा शब्द म्हणून 'वसाहतीचें स्वराज्य' हा त्या वेळीं प्रचारांत आला नव्हता. ज्यांच्यांत निवडणुकीचें तत्त्व-हि नीटपणें अंतर्भूत केलेलें नव्हतें अशीं कचकडयाच्या खेळासारखीं कायदे-कौन्सिलें त्या वेळीं अस्तित्वांत होती. राष्ट्रीय सभा ही किरकोळ मागण्यांचा उच्चार करण्यांत कृतार्थता मानीत असून देशाचें राजकीय प्राप्तव्य तिने देखील ठरविलेलें नव्हतें. अशा स्थितींत केवळ इंग्लंडच्या बाहुटयाची अट असलेलें 'सर्वतोपरी पूर्ण स्वातंत्र्य', हें देशाचें राजकीय ध्येय म्हणून निर्दिष्ट करण्यांत टिळकांचें निधडया छातीचें द्रष्टेपण व्यक्त होतें. त्या काळांत कोणत्याहि उघडपणे चालणाऱ्या राजकीय चळवळींत इंग्लंडच्या बाहुटयाची मर्यादा निर्दिष्ट करणें अवश्य होतें. असें न करणाऱ्याची रवानगी तुरुंगांत होण्यास अवकाश लागला नसता.

## राष्ट्रीय सभेची प्रथमावस्था

राजकीय ध्येयाचा विषय निघाला म्हणजे राष्ट्रीय सभेची आठवण होणें अपरिहार्य आहे. हिंदी राष्ट्राच्या राजकीय ध्येयाची परिपूर्ति राष्ट्रीय सभेच्या द्वारेंच होऊं शकेल अशी टिळकांची खात्री पटलेली असल्यामुळे त्यांनी तिची कास कधीहिं सोडली नाही. तिच्या कार्यांत बाणेदारपणा व तेज उत्पन्न करण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालू असे. सेवानिवृत्त सनदी अधिकारी ए. ओ. ह्यूम यांच्या प्रेरणेने राष्ट्रीय सभेची स्थापना १८८५ सालीं झाली तेव्हापासून तिचीं पहिलीं पांच अधिवेशनें मोठया उत्साहाने भरलीं. १८८९ सालीं मुंबईला पांचवी राष्ट्रीय सभा सर विलियम वेडरबर्न

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग २, पृ. ३८३.

यांच्या अध्यक्षतेखाली भरली व तिला इंग्लंडांतील रॅडिकल पक्षाचे पुढारी व पार्लमेंटचे सभासद चार्लस ब्रॅडलॉ हजर राहिले सभेमध्ये ब्रॅडलांचें उत्साहजनक भाषण झालें. हिंदी राजकीय सुधारणांचें एक बिल तयार करून तें ब्रॅडलासाहेबांनी पार्लमेंटमध्ये आणावें असें ठरलें; पण हें बिल अखेर पार्लमेंटपुढे येऊं शकलें नाहीं.

हिंदुस्थानांतल्या सुशिक्षित वर्गाच्या पुढाऱ्यांनी इतका पल्ला गाठलेला पाहून ब्रिटिश सरकारने साम दाम दंड भेद या चार उपायांपैकी तिसऱ्याखेरीज बाकीच्या सर्व उपायांचा प्रयोग सुरू केला. सामाचा प्रकार असा की १८९२ सालीं सरकारने स्वतःच कायदेकौन्सिलांच्या सुधारणेचें बिल पार्लमेंटपुढे आणून तें पास करून घेतलें. आपल्या प्रयत्नांना एवढें तरी फळ आलें यांत राष्ट्रसभेच्या कांही पुढाऱ्यांचें समाधान होऊन त्यांची आत्मसंतुष्ट व सरकारधार्जिणी वृत्ति जागृत झाली. दाम या उपायाचा प्रयोगहि करण्यांत आला. तय्यबजी, तेलंग प्रभृति कांही मंडळींना हायकोर्टाचे न्यायाधीश करून नोकरींत गुंतविण्यांत आलें. भेदाच्या प्रयोगाचें फळ १८९३ सालीं दिसून आलें. त्या सालीं हिंदुस्थानांत सर्वत्र हिंदुमुसलमानांचे दंगे मोठया प्रमाणावर झाले आणि मुसलमानांचे पुढारी सय्यद अहमद यांनी, मुसलमान समाजाने कांग्रेसपासून अलिप्त राहावें, असें जाहीर पत्रक काढलें. शत्रूला जिंकण्याचा चार उपायांपैकी दंड हा उपाय राहिला; त्याचा पहिला प्रयोग आपल्या गंभीर गर्जनेने जनतेला उत्साहित आणि राज्यकर्त्यांना अवस्थ करणाऱ्या 'केसरी' वर—टिळकांवर—१८९७ सालीं करण्यांत आला.

वर दिलेल्या कारणांमुळे असो किंवा दरसाल त्याच त्या मागण्या आणि तींच तीं भाषणें करून कंटाळल्यामुळे असो, १८८९ नंतर राष्ट्रसभेच्या अधिवेशनांत शिथिलता येऊं लागली. मागण्यांचा कंठाळी ठराव सालोसाल फुगूं लागला व 'ह्यूमसाहेबांची सर्कस' म्हणून सभेची चेष्टा होऊं लागली. १८९२ सालीं ह्यूमसाहेबांनी सर्व कांग्रेससदस्यांना नेटाने कामाला लागण्यासाठी अत्यंत कळकळीचें आवाहन केलें. पण या कळकळीच्या आवाहनाचाहि कांही परिणाम झाला नाही. वर्षांतून एकदा कोणत्या तरी शहरीं जमावें; त्याच त्याच मागण्यांचे ठराव करावे, त्यांवर घोटीव इंग्रजी

भाषेंत वक्तृत्वपूर्ण भाषणें करावीं आणि तीन दिवस मजलस गाजवून परत गावीं जाऊन आपआपल्या उद्योगांत मग्न व्हावें. यापरता कांग्रेसपुढे दुसरा कांही कार्यक्रम राहिला नाही. कांग्रेसचीं सूत्रें हळूहळू फेरोजशहा मेथा आणि मंडळीकडे गेलीं होतीं. त्यांना जास्त कांही नको होतें. "वर्षांतून दोन दिवस एकत्र जमून विवक्षित विषयांवर सर्व राष्ट्राच्या वतीनें कांही ठराव पास केले म्हणजे राष्ट्रीय सभेचें काम झालें, व एरव्हींचें म्हणजे शुष्क ओरडाओरडीचें काम वर्तमानपत्रें वर्षभर करीतच असतात, आणि अशा रीतीनें हिंदुस्थानांतील कायदेशीर चळवळींचें काम संपूर्ण होतें असेंच बहुधा ना. मेथा यांचें मत दिसतें." असा अनुभव टिळकांनी नमूद केला आहे.

## निःस्पृहता, कळकळ आणि स्वतंत्र बाणा

नवलाची गोष्ट ही की विलायतेंत हिंदुस्थानची जी हितचिंतक मंडळी होती त्यांना खरी कळकळ होती. आपल्या मागण्या पदरांत पाडून घेण्याकरतां सदोदित चिकाटीने चळवळ केली पाहिजे, सगळीकडून रान उठविलें पाहिजे, राज्यकर्त्यांना सळो की पळो करून सोडलें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें होतें. लंडनमध्ये कांग्रेसची 'ब्रिटिश कमिटी' म्हणून असे. ह्यूमसाहेबांखेरीज तिच्यामध्ये दादाभाई नवरोजी, वेडरबर्न, डिग्बी, कॉटन वगैरे हिंदुस्थानच्या हितचिंतक मंडळीचा समावेश असे. ती मंडळी तिथे कांही काम करीत. मधून मधून हिंदुस्थानांतून प्रचाराकरिता शिष्टमंडळें तिकडे जात असत. पण सर्व प्रकार 'बोलाचीच कढी, बोलाचाच भात' यापलीकडे जात नसे. हिंदुस्थानसरकारचा कारभार अधिकाधिक प्रतिगामी होत चालला, जनतेची स्थिति इतकी खालावली की दुष्काळ व प्लेग कायमचें ठाणें देऊन बसले, तरी कांग्रेसपुढाऱ्यांच्या सुखासीनतेंत अंतर पडेना.

टिळकांना ही स्थिति रुचत नव्हती. सालोसाल होणारीं कांग्रेसचीं अधिवेशनें बेचव, ठराविक ठशाचीं, परिणामाच्या दृष्टीने शून्य, अशीं होऊं लागलीं. त्यांच्यांत चैतन्य उत्पन्न करण्यासाठी टिळकांचा प्रयत्न चालू असे. कांग्रेसमध्ये होणाऱ्या ठरावांत जनतेच्या तीव्र भावनांचें प्रतिबिंब पडावें अशी त्यांची खटपट असे. चिंतामणींनी लिहिलेल्या आठवणींत यासंबंधाची

थोडीशी माहिती मिळते. प्रसिद्ध इंग्रज मुत्सद्दी ग्लॅडस्टन १८९८ मृत्यु पावला. त्याच्यासंबंधी त्या वर्षी मद्रास येथे भरलेल्या कांग्रेसमध्ये दुखवटयाचा ठराव करण्याचा विषय निघाला. ठरावांत 'कृतज्ञता' या शब्दाऐवजी 'समाधान' हा शब्द घालण्याचा टिळकांनी आग्रह धरला. 'केवळ गोड गोड थापा देण्यापेक्षा ग्लॅडस्टनने कांहीएक केलें नाही' असें टिळकांचें स्पष्ट म्हणणें होतें. पुढे १८९९ च्या लखनौ येथे भरलेल्या कांग्रेसमध्ये मुंबईचा मावळता गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट याच्या संबंधाने निंदाव्यंजक ठराव करावा असा प्रस्ताव टिळकांच्या पाठिंब्याने आला. अमरावतीचे बॅरिस्टर मुधोळकर यांनी टिळकांना विरोध केला. तथापि टिळक हट्ट सोडीनात व त्यांचें बहुमत होण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हा अध्यक्ष रमेशचंद्र दत्त यांनी आपण अध्यक्षस्थानाचा राजीनामा देऊं असें निर्वाणीचें शस्त्र उपसल्यामुळे टिळकांनी ठराव मागे घेतला. वास्तविक सँढर्स्टची कारकीर्द अत्यंत जुलमी व अयशस्वी झाली होती. दुष्काळच्या व्यवस्थेचा खेळखंडोबा आणि प्लेगव्यवस्थेचा असह्य जुलूम यांच्यामुळे त्याची नालायकी सिद्ध झाली होती. राजद्रोहाचे खटले भरून त्याने जी अविचारी दडपशाही केली होती तिजमुळे त्यांत भरच पडली होती. अशा गव्हर्नराचा निषेध करणें दूरच राहिलें, मुंबईचे कांग्रेसपुढारी त्याचें स्मारक करण्याच्या उद्योगाला लागले होते. मुंबईचे सिंह म्हणून गणले गेलेल्या मेथांचें नांव देखील या स्मारकाच्या खटपटींत गोवलेलें होतें हें पाहून केसरीने म्हटलें, "ना. मेथा यांस सिंहाची उपमा देण्यांत येते; पण सध्याचा काळ असा आला आहे की, या सिंहाने सुद्धा शेपूट घालून श्वानवृत्ति स्वीकारली आहे." आपल्यावर अन्याय करणाऱ्या लोकांचा प्रतिकार करणें आपणास शक्य नसेल तर निदान रुसून बसणें, किंवा कमींत कमी स्वस्थ बसणें तरी आपल्या हातीं आहे. परतंत्र देशांत लोकांचा स्वाभिमान आणि स्वतंत्र बाणा कायम राखण्याजोगें वर्तन पुढाऱ्यांनी नेहमी केलें पाहिजे. ही जागरूकता ठेवली तरच आपला राजकीय उद्धार होण्याची आशा आपण बाळगूं शकूं. ज्या राष्ट्राचा स्वाभिमान नष्ट झाला तें राष्ट्र मेलें असेंच समजलें पाहिजे. चिपळूणकरांपासून आलेली ही वृत्ति टिळकांच्या अंतःकरणांत सदैव जागृत होती. त्या वृत्तीस अनुसरून कांग्रेसच्या ठरावाला वळण देण्याची ते

सदोदित खटपट करीत आणि त्या वेळच्या पुढाऱ्यांच्या पोचट व आशाळभूत वर्तनावर टीका करीत.

दुसऱ्या एका अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीवर टिळकांनी भर दिलेला आढळतो. राष्ट्रीय सभेचीं तत्त्वें आणि तिचें कार्य यांचा जनतेमध्ये जारीने प्रसार केला पाहिजे. आपल्या राजकीय चळवळीला यश यावयाचें असेल तर राष्ट्रसभेच्या उद्दिष्टांसंबंधाने जनतेंत जिव्हाळा उत्पन्न केला पाहिजे आणि जागृत जनतेच्या आकांक्षांचें संघटित सामर्थ्य राष्ट्रीय सभेच्या पाठीशीं उभें केलें पाहिजे. राजकीय उद्धारकार्यांतलें हें मूलभूत सत्य प्रथम टिळकांनी ओळखलें. म्हणूनच, साम दाम आणि भेद या तीन्ही उपायांना वश होणारा हा माणूस नव्हे असें जाणून राज्यकर्त्यांनी आपल्या दंडशक्तीचा पहिला घाला टिळकांवर घातला.

'अरे, तुम्ही जागे व्हा, आपल्या स्वतःच्या सुरक्षिततेसाठी तरी हातपाय हालवा' अशी हाक १८९२ सालीं ह्यूमने दिली, तिला टिळकांनी केसरींतून जोराचा पाठिंबा दिला होता. राष्ट्रसभेच्या कार्याची जनतेला माहिती करून देऊन तिजविषयीं अभिमान व जिव्हाळा उत्पन्न करण्याचें काम केसरींतून लेख लिहून ते कसोशीने करीत असत. ता. ८ जाने. १८९५ रोजीं राष्ट्रीय सभेच्या कार्यावर त्यांनी लिहिलेला उज्ज्वल लेख हें याचें उदाहरण म्हणून सांगतां येईल.* पुढच्या वर्षी पुण्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचें समालोचन करतांना त्यांनी लिहिलेला पुढील मजकूर जनतेंत कार्य करण्याच्या आवश्यकतेची त्यांना कशी तीव्र जाणीव होती याची साक्ष देतो.

"राष्ट्रीय सभेने गेल्या दहा वर्षांत जे ठराव केले आहेत ते एकत्र केले असतां हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत कोणकोणत्या सुधारणा करणें अवश्य आहे हें कोणासहि निश्चितपणे सांगतां येईल. आता दर वर्षी याच गोष्टी पुनः पुनः निश्चित करण्याकरिता ५०–६० हजार रुपये खर्च करायचे किंवा यापेक्षा दुसरा कांही उद्देश सिद्धीस नेण्याकरिता या रकमेचा उपयोग करावयाचा हा आमच्या मतें

---

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग १, पृ. ३९६.

राष्ट्रीय सभेपुढे आता मोठा महत्त्वाचा मुद्दा आहे... येथील राष्ट्रीय सभेच्या मांडवासमोरच कोणी एकाने एक दुष्काळपीडित मनुष्याचें चित्र उभें करून त्याच्या हातांत दिलेल्या फडक्यावर 'सभेंत शेतकऱ्यांची खरी कळकळ बाळगणारे वीस तरी लोक आहेत काय' असा प्रश्न लिहिला होता... राष्ट्रीय सभा जें काम करीत आहे तें शेतकऱ्यांच्या हिताकरिताच आहे हें जर शेतकरी वर्गास अद्याप कळलं नसेल तर तें त्यांस कळवून देणें हें आमचें कर्तव्य आहे ही गोष्ट आम्हांसहि मान्य आहे."*

याप्रमाणे लिहून लेखाच्या अखेरीस पुन्हा याच मुद्यावर त्यांनी जोर दिला आहे हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. टिळकांची नेहमीची पद्धतच अशी की लेखांत जो मुद्दा प्राधान्याने प्रतिपादन करायचा असेल त्याचा जोरदार उल्लेख करून लेखाचा शेवट करायचा.

"...करिता राष्ट्रीय सभेस पुढील दहा वर्षांत जें वळण द्यावयाचें तें अशा धोरणाने दिलें पाहिजे की ज्यामुळे सभेस शेतकरी, कारागीर वगैरे सर्व लोकांचें सहाय्य मिळून तिचे ठराव अमलांत येण्यास ते मनोभावेंकरून मदत करतील.... हिंदुस्थानची राजकीय उन्नति घडवून आणणें हें कांही सामान्य काम नव्हे व तें दर वर्षास राष्ट्रीय सभेची एक बैठक केल्यानेच सिद्धीस जाईल असें कोणी समजूं नये. हा कार्य इतकें मोठें आहे की त्याकरिता आम्ही उद्योग करूं तेवढा थोडाच."*

पण तसा उद्योग त्या वेळच्या राष्ट्रीय सभेच्या सूत्रचालकांकडून झाला नाही. तिला उत्तरोत्तर मरगळ येत चालली. १८९७ पासून १९०३ पर्यंतचीं अधिवेशनें निवळ वार्षिक जलशाच्या स्वरूपाचीं, मिळमिळीत व निष्क्रिय अशीं झालीं.

"राष्ट्रीय सभेचे हल्लीचे पुढारी स्वतः ह्यूम, दादाभाईप्रमाणे सर्व धंदे सोडून जर या उद्योगास लागतील तर त्यांस कांहीतरी यश येईल... कोणतीहि चळवळ घ्या, ती सिद्धीस नेण्यास अमुक

---

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग १, पृ. ५०१, ५०२.

एक तऱ्हेचा उद्योग पाहिजे असें ठरल्यावर सदर चळवळीच्या पुढाऱ्यांनी रात्रंदिवस त्या उद्योगास लागलें पाहिजे. "*

अशा तऱ्हेची टोचणी टिळकांनी सारखी चालू ठेवली होती. १९०३ सालीं ह्यूमसाहेबांनी वृद्धापकाळास्तव निवृत्त होतांना पुन्हा एक कळकळीचा लेख लिहून कांग्रेसभक्तांना आवाहन केलें. त्याचा आधार घेऊन टिळकांनी पुन्हा एकवार जोराच्या चळवळीची आवश्यकता प्रतिपादिली.

"तुमचीं भाषणें मोठीं गोड व अलंकारिक असतात खरी; आणि न्यायाच्या दृष्टीने पाहिलें तर तुमचें म्हणणें सयुक्तिकहि आहे. पण सरकारापासून न्याय मागून घ्यावा व तो सरकारापासून लवकर मिळावा अशी जर तुमची इच्छा असेल तर ती असल्या गुलहौसी भाषणाने...सिद्धीस जावयाची नाही. इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत सबंध वर्षभर एकसारखी चळवळ सुरू ठेवून इंग्रज लोकांस सळो की पळो केल्याखेरीज... तुम्हांस यशप्राप्ति व्हावयची नाही. कांग्रेस सभा काढली तेव्हा तिचा उद्देश हाच होता; पण दुर्दैवाने आता तिला वार्षिक श्राद्धाचें स्वरूप प्राप्त झालें अहे! अशाने काय होणार? देशाभिमानाचें वारें सतत कित्येक वर्षेंपर्यंत अंगांत एकसारखें खेळून देशाकरिता आपलें तन मन धन अर्पण करण्यास किंबहुना देशाकरिता संकटहि सोसण्यास जेव्हा तुम्ही तयार व्हाल, आणि या कामांत अशा निर्धाराने पडलेले जे लोक अहेत ते जेव्हा एकमेकांवर विश्वास ठेवून परस्परांच्या साहाय्याने व सल्लामसलतीने उद्योगास लागतील तेव्हा कार्यसिद्धीची कांहं आशा आहे. "†

ह्यूमसाहेबांच्या 'निरोपा'च्या निमित्ताने १९०३ सालीं आपलें त्यागपूर्वक चळवळी संबंधाचे विचार सांगण्यास टिळकांस जशी संधि मिळाली, त्याचप्रमाणे पुढच्या सालीं वेडरबर्नसाहेबांनी 'इंडिया' पत्रांत निरोपाचा लेख लिहिला ती संधि साधून टिळकांनी पुनः हेच विचार प्रदर्शित केले.

---

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग २, पृ. ४८.

† लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग २, पृ. ४७.

वेडरबर्नसाहेबांच्या लेखांत विलायतेंत जाऊन सारखी चळवळ करण्याचा मुख्य मुद्दा होता. त्याला टिळकांनी "मिशनरी लोकांप्रमाणे विलायतेंत आमच्यांतील राष्ट्रभक्तांनी जाऊन निरपेक्ष बुद्धीने अव्याहत कांही वर्षे चळवळ सुरू ठेविली पाहिजे," असें म्हणून जोराचा पाठिंबा दिला.

## भिन्न मतांचे दोन भिन्न प्रवाह

त्या काळांतल्या राजकीय पुढाऱ्यांचें मत असें होतें की आपल्या देशांतल्या राजकीय कार्याबरोबरच आपल्या मागण्या विलायतेंतील जनतेस व पार्लमेंटास पटवून देण्यासाठी तिकडे जाऊन चळवळ करणें हेंहि तितकेंच अवश्य आहे. कांग्रेसच्या कार्याचें हें दुहेरी स्वरूप टिळकांना पूर्णपणे पसंत होतें. विलायतेंत चळवळ करण्याची इष्टता त्यांनी सदोदित प्रतिपादिली व आयुष्याच्या अखेरीस ते स्वतः होमरूल लीगचें डेप्युटेशन घेऊन विलायतेंत गेले होते. या मुद्द्याचा इथे मुद्दाम उल्लेख करण्याचें कारण असें की पुढे गांधीजींच्या हातांत कांग्रेसचीं सूत्रें गेल्यानंतर त्यांनी विलायतेंत कांग्रेसतर्फे चळवळ करण्याचें कांही कारण नाही असें ठरवून कांग्रेसची ब्रिटिश कमिटी बरखास्त केली. तोपर्यंत म्हणजे १९२० पर्यंत विलायतेंत चळवळ करणें जरूर आहे या मतानुसार कांग्रेसचें धोरण आखलेलें होतें व तें टिळकांना पूर्णपणे मान्य होतें. टिळक आणि गांधी यांच्या दृष्टिकोनांत हा एक महत्त्वाचा फरक होता.

ज्या काळाचा आपण विचार करतों आहोंत ( १८९९-१९०३ ) त्या काळांत हा मतभेदाचा मुद्दा नव्हता. टिळकांना हें मान्य होतें की कांग्रेसचें कार्य या देशांत व इंग्लंडांत दोन्ही ठिकाणीं केलें पाहिजे. दोन्ही ठिकाणीं हें कार्य सदोदित चिकाटीने, त्यागपूर्वक अंतःकरणाच्या तळमळीने केलें पाहिजे एवढेंच त्यांचें आग्रहपूर्वक सांगणें होतें. आपल्या देशांतल्या जनतेंत प्रचंड चळवळ करून सर्व राष्ट्राची प्रखर इच्छाशक्ति राष्ट्रसभेच्या मागण्यांच्या मागे उभी केली पाहिजे; आणि हें बळ घेऊन विलायतेंत जाऊन सारखी चळवळ करून इंग्रजांस सळो की पळो करून सोडलें पाहिजे.

पण त्या काळांतल्या कांग्रेसच्या सूत्रचालकांना हें पटणें शक्य नव्हतें. त्यांच्यापैकी बहुतेक सुखासीन होते, हें एक. खेरीज त्यांचें तत्त्वज्ञानच निराळें

होतें हें दुसरें. प्रस्तुत पुस्तकांत यापूर्वी अनेकवार सांगितलें आहे त्याप्रमाणे कांग्रेसच्या या सुधारणापक्षीय उर्फ नेमस्त सूत्रचालकांना ब्रिटिश राज्य हा एक परमेश्वरी प्रसाद आहे असें वाटत होतें. ब्रिटिश राष्ट्राचें धोरण व वृत्ति उदार व भूतदयेची आहे; तेव्हा आपण आपल्या मागण्या एकसारख्या त्यांच्या कानावर घालीत राहिलों म्हणजे केव्हा ना केव्हा तरी त्यांना त्या पटतील व जसजसे आपण लायक होऊं तसतसे ते क्रमाक्रमाने आपल्याला हक्क देतील, असें त्यांचें तत्त्वज्ञान होतें. टिळकांना मुळांतच ही विचारसरणी मान्य नव्हती. मनुष्यस्वभाव इथून तिथून सारखाच. अगदी भागच पडल्याशिवाय आपल्या हातचें कोणी सोडीत नसतो. तेव्हा, कायदेशीर रीतीनेच, परंतु राज्यकर्त्यांना सळो की पळो करून सोडल्याखेरीज ते राज्याधिकार हिंदी लोकांच्या हातीं सोपविण्यास कदापि तयार होणार नाहीत, ही टिळकांची ठाम विचारसरणी होती.

टिळक आणि कांग्रेसचे त्या वेळचे सूत्रचालक यांच्यामधील हा वृत्तिभेद दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्ट होत चालला होता. कांग्रेसच्या सूत्रचालकांच्या बाजूला एक व्यक्ति अशी होती की जी इतरांप्रमाणे सुखासीन नसून देशसेवेला वाहिलेली, त्यागी व अखंड परिश्रम करणारी अशी होती. ती व्यक्ति गोपाळ कृष्ण गोखले ही होय. गोखल्यांचीं बाकीचीं तत्त्वें व मतें नेमस्तपक्षाचींच होतीं. त्यामुळे त्यांचा विरोध टिळकांशीं सर्वांत अधिक निकराचा झाला. दोघेहि सारखेच त्यागी व अखंडपरिश्रमी असल्यामुळे आपलीं मतें प्रभावी व्हावींत ही दोघांचीहि इच्छा व खटपट विशेष. त्यामुळे दोघांचा विरोध बिनतोड ठरला. मतभेद असला तरी देखील आपण सर्वजण, तुम्ही व आम्ही एकत्रच राहून काम करूं या, ही टिळकांची भूमिका. पण कांग्रेसच्या तत्कालीन सूत्रचालकांची मनोवृत्ति तशी नव्हती.

## प्रांजळ टीकेचा विपर्यास

टिळक कांग्रेस अधिक कार्यक्षम व सतत चळवळ करणारी व्हावी याच केवळ हेतूने टीका करीत होते हें आपण मागे पाहिलेंच आहे. टिळक राष्ट्रीय सभेला खाली ओढूं इच्छितात व गोखल्यांचा मत्सर करतात, अशा आशयाचीं, टिळकांच्या लिहिण्याचा सर्वथैव विपर्यास करणारीं पत्रें कुणी

तरी १९०४ च्या कांग्रेसच्या अगोदर ब्रिटिश कमिटीच्या कार्यकर्त्यांना लिहिलीं असावींत असें दिसतें. या अंतःस्थ कारवाईचा हेतु कदाचित दादाभाई प्रभृति इंग्लंडांतील कांग्रेस कार्यकर्त्यांचें मत टिळकांविरुद्ध कलुषित करावें असा असेल. पण विलायतेंतील पुढारी गोखले व टिळक या दोघांचीहि विशिष्ट योग्यता जाणून होते. त्यांना दोघेहि पाहिजे होते. दादाभाई नौरोजी यांनी लंडनहून ता. २ नोवेंबर १९०४ रोजीं टिळकांना पुढील आशयाचें पत्र लिहिलें.

"मी जें लिहिणार आहें तें केवळ स्नेहभावाचें असें समजा. पूर्वी न्यू इंग्लिश स्कूल काढण्याचे वेळीं तुमचें माझें भाषण झालें तें मला चांगलें स्मरतें. तेथपासून पुढे तुमचें कामहि फार चांगलें झालें आहे. तुम्ही छळहि पुष्कळ सोसला. मी आज पत्र लिहितों याचें कारण असें. पुढील राजकारणाच्या क्षेत्रांत युद्ध करण्याचें राष्ट्रीय सभा हें एक आपलें शस्त्र झालें आहे. आज ती सर्वगुणपूर्ण नाही. पण हळूहळू तिला आम्ही बळकट करूं इच्छितों. केसरींतून तुम्ही तिला खाली ओढीत आहां असें कळतें. आणि अशा रीतीने जर ती एकदा निर्बल झाली व तिला इजा पोचली तर याचीच दुरुस्ती करण्याला आम्हांला पुष्कळ काळ लागेल....याकरिता तुमच्या नेहमीच्या उत्साहाने राष्ट्रीय सभेला बळकटी आणण्याचा प्रयत्न करा. आम्हांला ऐक्यवृद्धि संपादून काम वाढेल व कामाला माणसें अधिक मिळतील असेंच करावयाचें आहे. तुमचीं दोन वर्तमानपत्रें व तुम्ही स्वतः यांच्याकडून देशहिताचें असें किती तरी काम होईल...."*

स्विनीसाहेबांनी टिळकांना ता. ९ नोवेंबर १९०४ रोजीं पत्र लिहिलें त्यांत पुढील मजकूर होता—

"पुण्याचे कांही पुढारी यंदा मुंबईच्या कांग्रेसला जाणार नाहीत असें म्हणतात. माझा एक मित्र म्हणतो की या फुटीचे परिणाम वाईट होतील...प्रो. गोखले यांना त्यांच्या उद्योगप्रियतेमुळे राष्ट्रीय सभेंत वाजवीहून अधिक वजनदारी देण्याचा आम्हा मंडळीचा

---

* टिळक चरित्र, खंड २, भाग ४, पृ. ८३.

विचार असल्याच्या वातम्या तुमच्या कानावर येत असतील. पण तशी आमची इच्छा नाही. गोखले यांचा उत्साह व त्यांचें वक्तृत्व यांचा उपयोग करून घ्यावा असें आम्हांला सहजच वाटतें. पण त्यामुळे धैर्य व कोणालाहि हार न जाणारा करारीपणा हे गुण ज्या इतर पुढाऱ्यांत आहेत त्यांची किंमत आम्ही कमी मानतों असें नाही.... "*

अशा रीतीने प्रतिपक्षाचा विपर्यास करणें, ज्येष्ठ कार्यकर्त्यांकडे कागाळया करणें, यामुळे पक्षभेदांत भर पडत चालली. विसावी राष्ट्रीय सभा सर हेनरी कॉटन यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे ता. २४ डिसेंबर १९०४ रोजीं भरली. वेडरबर्नसाहेबहि कॉटनसाहेबांबरोबर मुद्दाम विलायतेहून आले होते. प्रत्यक्ष अधिवेशनांत मतभेद, भांडणें वगैरे झालीं नाहीत. टिळकांनी अधिवेशनाच्या कामांत भरपूर भाग घेतला. ठराव जरा नव्या धर्तीवर झाले, पण एकोप्याने झाले. वंगभंगाची योजना त्या वेळीं शिजत होती, तिचा निषेध करण्यांत आला. विलायतेंत आपल्या मागण्यांच्या प्रचारार्थ शिष्टमंडळ पाठवावें असें ठरलें.

राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधि म्हणून १९०५ च्या जूनमध्ये गोखले विलायतेंत गेले. इकडे २० जुलै १९०५ रोजीं कर्झनशहाने बंगालची फाळणी केल्याचें जाहीर केलें. बंगाल्यांत जी बहिष्काराची प्रचंड चळवळ सुरू झाली तिचें गोखल्यांनी विलायतेंतील श्रोतृसमाजापुढे ओजस्वी रीतीने समर्थन केलें. हिंदी लोकांच्या मनःस्थितीचें इतक्या निर्भीडपणाने त्यांनी वर्णन केलें की टिळकांनी केसरींतून त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें आणि त्यांच्या सत्कारसभेंत मुख्य ठराव टिळकांनी मांडला. दोघेहि सद्भावनेने व प्रेमाने एकत्र आल्याचें दृश्य उभयतांच्या आयुष्यांत एकदाच आणि तें याच वेळीं दिसलें!

## ताईमहाराज प्रकरण

टिळकांच्या अब्रूची व चारित्र्याची धूळधाण करूं पाहणारें एक घोर संकट प्रारब्धयोगाने एकसारखें चौदा वर्षे त्यांचा पाठपुरावा करीत

* टिळक चरित्र, खंड २, भाग ४, पृ. ८३.

होतें. त्या संकटाचा सर्वांत अधिक काळाकुट्ट भाग याच कालावधींत होऊन गेला असल्यामुळे त्यांच्या चरित्राच्या पूर्वीस्तव इथेच त्याचा त्रोटक वृत्तान्त देणें इष्ट होईल.

टिळकांचे एक परमस्नेही बाबामहाराज पंडित पुणें येथे ता. ७ ऑगष्ट १८९७ रोजीं वारले. टिळकांना राजद्रोहाच्या आरोपावरून पकडण्यांत आलें होतें. जामिनावर सुटून त्याच वेळीं ते पुण्यास आले, ते महाराजांच्या शुश्रूषेसाठी त्यांच्या जवळ बसून होते. महाराजांची इस्टेट फार मोठी, तेव्हा मृत्युपत्र करण्याची कल्पना सुचून त्याप्रमाणे करण्यांत आलें. इस्टेटीच्या व्यवस्थेसाठी ट्रस्टी नेमण्यांत आले, त्यांत मुख्य ट्रस्टी म्हणून टिळकांचें नांव घालण्याचा महाराजांनी आग्रह धरला. मृत्युसमयींचा मित्राचा आग्रह टिळकांना मोडवेना. त्यांनी रुकार दिला.

खटला, कैद, सुटकेनंतर प्रकृतीची अशक्तता, केसरी वगैरे स्वतःच्या उद्योगांची व्यवस्था, यांत टिळकांचीं तीन चार वर्षें गेलीं. नंतर बाबामहाराजांच्या इच्छेनुसार त्यांची विधवा पत्नी ताईमहाराज हिच्या मांडीवर दत्तक देण्याचा विचार झाला व तदनुसार सर्व ट्रस्टींच्या संमतीने योग्यायोग्य विचार करून निजाम इलाख्यांतील महाराजांच्या घराण्याच्या शाखेपैकी एक मुलगा निवडून त्याला औरंगाबाद येथे ता. २७, २८ जून १९०१ रोजीं रीतसर सर्वांच्या समक्ष ताईमहाराजांच्या मांडीवर दत्तक देण्यांत आलें.

मोठ्या इस्टेटीच्या वारसासंबंधी कांही प्रकरण उपस्थित झालें की त्यांत केवळ स्वार्थाच्या इच्छेने नाक खुपसून भानगडी उपस्थित करणारे कांही 'कुटाळ उर्फ पाजी' लोक समाजांत असतातच. त्यांनी ट्रस्टींपैकी नागपूरकर नांवाच्या गृहस्थाला फितवून ताईमहाराजांचें मन फिरविण्यांत यश मिळविलें. एवढें झालें तरी फार मोठा घोर प्रसंग ओढवणार होता अशांतली बाब नव्हती. दिवाणी दाव्याचा घोळ पडून टिळकांच्या मनाप्रमाणे इस्टेटीची व्यवस्था होण्यास विलंब लागला असता, एवढेंच. पण याच वेळेस पुण्यास जिल्हा न्यायाधीश व इनामदारांच्या इस्टेटींचे पर्यवेक्षक अधिकारी म्हणून ॲस्टन नांवाचे खुनशी, हिंदद्वेष्टे गृहस्थ होते. ब्रिटिश नोकरशाहीच्या अंगांत टिळकांच्या विषयी जो द्वेष भरलेला होता त्याचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वळमत
अनुक्रम ........................ वि: ..............
क्रमांक ........................ नों: दि: ..............

अर्क या ॲस्टनसाहेबांच्या अंगीं उतरलेला होता असें म्हणण्यास हरकत नाही. कुटाळकंपूने ताईमहाराजाला ॲस्टनसमोर नेऊन 'टिळकांनी केलेला मुलगा मला मान्य नाही, त्यांनी दत्तकाच्या कामीं मजवर जबरदस्ती केली' वगैरे तक्रारी तिच्या तोंडून वदविल्या व टिळकांनी घेतलेलें मृत्युपत्राचें प्रोबेट रद्द करविण्याबद्दल वारस म्हणून तिजकडून अर्ज करविला.

ॲस्टनच्या हातीं हें कोलीत मिळतांच टिळकांच्या चारित्र्याच्या धवल प्रासादाला आग लावण्यासाठी त्याचा उपयोग करावा अशी बुद्धि त्याला झाली. टिळकांना साक्षीला बोलावण्यांत आलें. त्यांच्या तपशीलवार साक्षीवर मोठें कुभांड रचण्यांत आलें. ताईमहाराजाच्या पढविलेल्या साक्षीच्या आधारें औरंगाबादेला दत्तविधान झालेंच नाही ही कल्पना गृहीत धरून टिळकांवर खोटी साक्ष देणें, खोटे दस्तऐवज करणें, बाईवर जबरदस्ती करणें, इत्यादि फौजदारी गुन्ह्यांचे आरोप लादण्यांत येऊन त्यांच्यावर खटला भरण्यांत आला. मुंबई इलाख्यांतल्या ब्रिटिश नोकरशाहीने 'सज्जनांचा छळ करूं नये' या साधुवाक्याला हरताळ फासून आपल्या तोंडाला कधीहि पुसलें न जाणारें डांबर लावून घेतलें!

खोटया प्रतिज्ञेचा अव्वल खटला क्लेमंट्स नांवाच्या मॅजिस्ट्रेटापुढे चालून त्याने टिळकांना दोषी ठरवून ता. २४ आगष्ट १९०२ रोजीं दीड वर्ष सक्तमजुरी व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा दिली. लगेच सेशनांत अपील करण्यांत आलें. सत्य आणि न्याय कुणीकडे आहे हें दिसत असूनहि नोकरशाहीच्या संकेताबाहेर वर्तन करण्याची हिंमत सेशन न्यायाधीशाला झाली नाही. पण हायकोर्टांत अपील झाल्यानंतर तेथे दोन इंग्रज न्यायाधीशांकडूनच टिळकांना पूर्ण न्याय मिळाला हें येथे नमूद केलें पाहिजे. स्वतःच्या नैतिक कीर्तीला कलंक लावूं पाहणाऱ्या सर्व घाणेरडया आरोपांतून ता. ३ मार्च १९०४ रोजीं टिळकांची मुक्तता झाली. दरम्यान ताईमहाराजाने दुसरा दत्तक घेतलेला होता तो आणि टिळकांनी दिलेला मूळ दत्तक यांचा वाद सर्व कोर्टांमधून झोके खात प्रिव्ही कौन्सिलपर्यंत गेला व त्यांत १९१४ मध्ये टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे निकाल होऊन एक मित्रकार्य पुरें केल्याचें निरामय समाधान टिळकांना लाभलें.

सार्वजनिक चळवळींत खटला झाला तर त्यांत आंतून देशसेवेचें समाधान लाभतें व बाहेरून देशबांधवांच्या अपार प्रेमाचा लाभ घडतो. अशी कोणत्याहि प्रकारच्या भरपाईची शक्यता नसतांना आणि उलट स्वतःच्या नीतिमत्तेला कलंक लागून सार्वजनिक प्रतिष्ठा धुळीला मिळण्याचें मरणाहूनहि दुर्धर संकट भेडसावीत असतांना टिळकांचें जें धैर्य या प्रसंगीं दिसून आलें त्याची थोरवी शब्दांनी वर्णन करणें शक्य नाही. शस्त्राचारी क्रांतिकारक सोडले तर ब्रिटिश नोकरशाहीने आपल्या सबंध कारकीर्दीत टिळकांइतका कुणाचाहि छळ केला नाही; आणि त्या छळाला तोंड देतांना टिळकांइतका अचल निर्धार कुणाचाहि टिकला नाही.

जनतेचें टिळकांवरचें प्रेम या खटल्यांच्या वावटळींतहि अखंड होतें. नोकरशाहीने आणलेल्या गलिच्छ आरोपांवर क्षणमात्रहि कुणाचा विश्वास बसला नव्हता. जनतेच्या निरपेक्ष आणि एकनिष्ट सेवेंचें हें फल जगतांतील बलाढयतम राज्यसत्ता देखील हिरावून घेऊं शकली नाही.

# ११. मानमहत्तामग्रेसरः केसरी

ता. २० जुलै १९०५ रोजीं व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांनी बंगालची फाळणी केल्याचें जाहीर केलें. तात्काळ या टोकापासून त्या टोकापर्यंत सगळ्या बंगालभर आगीचा डोंब उसळला. राष्ट्राच्या नाकावर टिच्चून नोकरशाहीने जाणून बुजून केलेलें हें बेगुमानपणाचें कृत्य होतें. अर्जविनंत्या शिष्टमंडळें हे चळवळीचे राजमान्य मार्ग तिने निष्फळ ठरविले. तेव्हा पुढे काय, असा प्रश्न बंगाली लोकांपुढे येऊन उभा राहिला. त्या प्रश्नाचें उत्तर त्यांनी तात्काळ स्वदेशी व बहिष्कार या दोन चळवळींच्या रूपाने दिलें. बंगाल्यांत उसळलेल्या या लहरींनी लोकमान्यांच्या मनांत तावडतोब सहानुकंप उत्पन्न केला. त्यांनी अत्यंत उल्लसित मनाने बंगालच्या आंदोलनाला साथ दिली.

'लोकमान्य' ही अत्यंत सार्थ पदवी टिळकांना उद्देशून प्रथम केव्हा योजण्यांत आली, हा कांहीसा संशोधनीय विषय आहे. ती १९०५-०६ च्या सुमारास चांगली प्रचारांत आली होती, असें दिसतें. आपण इथून पुढे तोच शब्द वापरूं.

बंगाली लोकांचीं मनें फार भावनावश. वंगभंगाच्या धक्क्यामुळे त्यांच्या मनाचा लंबक एकदम दुसऱ्या टोकाला गेला. बंकिमचंद्रांच्या वेळेपासून हिंदुधर्माच्या अभिमानाचें एक नवयुग बंगाल्यांत सुरू झालें होतें. हिंदुधर्मातील कल्पनांची राष्ट्रवादाशीं सांगड घालून नवीन तऱ्हेच्या धर्मविचारांची मांडणी करण्याचा यत्न चालू होता. त्यांतच रामकृष्ण परमहंसांचें गूढवादी अध्यात्म आणि त्याला विवेकानंदांनी दिलेलें देशाभिमानी वेदान्ताचें वळण यामुळे बंगाली सुशिक्षितांचें मन तरल भावनात्मक धर्मविचारांकडे अगोदरच वळलेलें होतें. त्यांतच त्यांच्या मनाला हा

हा वंगभंगाचा फटकारा बसला; त्यामुळे त्यांच्या भावनाशाली मनाला अधिकच चालना मिळून तें सर्वस्वी बंधविनिर्मुक्त होऊन अंतराळांत संचार करूं लागले. राष्ट्रीय चळवळ म्हणजे आत्म्याचा मोक्ष मिळविण्याचा प्रयत्न असें त्यांना वाटूं लागलें. राष्ट्रवाद किंवा राष्ट्रीयत्व हा आपल्या देशांत अवतरलेला परमेश्वराचा अवतार होय. राष्ट्रीय स्वातंत्र्य म्हणजे आपल्या आत्मस्वरूपाची प्राप्ति करून घेणें आहे. अशा तऱ्हेचे आध्यात्मिक पायावर आधारलेले विचार बंगाली राष्ट्रवादाचे प्रवर्तक व उद्गाते अरविंद घोषांसारखे लोक व्यक्त करूं लागले.

"आम्ही हिंदुस्थानी लोक परकीयांच्या मायेला वश होऊन गेलों होतों व आमच्या आत्म्यावरहि तिचा पगडा बसला होता. ...परकीय संस्कृतीची, परकीय लोकांच्या शक्तीची व सामर्थ्याची ही माया होती....

"या मायेचा विध्वंस दडपशाही आणि क्लेश यांवाचून होत नाही. वंगभंगाचें जें कडू फल लॉर्ड कर्झन यांनी आम्हांस चाखावयास भाग पाडलें त्यामुळे हा मोह नष्ट झाला. आम्ही वर दृष्टि करून पाहूं लागलों आणि संसारवृक्षाच्या शेंडयावर बसलेला तेजःपुंज पक्षी हा दुसरा कोणी नसून तो आमचा अंतरात्माच आहे, आमचा खरा प्रत्यगात्मा तो हाच, असें ज्ञान आम्हांस झालें. अशा प्रकारें आमच्यामध्येच स्वराज्य आहे आणि त्याची प्राप्ति करून त्याचा साक्षात्कार करण्याची शक्ति आमच्याच पाशीं आहे हें आम्हांस समजलें....

"तुम्ही स्वतंत्र व्हा, हा परमेश्वराचाच आदेश आहे व तुम्ही स्वातंत्र्य संपादन केलेंच पाहिजे... तुम्ही जर आत्मस्वरूपाला जागलां तर तुम्हांला भिण्यासारखें कांहीच नाही. सत्य, प्रेम आणि श्रद्धा यांना असाध्य असें कांहीहि नाही....

"बंगालमध्ये आज काय चालू आहे असा साश्चर्य प्रश्न आपण करीत आहां. कोणत्याहि अडथळयांना न जुमानतां चालू

असणारी एक चळवळ, कोणत्याहि शक्तीला तिचा प्रतिकार करतां येणार नाही अशी एक वाढ, किंवा राष्ट्रांत जन्मास आलेला एक नवा अवतार आज तुम्हांला तेथे दिसत आहे..."*

## कलकत्त्याची राष्ट्रीय सभा

राष्ट्रांत उद्भवलेल्या या नवतत्त्वाला बंगाली पुढाऱ्यांनी अध्यात्माच्या अंतरालांत नेलें, तर टिळकांनी त्याच तत्त्वाचें बौद्धिक पातळीवरून प्रतिपादन केलें. त्याचें आध्यात्मिक स्वरूप त्यांना आकलन होत नव्हतें किंवा त्याची थोरवी ते जाणत नव्हते असें नाही. पण त्यांचें मन बौद्धिक व व्यावहारिक पातळीवरून काम करीत होतें, एवढेंच. हा बऱ्याच अंशीं प्रकृतिभेदाचा परिणाम होता. बंगाली पुढारी व्यावहारिक दृष्टीने काम करीत नव्हते असें नाही. तसें असतें तर त्यांना ही चळवळ परिणामकारक करतांच आली नसती. तात्पर्यार्थ हाच की बंगाल्यांच्या प्रयत्नांना लोकमान्यांनी तात्काळ साथ दिल्यामुळे बंगाल व महाराष्ट्र यांच्यामध्ये विलक्षण स्नेहभाव उत्पन्न झाला आणि लोकमान्यांच्या नेतृत्वाचा बंगाली पुढाऱ्यांनी आणि जनतेने प्रेमभराने जयजयकार केला. कलकत्त्यास १९०६ च्या जून महिन्यामध्ये शिवाजी उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचें ठरवून त्यासाठी बंगाली पुढाऱ्यांनी टिळकांना पाचारण केलें. खापर्डे, मुंजे यांच्या-सहवर्तमान टिळक कलकत्त्याला गेले. बंगाली पुढाऱ्यांनी अपूर्व उत्साहाने त्यांचा सत्कार केला व टिळकांनी शिवचरित्रावर आणि आपल्या राष्ट्रीय उत्थानाच्या विषयावर स्फूर्तिदायक भाषणें केलीं. दोन प्रांतांमधील परस्पर ऐक्याचा सांधा यामुळे अधिक बळकट झाला.

या वर्षी (१९०६) राष्ट्रीय सभेचें अधिवेशन वंगभंगामुळे खवळलेल्या कलकत्ता शहरीं भरणार होतें, त्याचें अध्यक्षपद टिळकांना द्यावें अशी सूचना स्वातंत्र्यवादी पुढाऱ्यांचे अग्रणी बिपिनचंद्र पाल यांनी केली व ती इतर बंगाली पुढाऱ्यांनी उचलून धरली. ज्या गाळीव नेमस्तांच्या हातीं राष्ट्रीय सभेचीं सूत्रें या काळांत होतीं त्यांना टिळकांचें नांव

---

* अरविंद घोषांचीं व्याख्यानें, पृ. ४६–४८. आचार्य जावडेकरकृत 'आधुनिक भारत', आवृत्ति १९३८, पृ. ४११–१२ मधून.

म्हणजे 'बैलाला तांबडी चिंधी'प्रमाणे होतें. मराठी पुढाऱ्यांनी लाला लजपतराय यांची सूचना केली. तेंहि तितकेंच जहाल ! अखेर राष्ट्रपितामह दादाभाई नवरोजी यांना अध्यक्षपदासाठी विनंती करावी असें ठरलें. त्यांच्या नांवाला कोणीहि विरोध करणें शक्य नव्हतें. दादाभाईंची गणना पूर्वी देखील कधीच नेमस्तांमध्ये करतां आली नसती. नेमस्तमंडळी आणि नवराष्ट्रीयत्वाची प्रवर्तक धडाडीची मंडळी या दोघांनाहि घेऊन राष्ट्रसभेचें काम चालावें असें त्याचें पूर्वीपासून धोरण होतें. त्यांतून अलीकडे इंग्रज राज्यकर्त्यांचें अनुदार व प्रतिगामी धोरण पाहून त्यांचे विचार अधिकाधिक तीव्र होऊं लागले होते. आंतरराष्ट्रीय समाजवादी पक्षाच्या परिषदेंत भाग घेऊन हिंदुस्थानची दुःसह पारतंत्र्यावस्था जगाच्या वेशीवर टांगण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाला ते अध्यक्ष झाले यांत आनंदच होता.

अपूर्व उत्साहाच्या भरांत भरलेली कलकत्त्याची राष्ट्रीय सभा क्रांतिकारक ठरली. दादाभाईंनी आपल्या अध्यक्षीय भाषणांत स्वराज्याच्या ध्येयाचा स्पष्टपणें उच्चार केला. किरकोळ राजकीय हक्क व सुधारणा वर्षानुवर्षें मागत बसलों तरी आपल्या पदरांत कांहीहि पडलेलें नाही. तेव्हा यापुढे आपल्या राजकीय चळवळीचें ध्येय 'संयुक्त राज्य ( इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड ) किंवा वसाहती यांच्यासारखें स्वराज्य'* हेंच असलें पाहिजे असें त्यांनी प्रतिपादन केलें. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य ही चतुःसूत्री ठरावांच्या रूपाने मान्य झाली. त्यांतील शब्दयोजनेवर खडाजंगी वाद झाले. पण दोन्ही पक्षांना संभाळून घेणाऱ्या दादाभाईंच्या कुशल नेतृत्वामुळे कोणतीहि बाब तुटेपर्यंत ताणली गेली नाही. नव्या पक्षाला पाहिजे असलेलीं चारी तत्त्वें ठराव रूपाने मान्य झाल्यामुळे आणि त्यांतील शब्दयोजनेचा अर्थ आपल्याला अनुकूल असा करतां येतो हें त्याला दिसत असल्यामुळे त्याचें पूर्ण समाधान झालें. राष्ट्रीय सभेचा आधार सांगून आपली चळवळ पुढे चालवण्याला त्याला मोकळीक मिळाली.

---

* 'Self-government or Swaraja like that of the United Kingdom or the Colonies.'

## नव्या राष्ट्रीय पक्षाचीं मूळ तत्त्वें

ही जी नवीन चळवळ १९०५ च्या आगष्टपासून सुरू झाली, आणि जिचें तेज तीन वर्षांतच सरकारला दुःसह झालें, तिचीं मूलतत्त्वें काय होतीं हें थोडक्यांत पाहूं. स्वावलंबन, स्वार्थत्याग आणि प्रतिकार हीं तीं तीन मूलतत्त्वें; स्वराज्यप्राप्त्यर्थ जें अनुष्ठान सुरू झालें त्याची ही त्रिपदा गायत्री होती. ता. २८ नोवेंबर १९०५ रोजीं लिहिलेल्या 'हातघाईवर आलें' या लेखांत लोकमान्य म्हणतात—

> "सर्वस्वी हतभागी झालेल्या आमच्या लोकांस वर येण्याचा जर कांही मार्ग असला तर तो स्वावलंबन, स्वार्थत्याग, निश्चय आणि धैर्य हाच होय."

ज्या स्वातंत्र्यवादी संप्रदायाचे लोकमान्य मुळापासून अध्वर्यु होते त्या संप्रदायाचीं मूलतत्त्वें हींच होतीं. बंगालच्या फाळणीपासून जें प्रत्यक्ष कृतीचें राजकारण सुरू झालें त्याचींहि मूलतत्त्वें हींच असल्यामुळे लोकमान्यांनी त्या राजकारणाचें पूर्ण आत्मीयतेने स्वागत केलें. वास्तविक या नवीन राजकारणाला 'कृतीचें राजकारण' असें म्हणणें तितकेंसें बरोबर नाही. कारण ठराव, अर्ज, विनंती, शिष्टमंडळ या गोष्टी म्हणजे देखील एक प्रकारची कृतिच आहे. असली कृति नेमस्तांना मान्य होती व तिचें आचरण ते पूर्वीपासून मोठ्या निष्ठेने करीत आले होते. त्यांना रुचत अथवा पचत नव्हतीं स्वावलंबन, स्वार्थत्याग आणि प्रतिकार हीं तीन तत्त्वें; याच्या उलट नवा राष्ट्रीय पक्ष या तत्त्वांनुसार कृति करण्याकरिताच जन्माला आलेला होता. महाराष्ट्रांतील स्वातंत्र्यवादी संप्रदायाने हीं तत्त्वें फार पूर्वीपासून उराशीं बाळगिलेलीं होतीं आणि यथाशक्य आचरणांतहि आणलेलीं होतीं. म्हणून बंगालमध्ये या तत्त्वांचा प्राणपणाने अवलंब करणारा नवा पक्ष उदयाला आला असें दिसतांच आपल्याला आपलें खरें निधान गवसलें अशा भावनेने त्याने त्या पक्षाला आत्मीयतेने कवटाळलें.

टिळकांनी न्यू इंग्लिश स्कूल काढलें यांत स्वावलंबनाचेंच तत्त्व मुख्य होतें. १८९६ सालीं त्यांनी केसरींतून आणि सार्वजनिक सभेच्या द्वारा स्वदेशीचा जोरदार पुरस्कार केला, तो स्वावलंबनाचें तत्त्व त्यांच्या अंगीं

मुरलेलें होतें म्हणून. आता वंगभंगाच्या चळवळींत तेंच तत्त्व त्यांना दिसलें. ‘भ्रमाचा भोपळा फुटला’ या ता. ६ मार्च १९०६ रोजीं लिहिलेल्या लेखांत ते म्हणतात—

“ आम्ही कांही नैराश्यवादी नाही, आमची उन्नति केव्हा तरी झालीच पाहिजे असें आमचें ठाम मत आहे. प्रश्न काय तो उद्योगाच्या दिशेबद्दल आहे. आमचें म्हणणें आहे की, आपल्या लोकांनी आपली उन्नति जी करून घ्यावयाची ती स्वदेशी चळवळ व बहिष्कार यांसारख्या विलायतवाल्यांस फटकारा बसणाऱ्या उद्योगांनीच केली पाहिजे. सरकारचें शिक्षण तुम्हांस पसंत नसेल तर स्वतःची युनिव्हर्सिटी तुम्ही काढा. सरकार तुमच्या उद्योगधंद्यास उत्तेजन देत नसेल तर तुम्ही द्या....‘आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः’ हें भगवद्गीतेंतील वचन जितकें वेळां सांगावें तितकें थोडेंच होय !”

स्वावलंबनाच्या तत्त्वावर केलेलें हें सुंदर भाष्य आहे. व्यक्तीचा उद्धार जसा तिच्या स्वतःच्या प्रयत्नांनीच होऊं शकतो, त्याचप्रमाणे राष्ट्राची उन्नति ही स्वावलंबनानेच होईल. या स्वावलंबनाच्या तत्त्वाचीं स्वदेशी व बहिष्कार हीं व्यक्त स्वरूपें होत. ज्या राष्ट्राचा आपल्या स्वतःवर विश्वास नाही, त्याला राष्ट्र तरी कसें म्हणावें ? आपल्या स्वतःवर विश्वास असल्याची बाह्य खूण म्हणजे स्वावलंबन. समाजाच्या गरजेच्या वस्त्रादिक जड वस्तु आणि शिक्षणासारख्या मानसिक वस्तु यांच्या बाबतींत आम्ही आपल्या पायावर उभे राहूं शकतों, निदान तसा प्रयत्न करतों या गोष्टीचें महत्त्व राष्ट्राच्या चैतन्यवृद्धीच्या दृष्टीने फार आहे. न्यू इंग्लिश स्कूल काढलें तेव्हा देशांतल्या सगळ्या सरकारी शाळा ओस पाडूं असा भलताच भ्रम चिपळूणकर टिळकांना झालेला नव्हता. किंवा १९०६ सालीं जेव्हा विजापूरकर वगैरे मंडळींच्या साहाय्याने सर्व महाराष्ट्रभर राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा काढण्याच्या उद्देशाने ‘महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळा’ची स्थापना करून त्यांच्या विद्यमानें ‘समर्थ विद्यालय’ सुरू करण्याचें टिळकांनी योजिलें, त्या वेळीं सुद्धा सरकारमान्य शिक्षणसंस्थांकडील ओघ आपण कमी करूं शकूं अशी भलतीच कल्पना त्यांनी उराशीं बाळगली नव्हती. नेमस्तवृत्तीच्या आणि सरकार

धारजिण्या लोकांनी दोन्ही प्रसंगीं टिळक प्रभृतींची हेटाळणी केली. 'तुमच्या अव्यवहार्य प्रयत्नांनी सरकारमान्य शिक्षणसंस्थांचें नख सुद्धा वाकडें होणार नाही' असा उपहास करण्यांत या मंडळींना भूषण वाटत असे. कारण स्वत्वाभिमानी स्वातंत्र्यवादी मनोवृत्तीचें आकलनच त्यांना होणें शक्य नव्हतें. राष्ट्राच्या स्वातत्र्यवादी स्वावलंबी वृत्तीच्या निशाण्या म्हणून राष्ट्रीय शिक्षणसंस्थांचें महत्त्व होतें. स्वातंत्र्यसंग्रामांतला एक पवित्रा या नात्यानें त्यांनी जें कार्य केलें त्यामुळे त्यांचें अस्तित्व पूर्ण सार्थकीं लागलें असें निष्पक्षपाती इतिहासकाराला म्हणावें लागेल.

जी गोष्ट राष्ट्रीय शिक्षणाची तीच गोष्ट स्वदेशीची. १८९६ सालीं जेव्हा टिळकांनी स्वदेशीचा जोराचा पुरस्कार करायला सुरवात केली, तेव्हा वेस्टलंडसारख्या इंग्रज गृहस्थाबरोबर नेमस्तांचे एक अग्रणी वाच्छा यांनी तिजवर अव्यवहार्यतेचा शिक्का मारून तिजविरुद्ध टीका केली. म्हणे, 'सगळे लोक देशी कपडा वापरायला लागले तर सगळ्यांना पुरेल एवढा कपडा देशी गिरण्यांतून उत्पन्न कुठे होतो, किंवा उत्पन्न होणें शक्य तरी आहे काय?' न कर्त्यांचा वार शनवार, अशा तऱ्हेच्या या आक्षेपांना उत्तरें देण्यांत टिळकांना बराच वेळ व बरीच जागा खर्च करावी लागत असे. पण या उत्तरांनी चळवळीचा मार्ग साफ होऊन तिचें पाऊल पुढे पडत असे. म्हणून आक्षेपकांना सडेतोड उत्तरें देण्यामध्ये ते बहुधा कसूर करीत नसत.

राष्ट्रीय शिक्षणाच्या बाबतींत ज्याप्रमाणे व्याख्यानें आणि केसरी यांच्या द्वारा प्रचार करण्याखेरीज विजापूरकरांच्या समर्थ विद्यालयाच्या उभारणीला मदत करण्याची विधायक कामगिरी लोकमान्यांनी केली, त्याचप्रमाणे स्वदेशीच्या संबंधांत लेखन भाषण द्वारा प्रचार करून त्याशिवाय पैसाफंडाची संघटना उभी करण्याचें महत्त्वाचें विधायक कार्य त्यांनी स्वतःच्या अंगावर घेऊन केलें. राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या समर्थ विद्यालयाचे प्रवर्तक ज्याप्रमाणे अण्णा विजापूरकर, त्याप्रमाणे स्वदेशी तत्त्वाला कार्यक्षम करणाऱ्या पैसाफंडाचे प्रवर्तक अंताजी दामोदर काळे हे होत. त्यांच्या कार्याला चालना देण्यासाठी लोकमान्यांनी पुढाकार घेऊन १९०० सालीं पैसाफंडाची कमिटी स्थापन केली व केसरींतून अनेक लेख लिहिले. १९०५ सालीं संस्था

रजिस्टर करण्यांत आली व वंगभंगानंतर फंड जमविण्याच्या कामाला खरी भरती आली. १९०७ च्या फेब्रुवारीपर्यंत फंड सुमारें ८००० रुपये जमला होता. पुढे पैसा फंडामार्फत काच तयार करण्याचें शिक्षण कांही होतकरू तरुणांना देववून आणून एक काच कारखाना सुरू करण्याचें ठरलें. तळेगावास ६०-६५ एकर जागा घेण्यांत येऊन त्याच्या अर्ध्या भागांत विजापूरकरांचें समर्थ विद्यालय आणि बाकीच्या अर्ध्या भागांत काच कारखाना याप्रमाणे कामें सुरू करण्याचें ठरलें. या गोष्टी १९०८ सालीं टिळकांवर खटला होण्याच्या अगोदर कांही महिने घडल्या.

नव्या चळवळीचें दुसरें मूलतत्त्व स्वार्थत्याग. याविषयी अधिक कांही सांगण्याची जरूरी नाही. टिळकांचें सर्व जीवन त्यागमय होतें. विठ्ठलभक्तीने वेडावलेल्या तुकारामबुवांप्रमाणे राष्ट्रभक्तीने टिळकांचें मन केवळ वेडें झालें होतें. त्यांची गोष्ट अलौकिक म्हणून सोडली तरी जो जो म्हणून या नव्या राष्ट्रीय पक्षास येऊन मिळेल, त्याला किमानपक्ष कांही स्वार्थत्याग करावा लागणारच होता. या राष्ट्रीय चळवळीच्या आखाडयांत उतरणाऱ्या जवानाला, केवळ उदरनिर्वाहापुरतें द्रव्य जेमतेम घेण्याची तयारी ठेवूनच उतरणें भाग होतें. सरकारी मानमान्यतेमुळे मिळणाऱ्या फायद्यांवर सुरवातीसच मनाने तिळांजळी सोडणें भाग; पण एवढयाने भागणारें नव्हतें. वेळेनुसार खटला झाल्यास तुरुंगांत जाण्याची पाळी येणार, त्यालाहि मनाने तयार राहणें अवश्य. तेव्हा त्या काळची राष्ट्रीय पक्षाची चळवळ म्हणजे एकप्रकारची सुळावरची पोळी होती. पण या त्यागामुळेच त्या चळवळीला तेज आलेलें होतें.

त्यागेनैकेन देवा अमृतत्वमानशुः ।

या वचनांत एका सनातन सत्याचा आविष्कार झाला आहे. स्वास्थ्य आणि सुख यांची इच्छा धरणाऱ्या माणसाला सरकार सहज वश करूं शकतें. निःस्पृह मनुष्यच परतंत्र देशांत पारतंत्र्याचे पाश हटविण्याच्या दृष्टीने कांही कामगिरी करूं शकतो. लोकमान्यांनी आरंभिलेल्या सर्व कामांना त्यागी माणसांची जरूरी होती; अर्थात तरुण पिढीला त्यांचें त्यागाचें नित्य आवाहन असे, हें सांगणें नको.

## बहिष्कारयोग

तिसरें तत्त्व प्रतिकाराचें. या तत्त्वाची व्याप्ति मोठी आणि प्रखरताहि जास्त. राष्ट्रसभेच्या त्या वेळेपर्यंतच्या चळवळींत हें तत्त्व कधीहि अवलंबिलें गेलें नव्हतें. किंबहुना या तत्त्वाचा विचार देखील त्या वेळच्या चालक मंडळींच्या मनांत येणें शक्य नव्हतें. ब्रिटिश राष्ट्राच्या न्यायीपणावर व उदारतेवर या चालक मंडळीचा विश्वास होता. हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत जरी कांही व्यंगें असलीं, नोकरशाहीच्या कारभारांत जरी पुष्कळ दोष असले, कर्झन फुल्लर सारखे कांही अधिकारी जरी जुलमी अरेराव असले, तरी ब्रिटिश राष्ट्र मूलतः न्यायी, उदार व समंजस आहे. तेव्हा त्याला आर्जवून, आळवून, प्रसंगविशेषीं थोडें रुसून फुगून आपल्याला आपले हक्क मिळवितां येतील, असा त्यांचा विश्वास होता. प्रतिकाराचे तीव्र उपाय परिणामकारक होणार नाहीत, त्यांच्यामुळे देशांत अस्वस्थता माजेल व राजकीय हक्क संपादण्याच्या कामांत आपली प्रगति होण्याऐवजी पीछेहाट होईल असें या मंडळींचें प्रामाणिक मत होतें. इतका कट्टर नेमस्तपणा ज्यांना पूर्ण पचवितां येत नव्हता अशी सुरेंद्रनाथ बानर्जी, गोपाळ कृष्ण गोखले वगैरे कांही थोडी मंडळी या कांग्रेसच्या सूत्रचालकांच्या पक्षांत होती. त्यांची थोडीबहुत कुचंबणा होऊन सरतेशेवटीं ते मेथा वाच्छा प्रभृति कट्टया नेमस्तांच्या आहारीं गेले.

हें प्रतिकाराचें तत्त्व मुख्यतया 'बहिष्कार' या नांवाने त्या काळांत आविर्भूत झालें होतें. ज्या परकी इंग्रज राज्यकर्त्यांनी या देशांत आपलें राज्य स्थापिलेलें आहे ते सुखासुखीं आपल्या हातची सत्ता सोडण्यास तयार होणार नाहीत. त्यांना जेव्हा आम्ही भाग पाडूं तेव्हाच ते सत्ता सोडण्यास तयार होतील. इंग्रजांचा उदारपणा, न्यायीपणा तोंपर्यंतच, की जोंपर्यंत त्यांच्या स्वार्थाला, सत्तेला चट्टा बसत नाही. हिंदुस्थानांतील प्रजेला हक्क दिल्याखेरीज गत्यंतर नाही, नाहीतर ती आपणाला सळो की पळो करून सोडील, असें इंग्रजांस वाटण्याजोगी परिस्थिति निर्माण झाली म्हणजेच त्यांच्याकडून राजकीय हक्क आपणास प्राप्त होतील, असा सरळ युक्तिवाद नव्या राष्ट्रीय पक्षाचा होता. राज्यकर्त्यांना सळो की पळो करून

सोडील असें साधन म्हणजेच बहिष्कार होय. 'हातघाईवर आलें' या ता. २८ नोवेंबर १९०५ रोजीं लिहिलेल्या लेखांत टिळक लिहितात.—

" राष्ट्रीय सभा वीस वर्षें भीक मागत आहे; पण अधिकारी वर्गाच्या मनावर त्याचा अद्यापि कांही परिणाम झालेला नाही, ही गोष्ट ढळढळीत आमच्या डोळयांपुढे आहे; व आमचे जे प्रतिनिधि विलायतेस गेले आहेत त्यांस तिकडील लोकहि असें विचारूं लागले आहेत की, 'काय हो, हिंदुस्थानांतील गोऱ्या अधिकाऱ्यांच्या जुलमाचा कृतीने प्रतिकार करण्यास तुम्ही कधीहि तयार होणार नाही, असें जे सदर अधिकारी सांगतात तें खरें काय ?' असा कोणता हिंदुस्थानचा कैवारी आहे की जो हा प्रश्न ऐकून स्वदेशी चळवळीच्या सध्याच्या स्वरूपाचें मंडन किंवा अभिनंदन करणार नाही ? मि. दादाभाई नौरोजी, प्रो. गोखले किंवा लाला लजपतराय हे मोठया कळकळीने बहिष्कारयोगाचें कां समर्थन करतात याचें कारण आता कळून येईल. "

टिळकांच्या कल्पनेंत बहिष्कार या शब्दाचा फार व्यापक अर्थ अंतर्भूत होत होता. विलायती मालाचा त्याग करणें, हा अगदी सामान्य पहिल्या प्रथम लक्षांत येणारा अर्थ. हा बहिष्कार म्हणजे स्वदेशी तत्त्वाच्याच पुढची पायरी होती. होतां होईतों स्वदेशीच वस्तु वापरूं पण आवश्यक वस्तु स्वदेशी मिळत नसतील तर जर्मनी, जपान वगैरे तिऱ्हाईत देशांत तयार झालेल्या वापरूं, पण इंग्लंडमध्ये तयार झालेल्या वापरणार नाही, असा राजकीय हेतूने केलेला निग्रह म्हणजेच बहिष्कार. या बहिष्काराचा उपदेश तर टिळकांनी 'राष्ट्रीय बहिष्कार', 'बहिष्कारयोग' इत्यादि लेख केसरींत लिहून, तसेंच भाषणें वगैरे मार्गांनी केलाच. पण बहिष्कारयोगाचें यापेक्षा फार व्यापक व भव्य स्वरूप टिळकांच्या प्रतिभेला दिसत होतें. सरकारी अधिकाऱ्यांवर बहिष्कार घालणें, कामगारांनी संप करणें, जुलमी व अन्यायी कायद्यांचा भंग करून त्याबद्दल होईल ती शिक्षा सोसणें, इत्यादि सर्व प्रकारचे उपाय त्यांच्या विचारसृष्टींत वावरत होते; त्यांचा निर्देश त्यांनी त्या काळांत लिहिलेल्या लेखांत व केलेल्या भाषणांत ओजस्वी शैलीने

केलेला दिसून येतो. गांधीप्रणीत असहकारिता व सत्याग्रह यांचें प्राथमिक वैचारिक स्वरूप टिळकांच्या या काळच्या लेखांमधून ठिकठिकाणीं दृग्गोचर होतें. एका सशस्त्र हिंसात्मक प्रयत्नाखेरीज बाकी सर्व प्रकारचे उपाय त्यांनी कल्पिलेले व प्रतिपादिलेले आढळतात.

सरकारी अधिकाऱ्यांवर बहिष्कार घालून राज्ययंत्र दुष्कार करून टाकण्याची कल्पना—

"अरेरावी किंवा शिरजोर अधिकाऱ्यांचे डोळे उघडण्यास त्यांची किंवा विलायतेंतील लोकांची विनवणी करण्यापेक्षा अधिक तीव्र उपाय योजला पाहिजे; एवढें सिद्ध झाल्यावर असा उपाय कोणता हा प्रश्न सहजच उद्भवतो....सर डब्ल्यू. वेडरबर्न यांनी विलायतेंत...राष्ट्रीय सभेवर जें नुकतेंच एक व्याख्यान दिलें त्यांत त्यांनी असें सांगितलें की, इटली देश जेव्हा आस्ट्रिया देशाच्या ताब्यांत होता तेव्हा इटालियन लोकांनी परकीय आस्ट्रियन अधिकाऱ्यांवर बहिष्कार घालून राज्यव्यवस्थेचें काम दुष्कर करून टाकिलें होतें. वेडरबर्न म्हणाले की हिंदुस्थानांतील लोकांनी हीच रीत स्वीकारली तर हिंदुस्थानांत राज्यकारभार चालविणें राज्यकर्त्यांस कठीण जाईल....वेडरबर्न यांस ज्या बहिष्काराबद्दलची धास्ती वाटत होती तोच प्रसंग आज येऊन ठेपला आहे."*

कायदेभंगाचें तत्त्वज्ञान विशद करण्याचा प्रसंगहि लोकमान्यांवर लवकरच आला. एप्रिल १९०६ मध्ये बारिसाल ( पूर्व बंगाल ) येथे बंगालची प्रांतिक परिषद सुरेंद्रनाथ बानर्जींच्या अध्यक्षतेखाली भरण्याचें ठरलें होतें. पूर्वबंगालच्या फुल्लरशाही सरकारने रस्त्यांतून 'वंदेमातरम्'ची घोषणा करूं नये, असा हुकूम काढला होता. परिषदेस जमलेल्या लोकांनी अध्यक्षांची मिरवणूक काढून हजारोंच्या संख्येने वंदेमातरम्चा घोष केला ! पोलीस धावले, त्यांनी मिरवणुकींतील लोकांचीं टाळकीं लाठयांनी सडकून काढलीं; डोकीं फुटलीं, रक्ताच्या धारा वाहूं लागल्या, तरी लोकांनी शांत राहून वंदेमातरम्चा जयघोष चालू ठेवला. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामांतील

---

* 'राष्ट्रीय बहिष्कार' लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग ३, पृ. ९,

सत्याग्रह मोहिमेची ही पहिली सलामी होय. यासंबंधाने लिहिलेल्या 'सरकार आणि बारिसाल प्रकरण' (केसरी, ता. १५-५-१९०६) या लेखांत लोकमान्य म्हणतात—

"अधिकाऱ्यांनी कायदेशीरपणाने लोकांच्या तोंडास गवसणी अडकविली किंवा कायदेशीरपणाने लोकांचीं डोकीं फोडलीं म्हणून लोकांनी हा कायदेशीर छळ निमूटपणे सोसावयाचा किंवा कसें हा बंगालच्या लोकांपुढे प्रश्न होता. ज्याप्रमाणे कायदेशीर जुलूम लोकांवर करण्यांत येतो, त्याप्रमाणे शांततेने, स्थिरबुद्धीने आणि संकटास धिमेपणाने डोकें द्यावयाचें पण हार जावयाचें नाही ह्या दृढ निश्चयाने जुलमी हुकुमांचा प्रतिकार प्रजेस करतां येतो. जुलूम तो जुलूम; मग तो कायदेशीर असो किंवा बेकायदेशीर असो. कायदेशीर जुलूम असला तर शांततेने व हाल सोसण्याच्या दृढनिश्चयाने त्याचा प्रतिकार केला पाहिजे; 'तो बेकायदेशीर असला तर बेकायदेशीर रीतीने त्याचा प्रतिकार केला पाहिजे.' कांहींच्या हालअपेष्टा झाल्या तरी हरकत नाही. पण काळ सोकावूं देतां कामा नये...कोणचाहि हुकूम कायदेशीर ठरविण्यास विशिष्ट संस्कारांच्या भट्टींतून त्या हुकमास काढून घेण्याची इंग्रज सरकारची रीत आहे; त्याप्रमाणे कोणाचाहि हुकूम जुलमाचा आहे हें ठरविण्यास विशिष्ट हालअपेष्टांच्या भट्टींतून चालून जाण्यास, तक्रार करणारांनी तयार असलें पाहिजे, असा इंग्रजी राष्ट्राचा प्रघात आहे."

टिळकांचें हें प्रतिपादन आणि कायदेभंगरूपी सत्याग्रहासंबंधाने गांधीजींनी वेळोवेळीं केलेलें प्रतिपादन यांत, एक अपवाद वगळला असतां, कांही फरक आहे असें वाटत नाही. अपवाद जो म्हटला, तो वरील उताऱ्यांत एकेरी अवतरण चिन्हाने दर्शविलेल्या वाक्यांत अंतर्भूत आहे. बाकीच्या मजकुराची भाषा फक्त गांधींजींची नाही; आशय त्यांच्या तत्त्वज्ञानाशीं पूर्ण मिळता आहे.

कलकत्याची राष्ट्रीय सभा आटपल्यानंतर ता. २ जानेवारी १९०७ रोजीं लोकमान्यांनी 'नव्या पक्षाचीं तत्त्वें' (Tenets of the New Party) या विषयावर व्याख्यान दिलें. लोकप्रियतेच्या माध्यान्हीं तळपत

असतां, कर्तृत्वशक्तीच्या पूर्ण भरांत, देशाच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नांना आपल्या मनाजोगती दिशा लागत असल्याच्या पूर्ण संतोषांत त्यांनी दिलेलें हें व्याख्यान म्हणजे

मग ज्ञानाग्निसंपर्कें । कडसिलें विवेकें ।
पदा आलें परिपाकें । आमोदासीं ॥ ज्ञानेश्वरी १. ५२

या ज्ञानेशांच्या वचनांत वर्णिल्याप्रमाणे कढवून शुद्ध व सुगंधित बनलेलें स्वातंत्र्यवादी विचारसरणीचें नवनीत होय. या व्याख्यानांत ते म्हणतात—

"व्यावहारिक राजकारणाचें क्षेत्र अमर्याद आहे... जुन्या पक्षाचा ब्रिटिश राष्ट्राकडे दाद मागण्यावर विश्वास आहे व आमचा नाही. आमची ही भूमिका असल्यामुळे आमच्यापाशीं कांही तरी दुसरें साधन असलें पाहिजे हें तर्कसिद्ध आहे... आमच्याजवळ शस्त्रें नाहीत व शस्त्रांची आवश्यकताहि पण नाही. आमच्याजवळ अधिक प्रबल शस्त्र आहे. बहिष्कार हें आमचें राजकीय शस्त्र आहे. एक गोष्ट आमच्या दृष्टीस पडली आहे. ती ही की, मूठभर इंग्लिश लोकांनी चालविलेला हा सर्व राज्यकारभार आमच्या सहकार्यानें चालला आहे... पण सशस्त्र प्रतिकार करण्याचें सामर्थ्य तुमच्या अंगीं नसलें तरी स्वार्थत्याग आणि आत्मसंयमन यांचा उपयोग करून या परकीय सरकारला आपल्यावर राज्य करण्यास मदत न करण्याचेंहि सामर्थ्य तुमच्या अंगीं नाही काय? हाच बहिष्कार होय. आणि बहिष्कार हें राजकीय शस्त्र आहे, असें जेव्हा मी म्हणतों तेव्हा त्याचा हाच अर्थ असतो. सारावसुलीस व शांततारक्षणास आम्ही त्यांस साहाय्य करणार नाही. हिंदुस्थानचें रक्त सांडून आणि हिंदुस्थानचा पैसा वेचून सरहद्दीच्या पलीकडे किंवा हिंदुस्थानच्या बाहेर युद्ध करण्यास आम्ही त्यांना साहाय्य करणार नाही. न्यायदानाचें कार्य करण्यास आम्ही मदत करणार नाही. आम्ही आमचीं कोर्टें स्थापन करूं; आणि वेळ आली म्हणजे आम्ही करहि देणार नाही. तुमच्या संघटित प्रयत्नांनी तुम्हांस हें करतां येईल काय? जर येत असेल तर तुम्ही उद्यापासून स्वतंत्रच आहां."*

* आधुनिक भारत, आवृत्ति १ ली, पृ. ४३३-३५ वरून उद्धृत.

असहकारिता आणि सत्याग्रह यांचें जें स्वातंत्र्यवादी राजकारण सन १९२० नंतर महात्मा गांधींनी सुरू केलें त्याच्यांत आणि टिळकांनी १९०७ सालीं सांगितलेला जो बहिष्कारयोग त्याच्यांत वास्तविक काय भेद आहे ? राज्यकारभारांत असहकार, कोर्टांवर बहिष्कार, करबंदी, युद्धप्रयत्नांत असहकार, इत्यादि बाबी ज्या टिळकांनी कल्पिल्या त्याच गांधींनी अमलांत आणून अखेर हिंदी राष्ट्राला स्वातंत्र्यासाठी सिद्ध केलें, यांत या दोघां महापुरुषांचा सारखाच गौरव आहे.

## ‘ फोडा व झोडा ’

स्वावलंबन, स्वार्थत्याग आणि प्रतिकार या तीन मूलतत्त्वांच्या आधारावर लोकमान्य टिळक ज्या वेळीं बहिष्कारयोग किंवा निःशस्त्रप्रतिकार या प्रखर राजकीय साधनाची उभारणी करीत होते, त्या वेळीं नामदार गोखले हे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी जॉन मोर्ले यांच्या भेटी घेऊन त्यांच्याकडून कांही भरीव राजकीय सुधारणा पदरांत पाडून घ्याव्या या उद्योगांत निमग्न होते. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना करतांना सुद्धा सेल्बीसारख्या साहेबाची सल्ला घेणारे गोखले राजकारणी डावपेचांत भोळसर ठरून मोर्लेंच्या साखर पेरणाऱ्या भाषणास भुलले असल्यास त्यांत नवल नाही. ‘फोडा व झोडा’ या हिंदी लोकांच्या बाबतींत अचूक परिणामकारक ठरणाऱ्या राजनीतितत्त्वाचा प्रयोग इंग्रज राज्यकर्त्यांनी या नव्या आघाडीवर सुरू केला होता. हिंदुमुसलमानांमध्ये फूट पाडण्याची कारवाई १८९३ सालीं सुरू झाली होती हें आपण पाहिलें आहे. त्या फुटीच्या प्रयत्नांतून उजळ माथ्याने निघून राष्ट्रीय सभा आता कुठे तेजस्वी राजकारणाचा मार्ग चोखाळूं लागली होती, इतक्यांत नेमस्त आणि जहाल यांच्यामध्ये भेदनीतीचा प्रयोग सुरू झाला. नेमस्तांना चुचकारून, राजकीय सुधारणांचें मधाचें बोट लावून, जहालांपासून फुटून निघण्यास उत्तेजन देण्यांत आलें. हा भेदनीतीचा प्रयोग एका झटक्यांत यशस्वी झाला. सुरतेस १९०७ च्या अखेरीस भरलेली राष्ट्रीय सभा मोडली; नेमस्त आणि जहाल यांच्या छावण्या वेगवेगळ्या झाल्या.

सुरतेस घडलेल्या चित्तथरारक नाट्यपूर्ण प्रसंगामध्ये मुख्य भूमिका टिळकांची होती. कलकत्त्याच्या १९०६ च्या राष्ट्रसभेनंतर पुढची राष्ट्रसभा नागपुरास भरण्याचें ठरलें होतें. नागपूरच्या तरुण राष्ट्रीय पक्षाची जिद्द टिळकांना अधिवेशनाचे अध्यक्ष करावें अशी होती. मुंबईच्या बालेकिल्ल्यांत ठाण मांडून बसलेल्या कांग्रेसच्या सूत्रचालकांना बिथरून जाण्यास हें कारण पुरेसें होतें. नागपूरच्या स्वागतमंडळांत भांडणें आहेत अशा सबबीवर ऑल इं. कां. कमिटीने नागपुराहून कांग्रेस सुरतेस नेण्याचा ठराव केला. सुरतेचे लोक फेरोजशहा मेथांच्या पूर्ण मुठींतले होते.

टिळक अध्यक्षपदाविषयी पूर्ण निरपेक्ष होते. त्यांचें व राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें असें होतें की स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य यांसंबंधीचे कलकत्त्यास झालेले ठराव (अधिक कडक न केले तरी) निदान तसेच कायम राखावेत, अधिक सौम्य करूं नयेत. नेमस्त पुढारी असें आश्वासन देण्यास तयार नव्हते. कलकत्त्यास दादाभाईंच्या दडपणामुळे जें घडलें तें त्यांना तसेंच राहायला नको होतें; त्याच्या मागे जाण्याची त्यांची इच्छा होती. आणि ह्याच मुद्यावर नव्या पक्षाला बाहेर घालवितां आलें तर तें त्यांना पाहिजे होतें.

वादाला तोंड लागलें अध्यक्षाच्या सूचनेवरून. टिळकांनी लाला लजपतरायांना अध्यक्ष करावें म्हणून सुचविलें. नेमस्तांनी डॉ. रासबिहारी घोष यांना अध्यक्षपद द्यायचें ठरविलें. सभेच्या पहिल्या दिवशीं अध्यक्षांची रीतसर निवड होण्याच्या अगोदरच सभेंत गोंधळ माजल्याने स्वागताध्यक्षांनी सभा तहकूब केली. दुसऱ्या दिवशीं अध्यक्षाची सूचना होऊन तिला सुरेन्द्रनाथ बानर्जींनी अनुमोदन दिलें. इतक्यांत टिळक उठून व्यासपीठावर गेले व अध्यक्षांच्या निवडीच्या सूचनेला आपली उपसूचना मांडण्यासाठी बोलूं लागले. ‘माझी अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे’ असें बजावून रासबिहारी टिळकांना बोलूं देईनात; टिळक ‘तुमची निवड झालेली नाही, मी बोलणार’ असें म्हणून व्यासपीठावरून उतरेनात. टिळकांच्या अंगावर कांही जण धावून येऊं लागले. मोठी दंगल माजली. खुर्च्या, काठ्या, जोडे फेकण्यांत आले. पोलिसांनी येऊन मंडप ताब्यांत घेतला व सर्वांना बाहेर घालविलें.

झाल्या गोष्टीसंबंधानें आरोप प्रत्यारोपांचें रान माजलें. नेमस्तांनी आपली एक 'कनव्हेशन' स्थापन केली. राष्ट्रीय पक्षानें संयुक्त राष्ट्रसभा पुन्हा चालू करण्याचा प्रयत्न करण्याकरिता एक कमिटी नेमली. सरकारच्या दडपशाहीमुळे तिजकडून फारसें कांही होऊं शकलें नाही. नेमस्तांना फोडून निराळें केल्यानंतर जहालांना झोडण्याचा कार्यक्रम सुरू झाला. ता. २४ जून १९०८ रोजीं टिळकांना मुंबईस राजद्रोहाच्या आरोपावरून पकडण्यांत आलें. या पूर्वीच्या तीन वर्षांत त्यांनी प्रचंड कार्य केलें होतें व राजकीय ध्येयासाठी जनशक्ति संघटित करण्यांत फार मोठा पल्ला गाठला होता. अशा रीतीनें ते एकसारखे कार्य मग्न राहिले तर अखेरपर्यंत त्यांना 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून जीवनतत्त्वाचा संदेश देण्यास फुरसत मिळणार नाही हें लक्षांत घेऊनच जणूं काय भवितव्यतेने त्यांना सक्तीची फुरसत देण्यासाठी ही योजना केली !

गणपति उत्सव आणि शिवजयंत्युत्सव यांचा प्रसार सर्वत्र होऊन त्यांतून स्वातंत्र्यभावना उद्दीपित करण्याचें काम यथास्थित होत होतें. रायगडावर १९०० सालीं आणि १९०६ सालीं शिवजयंत्युत्सव मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. राष्ट्रीय शिक्षणासाठी 'महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळ' आणि स्वदेशीच्या पूर्तीसाठी 'पैसाफंड' यांची संघटना लोकमान्यांनी केली त्याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. म्युनिसिपालिट्या, कौन्सिलें वगैरेमधील निवडणुकी हें जनशक्तीच्या संघटनाचें एक साधन असतें, म्हणून अशा निवडणुकी शक्य तेथे लढविण्याचें टिळकांचें धोरण असे. तदनुसार १९०८ च्या मार्चमध्ये पुणें म्युनिसिपालिटीची निवडणूक लढवून तिच्यामधील चारी जागा त्यांनी राष्ट्रीय पक्षासाठी जिंकल्या. धुळें येथे मुंबई प्रांतिक परिषद २७ एप्रिल १८०८ रोजीं भरली, तिला फार महत्त्व आलें. राष्ट्रीय सभा काबीज करतां आली नाही, तरी प्रांतिक परिषदेवर राष्ट्रीय पक्षाचा पूर्ण पगडा बसविण्याचें कार्य या अधिवेशनांत टिळकांनी साधिलें. पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव या अधिवशेनांत मान्य करण्यांत आला. १९०८ सालीं टिळकांनी आणखी एक महत्त्वाची चळवळ हातीं घेतली, ती मद्यपाननिषेधाची होय. स्वयंसेवकांची संघटना झाली, गुत्त्यांवर निरोधन (पिकेटिंग) सुरू झालें, स्वयंसेवक पकडण्यांत येऊं लागले. ही चळवळ नीटपणें धसाला

लागण्यापूर्वीच टिळक पकडले गेले. राष्ट्रीय पक्षाच्या मतांचा प्रसार करण्या-साठी एका दैनिकाची आवश्यता होती; यास्तव नॅशनल पब्लिशिंग कंपनी नांवाची मर्यादित जबाबदारीची कंपनी स्थापन करून तिच्या तर्फे 'राष्ट्रमत' नांवाचें दैनिक काढण्याची त्यांनी व्यवस्था केली. या कमनशिबी दैनिकाचा पहिला अंक टिळकांना पकडल्यानंतर ता. २९ जून रोजीं निघाला.

सशस्त्र क्रांतिकारकांची संघटना महाराष्ट्रांत, त्याचप्रमाणे बंगाल्यांत १९०६ सालापासूनच सुरू झाली होती. प्रत्यक्ष कृति करण्यांत बंगाल्याने आघाडी मारली. हुतात्मा खुदीराम बोस यांनी ता. ३० एप्रिल १९०८ रोजीं मझफरपूर येथे पहिला बांब टाकला. या अत्याचारास व त्यावरून झालेल्या दडपशाहीस अनुलक्षून 'देशाचें दुर्दैव' आणि 'हे उपाय टिकाऊ नाहीत' असे दोन लेख केसरींत आले त्यांवरून लोकमान्यांवर राजद्रोहाचा खटला भरण्यांत आला. १८९७ सालीं रँडच्या खुनाचें निमित्त, तर १९०८ सालीं बांबच्या अत्याचाराचें निमित्त ! दोन्ही केवळ निमित्तेंच होतीं. टिळ-कांच्या राजकीय कार्याची प्रखरता नोकरशाहीला असह्य झाली, हेंच दोन्ही वेळचें खरें कारण. दोन्ही वेळीं अगोदर फोडा व झोडा या नीतीचा अवलंब करून नेमस्तांना वेगळें पाडण्यांत आलें होतें. १८९७ सालीं नेमस्तांनी सार्वजनिक सभेंतून फुटून निघून डेकन सभा स्थापली होती. त्या वेळीं फुटीचें प्रदर्शन मुंबई प्रांतापुरतेंच होतें. १९०७–०८ सालचें फुटीचें प्रदर्शन अखिल भारतीय होतें. हें देशाचें सर्वांत मोठें दुर्दैव होतें. टिळकांना फूट नको होती. टिळकांना पकडलें त्या वेळीं गोखले विलायतेंत असून स्टेट सेक्रेटरी मोर्ले यांच्या व त्यांच्या भेटीगाठी होत होत्या !

# १२. अद्वितीय लोकनायक आणि मुत्सद्दी

## दीर्घ बंदिवास

लोकमान्यांचा खटला ता. १३ जुलै १९०८ रोजीं हायकोर्टाच्या सेशनांत न्यायाधीश दावर यांच्यापुढे सुरू झाला. आपल्या तर्फे बॅरिस्टर वगैरे न देतां टिळकांनी स्वतःच आपला बचाव केला. सतत आठ दिवस बचावाचें भाषण करून हिंदुस्थानच्या सध्याच्या राजकीय स्थितींत राजद्रोह कशाला म्हणावें व कशाला म्हणूं नये याविषयी कायद्याच्या तात्त्विक चर्चेने भरलेला युक्तिवाद त्यांनी ज्यूरीच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न केला. नऊ सद्गृहस्थांच्या ज्यूरींत सात इंग्रज व दोन हिंदी गृहस्थ होते. टिळकांवर राजद्रोहाचा व जातीजातींत वैमनस्य पसरविल्याचा असे दोन आरोप होते. ज्यूरींतील सात गृहस्थांनी दोन्ही गुन्ह्यांबद्दल दोषी व दोघां गृहस्थांनी निर्दोषी असा निकाल सांगितला. बहुमतास अनुसरून न्यायाधीश दावर यांनी आरोप शाबीत धरून सहा वर्षें काळें पाणी आणि १००० रु. दंड अशी शिक्षा फर्माविली.

एवढी अमानुष शिक्षा देऊन या न्यायाधीशाचा आत्मा संतुष्ट झाला नाही. टिळकांना उद्देशून कुत्सित व हलकट उद्गारांनी भरलेलें भाषण करून या गृहस्थाने टिळकांबरोबर आपलें नांव चिरस्थायी करून घेतलें आहे.

ज्यूरीने निकाल दिल्यानंतर टिळकांनी काढलेले धीरोदात्त उद्गार प्रत्येक देशाभिमानी हिंदी मनुष्याच्या अंतःकरणांत निनादत राहिले.

**“ ज्यूरीने कसाहि निकाल दिला असला तरी मी पूर्ण निर्दोषी आहें अशी माझी निश्चित धारणा आहे.**

**सृष्टीच्या भवितव्यतेवर या कोर्टापेक्षा वरिष्ठ असलेल्या परमेश्वरी सत्तेचें प्रभुत्व असतें. माझ्या स्वातंत्र्यापेक्षा माझ्या हालअपेष्टांनीच मी अंगीकृत केलेलें राष्ट्रकार्य अधिक भरभराटीस यावें असाहि परमेश्वराचा संकेत असेल."**

शिक्षा झाल्यानंतर टिळकांना दोन महिने साबरमती तुरुंगांत ठेवलें होतें. नंतर त्यांना मंडाले इथे नेण्यांत आलें. तेथे त्यांनी शिक्षेचा बाकीचा काळ, म्हणजे तीन महिने कमी सहा वर्षे काढलीं. या काळांत त्यांची व्यवस्था चांगली ठेवण्यांत आली होती. शिक्षेंतील सक्तमजुरीचा भाग काढून टाकून केवळ बंदींत राहणें एवढेंच तिचें स्वरूप ठेवण्यांत आलें होतें. राहण्याला दोन खणी खोली, सभोवती थोडेंसें मोकळें आवार; खाण्याला दूध तूप हे पौष्टिक व भातपोळी इत्यादि सवयीचे पदार्थ; करून घालण्याला एक स्वतंत्र आचारी याप्रमाणे एकंदरीने व्यवस्था बरी होती.

टिळकांना शिक्षा झाली तेव्हा त्यांना ५२ वर्षें पूर्ण झालीं होतीं व ते सुटले त्यावेळीं जवळ जवळ ५८ वर्षें झालीं होतीं. कॉलेजमध्ये दणकून व्यायाम करून कमावलेल्या शरीरसंपत्तीवर २८ वर्षें केलेले अखंड व अपार परिश्रम आणि १८९७ च्या तुरुंगवासांतील हाल यांचा जबर बोजा पडल्याकारणाने त्यांचें शरीर अगोदरच पोखरलें गेलें होतें. वृषणवृद्धी, अपचन, बद्धकोष्ठ, हिरडयांची सूज व मधुमेह इतके विकार आपल्याला हळूहळू पूर्वीपासून जडले असल्याचें तुरुंगवासाच्या पहिल्या वर्षाच्या अखेरीस लिहिलेल्या एका पत्रांत ते सांगतात. इतक्या रोगांचें खटलें जवळ बाळगून देखील सहा वर्षांच्या अखेरीस एकंदरीने त्यांची प्रकृति बरी राहिली याचें मुख्य कारण त्यांची साधी व संयमी राहणी हें तर खरेंच, पण सरकारचें तुरुंगव्यवस्थेबाबतचें सवलतीचें धोरण हेंहि बऱ्याच अंशाने कारण म्हणून नमूद केलें पाहिजे. ब्रिटिश राष्ट्र हें हिंदुस्थानाला जिंकून स्वार्थासाठी त्याच्यावर राज्य करीत असलें, तरी एकंदरीने सुधारलेलें, उदार व मानव्याची बूज राखणारें, यांत कांही शंका नाही. तें जर स्पेन पोर्तुगालप्रमाणे रानवट, हिरवट किंवा फ्रेंच जर्मनांप्रमाणे निर्घृण असतें तर आपल्या स्वातंत्र्य-

संग्रामाचा इतिहास फार निराळा झाला असता. जनतेची स्वातंत्र्याकांक्षा मोडून काढण्यासाठी टिळकांना जनतेपासून अलग करावयाचें होतें, तेवढें त्यांनी केलें. याउपर टिळकांचा खुनशी छळवाद त्यांनी केला नाही. दुसरें एखादें छळवादी सरकार असतें तर अशा स्थितींत मानसिक व शारीरिक त्रास जारी ठेवून त्याने या दीर्घ मुदतींत टिळकांची अजीबात वाट तरी लावून टाकली असती किंवा त्यांना कोणतेंहि काम करण्यास असमर्थ अशा जीवन्मृतावस्थेंत आणून सोडलें असतें. पण ब्रिटिश सरकारच्या बंदीवासांतून टिळक सुटले ते सहा वर्षांच्या कालगतीने उतारवयांत जितकी अशक्तता वाढावी त्यापेक्षा अधिक वाढली नाही अशा स्थितींत सुटले. जनतेची अनमोल ठेव थोडी मनोती कापून घेऊन सरकारने जनतेला परत दिली.

प्रत्येक बाबतींत कायदेशीर लढा शेवटपर्यंत नेऊन भिडवायचा ही टिळकांची वृत्ति. तेव्हा झालेल्या शिक्षेवर हायकोर्टांत अपील, पुढे प्रिव्ही कौन्सिलकडे अपील, त्यानंतर स्टेट सेक्रेटरीकडे व बादशहाकडे दयेचा अर्ज, वगैरे गोष्टी चालूच होत्या. पण सरकारने अमुक मुदतीपर्यंत टिळकांना अडकवून ठेवायचें असा शिक्षा देतांनाच निश्चय केलेला असल्यामुळे या प्रयत्नांचा कांही एक उपयोग झाला नाही. ताईमहाराज केसच्या हायकोर्टा-तील अपिलाचा निकाल १९१० सालीं लागला, त्या अपिलाचें आणि त्याच्यावर प्रिव्ही कौन्सिलाकडे करावयाच्या अपिलाच्या तयारीचें काम टिळकांना तुरुंगवासांतच करावें लागलें. या सर्व विवंचनांचा भार शिरावर असतांनाच गीतारहस्य हा ग्रंथराज त्यांनी मंडालेच्या तुरुंगांत लिहिला. ता. २ डिसेंबर १९१० ते ता. २ मार्च १९११ पर्यंतच्या तीन महिन्यांत या ग्रंथाचा मुख्य भाग लिहून झाला असें त्यांच्या पत्रांमधील उल्लेखांवरून दिसतें. परिशिष्टें व गीताश्लोकांचें मराठी भाषांतर नंतर तयार करण्यांत आलें. 'ब्रह्मसूत्रवृत्ति' म्हणून ब्रह्मसूत्रांवरील शांकरभाष्याचा सोप्या संस्कृतांत सारांशहि त्यांनी तुरुंगवासांत लिहून काढला असें दिसतें.* 'ओरायन' या ग्रंथाची सुधारून परिपूर्ण केलेली आवृत्ति काढण्याची तयारी

---

* केसरी मराठा–टिळक जन्मशताब्दी विशेषांक, पृ. ९३, आचार्य वि. प्र. लिमये यांचा लेख.

त्यांनी याच अवकाशांत केली. जर्मन, फ्रेंच व पाली या भाषा या अवकाशांत शिकून घेतल्या. सरकारने राजकीय व प्रचलित विषय खेरीज करून बाकी वाटेल त्या विषयावरील ग्रंथ आणविण्याची आणि लेखन वाचनाची सवलत दिली होती, म्हणून इतक्या गोष्टी त्यांना करतां आल्या. जून १९१२ च्या प्रारंभीं त्यांच्या पत्नी वारल्याची तार त्यांना मिळाली, तेव्हा मात्र त्यांचें अंतःकरण विह्वल झालें. धैर्यमेरु क्षणकाल तरी विकम्पित झाला. ता. ८ जून १९१२ च्या पत्रांत ते म्हणतात—

"तुमची तार पोचली. मनाला फार मोठा जबर धक्का बसला. संकटें आलीं तर तीं मी शांतपणाने सोशीत असतों हें खरें. पण खरेंच सांगतों की या बातमीने मात्र मी अगदी हादरून गेलों,...तिच्या मरणकाळीं मी जवळ नाही, इतकेंच नव्हे तर बंदिवासांत असावें याचेंच फार दुःख वाटतें. पण तें होणारच होतें. भवितव्यतेला कोण काय करणार? हीच भीति मला राहून राहून वाटत होती आणि शेवटीं तसेंच घडलेंहि."*

## सुटकेनंतर

"माझ्या स्वातंत्र्यापेक्षा माझ्या हालअपेष्टांनीच मी अंगीकृत केलेलें राष्ट्रकार्य ऊर्जित दशेला यावें असाहि ईश्वरी संकेत असेल" असे उद्गार शिक्षा होत असतां आध्यात्मिक स्फूर्तीसरशीं लोकमान्यांच्या तोंडून बाहेर पडले. बुद्धीला अगम्य अशा आंतरिक शक्तींचा कांही परिणाम झालाहि असेल. पण व्यावहारिक दृष्टीने पाहिलें असतां त्यांच्या बंदिवासाच्या परिणामाबाबत नोकरशाहीची अटकळ व अपेक्षा हीच खरी ठरली असें दिसून येतें. टिळकांच्या बंदिवासाने त्यांनी आरंभिलेल्या राष्ट्रकार्याचें ऊर्जित न होतां, तें अगदी गारद होऊन गेलें. दडपशाहीचा वरवंटा फिरतांच राष्ट्रांतील चळवळ शांत झाली; चैतन्य नष्ट झालें नाही, तरी लुप्त झालें. लाला लजपतराय अमेरिकेला निघून गेले. बिपिनचंद्र पाल सुमारें सहा महिने कैद भोगून आल्यानंतर विलायतेला

* लो. टिळक यांचें चरित्र, खंड २, भाग ९, पान ३७.

गेले आणि तिकडून परत आल्यानंतर कांही काळाने ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं सहकार्य करण्याची इष्टता प्रतिपादूं लागले. आध्यात्मिक प्रवृत्तीचे पुढारी बाबू अरविंद घोष १९१० च्या प्रारंभीं आध्यात्मिक साधना करण्याकरिता देशत्याग करून पांडिचरीस जाऊन राहिले. त्याच सुमारास इतर बंगाली पुढाऱ्यांना हद्दपार करण्यांत आलें. मद्रासेस चिदंबरम् पिले यांजवर खटला होऊन त्यांना सहा वर्षांची शिक्षा ठोठावण्यांत आली. जनता किंकर्तव्यमूढ बनली. सगळीकडे स्मशानशांतता पसरली.

महाराष्ट्रांतली परिस्थिति फारशी वेगळी नव्हती. टिळकांच्या अनुयायिमंडळापैकी १९०८-०९ सालीं कैदेंत गेलेले लोक कैदेंतून सुटून आल्यानंतर आपआपल्या ठिकाणीं चूप होते. केसरी आणि मराठी हीं वृत्तपत्रें नरसोपंत केळकरांच्या तारतम्यशील मध्यममार्गी स्वभावामुळे चालू राहिलीं होतीं. बाकीचीं राष्ट्रीय पक्षाचीं वृत्तपत्रें बंद पडून सार्वजनिक वातावरणांत भकासपणा आला होता. समर्थ विद्यालयावर झडप घालून तें सरकारने बंद केलें होतें. राष्ट्रीय पक्षाच्या कित्येक सरदार मनसबदारांनी राजकीय क्षेत्रास रामराम ठोकून वाङ्मयाच्या इतर प्रांतांत मुक्तसंचार करण्याला आपल्या लेखण्यांना मोकळें सोडलें होतें.

अशा स्थितींत ता. १७ जून १९१४ रोजीं मध्यरात्रीं टिळकांना सरकारने गायकवाड वाड्यासमोर अचानक आणून सोडून दिलें. टिळकांनी अगदी प्रारंभीं मुलाखत देतांना रिप व्हॅन विंकल सारखी आपली स्थिति झाली असल्याचें वर्णन केलें. तथापि थोड्याच अवधींत एकंदर परिस्थितीचें आकलन करून पुढे कशीं पावलें टाकायचीं याचे आडाखे बांधण्यास त्यांनी सुरवात केली. इतक्यांत युरोपांत महायुद्धाचा डोंबाळा उठून ता. ४ आगष्ट १९१४ रोजीं ब्रिटिश सरकारने त्यांत उडी घेतली. युद्धाच्या चिंतेंत सरकार व्यग्र असतांना देशाच्या अंतर्गत चालू असलेल्या चळवळींना तें अधिकच निर्घृणपणें दडपून टाकणार, तेव्हा कशास कांही पत्ता नसतां सुरवातीसच सरकारी दडपशाहीला बळी जाण्याची पाळी येऊं नये, म्हणून टिळकांनी कलेक्टरशीं वाटाघाट करून स्वतःचें राजकीय धोरण स्पष्ट करणारा एक जाहीरनामा ता. २७ आगष्ट १९१४ रोजीं काढला. त्यांत मोर्ले-मिंटो

सुधारणांविषयी अनुकूल मत व्यक्त करून इंग्रजी बादशाही तख्ताबद्दल उत्कट राजनिष्ठा आमच्या मनांत आहे असें म्हटलें आहे.

'त्रस्त समंधा ! शांत हो !' अशा पद्धतीचा हा जाहीरनामा काढल्यानंतर पुढे पावलें कशीं टाकावीं याचा विचार टिळकांच्या मनांत सुरू झाला. राष्ट्राचें मन विकल, हताश झालेलें होतें. अनुयायिवर्ग किंकर्तव्यमूढ बनलेला होता. पण लोकमान्य टिळक हा

मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥

गीता, १८–२६

या कोटींतील पुरुष होता. आचार्य जावडेकरांनी म्हटल्याप्रमाणे

"राष्ट्र कोणत्याहि स्थितींत असलें तरी त्याला कर्मप्रवण कसें करावें आणि त्याची छाप प्रतिपक्षावर कशी बसवावी ही कला लोकमान्यांना पूर्णपणें अवगत होती."*

परिस्थिति अत्यंत नाउमेदीची होती हें खरें.

"पण परिस्थितीचा विचार तिच्यापुढे शरण जाण्यासाठी करावयाचा नसून तिला आपणापुढे शरण आणण्यासाठी करावयाचा असतो. मनुष्याची बुद्धि परिस्थितीने बद्ध असते हें खरें असलें तरी त्याच बुद्धीच्या साहाय्याने तो तिच्यावर आपलें प्रभुत्वहि प्रस्थापित करीत असतो. याचसाठी बुद्धि केवळ परिस्थितिनिष्ठ असून कार्य होत नाही तर ती आत्मनिष्ठहि असावी लागते."*

लोकमान्यांची बुद्धि आत्मनिष्ठ किंवा गीतेच्या परिभाषेत 'व्यवसायात्मिका' होती. म्हणून परिस्थिति स्वराज्यानुकूल बनविण्याकरिता काय केलें पाहिजे याविषयी विशुद्ध विचार ती प्रसवूं शकली.

## होमरूल

जनतेला उत्साहित केलें पाहिजे आणि अनुयायांना कार्यप्रवण केलें पाहिजे; हें होण्यासाठी राष्ट्रापुढे असें एक उद्दिष्ट ठेवलें पाहिजे की जें

---

* आधुनिक भारत, आवृत्ति १ ली, पृ. ४७२.

परिस्थितीला झेपण्याजोगें असूनहि पुरेसें आकर्षक व तेजस्वी असेल आणि ज्याच्यावर राष्ट्राची इच्छाशक्ति केंद्रित होऊं शकेल. ही सर्व कल्पना करीत असतांना लोकमान्य हेंहि विसरले नव्हते की अखिल हिंदी राष्ट्राची दुर्दान्त व अधृष्य इच्छाशक्ति कार्यकर्ती होण्यास तिला राष्ट्र-सभेचें अधिष्ठान प्राप्त होणें अवश्य आहे. हें अधिष्ठान प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न करणें हाहि ताबडतोबीचा कार्यक्रम त्यांच्या डोळ्यांसमोर होता. मराठी मुलखांतले त्यांचे अनुयायी दाठरलेल्या वृत्तीने आपआपल्या जागीं स्वस्थ बसले होते. त्यांना कामाला लावून त्यांच्या द्वारा जनमत प्रबल व संघटित करूं शकेल अशा कार्यक्रमाची जरूरी क्षणोक्षणीं भासत होती. पण १९०६–०७ सालीं उद्घोषित केलेला कार्यक्रम पुनः पुढे आणण्याची सोय नव्हती व शक्यता नव्हती. तो तेजस्वी कार्यक्रम उत्सा-हाच्या लाटेच्या शिखरावर नाचत नाचत राष्ट्राच्या पुढयांत येऊन पडला होता. आणि आता राष्ट्र निरुत्साहाच्या गर्तेच्या तळाशीं येऊन पडलें होतें.

लोकमान्यांच्या यापुढील आयुष्याचे राजकीय कर्तृत्वाच्या दृष्टीने दोन भाग पडतात. पहिला भाग लखनौ कांग्रेस, म्हणजे १९१६ अखेर पर्यंतचा आणि त्याच्यापुढील भाग १९१७ च्या सुरवातीपासून १ आगष्ट १९२० रोजीं झालेल्या त्यांच्या मृत्यूपर्यंतचा.

पहिल्या कालखंडांत त्यांनी एका बाजूने जनतेपुढे ‘ होमरूल ’ या नांवाने साम्राज्यांतर्गत स्वराज्याचें निकटचें उद्दिष्ट ठेवून त्याच्या भोवती जनतेची शक्ति संघटित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. तसेंच दुसऱ्या बाजूने कांग्रेसमध्ये शिरून तिथे आपलें बहुमत करून तिची सर्व शक्ति व प्रतिष्ठा स्वराज्याच्या मागणीच्या मागे उभी केली.

मुंबई प्रांतिक परिषद ता. ८,९, १० मे १९१५ रोजीं पुणें येथे फार मोठ्या उत्साहाने भरली. टिळकांची उपस्थिति हें मुख्य उत्साहकारण होतें. ४०० स्वागतसभासद आणि ९६० प्रतिनिधि जमले होते. अध्यक्षस्थानीं टिळ-कांचे मित्र बॅरिस्टर बॅप्टिस्टा होते. त्यांच्या अध्यक्षीय भाषणांत 'होमरूल' चा प्रथम उल्लेख झाला. आयर्लंडच्या लोकांनी महायुद्धाच्या काळांत देखील होमरूलची चळवळ जोरांत चालविली होती. तोच दाखला इकडे हिंदु-

स्थानांत सर्वांना पटण्याजोगा होता. खुद्द लोकमान्य टिळकांनी १९१५ च्या अखेरीस 'हिंदी स्वराज्य संघ' या विषयावर चार लेख लिहून आपल्याला आता कोणच्या प्रकारची राज्यव्यवस्था पाहिजे हें लोकांना तपशीलवार रीतीने समजावून दिलें आणि स्वराज्य संघाच्या स्थापनेसाठी लोकांना उद्युक्त केलें. यापूर्वी, म्हणजे सप्टेंबर १९१५ मध्ये मद्रासमध्ये बिझांट-बाईंनी 'होमरूल लीग' काढून या कार्याचें सूत उवाच केलें होतें. टिळकांची 'होमरूल लीग' उर्फ 'हिंदी स्वराज्य संघ' बेळगाव येथे पुढील वर्षाची प्रांतिक परिषद भरली असतां ता. १ मे १९१६ रोजीं स्थापित करण्यांत आला. हें स्वतःचें अधिष्ठान लाभल्याबरोबर टिळकांनी प्रचाराकरिता व्याख्यानांचे दौरे काढण्यास प्रारंभ केला. सरकारने कान टवकारले आणि टिळकांच्या साठाव्या वाढदिवसाच्या दिवशींच (२३ जुलै १९१६) त्यांच्यावर राजद्रोहाच्या आरोपावरून ५० हजार रुपयांचा जामीन मागण्याकरिता खटला भरण्यांत आला. सुदैवाची गोष्ट ही की या खेपेला उच्च न्यायदेवता टिळकांच्या रक्षणार्थ धावून आली. मॅजिस्ट्रेटने सरकारतर्फे दिलेला निकाल हायकोर्टाने फिरवून टिळकांना मुक्त केलें. या खटल्याच्या वेळीं बॅरिस्टर महंमदअली जिना यांनी टिळकांतर्फे काम चालविलें, हें विशेष लक्षांत घेण्याजोगें आहे.

मद्रासकडे ॲनी बेझंट आणि मुंबईकडे लोकमान्य टिळक यांचा होमरूल बाबत धडाक्याने प्रचार सुरू झाला. सरकार हें सहन करण्यास तयार नव्हतें. पुढारी जरी आज राजनिष्ठेची व साम्राज्यांतर्गत स्वराज्याची भाषा बोलत असले तरी ते जनतेची जी शक्ति जागृत करीत आहेत ती अखेरीस आपल्या सत्तेच्या मुळावर आल्याखेरीज राहणार नाही हें राज्यकर्ते ओळखून होते. टिळकांवर दडपशाहीचा प्रयोग १९१६ सालीं झाला. त्यानंतर एक वर्षाने बेझंटबाई व त्यांचे दोन सहकारी अरुंडेल व वाडिया यांना अटक करण्यांत आली. सुमारें तीनच महिने ही त्रयी अटकेंत होती. पण त्या अवधींत आसेतुहिमाचल प्रचंड चळवळ झाली. लोकांमधील शिक्षण वाढलें, राजकारणाविषयीची जाणीव वाढली याची ही खूण होती. या सर्व जागृतीला लोकमान्यांनी गेलीं पंचवीस वर्षें जनतेला राजकीय शिक्षण देण्यासाठी जे अखंड परिश्रम केले होते ते मोठया प्रमाणांत कारणीभूत होते. बेझंटबाईंना

सोडविण्याकरिता सत्याग्रह, निःशस्त्र प्रतिकार या साधनांचा अवलंब करावा असें म्हणण्यापर्यंत मजल गेली. लोकमान्यांनी या कल्पनेचें स्वागत केलें, पण हा प्रश्न तुम्ही आपल्या पुढाऱ्यांवर सोपवा, असा बुद्धिवाद केला. अलाहाबादेस केलेल्या भाषणांत निःशस्त्र प्रतिकाराचें स्पष्टीकरण करितांना त्यांनी 'कायदेशीर' व 'सनदशीर' या दोन शब्दांच्या अर्थांची फोड केली.

"आपल्या ध्येयप्राप्तीचा निश्चय करणें, आणि तिच्या आड कांही कृत्रिम अन्यायी कायदे येत असले किंवा आपल्या मार्गांत कांही अन्याय्य परिस्थितीचा अडथळा उत्पन्न झाला तर त्याच्याशीं झगडणें असा त्याचा अर्थ आहे. तुम्ही हें समजून घ्यावें अशी होमरूल लीगची इच्छा आहे....दांडगाईचा किंवा बेकायदेशीरपणाचा मी उपदेश करीत नाही, तर वाटेल तो स्वार्थत्याग करून आपलें ध्येय गाठण्याचा निश्चय करा असें मी सांगतों. निःशस्त्र प्रतिकार हा पूर्णपणे सनदशीर आहे. कायदेशीर आणि सनदशीर हे शब्द एकाच अर्थाचे नाहीत, हें इतिहासाने सिद्ध केलें आहे. जोंपर्यंत कोणताहि कायदा न्यायाला अगर नीतीला धरून नसेल, आणि १९ व्या व २० व्या शतकांतील नीतीस अनुसरून लोकमताला धरून नसेल, जोंपर्यंत तो या सर्व तत्त्वांस धरून नसेल, तोंपर्यंत तो कायदेशीर असला तरी सनदशीर नव्हे. हा भेद तुम्ही अगदी स्पष्टपणे समजून घेतला पाहिजे." *

ही चर्चा तात्त्विक स्वरूपाची होती. मुंबई प्रांतिक कांग्रेस कमिटीनें सत्याग्रहाला मान्यता देण्याचा ठराव केला, तथापि प्रत्यक्ष निःशस्त्र प्रतिकार करायला कोणी निघाला नव्हता. पुढे १९१८ सालीं टिळकांवर सरकारने भाषणबंदीचा हुकूम बजावला तरी टिळकांनी सत्याग्रह करून त्याचा प्रतिकार केला नाही.

स्वराज्यसंघ उर्फ होमरूल लीगतर्फे शिष्टमंडळ घेऊन १९१८ च्या मार्च अखेरीस टिळक विलायतेला जायला निघाले त्या वेळीं स्वराज्यसंघाचा अहवाल वाचून दाखविण्यांत आला. त्यांत पुढील माहिती देण्यांत आली.

---

* आधुनिक भारत, आवृत्ति १ ली, पृ. ४८६–८७.

संघाचे एकूण सभासद ३३८५४, त्यांपैकी शंभर रु. देऊन झालेले तहाहयात सभासद ६४१, संघातर्फे ४३५ जाहीर व्याख्यानें झालीं, त्यांत टिळकांनी दिलेलीं ८८ होतीं. बॅ. बॅपटिस्टा यांच्या दौऱ्याकरितां २३००० रु. खर्च वजा जातां संघाजवळ वरील तारखेस १,८२,९५७ रु. शिलक होते. त्या काळाचा विचार करतां दोन वर्षांपेक्षाहि कमी कालावधींत संघानें संपादिलेलें हें भव्य यश लोकमान्यांच्या सामर्थ्यशाली कर्मयोगाची साक्ष देण्यास समर्थ आहे.

## कांग्रेसमध्ये शिरकाव

लोकमान्यांच्या कार्याची कांग्रेसकडील बाजू आता पाहूं. स्वराज्य संघासारखी कांही तरी संस्था काढावी, अशी कल्पना टिळकांच्या मनांत १९१४ च्या अखेर पासून घोळत होती. ती कांग्रेसशीं स्पर्धा करण्याकरिता म्हणून नव्हे, तर कांग्रेसला पूरक म्हणून, कांग्रेसच्याच स्वराज्याच्या ध्येयाचा सर्वत्र नेटाने प्रचार करण्याकरिता. ही गोष्ट पुनःपुन्हा स्पष्ट करण्यास टिळक चुकत नसत. कांग्रेस हीच हिंदी राष्ट्राला स्वराज्याच्या ध्येयाप्रत नेणारी एकमेव प्रातिनिधिक संस्था, हा टिळकांचा भाव कधीहि डळमळीत झाला नाही. मंडालेहून सुटून आल्यानंतर कांग्रेसमध्ये शिरून कांग्रेस काबीज करण्याचा निश्चय टिळकांनी केला. गोखले १९१४ सालीं टिळकांना भेटायला गेले, तेव्हा टिळकांनी त्यांना बजावलें, " कांग्रेस सर्वांचीच आहे. ती कांही कोणत्याहि एका पक्षाला आंदण दिलेली नाही. मी प्रथम देश तयार करणार, कांग्रेसमध्ये शिरणार व कांग्रेस काबीज करणार आहें. " आपलें हें म्हणणें लोकमान्यांनी दोनच वर्षांत खरें करून दाखविलें.

समेटाचा उद्योग बिझांटबाईंनी सुरू केला. थिऑसोफिस्टांमध्ये प्रमुख असलेल्या या बाईंनी १९०३ सालापासून हिंदुस्थान ही आपली कर्मभूमि मानली होती. त्यांनी बनारस येथे सेंट्रल हिंदु कॉलेज स्थापून तें चालविलें होतें. बाईंच्याविषयी आदरभाव बाळगणारा सुखवस्तु सुशिक्षितांमध्ये बराच मोठा वर्ग होता. त्या अलीकडे कांग्रेसमध्ये प्रविष्ट झाल्या असून आपल्या कर्तृत्वाने तिथे चमकूं लागल्या होत्या. टिळकांनी कैदेंतून सुटल्यानंतर राजनिष्ठेचा जाहिरनामा काढला तेव्हा टिळक आणि त्यांचा

राष्ट्रीय पक्ष यांनी कांग्रेसमध्ये यावें अशा बुद्धीने त्यांनी खटपट सुरू केली. बाई व कांग्रेसचे सेक्रेटरी सुब्बराव पंतलु दोघे स्वतंत्र रीतीने टिळकांना भेटले. कांग्रेस मद्रासला भरायची होती. बाईंचें टिळकांच्या भेटींत समाधान झाल्यामुळे त्यांनी मद्रासला जाऊन टिळक पक्षाला कांग्रेसमध्ये येतां यावें अशा रीतीची घटनेंत दुरुस्ती सुचविली. दरम्यान सुब्बराव टिळकांना भेटून गोखल्यांना भेटायला गेले; त्यांनी टिळकांच्या त्या वेळच्या दृष्टिकोनासंबंधी तोंडी जी हकीकत गोखल्यांना सांगितली त्यावरून गोखल्यांनी एक खाजगी पत्र कांग्रेसचे अध्यक्ष भूपेन्द्रनाथ बसू यांना लिहिलें. त्यांत ' टिळक सरकारवर बहिष्कार घालण्याचा उपदेश करणारे आहेत; तेव्हा त्यांच्याशीं समेट करण्यांत येऊं नये ' अशा आशयाचा मजकूर होता. तो बसूंनी विषय-नियामक समितींत वाचून दाखविला, त्यामुळे समेट होऊं शकला नाही.

यावर खूप कडाक्याचा वाद झाला, त्याच्या खारट तुरट तपशिलांत शिरण्याचें आता कांही कारण उरलेलें नाही. समेटाला वास्तविक इतर प्रांतांतली मंडळी अनुकूल होती. बंगालचा तर पुढाकार होता. विरुद्ध होती काय ती घरचीच, म्हणजे मुंबई–पुण्याची मंडळी. मुंबईचे पुढारी फेरोजशहा मेथा आणि त्यांचे अनुयायी राजकीय बाबतींत टिळकांचे कट्टे विरोधक होते. टिळकांचे मार्ग देशाला घातक आहेत, तस्मात् त्यांना कांग्रेसबाहेरच ठेवावें असें त्यांचें प्रामाणिक मत होतें. पण माझ्या देशाच्या अंतिम महत्त्वाकांक्षेला मी कोणतेंहि बंधन मानीत नाही, तसेंच बहिष्कार, निःशस्त्र प्रतिकार हीं साधनें आपल्या विचारकक्षेंत येऊं शकतात व प्रसंगविशेषीं त्यांचा अवलंबहि करण्यास हरकत नाही, असें स्वतः प्रतिपादणाऱ्या गोखल्यांनी समेटास विरोध करावा, ही गोष्ट आज लक्षांत घेतली म्हणजे खेदकारक वाटल्याखेरीज राहत नाही.

समेटाचा डाव १९१४ सालीं फसला, तरी १९१५ सालीं मुंबईस भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत अर्धवट दार उघडून टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाला आंत येतां येईल अशी व्यवस्था करण्यांत आली. पण खुद्द टिळक पक्षांत समेटाबद्दल एकमत कुठे होतें ? मवाळांनी केलेल्या प्रतिज्ञापत्रकावर सही करून कांग्रेसमध्ये जाणें अपमानास्पद आहे; मग

मवाळांत आणि आमच्यांत फरक तो काय राहिला ?—अशी ब-याच जणांची मनोभावना होती. कांग्रेसमध्ये घुसण्याचा टिळकांचा निर्धार ठाम होता. पण आपल्या अनुयायांना त्यांनी मनसोक्त काथ्याकूट करूं दिला. श्री. गंगाधरराव देशपांडे यांनी आपल्या आठवणींत टिळकांचे जे उद्गार दिले आहेत, त्यांवरून त्यांचें आपल्या अनुयायांविषयींचें मत सूचित होतें. टिळक म्हणाले, 'माझ्या मनांत क्रीडवर सही करून कांग्रेसमध्ये जावें असें आहे. कांग्रेसच्या बाहेर राहून कांही एक काम झालें नाही.' *

डॉ. मुंजे आपल्या आठवणींत म्हणतात,

"क्रीडवर सही करून कांग्रेसमध्ये शिरणें ही गोष्ट माझ्या बुद्धीला मुळीच पटत नाही....अर्थात ही श्रद्धेच्या परीक्षेची वेळ आहे म्हणून मी तुमच्या विरुद्ध जाणार नाही. अकल्याण व्हावयाचें असेल तर तुमची आज्ञा पाळून होवो. पण तुम्ही मात्र ही चूक करीत आहां. तेव्हा टिळक मला म्हणाले, 'या वेळेस हेंच करणें शहाणपणाचें आहे हें तुमच्या लवकरच प्रत्ययाला येईल.' तिस-या दिवशीं टाइम्सने असें लिहिलें की समेटाच्या ठरावाने टिळकांनी कांग्रेस काबीज केली. तेव्हा माझे डोळे उघडले." *

## कांग्रेसचें कर्णधारत्व

टिळकांच्या अनुययायांपेक्षा टिळकांचा शत्रु टाइम्स याने टिळकांना अधिक चांगलें ओळखलें होतें, हें अनुभवावरून सिद्ध झालें. १९१६ सालीं लखनौ येथे पहिल्याच घडाक्यासरशी टिळकांनी कांग्रेसमध्ये आपलें वर्चस्व स्थापित केलें. टिळकांचें लखनौ येथे व वाटेंत सर्व ठिकाणीं अपूर्व स्वागत झालें. लखनौची कांग्रेस अधिकांत अधिक प्रातिनिधिक स्वरूपाची झाली. जहाल आणि मवाळ, हिंदु आणि मुसलमान सर्व जण एकत्र झाले होते. मुस्लिम लीगचें अधिवेशनहि तिथे त्याच वेळेला भरलें होतें. दोन्ही संस्थांची एकत्र बैठक होऊन स्वराज्याच्या मागणीचा एकच ठराव सर्वानुमतें उत्साहाने संमत करण्यांत आला. पूर्वी कधी घडली नव्हती अशी ही

* लो. टिळकांचें चरित्र, खंड ३, भाग २, पान ९.

अपूर्व गोष्ट घडली. या सर्व बनावाला टिळक हेच सर्वस्वी कारणीभूत होते असें म्हणणें अर्थातच चुकीचें होईल. पण स्वराज्याच्या भरीव हप्त्याची ठाम व ठोस मागणी करण्याचें आणि मुसलमानांना झुकतें माप देऊन त्यांचा या मागणीला पाठिंबा मिळविण्याचें सर्वांत अधिक श्रेय कोणत्याहि एका व्यक्तीला असेल तर तें टिळकांनाच होय याविषयी शंका नाही.

हिंदुमुसलमानांची व जहाल मवाळांची ही अभूतपूर्व एकी पाहून नोकरशाहीने एकीकडे दडपशाहीला सुरवात केली व दुसरीकडे भेदनीतीचे प्रयोग सुरू केले. नेमस्तमंडळी लवकरच आपली वेगळी परिषद भरवूं लागली आणि त्यांच्या 'क्रीड' मध्ये पुढे फरक करण्यांत आल्यानंतर त्यांनी कांग्रेस अजीबात वर्ज केली. दडपशाहीचे प्रयोग व त्यासंबंधी टिळकांचें धोरण याचा पूर्वी उल्लेख केलाच आहे.

## मांटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा

ता. २० आगष्ट १९१७ रोजीं भारतमंत्री एडविन मांटेग्यू यांचा 'हिंदुस्थानाला जबाबदार सरकार देऊन ब्रिटिश साम्राज्याचा भागीदार करण्याचें ब्रिटिश सरकारचें धोरण आहे' असा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. त्यामुळे वातावरण किंचित शांत होण्यास मदत झाली. ता. १७ सप्टेंबर रोजीं बेझंटबाईंची मुक्तता झाली. मांटेग्यूसाहेब स्वतः हिंदुस्थानांतल्या जनतेचें मत जाणून घेण्याकरिता नोव्हेंबरमध्ये हिंदुस्थानांत आले. अनेक संस्थांच्या शिष्टमंडळांच्या मुलाखती त्यांनी घेतल्या; कांही विशिष्ट महत्त्वाच्या व्यक्तींच्याहि भेटी घेतल्या. टिळकांनी अर्थात आपल्या होमरूल लीगचें शिष्टमंडळ दिल्लीस नेलें होतें; शिवाय व्यक्तिशः टिळकांची भेट मांटेग्यूने घेतली. ता. २६ डिसेंबर रोजीं कांग्रेसचें ३२ वें अधिवेशन कलकत्त्याला बेझंटबाईंच्या अध्यक्षतेखाली भरलें. लखनौ येथे मंजूर झालेली कांग्रेस-लीगची सुधारणा योजना स्वराज्याचा पहिला हप्ता म्हणून तात्बडतोब द्यावा आणि विशिष्ट कालमर्यादेंत पूर्ण स्वराज्य देण्याचें मान्य करावें अशी मागणी या अधिवेशनांत ठराव रूपाने करण्यांत आली. ही मागणी साध्य करून घेण्यासाठी विलायतेंत शिष्टमंडळ पाठवावें असें ठरलें.

लखनौच्या कांग्रेसपासून लोकमान्य जेव्हा जेव्हा संधि मिळेल तेव्हा तेव्हा व्याख्यानांचे दौरे काढून स्वराज्याच्या ठरावाच्या पाठीशीं प्रबळ लोकमत संघटित करीत होते. एप्रिल–मेमध्ये कर्नाटकांत बऱ्याच ठिकाणीं त्यांनी व्याख्यानें दिलीं. १९१८ च्या फेब्रुवारीमध्ये त्यांनी वऱ्हाडांत तुफानी दौरा केला. कौन्सिलें, राजदरबार किंवा सत्ताधीशांच्या भेटीगाठी हें टिळकांचें खरें कार्यक्षेत्र नव्हे. त्यांचें खरें कार्य जनतेंत होतें. यांतच त्यांचें लोकमान्यत्व होतें.

पुढे होमरूल लीगच्या तर्फे विलायतेस दहा बारा जणांचें शिष्टमंडळ पाठवावयाचें ठरलें. जून १९१८ मध्ये मांटेग्यू–चेम्सफोर्ड सुधारणांचा आराखडा प्रसिद्ध झाला, तर दुसरीकडे लगोलग रौलॅट कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध होऊन रौलॅटच्या नांवाने कुप्रसिद्ध झालेलीं दडपशाहीचीं दोन बिलें प्रसिद्ध झालीं. कांग्रेसचें जादा अधिवेशन २९ आगष्ट १९१८ रोजीं भरलें. त्यांत अर्थात टिळकांचा प्रमुख भाग होता. सुधारणांच्या आराखडयावर राष्ट्रातर्फे असमाधानकारक व निराशाजनक असा शिक्का मारण्यांत आला.

ता. १९ सप्टेंबर रोजीं टिळक विलायतेला रवाना झाले. ३० आक्टोबरला ते तिथे पोचले. या वर्षीची राष्ट्रीय सभा दिल्लीला भरायची होती, तिच्या स्वागत मंडळाने टिळकांची एकमताने अध्यक्षपदासाठी निवड करून त्यांना तार पाठविली. टिळकांनी तारेनेच आभारपूर्वक नकार पाठविला. पुढे राष्ट्रीय सभेच्या शिष्टमंडळामध्ये त्यांना समाविष्ट करण्यांत आलें. दिल्लीच्या राष्ट्रीय सभेने युद्धसमाप्तीनंतर भरणाऱ्या शांतता परिषदे-करिता प्रतिनिधि म्हणूनहि टिळकांची निवड केली. लगेच त्यांनी शांतता-परिषदेच्या अध्यक्षाला हिंदुस्थानाला स्वयंनिर्णयाचा हक्क देण्याविषयी मुद्देसूद युक्तिवाद करणारा अर्ज पाठविला. तसेंच पत्र अमेरिकेचा प्रेसिडेंट वुड्रो विलसन यालाहि पाठविलें. तहपरिषदेला पॅरिस येथे जाण्याकरिता त्यांनी पासपोर्टहि मागितला होता. तो अर्थात मिळाला नाही. पण आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या वाटाघाटींत हिंदुस्थानच्या मागणीचें सोवळेंभांडें त्यांनी टाकून दिलें ही गोष्ट फार महत्त्वाची होय. यांत लोकमान्यांची दूरदर्शी मुत्सद्देगिरी दिसून आली. या पहिल्या महायुद्धाच्या काळापासून कोणचेंहि राष्ट्र एकएकटें आपल्यापुरतें विचार करूं शकत नाही, इतरांची मदत,

सल्लामसलत युद्धांत काय, किंवा राष्ट्राराष्ट्रांच्या इतर व्यवहारांत काय, घ्यावी लागते, हें सिद्ध झालें. तेव्हा इंग्लंडच्या पायाखाली काय जळतें आहे हें इतर राष्ट्रांच्या मुत्सद्यांच्या कानावर खुद्द पददलित राष्ट्रांतल्या लोकांनी घातल्याने इंग्लंडला थोडें तरी ओशाळगत, अवघडल्यासारखें वाटणार हें नक्की. विशेषतः अमेरिका ही स्वातंत्र्याची व स्वयंनिर्णयाची पुरस्कर्त्री म्हणून प्रसिद्ध. तिने दोस्त राष्ट्रांना जय मिळवून दिला असल्यामुळे तिचें प्रस्थ विशेष. तेव्हा तिच्या अध्यक्षाच्या कानीं आपलें गाऱ्हाणें घातलें व त्याने जर ब्रिटिश पंतप्रधानाला, सौम्य कां होईना, चिमटा घेतला, तर त्याचा उपयोग कांही ना कांही तरी होणार ! दुसऱ्या महायुद्धानंतर हिंदुस्थानला स्वराज्य मिळण्यास अमेरिकेच्या टोचणीचा उपयोग झाला हें विदितच आहे.

टिळक विलायतेंत पोचल्यानंतर सर्व बाबतींत काळ प्रतिकूल झाला. महायुद्ध संपलें व दोस्तांचा विजय झाला. ब्रिटिश साम्राज्यशाहीला विजयाचा उन्माद चढला. पार्लमेंटच्या निवडणुकी १९१९ च्या जानेवारींत झाल्या, त्यांत ज्या मजूरपक्षावर टिळकांनी विशेष भिस्त ठेवली होती त्याची फारच कमी मंडळी निवडून आली. फेब्रुवारींत टिळकांनी चिरोलवर जी अब्रूनुकसानीची फिर्याद लावली होती तिचा निकाल टिळकांच्या विरुद्ध झाला. पुढे शिष्टमंडळांचें काम सुरू करायचें, त्यांत कांग्रेसची ब्रिटिश कमिटी व इंडिया पत्र यांच्या प्रतिकूलतेमुळे अडथळा येऊं लागला. मे महिन्यांत पटेल केळकर वगैरे कांग्रेसच्या शिष्टमंडळांतले लोक येऊन पोचले व काम जोरांत सुरू झालें. ब्रिटिश कमिटी व इंडिया पत्र स्वाधीन करून घेतलें. हिंदी सुधारणांच्या बिलावर पार्लमेंटने सिलेक्ट कमिटी नेमली होती तिच्यापुढे साक्षी झाल्या. होमरूल लीग टिळकांची स्वतःचीच होती. तिच्या तर्फे त्यांची एकट्याची साक्ष झाली. कांग्रेसच्या शिष्टमंडळाचें अधिकृत नेतृत्व टिळकांकडे नव्हतें, पण त्याचे मुखंड पटेल हे टिळकांना गुरुस्थानीं मानीत असल्यामुळे त्या शिष्टमंडळाचें कामहि टिळकांच्याच तंत्राने झालें. सभा व्याख्यानें, भेटी मुलाखती, पत्रकें पुस्तकें वगैरेंच्या द्वारा प्रचाराची धूम उडवून देऊन मंडळी परतली. स्वतः टिळक २६ नोवेंबर रोजीं मुंबईस येऊन पोचले. तेथे त्यांचा प्रचंड सत्कार झाला.

टिळकांच्या गैरहजिरींत इकडे हिंदुस्थानांत भीषण पर्व घडून आलें होतें. रौलॅट बिलें सबंध राष्ट्राच्या एकमुखी विरोधाला न जुमानतां सरकारने पास केलीं, त्याच्या निषेधार्थ गांधीजींनी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. तिच्यांतून कित्येक ठिकाणीं दंगे उद्भवले. अमृतसर येथे कांही गोरे लोक मारले गेले. त्याचा सूड उगवण्याकरिता लष्कर आणून डायरने जालियन-वाला बागेंत जमलेल्या असहाय लोकांची अमानुष कत्तल केली. पंजाबभर लष्करी कायदा पुकारून लोकांचा अमानुष छळ केला. या सर्व हकीकती ऐकून लोकमान्यांचें अंतःकरण कळवळलें. मुंबईस उतरल्याबरोबर पहिल्या स्वागताच्या सभेंत 'गांधीजींनी सुरू केलेल्या सत्याग्रहांत व नंतरच्या भयंकर प्रसंगांत मी तुमच्याबरोबर नव्हतों याचें मला वाईट वाटतें' असे त्यांनी उद्गार काढले. ता. २७ डिसेंबर १९१९ रोजीं अमृतसर येथे कांग्रेसचें अधिवेशन भरलें. पूर्वी पास झालेल्या ठरावांच्या धर्तीवर, 'हिंदुस्थान आजच जबाबदारीच्या स्वराज्याला पात्र आहे; आणि मांटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणांचा कायदा अपुरा, असमाधानकारक व निराशाजनक आहे' अशा अर्थाचा ठराव पास करून घेण्यांत टिळकांनी यश मिळविलें. याच ठरा-वाच्या चवथ्या कलमांत पूर्ण जबाबदारीचें स्वराज्य ज्या योगें मिळेल अशा रीतीने नवीन आलेल्या राजकीय सुधारणा राबवून घेण्याचा आदेश राष्ट्राला देण्यांत आला. महात्मा गांधी ही कांग्रेसमधली मोठी शक्ति एव्हाना बनली होती व राष्ट्राचें नेतृत्व त्यांच्याकडे जाणार असें चिन्ह दिसूं लागलें होतें. त्यांनाहि संभाळून घेऊन, पण आपले मुख्य मुद्दे न सोडतां सर्वसंमत ठराव करून घेण्यांत टिळकांनी यश मिळविलें.

## अखेरच्या कृष्णछाया

इथून पुढे सात महिने टिळकांचें आयुष्य राहिलें होतें. त्यांत आजाराचे शेवटचे ११ दिवस खेरीज करून बाकीचा काळ टिळक एक-सारखे कार्यव्यापृत होते. फेब्रुवारींत सांगलीस ज्योतिष संमेलन झालें, मार्चमध्ये मराठी मुलखांत सभा परिषदा वगैरे होऊन दिल्ली, अजमेर व सिंध प्रांतांत मोठा दौरा झाला. लगेच २ एप्रिलपासून पुढे सोलापुरास प्रांतिक परिषद झाली. सर्व ठिकाणीं टिळकांचें सांगणें एकच होतें.

" सुधारणेचें बिल अपुरें असलें तरी त्याचा त्याग करावा असें नाही. आज जें कांही मिळेल तेवढें तर पदरांत घ्याच, पण तेवढयाने संतुष्ट होऊन चळवळ सोडूं नका. "

आज जेवढें मिळालें आहे तेवढें तरी आपल्याच चळवळीचें व प्रयत्नांचें फळ आहे. तें खिशांत टाकून लगेच पुढे बाकीचें मिळवण्यासाठी झगडा करा. पूर्ण स्वराज्य मिळेपर्यंत स्वस्थ बसूं नका, हाच त्यांनी सभा परिषदां-मधून सांगितलेला शेवटचा संदेश होता. सुधारणा राबवून घेण्यासाठी त्यांनी कांग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना केली. या पक्षाचा जो जाहिरनामा त्यांनी तयार केला तो हिंदुस्थानच्या राजकीय आकांक्षांच्या दृष्टीने आजहि वाचनीय आहे. त्यांत ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थानला खुद्द ग्रेटब्रिटनच्या बरोबरीने भागीदारी, जागतिक शांततेची प्रस्थापना, राष्ट्रांचें स्वातंत्र्य, व्यापारी लुबाडणूक नष्ट करणें इत्यादि तत्त्वांचा समावेश केलेला आहे. अगदी प्रारंभींच कांग्रेसविषयी अढळ निष्ठा आणि डेमॉक्रसी ( लोकशाही) वर दृढ विश्वास हीं या पक्षाचीं तत्त्वें असल्याचें नमूद केलें आहे.

याप्रमाणे काम अव्याहत चाललें होतें व टिळक एकसारखे पुढे चालले होते; तरी प्रतिकूल व अप्रिय गोष्टींचे बदसूर या काळांत उमटले. त्यांच्या अंधाऱ्या व अपेशी छाया अखेरच्या दिवसांमध्ये त्यांच्या जीवना-वर वावरल्या ही विषादजनक गोष्ट झाली. ज्या ज्या सभांना टिळक हजर राहात, जिथे जिथे त्यांना मानपत्रें देण्यांत येत त्या त्या ठिकाणीं नवीन उद्भवलेल्या ब्राह्मणेतर पक्षाचे लोक आक्षेप घेत, विरोध करीत; प्रसंग-विशेषीं अशिष्ट प्रकार घडत व दंगल माजण्यापर्यंत पाळी येई. या विरोधांत नेमस्त पक्षाच्या निवडणुकीला उभे राहूं इच्छिणाऱ्या पुढाऱ्यांचा सहयोग असे. पण ते असत मूठभर आणि त्यांना बहुसंख्य ब्राह्मणेतर समाजांतली चेतविली गेलेली मंडळी साथ करीत असत. समाजांत उत्पन्न झालेल्या खेदकारक जातीय कटुतेचें हें बाह्यचिन्ह होतें. तो विषय फार मोठा आणि विवेचनेचा आहे. टिळकांच्या जीवनांत अगदी शेवटीं त्याने निर्माण केलेल्या कृष्णछायेचा उल्लेख करण्यापलीकडे इथे त्याचा विस्तार करण्याचें कारण नाही.

चिरोल केसमध्ये टिळक हरले तेव्हा त्यांच्यावर अडीच तीन लाख रुपयांचा बोजा बसला. तो जनतेने निवारण करावा या उद्देशाने टिळक इंग्लंडांत असतांनाच इकडे फंड जमविण्यास अनुयायी मंडळींनी सुरवात केली. हा फंड साधारणपणे केसमध्ये टिळकांना झालेला खर्च भरून काढण्याइतका जमला होता, तो अर्पण करण्याचा समारंभ ता. २२ मे १९२० रोजीं पुणें येथे झाला. सुरवातीपासूनच या फंडाला पुष्कळ निंदक उत्पन्न झाले होते, त्यांत तावत्कालपर्यंत टिळकांचे राजकारणांत निष्ठावंत अनुयायी असलेले अच्युत बळवंत कोल्हटकर हे सामील झाले आणि त्यांनी खुद्द टिळकांसह इतरांवर बेसुमार टीका करण्यास सुरवात केली. टिळकांसंबंधी जन्मांत जितकें घाणेरडें कोणी लिहिलें नसेल इतकें या प्रकरणांत त्यांच्यावर लिहिण्यांत आलें. टिळकांकडून समर्पक उत्तर आल्यानंतरहि लिहिणारांची अर्वाच्य लेखणी थांबली नाही. या प्रकरणांतील ऐतिहासिक दृष्टया लक्षांत घेण्याजोगें सार इतकेंच की टिळकांच्या राष्ट्रीय पक्षामध्ये स्वार्थ आणि स्वार्थामुळे उद्भवलेला दंभ व मत्सर यांची वाढ होऊं लागली होती.

आपसांतल्या या गलिच्छ वादाने टिळकांच्या मनाला फार वेदना झाल्या असल्या पाहिजेत. त्यामुळे त्यांचा मृत्यु अधिक जवळ आला की काय, याचा निर्णय कोण करूं शकणार ? अलीकडे दोन तीन वर्षे त्यांचें शरीर फार दुर्बल झालेलें होतें. हात कापत असत आणि चालतांना पाय लटपटत असत. डोळे आणि कान या इंद्रियांची शक्ति कमी झाली होती आणि मधुमेहाच्या कडक पथ्यामुळे खाणें अगदीच बेतांत आलें होतें. प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी आपल्या आत्म्याला शरीरांत डांबून ठेवलें होतें असें म्हटलें तरी चालेल. अखेरीस अंगांत थोडा ताप असतांना उघडया मोटारींतून लांबवर फिरून आल्याचें निमित्त होऊन फुफ्फुसदाहाचा व्याधि उद्भवला आणि त्याच्यावर मात करण्याइतपत त्राण उरलें नसल्यामुळे अकरा दिवस झगडून त्यांचा देह ता. ३१ जुलै १९२० च्या मध्यरात्रीनंतर १२ वाजून १० मिनिटांनी काळाच्या स्वाधीन झाला. ईश्वरी विभूतिमत्त्वाचें इतकें प्रचंड देणें लाभलेल्या व्यक्ति फार क्वचित जन्मास येतात.

# १३. प्राप्य वरान्निबोधत

## स्वातंत्र्य आणि लोकशाही

लोकमान्य टिळक आरंभापासून अखेरपर्यंत पूर्ण स्वातंत्र्यवादी होते हें सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. चिपळूणकरांनी आणि आगरकरांनी स्वातंत्र्याच्या ध्येयाचा जसा स्पष्टपणे उच्चार केला आहे, आणि आगरकरांनी चिपळूणकरांच्या स्वातंत्र्यवादाबद्दल निर्वाळा दिला आहे, तशी स्पष्ट खूण टिळकांच्या बाबतींत आढळत नाही. याचें कारण पूर्ववयांत राजकीय विषयावर तात्त्विक दृष्ट्या त्यांनी कांही लिहिलेंच नाही. पुढे प्रत्यक्ष राजकारणांत पडल्यानंतर अंतिम राजकीय ध्येयाचें प्रतिपादन लेखांतून किंवा भाषणांतून करणें सोयीचें नव्हतें. तरी तशा स्थितींत देखील 'इंग्लंडच्या बाहुटयाखाली पूर्ण स्वातंत्र्य' या ध्येयाचा उच्चार १९०२ सालीं केसरीमधून करण्याचें धाडस त्यांनी केलें होतें हें आपण पाहिलें आहे. आयुष्याच्या अखेरीस कांग्रेस डेमोक्राटिक पक्षाचा जाहिरनामा त्यांनी काढला त्यांत ब्रिटिश साम्राज्यमंडळांत हिंदुस्थान हा ग्रेट ब्रिटनच्या बरोबरीच्या दर्जाचा भागीदार व्हावा अशी मागणी नमूद केली आहे. यावरून असा एक संभव वाटतो की ब्रिटिश राष्ट्रकुलाचा सभासद राहूनहि पूर्ण स्वतंत्र अशी जी सध्या भारताची अवस्था आहे ती त्यांना मान्य झाली असती; स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रेट ब्रिटनपासून फुटून निघालेंच पाहिजे असा आग्रह त्यांनी धरला नसता.

मनाने निरंतर स्वातंत्र्यवादी असले तरी प्रकट लेखांत व भाषणांत स्वराज्य, स्वातंत्र्य या शब्दांची त्यांनी जपमाळ घेतली होती असें नाही. जुलूम नाहीसा झाला पाहिजे, आमचे हक्क आम्हांला मिळाले पाहिजेत, अशीच भाषा सर्वसाधारणपणे वापरली जात असे. पूर्वी स्वराज्य शब्दाची देखील भीति वाटत असे. कलकत्त्याच्या १९०६ च्या कांग्रेसपासून तो शब्द

चालू राजकारणाच्या संबंधांत येऊं लागला. पुढे होमरूलच्या काळांत 'साम्राज्यांतर्गत स्वराज्य' असा शब्दप्रयोग टिळक बहुधा वापरीत असत.

हें आपलें स्वराज्य किंवा स्वातंत्र्य पूर्ण लोकसत्ताक असलें पाहिजे अशी लोकमान्यांची ठाम भावना होती. कांग्रेस डेमोक्राटिक पक्षाच्या जाहिरनाम्यांत लोकशाहीवर अढळ विश्वास हें पक्षाचें एक प्रमुख लक्षण म्हणून प्रारंभींच नमूद केलें आहे. सामान्य जनता हें त्यांचें उपास्य दैवत होतें. जनता हाच परमेश्वर अशा भावनेने त्यांनी गीतारहस्य 'श्रीशाय जनतात्मने' अर्पण केलें आहे. सुधारक लोक त्यांना तेल्यातांबोळयांचे पुढारी म्हणून हिणवीत, तेंच आपलें बिरुद म्हणून लोकमान्य मिरवीत. हिंदुस्थानांतील जनतेचा मुख्य अंश जो शेतकरी त्याच्या संबंधाने टिळकांनी केसरींत जितक्या कळवळयाने लिहिलें तितकें दुसऱ्या कोणी कधी लिहिलें नसेल. इ. स. १८९६ च्या दुष्काळांत खेडयापाडयांतील जनतेचीच त्यांनी काळजी वाहिली; सोलापूरच्या कोष्टयांना वाचविण्याकरिता ते सरकारशीं झगडले. शिवाजी उत्सव, गणपति उत्सव यांसारख्या राष्ट्रीय महोत्सवांच्या निमित्ताने सुशिक्षितांनी खेडयांत जावें, तेथील जनतेशीं समरस होऊन त्यांच्यांत नवीन कल्पनांचा प्रसार करावा असें त्यांनी प्रतिपादिलें. 'खेडीं हाच आपला हिंदुस्थान देश आहे', 'खेडयांकडे परत चला' ( back to the villages ) इत्यादि अलीकडील उद्घोषांचा आशय त्यांच्या प्रतिपादनांत अशा रीतीने येऊन गेला आहे. गणपति विसर्जनाच्या मिरवणुकींत अस्पृश्यांचा गणपति त्यांनी आपल्या हाताने गायकवाड वाडयाच्या गणपतीशेजारीं नेऊन ठेवला वगैरे ज्या हकीकती त्यांच्या संबंधाने सांगितल्या जातात त्या त्यांच्या जनताप्रेमाच्या आणि समताभावनेच्या द्योतक होत.

हिंदुधर्माचा त्यांना पूर्ण अभिमान होता आणि वर्णव्यवस्था हें त्याचें महत्त्वाचें अंग होय, असें त्यांचें मत होतें. तथापि जातिविषयक आणि वर्णविषयक उच्चनीचतेच्या भावना लयास गेल्या पाहिजेत असें त्यांना वाटत होतें.

> " कालांतराने अशी स्थिति येऊं शकेल की ही वर्णव्यवस्था मोडून सर्व समाज पाश्चिमात्त्य समाजाप्रमाणे कराराच्या पायावर

उभारला जाईल." ... पण ..."हा (वर्ण) संकर पूर्ण होऊन सब-गोलंकार झाल्याखेरीज हिंदुस्थानच्या उन्नतीची आशा धरावयास नको, अशी कोणाची समजूत असेल तर ती साफ चुकीची आहे... कारण जेथे वर्णभेद नाही तीं राष्ट्रेंहि आमच्याप्रमाणेच आपत्तींत गुरफटलेलीं आहेत असें नजरेस येतें.... आणि सध्याच्या काळीं इंग्रजी साम्राज्यांतर्गत ज्या स्वराज्याची स्थापना करायाची आहे तें स्वराज्य मिळविण्यासहि वर्णसंकराची वाट पाहण्याचें कारण नाही."*

वर्णसंकराची वाट पाहण्याची जरूरी नाही, त्याचप्रमाणे देशहिताचीं कामें करतांना जातीकडे पाहण्याची मुळीच जरूर नाही असेंहि लोकमान्यांनी सांगितलें आहे.—

"पण हे भिन्नभिन्न देशहिताचे प्रकार सिद्धीस नेण्यास भिन्न भिन्न जातवारच लोक पाहिजेत असें मात्र त्याने सिद्ध होत नाही. अधिकारारूढ पुरुष त्याच विषयांत निष्णात असला म्हणजे झालें, मग तो जातीचा ब्राह्मण असो वा ब्राह्मणेतर असो, जैन असो वा लिंगायत असो, तिकडे पाहण्याचें कारण नाही. हल्ली येऊं घातलेल्या लोकशाहींत जें काय शिकावयाचें आहे तें हेंच."*

लोकशाहीवरील ही निष्ठा आगरकरांच्या ठायीं होती की नाही याबद्दल संदेह वाटण्यास जागा आहे. मानवी सुधारणेचीं खरीं तत्त्वें ज्यांना कळत नाहीत अशा अडाणी, रूढिप्रिय समाजाच्या हातीं सत्ता देण्याला त्यांचा विरोध दिसतो. पाश्चात्त्य देशांमधून मानवी सुधारणुकेचीं जीं तत्त्वें इंग्रजी विद्येच्या द्वारें इकडे आलेलीं आहेत, तीं ज्यांना पटलेलीं आहेत ते जरी अल्पमतांत असले तरी त्यांच्या मतानुसार सरकारने बिनदिक्कत कायदा करावा असें त्यांचें मत होतें. म्हणजे ( सगळाच्या सगळा समाज पाश्चात्त्य सुधारणेचीं तत्त्वें अंगीकारणारा होईपर्यंत तरी ) एक प्रकारची बुधजनसत्ता त्यांना पाहिजे होती. टिळकांचें मत असें नव्हतें. इंग्रजी विद्या न शिकलेला समाज असमंजस असलाच पाहिजे असें त्यांना वाटत नव्हतें.

---

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग ३, पृ. ४५५–५७.

तर्कशुद्ध छाननी केली तर आगरकरांचा स्वातंत्र्यवाद देखील निरपवाद नसावा अशी शंका येते. 'सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल, सांप्रतकाल' या नांवाने त्यांनी लेख लिहिले त्यांत असें प्रतिपादन केलें की

"आमचें सांप्रत पारतंत्र्य हेंच सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास कांही अंशीं अनुकूल झालें आहे."

"सामाजिक व धार्मिक बाबतींत हवें तें करण्यास आज आम्हांस पूर्ण मुभा आहे. आम्ही स्वतंत्र असतों तर असें झालें नसतें."*

या दोन विधानांचा फलितार्थ असा की सामाजिक सुधारणा जर आम्हांस पाहिजे असेल ( आणि आगरकरांच्या मतीं ती आम्हांस अत्यवश्यक आहे) तर सुधारणा होऊन जाईपर्यंत तरी आपलें पारतंत्र्य कायम राखणें इष्ट आहे!

आगरकरांच्या विचारसरणींतून स्वातंत्र्य आणि लोकशाही यांना कांही काळ तरी अपवाद करण्यास हरकत नाही अशीं मतें निष्पन्न कां झालीं याचें कारण त्यांची मूलभूत भूमिका लक्षांत घेतली म्हणजे आपणास उमगतें. 'मनुष्यसुधारणेचीं अत्यंत परिणत तत्त्वें आज युरोपांत दृष्टीस पडत आहेत, आणि त्यांचें अनुकरण केल्याखेरीज आपला निभाव लागणार नाही' हें महान गृहीतकृत्य ( assumption ) त्यांच्या एकंदर विचारसरणीच्या बुडाशीं आहे. त्यामुळे, मनुष्यसुधारणेच्या ह्या परिणत तत्त्वांचा आपल्या समाजाकडून जोंपर्यंत स्वीकार झाला नाही तोंपर्यंत लोकशाही आणि स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी बाजूस ठेविल्या पाहिजेत, हें फलित ओघानेच आलें. टिळकांना मुळांत हें गृहीतकृत्यच मान्य नव्हतें, म्हणूनच लोकशाही आणि स्वातंत्र्य या तत्त्वांना कोणताहि अपवाद करण्याची त्यांना जरूर भासली नाही. मनुष्यसुधारणेचीं परिणत तत्त्वें काय तीं युरोपांत, आणि आमच्या धर्मांत जीं मूल तत्त्वें आहेत तीं अगदी हीन, अशी वास्तविक स्थितिच नाही; दोन्ही संस्कृतींत कांही चांगले तर कांही वाईट भाग आहेत; दोहींच्या संघट्टनाने योग्य त्या सुधारणा होत जातील. त्यासाठी

* निबंधसंग्रह, भाग १, पृ. १४०-४१.

स्वातंत्र्य व लोकशाही खोळंबून ठेवण्याचें कारण काय ? असें टिळकांचें म्हणणें होतें.*

आगरकर स्वातंत्र्यसमतावादी सुधारक असूनहि राजकीय स्वातंत्र्य व लोकशाही यांच्या बाबतींत मागे कां, आणि टिळक धर्माभिमानी, परंपराभिमानी असूनहि राजकीय स्वातंत्र्य व लोकशाही यांच्या बाबतींत पुढे कां, याची तर्कशुद्ध उपपत्ति ही अशी आहे.

## सुधारणांची कार्यकारणमीमांसा

आज आपणास स्वातंत्र्य मिळून नऊ वर्षें झालीं आहेत. आगरकरांच्या देहावसानाला ६१ व टिळकांच्या मृत्यूला ३६ वर्षें लोटलीं आहेत. दोघां थोर पुरुषांपैकी प्रत्येकाच्या कार्याचें फलित काय झालें, तसेंच दोघांपैकी कोणाची विचारसरणी खरी ठरली हें आजमावून पाहण्यास आता उत्तम सवड झाली आहे. थोडक्यांत ही अजमावणी करून पाहूं या.

स्वातंत्र्य मिळालें आहे. बऱ्याचशा सुधारणा झाल्या आहेत. परंतु या दोघांमध्ये कार्यकारणसंबंध कितपत आहे ? पांढरपेशा वर्गाच्या स्त्रियांचें केशवपन थांबलें आहे; विधवापुनर्विवाह रूढ झाले आहेत; बालविवाह ही गतकालीन गोष्ट होऊन बसली आहे; स्त्रियांचें शिक्षण, पांढरपेशा वर्गामध्ये तरी, पुरुषांच्या बरोबरीनें होऊं लागलें आहे. या सर्व सुधारणा इंग्रजी शिक्षणानें जे नवीन विचार इकडे आले त्यामुळे मुख्यतया घडून आल्या; आगरकर आपटे यांच्यासारख्यांनी केलेल्या दटावणीच्या व कांतासंमित उपदेशाचेंहि त्यांना पाठबळ मिळालें. या सर्व सुधारणा इष्ट आहेत यांतहि वाद नाही. पण यांचा व राजकीय स्वातंत्र्याचा कितीसा कार्यकारणसंबंध आहे ? या सर्व सुधारणा ज्या 'स्त्रीदास्यविमोचन' या मोठया सदरांत येतात, तें अगोदर होऊन गेलें आणि त्याच्यामुळे स्वातंत्र्याचे प्रयत्न जोरावून स्वातंत्र्य मिळालें असें तर दिसत नाही. याला दुसरें प्रत्यंतर असें की स्वातंत्र्य संपादन करण्याच्या कार्यांत ज्याचा मोठा भाग होता त्या अशिक्षित बहुजन समाजाला हा सुधारणांचा कार्यक्रमच नीटसा लागू पडत नाही. त्या

---

* तपशीलवार विवेचन प्रस्तुत पुस्तकाच्या ७व्या प्रकरणांत पहा.

समाजांत केशवपनाचा व बहुंशीं विधवापुनर्विवाहाचा प्रश्न नाही. स्त्री-शिक्षणाचा प्रश्न आहे, पण त्याला स्वातंत्र्य मिळेपर्यंत तोंड लागलें नव्हतें. तेव्हा कार्यकारणसंबंध जुळत नाही.

ज्या सुधारणांचा स्वातंत्र्यसंपादनाशीं उघड संबंध दिसतो, त्यांच्या संबंधाने विचार करूं. जातीजातीमध्ये, समाजासमाजामध्ये एकोपा स्थापित झाला म्हणजे राष्ट्राची एकजूट होईल आणि त्यामुळे स्वातंत्र्यसंपादन सुलभ होईल, हा सिद्धांत कुणालाहि पटण्याजोगा असाच आहे. त्याच कारणास्तव अस्पृश्यतानिवारणाची आवश्यकताहि उघड दिसणारी आहे. जातीजातींतील एकोप्याचें सर्वोत्तम स्वरूप म्हणजे जातिभेद नष्ट करणें, त्यापेक्षा खालच्या पायऱ्या म्हणजे जातिविषमता कमी करणें, उच्चनीचभाव नाहीसा करणें, इत्यादि. रानडे आगरकर प्रभृति सुधारकांनी यद्यपि व्यक्तिसमतेचें तत्त्व प्रतिपादिलें होतें, आणि जातिभेदाची अनिष्टता वर्णिली होती, तथापि या सुधारणांचा हिरिरीने त्यांनी प्रचार केला असल्याचें दिसत नाही. पांढरपेशा वर्गांतील स्त्रियांच्या परवश, कष्टमय स्थितीसंबंधाने जसें त्यांनी वारंवार तळमळीने लिहिलें तसें जातिवैषम्याबाबत लिहिलेलें दिसत नाही. मध्यंतरींच्या काळांत अनेक सामाजिक व आर्थिक कारणांमुळे जातिविषमता, उच्चनीचतेची भावना वाढतच गेली. याचा अर्थ, पारतंत्र्याचे वळसे जसजसे जास्त बसत गेले तसतशी, या बाबतींत तरी, सामाजिक सुधारणेची पीछेहाट होत गेली, असा सरळ होतो. पण पुढे स्वातंत्र्याची चळवळ जसजशी जोरावली, संग्रामाची आघाडी विस्तृत झाली, तसतशी जातीजातींच्या ऐक्याची नौबत झडली; जातिवैषम्यनिरासाचें कार्य एकदम पुढे सरसावलें. स्वातंत्र्यसंपादनानंतर गेल्या नऊ वर्षांत याबाबत कसे नेटाचे प्रयत्न होत आहेत हें आपण पाहतच आहों. म्हणजे यासंबंधांत ‘स्वाभिमान, हुरूप, स्वराज्यनिष्ठा इत्यादि गुण जिथे वसत असतात, त्या ठिकाणीं सुईच्या मागे जसा दोरा तद्वत सामाजिक सुधारणाहि मागोमाग येत असतात’ हें लोकमान्य टिळकांचें म्हणणें खरें ठरलें.

अस्पृश्यतानिवारणाची गोष्ट अशीच. महर्षि अण्णासाहेब शिंदे आणि इतर कांही मंडळी यांनी आपलीं आयुष्यें या कार्याकरिता वेचिलीं. त्यांना

यश आलें, पण फार मर्यादित. महात्मा गांधींनी स्वातंत्र्यसंपादनाच्या कार्यक्रमांत एक कलम म्हणून तें गोवून दिलें. स्वातंत्र्यसंपादनाच्या हुरुपांत त्याचा समावेश झाल्यामुळे त्याचा वेग एकदम वाढला. अस्पृश्यता नष्ट केल्याचें कलम घटनेंत घालण्यांत आलें आणि स्वातंत्र्यसंपादनानंतर या कार्याची प्रगति अधिक त्वरेने होत आहे.

आर्थिक व भौतिक परिस्थितीमुळेहि सुधारणा होत असतात. या खरोखर सुधारणा म्हणून होत नसून परिस्थितीने भाग पाडल्यामुळे होणारें अवस्थांतर असतें. आगगाडी, आगबोट, मोटार या प्रवाससाधनांमुळे सोवळेंओवळें, शिवाशिव, मुहूर्तनक्षत्र इत्यादि अनेक चालींचें बंड कसें मोडलें हें सांगावयास नको. पण हें विचारपूर्वक झालें नसल्यामुळे खाण्यापिण्यांतील अस्वच्छता व बकालीपणा यांत वाढ झाली हा दुष्परिणामहि घडला. विवाहाचें उदाहरण असेंच. ब्राह्मणादि जातींतील मुलामुलींच्या विवाहाचीं वयें वाढलीं तीं मुख्यतया आर्थिक परिस्थितीमुळे, आगरकरादि सुधारकांच्या आक्रोशामुळे नव्हे. या प्रवाहपतितत्वामुळे वृद्धा कुमारींचा अथवा असंमत कौमार्याचा बिकट प्रश्न समाजापुढे उभा राहील की काय असें वाटूं लागलें आहे.

## बुद्धिवाद आणि अध्यात्म

'मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन' हें जें आगरकरांनी वर्णिलेलें सर्व सुधारणेचें साध्य त्याच्याविषयी थोडासा विचार करूं. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सुखसमृद्धीच्या शिखरावर पोचलेल्या इंग्लंडमधील मिल, स्पेन्सर इत्यादि तत्त्वज्ञांनी जीं तत्त्वें प्रतिपादिलीं त्यांचें हितकारकत्व आगरकरांना पटलें आणि तीं तत्त्वें त्यांनी स्वसमाजाला उपदेशिलीं.

मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन म्हणजे काय? 'ऐहिक', म्हणजे या जगांतील, हा शब्द वापरून आगरकरांनी पुनर्जन्म, परलोक, मेल्यानंतर सद्गति इत्यादि कल्पनांचा त्याग केला आहे हें उघड आहे. मेल्यानंतर आत्म्याचें अस्तित्व मानण्यास कांही आधार नसल्याळे ते यासंबंधाच्या सर्व धर्मांमधल्या स्वर्ग, नरक इत्यादि कल्पना मानण्यास तयार नाहीत, त्याचप्रमाणे हिंदु व बौद्ध धर्मांतील कर्मविपाक व पुनर्जन्म यांसंबंधीचे

सिद्धान्त मानण्यास तयार नाहीत, हें स्पष्ट आहे. पण जन्माअगोदरच्या आणि मेल्यावरच्या स्थितीचा विचार जरी बाजूला ठेवला तरी, या जगांतल्या सुखाविषयी मनुष्यांच्या कल्पना अत्यंत परस्परभिन्न किंबहुना परस्परविरोधी असूं शकतात. दरमहा ४० रुपये पगारावर देशबांधवांना सद्विचार शिकविण्याकरिता हाडें झिजविणाऱ्या आगरकरांचें सुख आणि महालामध्ये मदिरेने धुंद होऊन विलासिनींच्या अंगसंगांत लोळणाऱ्या धनाढ्याचें सुख यांच्यांत जमीनअस्मानाचें अंतर आढळून येतें. मग कोणच्या सुखाचें वर्धन करणें हा मनुष्याने आपला धर्म मानावयाचा? कोम्ट याने आपल्या पॉझिटिव्हिस्ट तत्त्वज्ञानामध्ये आणि स्पेन्सरने आपल्या समाजशास्त्रीय तत्त्वज्ञानामध्ये याचें उत्तर असें दिलें आहे की जड सृष्टीच्या व्यापारांचें अधिकाधिक ज्ञान होऊन मनुष्याची भौतिक परिस्थिति जशी सुधारत जाईल तशा त्याच्या मनोवृत्तीहि विकसित होत जाऊन त्या अधिक उन्नत, परहितप्रवण होतील आणि पूर्वी परलोकांतील शिक्षेच्या किंवा देवादिकांच्या अवकृपेच्या भीतीने जे नीतिनियम तो आचरीत होता, ते नीतिनियम तो अखिल मानवजातीचें कल्याण हें परमोच्च ध्येय मानून त्या प्रीत्यर्थ आचरूं लागेल. याच विचारास अनुसरून आगरकर मनुष्याच्या धर्मविचारांसंबंधी लिहितांना आपल्या देवभोळ्या देशबांधवांस उद्देशून म्हणतात.—

> "...थोडया वर्षांत तुमचे देव मनुष्यापासून व पिशाचापासून निघाले आहेत अशी बहुतेकांची खात्री होऊन जाईल इतकेंच नाही, तर तुमच्या धर्माचारांतहि प्रचंड क्रांति होऊन तुमचें वर्तन पराकाष्ठेचें साधें व फक्त नीतीच्या नियमांनी चालणारें असें होईल... आणि सत्यपरायणता, न्यायरति, परोपकृति आणि शहाणपण इत्यादि सद्गुणांची वृद्धि होऊन लोकांना आतापेक्षा शतपट अधिक सुख मिळूं लागेल."*

पण तथ्यवादी किंवा विकासवादी शास्त्रज्ञांची ही विचारसरणी सर्व प्रश्नांचें उत्तर देऊं शकत नाही. ही जाणीव लोकमान्य टिळकांच्या मनांत

* निबंधसंग्रह, भाग २, पान ६१७.

उत्पन्न झाली. एकतर सृष्टीला विकासतत्त्व लागू आहे हा सिद्धांत ज्याप्रमाणें डार्विनने स्थापित केला, त्याप्रमाणे मानवी मनोवृत्ति देखील विकाससिद्धांताच्या अधीन आहेत हें कोणास शाबीत करतां आलेलें नाही. तसेंच इंद्रियभोगाने मिळणारें सुख हें परोपकार, सत्य इत्यादि तत्त्वांच्या आचरणाने मिळणाऱ्या सुखापेक्षा हीन कां मानायचें याचेंहि समाधानकारक उत्तर निर्भेळ ऐतिहासिकतावाद्यांना देतां येत नाही. आपल्या भोवतालचे लोक मोठमोठया नोकऱ्या पतकरून सुखांत राहताहेत हें दिसत असूनहि आगरकरांसारखा मनुष्य आपल्या देशबांधवांकरिता त्याग कां करितो? अंतःप्रेरणेमुळे तो असें करतो असें म्हटलें तर ऐहिकतेला बाध येतो. एक प्रकारें आपण आत्मतत्त्वाला मान्यता देतों असें होतें. दुसरें असें की सत्य कोणचें, नीति कोणची याविषयीं पुष्कळ वेळां प्रश्न पडतो. धर्म अधर्म, कार्य अकार्य याची गुंतागुंत सुटत नाही. एकाला जें सत्य वाटतें तें दुसऱ्याला असत्य वाटतें; इतकेंच नव्हे, तर एकाच व्यक्तीला पुढे दिसणाऱ्या दोन नैतिक कर्तव्यांपैकी ग्राह्य कोणतें व अग्राह्य कोणतें याचा निर्णय करतां येत नाही. तेव्हा निवळ ऐहिकता आणि निवळ बुद्धिवाद हे नीति न्यायादिकांच्या अंतिम कसोटीच्या दृष्टीने पंगु ठरतात, असें टिळकांचें म्हणणें आहे. ही कार्याकार्यव्यवस्थिति आपल्या उपनिषदांच्या परंपरेंतून आलेल्या अध्यात्म्याच्या आधारें भगवद्गीतेंत केलेली असून गीतेंत वर्णिलेल्या कर्मयोगाच्या सिद्धांतामुळेच नीतिशास्त्राला खरा शाश्वत आणि समाधानकारक आधार मिळतो. हेंच 'गीतारहस्य किंवा कर्मयोगशास्त्र' या आपल्या युगप्रवर्तक ग्रंथांत लोकमान्यांनी प्रतिपादिलें आहे. अखिल विश्व हें चैतन्यतत्त्वाचा किंवा परब्रह्माचा आविष्कार असून आपला आत्मा आणि हें विश्वचैतन्य दोन्ही एकरूप होत. या विश्वात्मैक्याचा साक्षात्कार झाला म्हणजे बुद्धि वासनारहित निरहंकार होऊन राग, द्वेष इत्यादि द्वन्द्वांपासून विमुक्त होते. अशा अनासक्त अनहंकार बुद्धीला आपलें कर्तव्य काय, अकर्तव्य काय, सत्य काय, असत्य काय याचा बोध होतो. यावरून शुद्ध निष्काम व सर्वांभूतीं सम झालेली अतएव फलासंगविरहित बुद्धि हेंच काय तें गीतेंत वर्णिलेलें सदाचरणाचें मूळ होय असें सिद्ध होतें. अशा निष्काम बुद्धीने लोकसंग्रहार्थ आमरणान्त कर्में करीत राहणें हेंच गीतेंतील सर्व उप-

देशाचें सार होय. हें गीतेचें सारतत्त्व जाणून घ्या आणि भारताच्या उद्धारासाठी निष्काम कार्यकर्ते व्हा,

उत्तिष्ठत जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत ।

असा लोकमान्यांचा नव्या पिढीस उज्ज्वल संदेश आहे.

केवळ बुद्धिवाद हा मानवी जीवनांतील नीतिअनीतीचे, कार्याकार्याचे गहन प्रश्न सोडविण्यास असमर्थ ठरतो. तो विचारवंतांचें पूर्ण समाधान करूं शकत नाही. त्याच्या पलीकडे अध्यात्म आहे. बुद्धिवाद कुंठीत होतो तिथे अध्यात्म आपलें समाधान करूं शकतें हें लोकमान्यांनी दाखवून दिलें. अध्यात्माची किंचित छटा आगरकरांनाहि स्पर्शून गेली असावी असें त्यांच्या पुढील उद्‌गारांवरून वाटतें.

> " ...आणि कांही वेळ सर्व ब्रह्मांडास उत्पन्न करून त्याचें परिपालन व नाश करणाऱ्या अशा एका परमात्म्याच्या कल्पनेचा उदय होतो. पण पुढे वेदांत विचाराच्या कुंडांत पेटलेल्या अग्नींत हें द्वैतहि खाक होऊन जातें आणि **अहं ब्रह्मास्मि** एवढा अनिर्वचनीय विचार मागे राहतो ! व्यक्तींच्या व राष्ट्रांच्या धर्मविचारांचा हा कळस आहे. एथपर्यंत ज्याची मजल आली त्याला सर्व धर्म तुच्छ आहेत. "*

अध्यात्म हें याप्रमाणे मानवी जीवनाचें अंतिम नियामक असलें, तरी मनुष्यांच्या सामान्य व्यवहारांमध्ये त्याची बुद्धि किंवा सारासार विचारशक्ति हीच योग्य मार्गदर्शन करते. रूढि, श्रद्धा, अंधभावना इत्यादिकांच्या योगाने बुद्धीला झाकोळून टाकणें हें केव्हाहि योग्य नाही, स्वतंत्र अनिर्बंध रीतीने तिला विचार करूं देणें हें अवश्य आहे, या आगरकरांच्या म्हणण्याला बाध येऊं शकत नाही. किंबहुना अध्यात्म हें देखील बुद्धीच्या विचारसामर्थ्याचेंच फळ आहे. लोकमान्य देखील आगरकरांइतकेच बुद्धिवादी होते. कोणत्याहि प्रश्नाचा विचार ते तर्कनिष्ठ रीतीने करीत असत. खुद्द गीतारहस्यांतील प्रतिपादन बुद्धिवादाचीच कास धरून तर्कनिष्ठ पद्धतीने केलें आहे. बुद्धि अथवा विचारशक्ति हें मानवाला प्राप्त झालेलें

---

* निबंधसंग्रह, भाग २, पान ६२०.

सर्वश्रेष्ठ साधन होय. त्याच्या उपयोगानेच मानवाने आजपर्यंत प्रगति केली आहे व पुढेहि करील.

या दोघां थोर पुरुषांच्या जीवनकार्याचें आणि त्यांच्या विचारसंपदेचें अगदी त्रोटक समालोचन एथवर केलें; एवढयाशा अवकाशांत सर्व तपशील, सर्व मुद्दे किंवा सर्व शाखा यांचा परामर्श घेणें शक्य नव्हतें. तथापि दोघां-च्याहि व्यक्तिमत्वाची आणि त्यांच्या प्रधान जीवितकार्याची यथातथ्य कल्पना आणून देण्यास प्रस्तुत पुस्तकांतील विवेचन उपयोगीं पडेल असें वाटतें.

दोघांच्या जीवनापासून एक निषेधात्मक धडा सर्वांनी घ्यावा असें इथे आवर्जून सांगावेंसें वाटतें. तो एकमेकांवर करावयाच्या टीकेच्या बाबतींत होय. या दोघांनी स्वमताभिनिवेशाच्या भरांत एकमेकांवर जी टीका केली ती, आपण काय करूं नये, हें जाणण्यासाठी डोळयासमोर वागवावयाचें उदा-हरण म्हणून घ्यावी. मतभिन्नता दर्शवितांना मतांबद्दलच साधक बाधक काय असेल तें बोलावें. आडून केलेली वैयक्तिक टीका, टोचून लिहिणें, उखाळया-पाखाळया असले प्रकार निर्धाराने वर्ज करावे. अशा प्रकारांनी मराठी जन-तेचें आजवर अतोनात नुकसान झालें आहे.

टिळक आगरकरांच्या चरित्रापासून काय घ्यावें याचें विवरण इथे करणें बऱ्याच अंशीं पुनरुक्तिरूप होईल. आतापर्यंतच्या समालोचनांत दोघांच्याहि विशिष्ट गुणांचा त्या त्या ठिकाणीं उल्लेख केलेला आहे. एक विचार सर्वांच्या मनांत प्रबळ व्हावयास पाहिजे. आपल्याला मिळालेलें स्वातंत्र्य आणि आपण स्थापिलेली लोकशाही आपल्याला टिकवावयाची आहे, संवर्धित करावयाची आहे. या कार्यासाठी दोघांच्या जीवनांत प्रकट झालेल्या सर्व गुणांचा आज उपयोग आहे. त्याग, निर्भयता, धैर्य, स्वावलंबन, देशाभिमान इत्यादि गुणांची जरूरी त्या काळांत जितकी होती तितकीच आज आहे. पोटांत लोभ आणि ओठीं त्याग असा दंभ नको आहे. तो केव्हाहि वाईटच, पण आजच्या स्थितींत फारच घातक होणारा आहे. टिळक आगरकरांच्या उदाहरणावरून आजच्या घटकेस सर्वांत अधिक उपयोगी गोष्ट कोणची शिकण्याजोगी असेल तर ती ही आहे. त्यांना

जें इष्ट वाटलें तें त्यांनी सांगितलें आणि साध्य झालें तें केलें. आंत एक बाहेर एक असा प्रकार कधीहि केला नाही. आज कार्य निराळें आहे. पण तें करण्यास या महात्म्यांचाच गुणसमुच्चय आजहि आपणास उपयोगी पडणार आहे. तेव्हा —

उत्तिष्ठत जाग्रत। प्राप्य वरान् निबोधत।

'उठा, जागे व्हा, आणि या महात्म्यांच्यापासून त्यांचे गुणरूपी वर मिळवून बुद्धि विशुद्ध करा' एवढेंच सांगावयाचें आहे.

समाप्त

# सूची


अणे, बापूजी, १५३
अध्यात्म १७६, २१७, २२०
अस्पृश्यता निवारण २१६
असहकारिता १८६, १८९
अळेकर, नारायणराव १५३
ॲस्टन, मॅजिस्ट्रेट १७३, १७४
आगरकर, गोपाळ गणेश ५२, ५६, ५९, ६७, १५४, अध्यात्मस्पर्श २२०; अनावृत पत्र १२५; ऐहिकतेसंबंधी २१७; कायदापक्षीय १०६; केसरीचे प्रेरक ५७,-लेख ८४,-तून बाहेर ८९; गोखल्यांचे गुरु ११९; चिपळूणकरांसंबंधी ४२,-चे सहकारी ४५,-शीं भेट ५३; जन्म ४९, -शताब्दी २; जीवनसमालोचन २१५-२२१; टिळकांशीं सख्य ५४, -शीं वाद ९५-१०७; तुरुंगवास ८२; त्याग ५३, ११८; दारिद्र्य ५१; ध्येयनिर्देश ११३; नेमस्तपक्षीय ११६; पुण्यतिथि उत्सव ११७; पूर्व संस्कार १७; बुद्धिवाद ११०,-चीं लक्षणें ११०-११३; मतभेद ८६; मृत्यु १२०, १५९; राजकीय मतें (बाजू) ११५, ११७, ११८; राष्ट्रकार्यांत उडी २७; रूढींवर टीका ११३; लोकहितवादीचा अवतार १०७; लोकशाहीनिष्ठा २१३, विद्याभ्यास ४९-५०; वैशिष्ट्य १०८; शैली, १०७; श्राद्धतिथि ९८; सुधारणा सिद्धांत १०१,-संप्रदायी ११८; सोसायटींतील वाद ७४; स्वभाव ९६; स्वराज्यवादी ११७; स्वातंत्र्य व समता यासंबंधी ११४; संपादक ८३; संस्थासंचालक ११९; शरीरप्रकृति १२०; शिक्षक ६१, ६२;
' आधुनिक भारत '-जावडेकरकृत १४०, १७८, १८८, १९८.
आपटे, दत्तोपंत १४३
आपटे, वामन शिवराम ५७, ६४, ६५, ६६, ६७, ८७, ११९, मराठ्याचे प्रेरक ५८, साक्ष ६२,
आमच्या देशाची स्थिति-निबंध, ३८, ४४, १२३
अंमलदार १३१, १४४
इंग्रज अधिकारी १३२
इंग्रजी अंमल ५,-भाषा ५,-वाङ्मय १० -विद्या १२, ४४ -शिक्षण ७, १२, १२५ -संस्कृति १०

इंडिया पत्र १६८, २०७
इंदुप्रकाश २३
इनाम कमिशन ८
इनामदार वर्ग ६, ७, ८, ११
ईस्ट इंडिया कंपनी ८, १८,
उपनिषदें १२३, २१९
उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा २२
उपाध्येगिरी ६
एकेश्वरी मत १३,
एक्साईज ड्यूटी–कर–११
एतद्देशीय, नेटिव्ह ९, १०
एलफिन्स्टन माऊंट स्टुअर्ट ७
एलफिन्स्टन कॉलेज ६५
ओरायन १९५
कनव्हेन्शन ( नेमस्तांची), १९१
कांट, तत्त्वज्ञ १०९
कर्झन, लॉर्ड १५९, १७२, १७६, १७७
करंदीकर, रघुनाथ पांडुरंग १५३
करबंदी १४३, १५०
कल्याणोन्नायक सभा २२
कानिटकर १३५
कारकुनी ६, ११
कारखानदारी, सुरुवात २०
क्राफर्ड प्रकरण ९०
क्रांति, या राष्ट्रांतील १, इंग्लंडांतील सामाजिक ८, औद्योगिक१,१५८
कायदेभंग १८७;–चें तत्त्वज्ञान १८३
'कायदेशीर' व 'सनदशीर' २०१
काळ–वृत्तपत्र १५२
काळे, अंताजी दामोदर १८२,
क्रीड (मवाळांचें ) २०३, २०५
कुळकर्णी वतन ७
क्लेमंटस्, सेशन जज १७४
केशवपन २१५, २१६; निषेध ११४
केसरी
कोल्हापूर प्रकरण ८२; गणेशोत्सवावर लेख १३३; गोखल्यांचें अभिनंदन १७२; खटल्याचे लेख १४७; ज्वलन्त प्रकरणें १५८; थिओसोफिस्टांवर लेख १२४; फॅमिन कोड सारांश १४२; प्रारंभ ४५, ५७; प्लेगविषयक १४५; केसरी मराठा १४९, १९७;– टिळक जन्मशताब्दी विशेषांक १९५;–पक्षभेदाविरुद्ध ओरड १९६; राजकीय लेखांची तेजस्विता ११७; –चें स्वरूप १६१; सरकारवर टीका १२६, सुधारकावर–१०६; लेखनामागील जाणीव १२६; हिंदुमुलमान दंग्यासंबंधी १२५; ह्यूमला पाठिंबा १६६
केळकर, नरसिंह चिंतामण ५, १३३, १४०, १४९, १५२, १९७, २०७
केळकर, वा. बा. ६७, ७४,८८, ९०

कांग्रेस डेमोक्रेटिक पक्ष २१२
कॉटन, सर हेनरी १६४, १७२
कोम्ट, आगस्ट तत्त्वज्ञ १०९,११०, २१८
कोल्हटकर, अच्युतराव २१०
कोल्हापूर प्रकरण ६; ८१-८३, १२५
कौशल्यशिक्षक सभा २५
खरे, दाजीसाहेब १४६
खाडिलकर, कृष्णाजी प्रभाकर १३३, १४०, १४९, १५२,
खापर्डे, गणेश श्रीकृष्ण १५३, १७८
गणपति उत्सव १२६, १२७, १३०, १३३, १३४, १३५, १५५, १५९, १९१
गद्रेवाडा ६६
ग्रंथोत्तेजक मंडळी २६
ग्लॅडस्टन १६५
गांगल, चिपळूणकरांचे सहकारी ५८
गांधी, महात्मा ६८, १००, १५१, १६९, १८६, १८७, १८९, २०८, २१७
गीता ३७, १२३, १९८
गीतारहस्य १९१,१५८,२१८,२२०
ग्रीन, सार्जंट ८२
गृहव्यवस्था ११, १२
गोखले, गोपाळ कृष्ण ७५, ७६, ११९, १२८, १३८, १५५, १५७,१७०,१७१,१७२, १८४, १८५, १८९, १९२, २०२
गोखले, हरि नारायण ८८, ९१
गोळे, महादेव शिवराम ६७
घोष, अरविंद १७७, १९७
घोष डॉ. रासबिहारी १९०
चतर्जी, बंकिमचंद्र ३४, १७६
चाफेकर, दामोदरपंत १४७
चिंतामणि, सी. वाय्. १५६, १६४
चिपळूणकर, कृष्णशास्त्री १४, १९, ३५, १२३
चिपळूणकर, विष्णु कृष्ण ११, २२, २६, २७, ४०, ४७, ५६, ५७, ६६, १२२,१२३, १५४, १६५, १८१, २११ उक्ति कृति ३८; जीवनसूत्र ४४; टिळक आगरकरांशीं भेट ५४; तत्त्वत्रिपुटी ६७; त्यागी पुरुष ५३; नवनेतृत्व ३४; निबंधमालेची सुरवात ३५; पारतंत्र्याची चीड ४१; बदली ३६; मनोभूमिका ५९; मृत्यु ४५; वैचारिक नेतृत्व ५५; संप्रदाय ४८; सामाजिक सुधारणा ४२; स्वतंत्र बाणा ६८
चिरोल, सर व्हॅलेंटाईन २०७;
छत्रपती, सातारचे ९
जंतुशास्त्र १५८
'जस्टिस' १४८

जहागिरदार वर्ग ६, ७, ८
जहाल (Firebrand) १३९
जहाल-मवाळ एकी २०५
जाईस, नामदार १६०
जातिभेद, ११४
जांभेकर, बाळशास्त्री १६
जालियनवाला बाग २०८
जावडेकर, आचार्य शं. द. १३९, १७८, १९८
जाहीरनामा, टिळकांचा १९७, २०२; १८५८ चा ९, १६०; काँ. डे. पक्षाचा २०९, २१२
जिनसीवाले, श्रीधर गणेश १५४
जिना, महंमदअली २००
जेसुईट संघटना ७५
जोशी, गणेश वासुदेव उर्फ सार्वजनिक काका २५, २८,
जोशी, वासुदेव गणेश उर्फ वासुकाका १४६, १४९, १५३
ज्योतिष संमेलन, सांगली २०८
टाईम्स ऑफ इंडिया १३२, १४८, २०४
टिळक आगरकर वाद ९५-१०७
टिळक, गंगाधरपंत ५०, ५१
टिळकपक्ष १३२, १३६, १३८, १५३
टिळक, लो. बाळ गंगाधर—अखेरच्या कृष्णच्छाया २०९; अचल निर्धार १७५; असंतोषाचे जनक १५७-१५९; आगरकरांविषयीं ११७, ११८; -शीं वाद ९५-१०७; —शीं सख्य ५४; आजीव सभासद ६७; कर्मयोग २०२; काँग्रेसकार्य २०२-२०५; कायदेभंगासंबंधी १८७; केसरी संपादक ८९, -मालक ९०; कोल्हापूर प्रकरण ८१-८२; खटला १८९७ चा १४५-४७; (मीमांसा १४७-४८, सुटका १४९); गांधीजींशीं साम्य १८६-१८९; चतुर्विध कार्य १२६-१२९; चरित्रापासून बोध २२१; चळवळीचें ध्येय १६१-६२; चिपळूणकरांचे सहकारी ४५; जन्म ५०; -शताब्दी १; जनजागृति १२७; टीकेचा विपर्यास १७०-७१; ताईमहाराज प्रकरण १७३; -साक्ष १७४; तेजस्वी नेतृत्व १२१; तेल्यातांबोळ्यांचे पुढारी २१२; दंग्यासंबंधी १२९-१३३; दंडाचा पहिला प्रयोग १६३; दीर्घ बंदिवास १९३; दुष्काळांतील कार्य १४१-४३; देशाभिमानी पंथ ९३; धर्मबुद्धि, धर्माभिमान १२२, १२४-२५, २१३; धीरोदात्त उद्‌गार १९३-९४, नव्या पक्षाची तत्त्वें १८०; नेमस्तांचा पाडाव १२८, -शीं वृत्तिभेद १६९-७०; पत्नीनिधन

१९६; पुराणप्रियता १५४-५५; पूर्वसंस्कार ९७; पूर्वीचेंच कार्य १५०; प्लेगमधील कार्य १४५; बहिष्कार प्रतिपादन व प्रवर्तन १८४-८५, १८८; बारिसाल प्रकरण १८६; बुद्धिवादी २२०; महाराष्ट्राचे सुपुत्र २; मित्रमंडळ १५२-५३; मूलभूत भूमिका ९८; मॉंटफर्ड सुधारणांविषयी २०५; मृत्यु २१०; राजकीय पक्षभेद १५५; राजनिष्ठा धोरण १५९-६०; राजीनामा ७१,-निवेदन ७२-७५, ७८; रानडयांसंबंधी २९,-वर टीका १३९; राष्ट्र-कार्यांत उडी २७,-भक्तीनें वेडे १८३; राष्ट्रीय महोत्सवांची उभारणी १३३-३६; राष्ट्रीय शिक्षणासंबंधी १८२; राष्ट्रवाद बौद्धिक १७८; राष्ट्रसभेंत चैतन्य १६४,-भाग १२७,-चा जनतेंत प्रसार १६६; लोकप्रियता १२६, १५१; व्यासंग १२३; विद्या व व्यायाम ५१, ५२; विकास-वादासंबंधी २१८-१९; विला-यतवाद २०६; शाळास्थापना ५७; शिक्षक ६०, ६१; सरकारी नियंत्रणें ७२; साधी राहणी १२२; सामाजिक दृष्टिकोन १०४; सामाजिक परिषद मंडपवाद १३७-३८; सार्वजनिक सभा काबीज १३८; सुधारणांसंबंधी १००, १०४, १०५, १०६, २१६; सुरतेची कॉंग्रेस १९०; सुटकेनंतर १९६; स्फूर्ति ५४-५५; सोसायटींतील वाद ७४; स्वदेशीचा पुरस्कार १८२; स्वभाव ९६; स्वातंत्र्यवादी (पूर्ण) ९९, २११; ह्यूमला पाठिंबा १६८; होमरूलचें कार्य १९८-२०२.

टेंपल, सर रिचर्ड ४१

डायर, जनरल २०८

डार्विन २१९

डिग्बी १६४

डेक्कन एज्युकेशन सोसायटी ६६, ७०,७७,८७, ८९, १३७,१५९

डेक्कन कॉलेज ५०, ५२,५४, ६५,

डेक्कन सभा ३१,१३९,१५६,१९२

डोंगरी तुरुंग ८२

तथ्यवाद-दी १०९, २१८

तय्यबजी, बद्रुदिन १४६, १६३

ताई महाराज १७३;-केस १९५;-प्रकरण १७२-७५;

तेलंग, न्या. १८, ८२, ८६, १६३

दत्त, रमेशचंद्र १४६, १५१, १६५

दर्पण, पत्र १६

दादाजी वि. रखमाबाई खटला ८८

दावर, न्या. १९३

दुष्काळ १८७६ चा १९, १४१, १४२;-१८९६ चा १२७, १४२ -१४३, १५७, २१२;-१८९९ चा १५८;
देशपांडे, गंगाधरराव १५३, २०४
धनुर्धारी ११
धर्मक्रांति, युरोपांतील २७
धर्मसुधारणा १४
धर्माभिमानी पंथ १३, २३
धूमकेतु, वृत्तपत्र १६
धारप, नारायण कृष्ण ६७
नव्या पक्षाचीं तत्त्वें १८७
नॅशनल पब्लिशिंग कंपनी १९२
नागपूरकर ( ट्रस्टी ) १७३
नातू, सरदार बाळासाहेब व तात्यासाहेब १५२
नामजोशी, महादेव बल्लाळ ६६, ६७, १५२
नारायण शेषाद्रि १३
निजबिट रे० १३
निबंधमाला १५, २७, ३५, ३६, ४०, ४४
निरोधन, पिकेटिंग १९१
निःशस्त्र प्रतिकार १८९, २०१
न्यू इंग्लिश स्कूल ५६, ६१, ६६, ६९, १५०, १७१, १८०
नेमस्त १८०, १८९, १९२;-पणा (Moderation) १३९, १८४; पक्ष १२६, १२८, १५५
नेटिव्ह ओपिनियन ( वृत्तपत्र ) ४३
नेटिव्ह स्कूल ॲण्ड बुक सोसायटी ७
नोकरशाही १२, १२१, १३०, १३१, १७३, १७५, १७६, १९२
नौरोजी, दादाभाई २४, १२६, १६४, १६७, १७१, १७३, १७९, १८५, १९०
पटवर्धन अण्णासाहेब १४०
पटेल, विठ्ठलभाई २०७
पंडित, बाबामहाराज १५२, १७३
पंडित, विष्णुशास्त्री २३
पंडिता रमाबाई ९०, ९१
पंतलु, सुब्राव २०३
परमहंस सभा १३, १४
परांजपे, शिवराम महादेव १३३, १३५, १३८, १४०, १५२
प्रभाकर ( पत्र ) १६
प्रत्यक्षवाद १०९
प्रतिकार १८०-१८९;-चें तत्त्व १८४
पक्षभेद १५५-१५७; १७२
पांगारकर, ल. रा. १३३, १५२
पाच्छाहीपणा १६१
पांढरपेशा वर्ग ६, १५, २१५, २१६
प्रांतिक परिषद बंगालची १८६; मुंबई १९१, १९९; सोलापूर २०८
प्रार्थना समाज २३
पार्लमेंट १६३, २०७
पाल, बिपिनचंद्र १७८, १९६
प्रिव्ही कौन्सिल १७४, १९५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्र 20५७१ रजि. ...
क्रमांक 632 नों: दि.

## सूची

पुणें म्युनिसिपालिटी १९१;- विद्यापीठ १४५
पुनर्विवाहोत्तक मंडळी २३
पुनश्च हरिः ॐ १४४, १४९, १५६
पूर्ण स्वातंत्र्य १६२, १९१, २०९
पुराणमताभिमानी पक्ष १३६
पूर्वनियतवाद ३७
प्लेग १४३-४५, १५८;-कमिटी १५८;-व्यवस्था १६५
फडके, वासुदेव बळवंत २१, २८, ४१
फॅमिन कमिशन १५८;-रिलीफ कोड १४१-४२;-फंड १४१
फर्ग्युसन कॉलेज ६५, ६९
फर्ग्युसन, सर जेम्स ६६, ६९
'फोडा आणि झोडा' १२९, १८९, १९२
फुल्लरशाही १८६
फुले, महात्मा ज्योतिबा ४६-४७,८३
बॅप्टिस्टा, बॅ. १९९, २०२
ब्रॅडलॉ, चार्लस १६३
ब्रह्मसमाज २३
ब्रह्मसूत्रवृत्ति १९५
बरवे, रा. ब. माधवराव ८१-८३
बसू, भूपेन्द्रनाथ २०३
बहिष्कार १७६,१७९, १८८,१९०; -योग १८४-१८५, १८९
बानर्जी, सुरेन्द्रनाथ १५७, १८४, १८६, १९०
बापू सदाशिव शेट १४
बाबा पदमनजी १३
बॉम्बे असोशिएशन २४
ब्राह्मण ६, ७, ११, १५, १६,२१७
ब्राह्मणेतर पक्ष २०९
बारिसाल प्रकरण १८६
बालविवाह ८४,- निषेध १४;- निराकरण ११४, २१५
बीकान्सफील्ड २०, ४१
ब्रिटिश कमिटी १६४, १७१, २०७
ब्रिटिश साम्राज्यशाही १९७, २०७
ब्रुईन, गुप्त पोलिस ऑफिसर १४८
बुधजनसत्ता २१३
बुद्धिवाद, १०८,१०९-११२,२१७, टिळकांचे आक्षेप २१९, २२०
बेझंट, मिसेस ॲनी २००, २०२, २०३, २०५
बेहेरे, दत्तोपंत १५४
बोडस, महादेव राजाराम १३९
बोर्ड ऑफ एज्युकेशन, मुंबई १०
बोस, हुतात्मा खुदीराम १९२
भागवत (आगरकरांचे मामा) ४९
भांडारकर, रा. गो. १८, २३, ६७, ७८, ९२, १५९
भारतेन्दु हरिश्चंद्र ३४
भास्कराचार्य ११३
भोपटकर बंधु, भालाकार १५२
भोसले, नागपूरकर ९
मॅक्सम्युलर १४६
मद्यपान निषेध १९१

मंडपाचा वाद १३६
मंडलिक, वि. ना. १९
मरेमिचेल, रे. १३
मलबारी, बेहेरामजी ८५, १०६
महाजन, भाऊ १६
महाजनि, वि. मो. ५०, ५३
महाराष्ट्र कॉलेज १४०
महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळ १८१, १९१
मांटेग्यू, एडविन २०५
मांटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा २०५-२०६, २०८
मिल, जॉन स्टुअर्ट ४१,१०९,२१७
मिशनरी लोक १०, १३, १४,१६९
मुंजे, डॉ. बा. शि. १५३,१७८,२०४
मुधोळकर, बॅरिस्टर १६५
मुंबई विद्यापीठ १८, ६७
मुस्लीम लीग २०५
मेकॉल, लॉर्ड ९, १०, ४१
मेटकाफ् १०
मेथा, फेरोजशहा ८२, १३२, १६४, १६५, १८४, १९०, २०३
मोडक, रे. रामकृष्ण १३, ८६
मोर्ले, लॉर्ड १८९, १९२
मोर्ले-मिंटो सुधारणा १९७
युनिवर्सिटी नियंत्रण कायदा १५९
रँड, प्लेग कमिशनर, १४४, १४५, १४७, १९२;-रँडशाही १४५
राजकीय स्वातंत्र्य ११८,-सुधारणांचें बिल १६३
राजद्रोह १४५, १५९, १९१-१९३, २००
राजनिष्ठा १९८
राज्यक्रांति, फ्रेंच ४४
राज्यपद्धतींत सुधारणा १६६
राजवाडे ६०
रानडे, न्या. म. गो. १८, २३, २५, २८-३३, ४२, ७८, ८६, ८८, ८९, ९२, ११८, ११९, १२२, १२८, १३२, १३३, १३९, १४०, १५४, २१६
रानडेपक्ष १३२, १३६, १३७, १३८
रामकृष्ण परमहंस १७६
राय, राजा राममोहन २३, ३०
राष्ट्रमत दैनिक १९२
राष्ट्रवाद १७६,-आध्यात्मिक पाया १७७,-बंगाली १७७
राष्ट्रीय पक्ष १५५, १८०, १८३, १९१, १९२, २०३, २१०
राष्ट्रीय शिक्षण ६८, १५०, १७९, १८२, १९०
राष्ट्रसभा (महासभा व कांग्रेस) १२६, १२९, १३४, १३६, १५१, १६२-१६४; १६७, १६९; अमृतसर २०८; कलकत्ता १७८, २०५; जादा २०६; दिल्ली २०८; मुंबई २०३; लखनौ १५६, १९९, २०४, २०५; विसावी १७२; सुरतेची १८९, १९०
रौलॅट कमिटी रिपोर्ट २०६
रौलॅट बिलें २०८

लजपतराय, लाला १७९, १८५, १९०, १९६
लाइबनित्झ, तत्त्वज्ञ १०९
लाड, डॉ. भाऊ दाजी १९
लिटन, लॉर्ड ४१
लिमये, वि. प्र. १९५
लीडर, पत्र १५६
लूथर, मार्टिन २७
लोकमान्य पदवी १७६
लोकशाही २०९, २११, २१३, २१४
लोकसंग्रह १५३
लोकहितवादी १२, १६, ३०, ४२, १०७, १०८;–शतपत्रें १२
वक्तृत्वोत्तेजक सभा २५
वंगभंग १५०, १७२, १७६, १८३,–ची चळवळ १८१
"वंदे मातरम्" १८६
वर्णसंकर २१३
वर्णाश्रमधर्म १२५
वसाहतीचें स्वराज्य १६१, १६२, १७९
व्हाल्टेअर ४४
वाच्छा १८२, १८४
व्हिक्टोरिया, राणी २०, १४५, १६०
विकासवाद २१८, २१९
विचारलहरी, पत्र १४
विजापूरकर, वि. गो. १८१–१८३,
विद्वांस, धोंडोपंत १४६, १५३
विधवापुनर्विवाह १४, ११४, २१५ –वाद २३
विलसन, प्रे० वुड्रो २०६
विवेकानंद १७६
विश्रामबाग पाठशाळा ७
विष्णुबुवा ब्रह्मचारी १४
वेडरबर्न, विलियम ६६, ६९, १६४, १६८, १७२, १८२, १८६
वेस्टलंड १८२
वैद्य, गजानन भास्कर १५२
शंकरशेट, नाना २४
शंकराचार्य २३
शारदासदन ९०, ९२
शिंदे, अण्णासाहेब २१६
शिवाजी उत्सव १२६, १२७, १३५, १५९, १७८, १९१
शिवाजी महाराज, कोल्हापूर नरेश ८१, ८२
शिवाजी, छत्रपति ८१, १३५
शिक्षणप्रसार, मिशनऱ्यांचा १०
शिक्षणस्वातंत्र्य ६३
सत्यशोधक पंथ ४६, ४८
सत्याग्रह १८६, १८७, १८९, २०१, २०८
स्त्रीदास्यविमोचन ११४, २१५
स्त्रीशिक्षण १४, ११४, २१६
सद्धर्मदीपिका (वृत्तपत्र) १४
सँढर्स्ट, लॉर्ड १६०, १६५
स्पेन्सर, हरबर्ट १०९, २०७, २१८
समता, सामाजिक ११३, ११४
संमतिवयाचें बिल १०६, १२५;–वाद ९०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6868

समर्थ विद्यालय १८१, १८२, १८३, १९१
समाजवादी पक्ष, आंतरराष्ट्रीय परिषद १७९
सय्यद अहमद १६३
सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी १८७
स्वदेशी १५०, १७६, १७९, १८०, १८२, १९०
स्वदेशी व्यापारोत्तेजक मंडळी २५
स्वराज्य १७९, १९०, २११, २१२
स्वातंत्र्य ११३, ११४, १६२, १९१, २०९, २११, २१४, २१७
स्वातंत्र्यनाश, कारणें ३९
स्वातंत्र्ययुद्ध, सत्तावनचें ९, १७
स्वातंत्र्यवादी संप्रदाय १२२, १२८, १५३, १८०
स्विनीसाहेब १७१
साठे, मोरशास्त्री २२
साठे, अ. सी. १४०, १४३
सामाजिक परिषद १२४, मंडप वाद १३६
सार्वजनिक सभा २४, १२८, १२९, १३२, १३८, १४१, १५७, १८०
सुधारक (पत्र) ८४, ९४, ९५, १०९, ११५;-राजकीय बाजू ११६, ११८
सुधारक (सुधारणा पंथ, संप्रदाय) १३ २३, ११७, ११९, १२२, १२६, १२८, १४७, १५५, १५६
सुधारणा, सामाजिक १४, ११४, २१५–२१७
सुधारणावाद ४३
सेन, केशवचंद्र २३
सेल्बी, प्रो. ५०, ६९, १८९
हंटर, वि. वि. ६२;-कमिशन ६२
हर्डीकर, भिकाजीपंत १५४
हॅरिस, लॉर्ड १३१
ह्यूम, ए. ओ. १६२, १६३, १६४, १६६, १६७, १६८
हॉवर्ड सोसायटी १४६
हिंदी राष्ट्रवाद १३१
हिंदी स्वराज्य संघ २००, २०१, २०२
हिंदु धर्म १३, १२३-२५, २१२, २१७
हिंदुमुसलमानांची एकी २०५,-चे दंगे १२५, १२९-१३३, १५३
हेस्टिंग्ज, लॉर्ड ९
होरूमल १९८–२०२;-लीग १६९, बिझांटबाईंची २००;-टिळकांची २००, २०१, २०६, २०७
ज्ञानचक्षु (वृत्तपत्र) २३
ज्ञानप्रकाश २३
ज्ञानप्रसारक (मासिक) १६
ज्ञानेश्वरी १८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 20454 वि: इतिहास
क्रमांक 632 नों: दि: 9/8/1956